भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
राष्ट्रीय पुस्तकालय, कलकत्ता
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

वर्ग संख्या
Class No. Mo4c 891.461
पुस्तक संख्या
Book No. V375g
रा० पु०/ N. L. 38. V.3

MGIPC—S4—9 LNL/66—13-12-66—1,50,000.

# वामनी

## वामन पंडितांच्या सर्व उ ग्रंथांचा संग्रह.

## भाग तिसरा.

# काव्य प्रकरणें.

( सन १८६७ चे २५ वे आक्टान्वयें सर्व हक्क प्रकाशकांनीं राखिले आहेत. )

# वामन[redacted]

# काव्यप्र[redacted]

जुनाट हस्तलिखित अनेक प्रतीं[redacted]

**बाळाजी आणि कंपनी**

यांनीं शुद्ध करून विपुल टिपांसह प्रसिद्ध केलीं.

वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला ।
प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुसाचि बोलविला ॥

मोरोपंत.

१८९१.

किंमत [redacted] रुपये.

Mar.
891.461
V 375 g
v.3

मुंबईंत.

" इंडिअन प्रिंटिंग प्रेस " छा. छापविली.

NATIONAL LIBRARY
NO. 10999
DATE 31.12.64
CALCUTTA

वामनी ग्रंथ, भाग तिसरा.

# काव्यप्रकरणें.

## अनुक्रमणिका.


| विषय. | श्लोकसंख्या. | पृष्ठ. |
|---|---|---|
| कृष्णजन्म. | २८ | १ |
| मृत्तिकाभक्षण. | २२ | ५ |
| उखळबंधन. | ५४ | ९ |
| बालक्रीडा. | १०२ | १५ |
| वनसुधा.— | | |
| अध्याय १ वनक्रीडा. | ३६ | २६ |
| ,, २ अघदर्शन. | १२ | ३० |
| ,, ३ अघमुक्ति. | २६ | ३५ |
| ,, ४ वनभोजन. | ३३ | ३९ |
| जलक्रीडा. | ३३ | ३९ |
| राधाविलास. | ७७ | ४३ |
| राधाभुजंग. | ५७ | ५१ |
| गोरसहरण. | २१ | ५५ |
| हरिविलास अथवा कालियामर्दन.— | | |
| अध्याय १ हरिविलास. | ४९ | ५७ |
| ,, २ लोकलीलाविलास. | ६३ | ६३ |
| ,, ३ तांडवविलास. | ४५ | ६९ |
| ,, ४ पुरजमहिमाविलास. | ५२ | ७४ |
| ,, ५ भुवनवंद्यविलास. | ४८ | ७९ |
| ,, ६ क्षमाविलास. | ४१ | ८४ |
| ,, ७ लीलाविलास. | ३९ | ८८ |
| ,, ८ सुधारसविलास. | ३८ | ९२ |
| ,, ९ आनंदविलास. | १९ | ९६ |
| नौकाचरित्र. | १७ | ९८ |

| | | |
|---|---|---|
| कात्यायनीव्रत अथवा गोपीवस्त्राहरण. | ९४ | १०१ |
| ऋषिपत्न्याख्यान अथवा यज्ञपत्न्याख्यान. | ५९ | १११ |
| वेणुसुधा.— | | |
| प्रसंग १ | ३८ | ११८ |
| ,, २ | ३७ | १२२ |
| ,, ३ | ४५ | १२५ |
| रासक्रीडा. | १९६ | १२९ |
| रासमंडळ. | २३ | १४९ |
| गोपीगीत समूळ. | ५० | १५४ |
| कंसवध अथवा नवरसश्लोक. | २४ | १६० |
| द्वारकाविजय.— | | |
| सर्ग १ विवाहविजय. | ५३ | १६३ |
| ,, २ कौशल्यविजय. | ४४ | १७१ |
| ,, ३ गृहधर्मविजय. | ३६ | १७६ |
| ,, ४ लीलाविनोदविजय. | ९२ | १७९ |
| ,, ५ द्वारकाविजय. | ३४ | १८७ |
| रुक्मिणीपत्रिका ( समूळ. ) | १६ | १९१ |
| रुक्मिणीविलास. | १६० | १९३ |
| भामाविलास. | ४९ | २०९ |
| मुकुंदविलास. | ६७ | २१६ |
| सुदामचरित्र. | ११४ | २२५ |
| गजेंद्रमोक्ष. | १२ | २३६ |
| भीष्मप्रतिज्ञा. | २१ | २३८ |
| जयद्रथवध. | २६ | २४१ |
| दंपत्यचरित्र अथवा अश्वज्ञान. | १६ | २४४ |
| शुकाष्टक. | १२ | २४६ |
| करुणाष्टक. | ११ | २४९ |
| दशावतार. | १० | २५० |
| नृहरिदर्पण. | १४९ | २५१ |
| वामनचरित्र. | ८१ | २६७ |
| भागवत रामायण.— | | |
| अध्याय १. | ३२ | २७१ |
| ,, २. | ३३ | २७५ |
| ,, ३. | ३६ | २७९ |

| | | |
|---|---|---|
| रामजन्म. | ४८ | २८३ |
| अहल्योद्धार. | ६५ | २८७ |
| सीतास्वयंवर. | ११४ | २९३ |
| भरतभाव. | ९७ | ३०६ |
| जटायुस्तुति. | ४४ | ३१३ |
| सीतालोपामुद्रासंवाद. | ३४ | ३१७ |
| भर्तृहरि.– | | |
| नीतिशतक. | ९४ | ३२१ |
| शृंगारशतक. | ८७ | ३३० |
| वैराग्यशतक. | ९७ | ३३८ |
| भूगोलवर्णन. | १० | ३४९ |
| ध्यानमाला, भगवद्ध्यान, ध्यानपद्धति किंवा कपिलस्तुति (समूळ.) | १५ | ३५३ |
| रामस्तव. | ९ | ३५८ |
| हनुमत्स्तव. | ५ | ३५९ |
| दत्तात्रेयस्तव. | ५ | ३५९ |
| गोरसविक्रय. | ५ | ३६० |
| चतुःश्लोकी भागवत (समूळ.) | ४ | ३६१ |
| चिरसुधा. | ४३ | ३६२ |
| नामसुधा.– | | |
| अध्याय १ प्रथम चरण. | ५३ | ३६६ |
| ,, ,, द्वितीय चरण. | २० | ३७२ |
| ,, ,, तृतीय चरण. | ३३ | ३७४ |
| ,, ,, चतुर्थ चरण. | २९ | ३७७ |
| ,, २ प्रथम चरण. | ४९ | ३७९ |
| ,, ,, द्वितीय चरण. | ६९ | ३८४ |
| ,, ,, तृतीय चरण. | ४८ | ३९० |
| ,, ,, चतुर्थ चरण. | ६२ | ३९५ |
| ,, ३ प्रथम चरण. | २८ | ४०१ |
| ,, ,, द्वितीय चरण. | ६२ | ४०४ |
| ,, ,, तृतीय चरण. | ५२ | ४०९ |
| ,, ,, चतुर्थ चरण. | ३३ | ४१४ |
| प्रियसुधा. | १८ | ४१७ |
| गीतार्णवसुधा. | १०२° | ४१८ |

| | | |
|---|---|---|
| चरमगुरुमंजरी. | ११४ | ४२७ |
| ब्रह्मस्तुति ( मूळसहित. )— | | |
| चरण १ | १९४ | ४४३ |
| ,, २ | ४५२ | ४६१ |
| ,, ३ | १६८ | ४९९ |
| विश्वासबंध अथवा गुरुबोध. | २२ | ५१५ |
| राजयोग. | ३५ | ५१८ |
| उपाशन. | २७ | ५२२ |
| प्रेमसरी अथवा मातंगकेसरी. | ५८ | ५२६ |
| योगवासिष्ठ. | २३ | ५३१ |
| कर्मतत्त्व.— | | |
| अध्याय १ फलतत्त्व. | ५५ | ५३३ |
| ,, २ यत्नतत्त्व. | ३६ | ५३८ |
| ,, ३ भोगतत्त्व. | ४८ | ५४१ |
| ,, ४ भोक्तृतत्त्व. | ५५ | ५४६ |
| ,, ५ आत्मतत्त्व. | ७१ | ५५० |
| ,, ६ वेदतत्त्व. | ११७ | ५५६ |
| ,, ७ जीवतत्त्व. | ५३ | ५६७ |
| ,, ८ अनुभवतत्त्व. | ९० | ५७२ |
| तत्त्वमाला. | १८ | ५८१ |

# वामनी ग्रंथ.

## कृष्णजन्म.

### (कथेचा सारांश.)

मथुरेचा राजा जो कंस ह्यानें आपली बहीण देवकी हिला शूरसेन नामक यादवाचा पुत्र जो वसुदेव ह्यास दिली. लग्न झाल्यावर कंसास आकाशवाणीनें असें कळविलें कीं, ह्या देवकीचा आठवा पुत्र तुझा प्राणहरण करणारा होईल. त्या भयानें कंसानें वसुदेव व देवकी या उभयतांस बंदींत टाकून त्यांस झालेले सहा पुत्र शिळेवर आपटून मारिले. देवकी सातव्यानें गरोदर राहिली, परंतु तिचा गर्भ योगमायेनें तेथून काढून गोकुळांत रोहिणीचे उदरीं नेऊन घातला, तोच पुढें बलिराम झाला. हा सातवा गर्भ जिरून गेल्यावर देवकी पुनः आठव्यानें गरोदर झाली. ह्या वेळीं कंसानें विशेष बंदोबस्त केला होता. नऊ मास पूर्ण झाल्यावर श्रावणकृष्ण अष्टमीस कृष्णावतार झाला. देवकी प्रसूत होऊन तिच्यापुढें चतुर्भुज अष्ट वर्षांची श्रीविष्णूची मूर्ति उभी राहिली. श्रीकृष्णानें वसुदेवास सांगितलें कीं, मला नंदगृहीं यशोदेपुढें नेऊन ठेव आणि ह्याच वेळीं यशोदेस जी मुलगी झाली आहे, तिजला इकडे घेऊन ये. असें सांगून श्रीकृष्णानें बालरूपधारण केलें. ह्या वेळेस मध्यरात्रीचा समय असून पर्जन्याची वृष्टि होत होती, व यमुना तुडुंब भरून चालली होती; तथापि श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें वसुदेव बालकास घेऊन निघाला; तेव्हां त्याचे पायांतील बिडी आपोआप तुटली, दरवाज्यांचीं कुलपें गळून पडलीं, द्वारपाल स्वस्थ घोरत पडले होते, पाऊसही अंमळ कमी झाला व यमुना नदी दुभागून वाट मिळाली.

इकडे गोकुळांत यशोदेच्या उदरीं योगमायेचा अवतार झाला. यशोदा झोंपेंतच प्रसूत झाली व मायेच्या योगानें सर्वच गोकुळांतील लोक निद्रित होते ते, वसुदेव कृष्णास ठेवून कन्या घेऊन गेल्यावर, जागृत झाले. वसुदेव कन्या घेऊन बंदिशाळेंत परत आल्यावर त्याचे पायांत बिडी पूर्ववत् बसली, दरवाजे लागून कुलुपें लागलीं, व द्वारपाल जागृत झाले. कंसास कन्या झाल्याचें वर्तमान समजतांच तो तेथें आला आणि मुलगी घेऊन भोवंडून शिळेवर आपटणार इतक्यांत ती त्याचे हातून सुटून आकाशांत कडकडत गेली. अशी मूळची कथा आहे.

करुनि नमन एका देवदेवा[1] हरीतें, भव[2]भय अवघेंही नाम ज्याचें हरीतें[3] ।
हरिविण इतरांतें[4] सेवितां बद्ध होतो, कथिन चरितरूपें व्यासभावार्थ हो[5] तो ॥ १ ॥
ठेवूनि नंदसदनांत हरि स्वहातें, माया[6] व्रजेशै[7]तनया तिस ने गृहातें ।
आणी अजा[8] त्यजुनि अन्यगृहीं अजाला[9], तों बद्ध मागुति पहा वसुदेव झाला ॥ २ ॥
कथेमाजि या तत्त्वं[10] हें व्यासदेवें, असें दाविलें जें पहावें सदैवें[11] ।
हरी जन्मला तेथुनी हे कथा रे, तरे या चरित्रीं जरी चित्त थारे[12] ॥ ३ ॥
प्रहर दोनि निशा विमलक्षणीं[13], प्रगटला निजउत्तमलक्षणीं[14] ।
दिसतसे भुवनत्रयपालक, त्रिदशे[15]नायक अद्भुत बालक ॥ ४ ॥
नयन सुंदर ते श्रवणावधी[16], विमलदृष्टि अजा त्रिगुणां वधी[17] ।
प्रगटला अतिअद्भुत बालक, विधिपिता[18] जगचालक पालक ॥ ५ ॥

---

१ इन्द्रादि सर्व देवांचाही देव जो अज आणि अव्यय असा एकच परमेश्वर आहे त्यास. "ग्रंथादौ मंगलं कुर्यादित्यादि" शिष्टाचारास अनुसरून या आख्यानाच्या निर्विघ्नसमाप्तीकरितां वामनपंडित या श्लोकांत देवाधिदेव जो सकल ब्रह्मांडांचा एकच स्वामी त्याचें नमनरूप मंगल करून कथेचेंही अवतरण करितात. २ संसाररूपी भय; हा कर्मधारय समास करावा हें बरें. ३ हरण करितें; नाशिसें करितें. ४ वर निर्दिष्ट केलेला परमात्मा देवाधिदेव जो हरि त्यावांचून इतर देवतांची उपासना केली असतां प्राणी बद्ध होतो हा जो व्यासोक्तीचा भावार्थ आहे तो तुह्मास श्रीकृष्णचरित्ररूपानें मी सांगतों असा अर्थ. ५ अहो. ६ आदिशक्ति जी अविद्या माया तीस. ७ व्रजाचा ईश ह्म० स्वामी जो नंद त्याचे झालेली मुलगी. ८ जन्मरहित जी माया तीस आणिलें. ९ जन्ममरणरहित असा जो कृष्णपरमात्मा त्यास; वसुदेवानें कृष्णास नंदगृहीं सोडून नंदास झालेली मुलगी आणिली, अर्थात् अविनाशी परमात्म्यास सोडून इतर देवतांचें सेवन केलें ह्मणून तो पुनः बद्ध झाला, असा ह्या श्लोकाचा भावार्थ आहे. ह्मणून "हरिविण इतरांतें सेवितां बद्ध होतो" इत्यादि वाक्य सप्रमाण आहे. १० "हरिविण इतरांतें" इत्यादि व्यासोक्तीचें खरेपण. ११ दैववान् ह्म० भाग्यवान् असतील तेच पाहतील असा अर्थ. १२ चित्त स्थिर राहील तर. १३ निर्मळ काळीं ह्म० शुभमुहूर्तीं. १४ "लक्षणीं" ही तृतीया अने० आहे—लक्षणांनीं युक्त. १५ त्रिदश ह्म० देव यांचा स्वामी; देवाधिदेव. १६ श्रवण ह्मणजे कर्ण हेच ज्यांची अवधि ह्म० सीमा आहे असे नेत्र; आकर्णनयन असा अर्थ. १७ सत्त्व रजस् आणि तमस् या त्रिगुणांचा नाश करणारा. १८ जो बालक विधि ह्म० ब्रह्मदेव याचा जनक आणि जगाचा पालक व चालक होय.

भुजा चारि हातीं धरी शंखचक्रें, गमे सिद्ध माराबया दैत्यचक्रें।
गृहीं दीप्ति त्या अद्भुता बालकाची, दिसे सर्व लोकांचिया पालकाची ॥ ६ ॥
श्रीवत्सयुक्त उर सुंदर केशवाचा, वर्णूं शके न गुण ज्यांतिल लेश वाचा।
शोभे गळां परमकौस्तुभ भासमान, ज्योतीस ये न रविची अतिभा समान ॥७॥
कनकवसन यावा ज्यांत सौदामिनींचा, घनतनुवरि वास श्रीजगत्स्वामिनीचा।
श्रवणिं मणि किरीटीं कुंडलें सुप्रभातें, तरुणअरुणशोभा जेविं फांके प्रभातें॥८॥
शोभे कटीं जडित सुंदर रत्नकांची, श्रीअंगदें मणिमयें सहमुद्रिकांची।
ऐसी तनू परमअद्भुत बालकाची, देखे यदूत्तमपिता जगपालकाची ॥ ९ ॥
आनंदसिंधुसलिलींत निमग्न झाला, देखोनि शूरसुत तो स्वसुता अजाला।
प्रेम तो हळुहळू गुण केशवाचे, वर्णून कंसभयही कथि लेश वाचे ॥१०॥
'व्रजा जाउनी नंदगेहीं रमाया,' असी घालुनी आपुली स्वैर माया।
ह्मणे 'नंदकन्येसि आणूनि ठेवा, व्रजीं आपुला देह नेऊनि ठेवा' ॥११॥
ऐसें वदूनि जनका यदुवंशजाला, सद्यःप्रसूतजनबालकरूप जाला।
वेषांतरें नट जसा निजभाव दावी, ते ईशशक्ति गति अद्भुत ते वदावी ॥१२॥

---

१ देवकी प्रसूत झाली तेव्हां प्रथम शंखचक्र गदापद्म धारण करणारी श्रीकृष्णाची चतुर्भुज अष्टवर्षांची मूर्ति तिच्यापुढें उभी राहिली; तीच मूर्ति पुढें बालक झाली. २ दैत्यसमूह. ३ श्रीवत्स हें ज्याचे उरावर चिन्ह आहे; भृगूच्या लाथेचें चिन्ह ज्याच्या हृदयावर आहे असा. ४ समुद्रमंथन केल्यावर जीं चौदा रत्नें निघालीं त्यांतील कौस्तुभमणि. ५ प्रकाशमान. ६ अत्यंत तेज; रवीचें अत्यंत तेज कौस्तुभाचे तेजाची बरोबरी करीना असा अर्थ. ७ सुवर्णाचे कांतीप्रमाणें झळकणारा पीतांबर ८ येणें; आगमन. ९ विद्युल्लता. १० घन ह्म० मेघ यासारखी नीलवर्ण तनु ह्म० शरीर ज्याचें त्यावर. ११ कानांमध्यें. १२ बालसूर्याची शोभा जशी सकाळीं फांकते तशी मणिमय किरीटकुंडलांची शोभा कर्णांवर पसरली होती. १३ कंबरेमध्यें रत्नजडित कांची ह्मणजे मेखला किंवा कमरपट्टा. १४ श्रीयुक्त बाहुभूषणें ज्या तनूस; श्रीशब्द शोभार्थ आहे. १५ मुद्रिका आहेत जीस अशी तनु. १६ यादवांचा राजा वसुदेव. १७ आनन्दरूपी समुद्राचे उदकांत बुडाला. १८ वसुदेव. १९ वसुदेवानें अष्टवर्षांची जी मूर्ति प्रगट झाली तिचे गुण वर्णून कंसापासून भय आहे असेंही थोडक्या शब्दांनीं सांगितलें. २० वेष पालटून नट जसा आपला भाव दाखवितो त्याप्रमाणें श्रीकृष्णानें वसुदेवास नन्दाचे घरीं नेण्यास सांगून लागलेंच बालरूप धरिलें. ही ईशाची अद्भुतशक्ति वाटली पाहिजे.

'ने गोकुळासि मज' ये रिति देवदेवें
आज्ञापिला निजपिता वसुदेव देवें ।
विष्णुत्व दावुनि शिशू जलजाक्ष झाला
तों चालिलाचि उचलूनि अधोक्षजाला ॥ १३ ॥
उचलुनि हरि जों तों होय सानंद जाया
प्रसवलि गुणमाया गोकुळीं नंदजाया ।
त्रिभुवनपतिची ते शक्ति हो योगनिद्रा
करि सकळ जनांतें भ्रांतिसंयोगनिद्रा ॥ १४ ॥
निशा अर्ध नाहींच लोकप्रवृत्ती, विशेषें बुडाल्या तमीं क्षिप्रं वृत्ती ।
करी द्वारपाळां महागाढनिद्रा, जसी जन्मली गोकुळीं योगनिद्रा ॥१५॥
जयां ठेवी द्वारीं बहुभरवशानें खळें खळीं
तयां लागे निद्रा गळति कुलुपें हो खळखळां ।
निघे बेडी घेतां उचलुनि घनश्यामल हरी
भवग्रंथी ज्याची परिहरि कृपासिंधुलहरी ॥ १६ ॥
कवाडें लोहाचीं न निघति कधीं जेविं निकरें
घणीं जीं लोहारीं बसविलिं खिळे ठोकुनि करें ।
असंगाचें शस्त्र प्रभु उचलितां तीं उघडती
कटाक्षें कृष्णाच्या अघटित विचित्रेंचि घडती ॥ १७ ॥
हळुहळु घन गर्जे तीव्र वर्षोनि वारी
दशशतफणि त्यातें छत्ररूपें निवारी ।

---

१ चतुर्भुज विष्णुचें स्वरूप दाखवून. २ जलज ह्म० कमल यासारिखे अक्षि ह्म० डोळे ज्याचे–कमलाक्ष असा लहान बालक झाला. ३ तंव; बालस्वरूप धारण केल्याबरोबर. ४ जाण्यास. ५ सगुण मायेप्रत. ६ नंदस्त्री. ७ अर्धरात्र ह्म० मध्यरात्र झाली आहे. ८ लोकांची हालचाल नाहीं. ९ लोकांच्या वृत्ति अज्ञानांधकारांत बुडाल्या आहेत. १० त्वरित. ११ ज्याप्रमाणें गोकुळामध्यें हरीची शक्ति योगनिद्रा यशोदेच्या उदरी जन्मून तिणें सर्व लोकांस भ्रांति व निद्रा यांत बुडविलें, त्याप्रमाणेंच इकडे गाढनिद्रेनें द्वारपाळांची वगैरे स्थिति केली. १२ खल ह्म० दुष्ट जो कंस तो. १३ दुष्ट द्वारपाळ ज्यांस द्वारावर ठेविलें त्यांस. १४ ती हरीची श्याममूर्ति उचलून घेतांच वसुदेवाचे पायांतील शृंखला आपोआप तुटली. १५ संसाररूप ग्रंथि. ज्याची कृपासिंधुलहरी भवग्रंथि परिहरी, असा अन्वय. १६ जोरानें. १७ असंग ह्म० संसारीं अनासक्ति. १८ पाणी. १९ दशशत ह्म० सहस्र फणा आहेत ज्याला त्या शेषानें त्या वेळेस त्यास पाऊस लागूं नये ह्मणून आपल्या फणीचें छत्र त्यावर धरिलें.

सखि बहिणे यमाची क्रूर त्याहूनि वाटे
भय मनिं वसुदेवें मानिलें फार वोटे ॥ १८ ॥
उघडितां क्षणं मागुति लौकरी, सुरपती अतिवृष्टि जगीं करी ।
जनभयानक होय यमानुजा, बहु सफेनजलाकुलभानुजा ॥ १९ ॥
शतें आवर्तांचीं अचलें चलती चंचलगती
असे मोठे फेन भ्रमति, उदकें त्यांत फुगती ।
नदी ते दे मार्ग स्थिरपतिस तेव्हां झडकरी
जसा झाल्यां सेतु जलधि पंथ रामार्पण करी ॥ २० ॥
शुभांगी जसी विंचरीते शुभांगा, द्विधा केश सारी, करी अंशु भांगा ।
कलिंदात्मजेचें तसें होय पाणी, पथें त्या पिता ने शिशू चक्रपाणी ॥ २१ ॥
नंदव्रजाप्रति असा वसुदेव देवा, आणी सुखेंचि यमुनेंतुनि देवदेवा ।
तों झोंप गोवळजनां अति गोपिकांही, गेला गृहांत न कळेचि तथापि कांहीं ॥२२॥
यशोदेसि होतां सुता योगनिद्रा, समस्तां स्त्रियां युक्तें ये गाढ निद्रा ।
न जाणेचि ते पुत्रि की पुत्र कांहीं, न ते लक्षिली आणिकां बायकांहीं ॥२३॥
यशोदेपुढें ठेवुनी कृष्णजीतें, गृहातें तिला ने[21] ह्मणे कृष्ण जीतें ।
स्वभार्येपुढें तीस आणुनि घाली, पदीं त्याचि बेडी क्षणीं त्या रिघाली ॥२४॥
घे ज्या गृहींच उचलूनि अधोक्षजाला, बेडी निघोनि अतित्वर मोक्ष झाला ।
माया नयाच सदनां भरि शृंखलांला, जागें करी स्वरुदितें वि तयीं खळांलों २५

१ यमाची बहीण ह्म० यमुना. २ वाटेनें. ३ एक क्षणभर. ४ इन्द्र. ५ सूर्याची कन्या व यमाची भागिनी जी यमुना नदी ती फेनयुक्त जलानें अतिशय भरून गेली. ६ शेंकडों भोंवरे. ७ न चलन पावणारे, स्थावर असे जे पर्वत. ८ जीत पर्वताएवढे फेन ह्म० फेसांचे समुदाय भ्रमण करीत आहेत. ९ स्थावर पदार्थांचा स्वामी जो कृष्ण त्यास. १० सेतु झाल्यावर. ११ समुद्र. १२ मार्ग. १३ शुभ आहेत अंगें जिची; स्त्री. १४ उत्तमांग; ; शिर. १५ दोन भाग; केश दोन्ही बाजूंस सारून जशी स्त्री फणीनें भांग करिते तशी. १६ त्वरित. १७ कालिंदी; यमुना. १८ गोपिकांसही अति झोंप लागे असा अन्वय. १९ यशोदेस योगनिद्रारूपी कन्या झाल्यावर. २० सह; 'समस्त स्त्रियांसह यशोदेसही गाढ निद्रा ये' असा अन्वय. २१ जितें कृष्णगृहा ने (असें पूर्वी) ह्मणे (ह्मणाला) तीतें गृहास नेता झाला. २२ सुटका. २३ हरीस धरिलें ह्मणजे मोक्ष मिळतो, मायेस धरिलें ह्मणजे दृढ बन्धन होतें असा अन्वर्थ एथें आहे. २४ आपल्या रडण्यानें. २५ दुष्ट जो कंस त्यास जागें केलें.

हरी ठेवी माया उचलुनि गृहा ये झडकरी
हरीच्याही बोच्या चरणिं दृढ ते बंधन करी ।
हरीच्या आज्ञेंही करुनि इतरांतें न यंजिजे
अनन्यें सद्भक्तीकरुनि हरितें त्याचि भजिजे ॥ २६ ॥
निघालींसे वाटे क्षणें चरणिं बेडी तरि पडे
न बंधाचा कंद त्रिभुवनपतीवीण उपडे ।
जइं राया कंसा गज वधुनि मल्लांसहि वधी
पुन्हा कृष्णप्राप्ती करुनि सुटका ते निरवधी ॥ २७ ॥
हरी वामनाचा हरी क्षिप्र बंध, स्वनामेंचि जो हा तयाचा प्रबंध ।
कथातस्वनामें जगीं हो प्रसिद्ध, प्रकर्षें जया वर्णिती विप्र सिद्ध ॥ २८ ॥

---

## मृत्तिकाभक्षण.

### ( कथेचा सारांश. )

एके वेळीं कृष्णानें माती खाल्ली तें बळराम व इतर सवंगड्यांनीं यशोदेस येऊन सांगितलें. यशोदा अतिशय रागावून कृष्णास मारणार, तों कृष्ण ह्मणतो, 'माते, मीं माती खाल्ली नसतां हे सर्व माझ्यावर कुभांड घेतात.' यशोदा ह्मणाली,' ही गोष्ट जर खरी आहे तर आपलें तोंड उघडून दाखीव.' तेव्हां कृष्णानें आपलें तोंड उघडून यशोदेस मृत्तिकेपासून रचलेलें सकल चराचरविश्व दाखविलें. ही कथा यांत वर्णिली आहे.

स्वउदरांत चराचर मृत्तिका, पसरुनी मुख दावित कौतुका ।
प्रगट जो करि बाल्यकथारसा, नमिन त्या हरिच्या पदसारसा. ॥ १ ॥

---

१ बापास; हरीच्याही बापास ज्या मायेनें बंधन करण्यास सोडिलें नाहीं अशी ही माया मोठी दुस्तर आहे असा अभिप्राय. २ यजन ह्मणजे पूजन करावें ३ हें मायेचें बंधन क्षणभर सदुपदेशानें तुटलें असें वाटतें, पण तें लागलेंच पुनः दृढ होतें. ४ या बंधनाचें मूळ. ५ कृष्ण आणि बलराम हे जेव्हां मथुरेस आले तेव्हां त्यांनीं वेशींत हत्ती होता त्यास मारून अंगावर चालून आलेल्या पुष्कळ मल्लांचा संहार केला. ६ अनंतकालपर्यंत. ७ हरी ( श्रीकृष्ण ) ह्यानें वामनपण्डिताचें त्वरित भवबंधहरण केलें. ८ जो वामन तुह्माच नामधारी आहे ह्म० वामन हें विष्णूचें नांव आहे. ९ कथा; काव्य. १० मृत्तिकेपासून उत्पन्न केलेले सकल स्थावरजंगमात्मक लोक ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' इत्यादि वेदान्तमताचा वामनाचे ग्रंथांत वारंवार उल्लेख सांपडतो. ११ बाळपणच्या कथारसास. १२ चरणकमलास.

गोपबालक गडी बळिराम, क्रीडतां हरिसवें अभिराम ।
मृत्तिका सुत तुझा घननीळा, भक्षितो वदति हें जननीला ॥ २ ॥
न रागेजणारी कधीं नंदराणी, करी कृष्ण खोडी तिला हे शिराणी ।
तरी मृत्तिका भक्षितां कृष्णजीतें, दटावी चढे क्रोध अत्यंत जीतें ॥३॥
कर श्रीकांताचा करकरुनि माता धरि करें
दुजा हस्त क्रोधें हरिवरि उगारूनि निकरें ।
दटावी ते वेळीं भयचकित डोळे करि हरी
करी अंडत्रासें वरि कर दुजा जो भय हरी ॥ ४ ॥
अशीं कोटि अंडें जयांमाजि मांती, तया खादली कां ह्मणे आजि माती ।
मुखश्री करूनी हरी दीनवाणी, असत्यांतही बोलतो सत्य वाणी ॥ ५ ॥
'माती नाहीं खादली म्यां यशोदे, या सर्वांची गोष्टि मिथ्या असोदे ।
मिथ्या तूतें ज्येष्ठही बंधु सांगे. जो तो याचा शब्द मिथ्या असा गे' ॥६॥
'जाण हे अनृत सर्व वैखरी, मानिसी जरि तथापिही खरी ।
माझिया निजमुखाकडे तरी, दृष्टि दे बरवि बाह्य अंतरीं ॥ ७ ॥
मृषा लोकवाणी मृषा अर्थ तीचा, खरा अर्थ तो वेदवाणीश्रुतीचा ।
असे ती मुखीं आपुल्या वेदवाचा, पहा तीस भावार्थ तो माधवाचा॥८॥
असत्य हें बोलती सर्व वाचा, साचा असा शब्दहि माधवाचा ।
असत्य हें यास्तव बोलिलों कीं, सत्यत्वही सर्व असत्य लोकीं" ॥ ९ ॥
मृषा तरी हा व्यवहार साचा, यालागिं यी वाक्यसुधारसाचा ।
मिथ्या दिसे भाव ह्मणूनि दावी, पोटींच माती गति हे वदावी ॥१०॥
नसे खादली खाउनी मृत्तिकांही, ह्मणे या स्ववाक्यासि मिथ्यत्व कांहीं ।
दिसे तें हरायास पोटांत सारे, तिला दाखवी मृत्तिकेचे पसारे ॥ ११ ॥

---

१ तुझा घननीळ (मेघासारखा श्यामवर्ण) सुत; घननीळा ही प्रथमा आहे. २ रागास जाणारी. ३ आवड, कौतुक. ४ श्री ह्म० लक्ष्मी हिचा पति अर्थात् कृष्ण. ५ आपल्या हातानें. ६ जोरानें. ७ ब्रह्मांडाच्या भीतीनें; कृष्णास भीति वाटली ह्मणून सकल ब्रह्मांड घाबरलें असा अर्थ ८ "दुजा कर जो भय हरी तो अंडत्रासें वर करी" असा अन्वय. ९ ब्रह्मांड. १० मावतात. ११ "जो याचा शब्द तो मिथ्या" असा अन्वय. १२ वाणी. १३ बाहेरून व आंतून. १४ खोटी. 'ब्रह्मैव सत्यं तदितरं सर्वमसत्यम्' इत्यादि श्रुतिप्रामाण्यात्. १५ या लोकांचें जें सत्य तें सर्व असत्य आहे ह्मणून हे लोक मला माती खाल्ली ह्मणतात तें असत्य आहे. १६ माती खाऊन नाहीं ह्मणाला हें दर्शनी खोटें दिसतें त्यास खरेपणा आणण्याकरितां सर्व मृत्तिकारूपी चराचर विश्व त्यानें आपले पोटांत दाखविलें.

पोटांत बाहेरुनि जें रिघेना, तें भक्षणप्राय ह्मणूनि घेना ।
ह्मणोनि हे मृन्मय लोक सारे, पोटांत हे दाखविले पसारे ॥ १२ ॥
हरीची अशी वेदवाणी पुराणी, न जाणोनि मानी मृषा नंदराणी ।
अहो विश्व जो दाखवी पांडवासी[2], ह्मणे त्यासि 'साचा तरी तोंड वाशीं' १३
कीं मृत्तिका हे अवघीच मातें[3], आधींच माझ्या उदरांत मातें[4] ।
ते भक्षिली कां ह्मणसील मातें, नेणोनि ऐशा पुरुषोत्तमातें ॥ १४ ॥
असा आपुला शब्द तो देव साचा, करूं पाहतो, त्या कथेच्या रसाचा ।
पहा भाव तो मातृशब्दीं हरी तो, असत्यत्व हे आवरूनी हरीतो ॥ १५ ॥
एवं पहातां अजि कोटिअब्दीं, नयेचि मिथ्यत्व मुकुंदशब्दीं ।
तें आइका यावरि माय काय, बोलों शके दाखवि विश्वकाय ॥ १६ ॥
घटाकार आकार मातींत माती, अशी मानसें सर्वही ज्यांत माती ।
अशा विश्वरूपा मुकुंदा उदारा, दटावी धरूनी करीं गोपदारा ॥ १७ ॥
ह्मणे 'पूससी ओष्ठ चाटूनि चाटा, पुन्हा बोलसी धीट गोष्टी अचाटा ।
घडीही घरीं पाय तूझा न थांरे, न आटोपसी तूं मला सर्वथा रे ॥ १८ ॥
पसरुनी मुख दाखविसी मला, तरि खरा मज वाटसि रे मुला' ।
ह्मणउनी जननीवचनें हरी, पसरुनी मुख संशय संहरी ॥ १९ ॥
वदनिं ओंऽअवलोकुनि पाहते, जननि विस्मित होउनि राहते ।
स्थिरचरात्मक हें जग देखिलें, स्वसुत ईश्वर हें मनिं रेखिलें ॥ २० ॥
यशोदेसि हें तत्त्व दावूनि देवें, पुन्हा घातला मोह त्या वासुदेवें ।
कडे घेतला मागुती पुत्रभावें, यथापूर्व पाहे तयातें स्वभावें ॥ २१ ॥
अशीं कौतुकें शेषशायी हरी तो, करी तो कथेनें अविद्यों[12] हरी तो ।
कथेच्या रसें शुद्ध केलें मनाला, कलीमाजि या तारिलें वामनाला ॥ २२ ॥

१ जुनी. २ अर्जुनास संपूर्ण विश्व आपल्या मुखांत प्रवेश करीत आहे असें दिव्यचक्षु देऊन दाखविलें तें वर्णन गीतेच्या अकराव्या अध्यायांत आहे. ३ हे आई. ४ मावते. ५ अहो. ६ कोटिवर्षांत. ७ आपलें विश्वरूप शरीर. ८ चावटा. ९ विलक्षण, अद्भुत. १० थारे हा शब्द स्थिर या शब्दापासून निघाला आहे. ११ हा माझा पुत्र असा भावानें. १२ अज्ञान; माया.

# उखळबंधन.

## (कथेचा सारांश.)

एके दिवशीं यशोदा कृष्णास स्तनपान करीत बसली असतां दूध उतून चाललें, तेव्हां यशोदा कृष्णास टाकून दुधाकडे गेली. माझ्यापेक्षां मातेची भक्ति दुधावर अधिक ह्मणून कृष्णास राग येऊन त्याणें सर्व दुभत्याची भांडीं उपडी केलीं. हें त्याचें कृत्य पाहून यशोदेस अत्यंत राग येऊन तिणें त्यास उखळास बांधून ठेविलें. कृष्ण उखळासह सरकत सरकत अंगणांत गेला. तेथें दोन वृक्ष होते त्यांच्या मध्यें उखळ अडकून ते वृक्ष उन्मळून खालीं पडले. त्यांतून दोन पुरुष निघाले ते नलकूबर नांवाचे दोन गंधर्व होते. ते नारदमुनीच्या शापानें वृक्ष झाले होते व कृष्णाच्या कृपेमुळें आतां उद्धरून गेले.

धरि नसोनिहि रज्जु भुजंगमा, धरि अशा रितिं जो स्थिरजंगमा ।
उखळरज्जु तया प्रभुच्या कटीं, भ्रम हरी हरि तो भवसंकटीं ॥ १ ॥
करुनि वंदन त्या पुरुषोत्तमा, कथिन बाल्यकथा अति उत्तमा ।
सगुण सुंदर आकृति धाकुटी, उखळ त्या प्रभुमूर्तिचिया कटी ॥ २ ॥
सकुल गुंतलिया गृह किंकरी, मथन ते समयीं जननी करी ।
स्वसुतबाल्यचरित्रचि गातसे, हरिकथा जन हो तुह्मी गा तसे ॥ ३ ॥
स्वसुत बाल्यचरित्र महोदधीं, स्मरत गात, सुखें मंथि हो दधीं ।
रुचत भक्ति न कीं जननीच ते, समजती न कधीं जन नीच ते ॥ ४ ॥
पृथु नितंब नितंबिनिचा वरी, कटितटीं कटिसूत्रचि सांवरी ।
कनककंकणवृंदहि वाजती, मुखिं सुखश्रमबिंदु विराजती ॥ ५ ॥
श्रवणिचे श्रवणीं नग हालती, गळति गुंफिलिया शिरिं मालती ।
घुसळितां कुचकुंभहि कांपती, अमृत ज्यांतिल घे कमळापती ॥ ६ ॥

---

१ रज्जूवांचून जो शेष सर्पास आकळतो. मंगलाचरणरूपी श्लोक आहे. २ स्थावर आणि जंगम (चर आणि अचर) पदार्थ यांस धारण करितो. ३ गृहदासी, घरांतील चाकरमाणसें. ४ माता दधिमंथन करीत असतां. ५ तसी हरिकथा तुह्मी गा. ६ महासागर. ७ मंथन करी, घुसळी. ८ स्थूल, विशाल. ९ नितंब जिला आहे ती ह्मणजे स्त्री. १० कमरपट्टा. ११ सुवर्णाच्या बांगड्यांचे समुदाय. १२ मंथनाच्या श्रमानें घर्मबिंदु मुखावर जिच्या चमकत आहेत. १३ श्रवणिचे नग ह्म० कानांतील अलंकार. १४ मालतीपुष्पें. १५ दुग्धरूपी अमृत १६ कमळा ह्म० लक्ष्मी.

फिरविते रवितें दधिभीतरीं, मिरवितें रवितेज नगांवरी ।
स्वकरिं ते करि चंचलता, मनीं, उपरमे परमेश्वरगायनीं ॥ ७ ॥
बाइ स्यां उगवतांच रवीला, दाट घालुनि दहीं चरवीलां ।
त्यांत मे फिरवितांच रवीला, सार काढुनि हरी चरवीला ॥ ८ ॥
मंथी पुत्रभावें असी गायमाय, स्तनीं प्रेमपान्हा तिच्या काय मायें ।
अशामाजिं ये सर्वसंसारसाक्षी, असे जे स्थळीं गोपिका सारसाक्षी ॥ ९ ॥
फुटे प्रेमपान्हा भिजे आंत चोळी, हरीहानि मानूनि ते हात चोळी ।
धरी भक्तिनें आपिल्याची स्पृहा हा, ह्मणोनी ह्मणे व्यर्थ जातें अहाहा ॥ १० ॥
न घेववे व्यापकचित्स्वरूपें, न घेववे तो रस साक्षिरूपें ।
पुत्रत्वरूपासि जयासि दावी, ते भोक्तृता त्याचि मुखें वदावी ॥ ११ ॥
जननिच्या स्तनदुग्धरसार्पणें, स्वसुखतृप्तिहि मानिचि तर्पणें ।
ह्मणि असा रस जाय गळोनिया, ह्मणुनि घे हरि हेंचि कळोनिया ॥ १२ ॥
क्षुधित मी स्तन दे मज लौकरी, ह्मणुनिया रवि गाढ धरी करीं ।
त्वरित बैसुनि दे स्तन नागरी, मन जिचें बुडतें सुखसागरीं ॥ १३ ॥

---

१ आंत, मध्यें. २ जिच्या भूषणांवर सूर्याचें तेज मिरवत ह्म० फिरत असे. ३ मनामध्यें उपरमे. ४ विश्रांति पावली. ५ रवीला उगवतांच ह्म० सूर्योदयाबरोबर. ६ चरवीमध्यें, मंथनाच्या डेऱ्यांत. ७ मंथनदंड; रवी. ८ लोणी. ९ खाऊं घातलें, चारविला. १० वश होई. ११ मातारूपी गाय. १२ मावे, मावतो. १३ सर्व संसार ह्म० ब्रह्माण्डाचा पसारा यास निरंतर पाहणारा अर्थात् कृष्ण. १४ सारस ह्म० कमल यासारखे अक्ष ह्म० नेत्र आहेत जीचे ती गोपिका अर्थात् यशोदा जेथें होती तेथें आला. १५ दुग्ध फुकट गेल्यामुळें हरीहानि ह्मणजे हरीचें नुकसान झालें असें मानून हात चोळूं लागली. १६ सर्व जगास व्यापून जो दशांगुळें उरला ह्मणून जो सर्वव्यापक आणि चित्स्वरूप ह्म० चैतन्यस्वरूप. १७ सर्वसाक्षिरूप सर्व जगांतील प्राण्यांचीं कर्मे पाहणारा. १८ भोग; सुख. व्यापक व चित्स्वरूपानें व साक्षिरूपानें जो वात्सल्यरस घेववत नाहीं तो वात्सल्यरस ज्यास दाखवितो त्याचें भाग्य त्याच्याच मुखानें वर्णन करवेल, इतरांच्यानें त्याचें वर्णन करवणार नाहीं असा ह्या श्लोकाचा भावार्थ दिसतो. १९ असा रस कीं ज्याच्या योगानें स्वसुखाची तृप्ति होय. २० नागरिक स्त्री अर्थात् यशोदा.

मुखसुखामृतरश्मि पहातसे, तुजसि हि कां स्वमनीं न पहा तसे ।
परि तयासहि टाकुनि धांवते, तुजसि हि व्याल म्हणी अजि पावते ।। १४ ।।
त्रिभुवनात्मक राज्यहि ये करां, त्यजुनि तें हरिभक्तिचि हे करा ।
जरि बुडोनि समस्तहि जातसे, तरि बुडो, हरि तोचि भजा तसे ।। १५ ।।
प्रभुस नेणोनिच पुत्रभावें, ते गौळणी स्त्रीप्रकृतिस्वभावें ।
लोटोनिया चक्रगदायुधातें धांवे, उतें दुग्ध तया दुधातें ।। १६ ।।
तो प्रेमपान्हा अवघाचि मातें, न पाजिला कां पुरुषोत्तमातें ।
म्हणोनि कोपास चढे हरी तो, जो क्रोधकामा स्मरणें हरीतो ।। १७ ।।
चावोनि ओष्ठ दशनीं मधुकैटभारी, फोडी शिळेंकरुनि तें दधिपात्र भारी ।
शिंकाघरांत हरि घालुनि पोणि खातो, दे मर्कटांसि नवनीतचि आणिकां तो १८
मी घे स्वभक्तिरस कीर्तनिं वो रसाचा, टाकूनि त्या मज इला निजगोरसाचा ।
लोण्या दह्यांस हरि जो न कधीं भुकेला, कां फार लोभ म्हणऊनिचि नाश केला १९
मृषा अश्रु डोळां परि क्रोध साच, हरी दाखवी अर्थ एथें असाच ।
मृषा नीर नेत्रांत मातेसि दावी, मृषा क्रोधवार्ता कशी हे वदावी ।।२०।।
पितांस्थानिंचा लोटिला म्यां भुकेला, म्हणोनी असा बाळकें क्रोध केला ।
क्षुधाक्रोधयोगें करी रोदनातें, म्हणे माय तेव्हां असें नंदनातें ।। २१ ।।
असा पात्र फोडूनियां चक्रपाणी, मृषा दाखवी लोचनांमाजि पाणी ।
परि क्रोध जो ओष्ठ चावूनि दावी, तयाची मृषा काय वार्ता वदावी ।।२२।।

---

१ अमृतरश्मि. अमृत आहे किरणांत ज्याच्या म्ह० चन्द्र. सुखामृतरश्मि म्ह० सुख देणारा चन्द्र. मुखसुखामृतरश्मि म्ह० अर्थात् कृष्णाचें जें मुख तोच कोणी सुखचन्द्र त्यास. २ जशी यशोदा कृष्णमुखचन्द्रास पाहते तसे 'तुम्ही आपल्या मनांत ( हृदयांत ) कृष्णरूप चन्द्र आहे त्यास कां पहात नाहीं. "चन्द्रमा मनसो जातः" इत्यादि श्रुतिप्रामाण्यात् सर्व आत्म्याचे ठिकाणीं असणारा परमात्मा त्याचा मुखचन्द्र आपल्या हृदयांत निरंतर पहातां येईल असा भाव. ३ हातांत, त्रिभुवनाचें राज्य जरी हातांत आलें तरी तें टाकून. ४ चक्र, गदा इत्यादि आयुधें धारण करणारा त्यास. ५ वर येई; उतूं जाई त्या दुधाकडे. ६ मला पुरुषोत्तमाला. ७ जो क्रोध, काम इत्यादि षड्रिपूंस स्मरणमात्रेंच नाहींसा करितो. ८ दांतांनीं. ९ मधु आणि कैटभ या दैत्यांचा शत्रु जो कृष्ण. १० शिळेच्या योगानें, दगडानें. ११ हात. १२ लोण्यांत. १३ दूध, दहीं इत्यादि. १४ मिथ्या. १५ उदक, अश्रु; डोळ्यांस अश्रु आणिले ते नाम खोटे; परंतु क्रोध आला तो खरा ही उक्ति पुढें श्लोक २१ व २७ यांत स्पष्ट केली आहे. १६ रडण्यास. १७ पुत्रास. १८ डोळ्यांत. १९ जो क्रोध दाखविला तो खोटा म्हणतां येत नाहीं.

कोण्ही दिसेना जवळी असेना, न ते स्थळीं युद्ध न दैत्यसेना ।
कोणासि हो चावुनि ओष्ठ दावी, न क्रोधवार्ता लटिकी वदावी ॥२३॥
ऋषी आपणा ज्ञानदृष्टीं पहाती, म्हणोनी असा दावुनी कोप हातीं ।
शिळा घेउनी पात्र फोडी म्हणावा, न मिथ्या तई क्रोध साचा गणावा २४
विना क्रोध हा मारिलो दैत्यसेना, ऋषी जाणती क्रोध याला असेना ।
मृषा क्रोधवार्ता हरीची वदावी, जिहीं त्यांसही क्रोध कां देव दावी ॥२५॥
अशासही क्रोध कसा उठावा, तो त्या मुनींद्रांसहि ठाउ ठावां ।
की द्रोह भक्तांवरि साहवेना, तेथें क्षमा सोसुनि राहवेना ॥ २६ ॥
ज्या भक्तिनें आवडताति भक्त, ज्या भक्तिनें ते न मणी विभक्त ।
त्या भक्तिनें जो रस योजिला हो, दिला न त्याचा मज आजि लाहो॥२७॥
स्मरोनि मद्वाल्यचरित्र गाये, द्रवे जसी देखुनि वत्स गाय ।
तो प्रेमपान्हा मजला नसा हे, न पाजितां जाय न तेंचि साहे ॥ २८ ॥
भजोनिही एक असे द्विजाती, सप्रेमही काम्यफळासि जाती ।
दुग्धासि धांवे पुरुषोत्तमातें, टाकोनि माता प्रिय तें न मातें ॥ २९ ॥
खराचि हा क्रोध मुनीस दावी, कथामृताची गति हे वदावी ।
आतां पुढें कौतुक काय केलें, तें आइका चित्त जयां भुकेलें ॥ ३० ॥
तें दुग्ध नीट करितां क्षण एक झाला, तों आठवी जननि त्या क्षुधिता अजाला।
दे थान देइन म्हणूनि मनीं कृपा हे, देखे न त्यासि परि तत्कृतमात्र पाहे ३१
हांसे परंतु बहु गोरसनाश झाला, मारीन यास्तव मनींच म्हणे अजाला ।
काठी धरूनि अवलोकन जों करीते, देखे घरांत मग ये अति लौकरी ते ॥३२

१ ऋषि त्यास ज्ञानदृष्टीनें पहात असतां तो शिळा घेऊन पात्र फोडीत आहे तर त्यास आलेला राग मिथ्या आहे असें समजूं नये. रागास कांहीं तरी कारण आहे व राग खरा आहे असा भावार्थ. तें कारण म्हणजे भक्तांचा द्रोह किंवा भक्तिरसास अंतर, ( श्लोक २६ व २७ पैहा) २ ठिकाण. ३ माहीत, ठाऊक. ४ द्वेष ५ भक्तिरस. ६ लाभ. ७ गाणें गाई. ८ गाय जशी वत्सास पाहून द्रवे म्ह० प्रेमपान्हा सोडिते तसाच यशोदेस प्रेमपान्हा आला असतां तो मला पाजिला नाहीं. ९ सहन होई. १० द्विजाति म्ह० ब्राह्मण एका परमेश्वरास भजून जर काम्यफळाची इच्छा करतील तर ते मला प्रिय नाहींत असा भावार्थ. भगवद्गीतेंत म्हटलें आहे कीं निष्काम कर्म करावें. ११ मला. १२ तत्कृत म्ह० त्याची करणी म्हणजे गोरसपात्रांचा नाश केलेला तो मात्र तिनें पाहिला; कृष्ण कोठें दिसेना. १३ जन्मरहित जो कृष्ण त्यास.

तो काष्ठउलूखलपृष्ठभागीं, उभा हुजे मर्कटही विभागी।
चोरूनि खातो नवनीत पाणी, घालूनि सिंका प्रभु चक्रपाणी ॥ ३३ ॥
उडी टाकुनीयां पळाला हरी तो, समस्तां भयालागिंहो जो हरी तो।
न तो सांपडे कीं जया कामनांहीं, न ठायीं पडे त्यांचिया त्या मनांही ॥३४॥
श्रमें श्रांत तीचा बहू देह झाला, बहू धांवतां ये कृपा त्या अजाला।
जसी हस्तिनी बालहस्तासि हस्तीं, यशोदा धरी कृष्णहस्त स्वहस्तीं ॥ ३५
कृतापराधें प्रभु रोदनातें, करी धरी त्या मधुसूदनातें।
करें उगारी वारि वेत्र भारी, कांपे भयें देखुनि कैटभारी ॥ ३६ ॥
अहो लोचनीं पूर वाहे जळाचा, मुखीं मांखला रंग तो काजळाचा।
मुखाऊपरी नाचवी आड पाणी, भयें ताडणाच्या प्रभु चक्रपाणी ॥ ३७
नीलपंकजतनू सुकुमारा, देखतां अजि अशांस कुमारा।
वेत्र दाखवि जरी घननीळा, हाणवे न तरि त्या जननीला ॥ ३८ ॥
संत्रस्त तो देखियला मुरारी, उगारितां वेत्र भयें थरारी।
टाकूनि काठी मधुसूदनातें, बांधूं म्हणे त्या निजनंदनातें ॥ ३९ ॥
न कामना ज्यास न वासनाही, प्रेमेंविना बंधन त्यास नाहीं।
तें प्रेम वाहे हृदयांत माय, दांव्यांत तीच्या म्हणऊनि माय ॥ ४० ॥
ब्रह्मांडकोटीं न कदापि मातो, बांधों तयातें शकतीच माता।
वार्ता अशी ज्या स्वजनीं वदावी, आधीं अबद्धत्व तयास दावी ॥ ४१ ॥

---

१ उखळ, २ हात घालून. ३ कामनांहीं ही तृतीया अने० आहे. कामना म्ह० वासना ज्यास आहे, त्यास जो कधींच सांपडणारा नाही. ४ जशी हत्तीण आपल्या सोंडेनें आपल्या बाळहत्तीस धरिते तशी. ५ वेताची छडी. ६ हात. छडी चुकविण्याकरितां मुखावरून इकडे तिकडे हात नाचवी. ७ निळ्या कमलाप्रमाणें ज्याचा देह. ८ अशा पुत्रास. ९ घनासारखा नीलवर्ण ज्याचा देह. १० भ्यालेला. ११ मुरनामक दैत्याचा शत्रु ( कृष्ण ). १२ मातेच्या हृदयांत प्रेम होतें म्हणूनच त्यास दाव्यांत ( दोरींत ) बांधूं शकली, प्रेमावांचून इतर बंधनें त्यास कामना व वासना नसल्यामुळें बांधूं शकत नाहींत. १३ कोटि ब्रह्मांडांत न मावणारा. १४ मी अबद्ध म्ह० कशानेंही बांधला जाणारा नाहीं हें आपल्या भक्तांस (स्वजनांस) दाखविण्याकरितां पाहिल्यानें त्यास कितीही दोऱ्या लाविल्या तरी पुरेनात. नंतर मी प्रेमानें बद्ध होतों, हें दाखविण्याकरितां स्वतः आपणास बांधूं दिलें असा अर्थ.

हा अनंतचि तथापिहि लोकां, बाळरूप जननी अवलोकी ।
बद्ध हा म्हणति ये रिति जाणा, दाखवी तदपि त्याचि सुजाणा ॥ ४२ ॥
एवं द्विधा[1] कौतुक देव दावी, कथा अशी हे रुचिनें वदावी ।
न बांधवे केविं तया प्रकारा, वदों कसा बंधहि निर्विकारा ॥ ४३ ॥
आधींच दावें उखळास माय, बांधी न त्यामाजि मुकुंदमाय ।
बांधी जसें कां इतरां नरां हें, तों दोन बोटें व्यवधान[2] राहे ॥ ४४ ॥
पाठीकडे उखळ आणुनि मध्यभागीं, पोटाकडे जननि अग्रयुगीं[3] विभागी ।
देईन गांठि म्हणतां न पुरेचि दावें, त्यानंतरें नवल होइल तें वदावें ॥ ४५
दावें दुजें जोडुनि त्याशि माय, बांधे तरी त्यांत हरी न माय ।
बांधेच दावीं अवघ्या गृहाचीं, तरी उणें ये नवलाव[4] हाची ॥४६॥
जें तें उणें अंगुळ दोन माजी, आश्चर्य तें गोपवधूसमाजीं[5] ।
मातेसही विस्मय फार वाटे, तरी नये बुद्धि विचारवाटे ॥४७॥
न आदि ना मध्य न अंत ज्याला, बांधे कसें कोण तया अजाला ।
जो न स्वयें सर्वजगांत माता[6], त्या बांधिते यत्न करूनि माता ॥ ४८
हें तत्त्व नेणोनिचि कष्ट भारी, माता करी देखुनि कैटभारी ।
दयाकटाक्षें जननीस पाहे, बांधोन घे दाखवि तें कृपा हे ॥ ४९ ॥
कीं मुक्ति बद्धांसहि[7] देव देतो, जे आत्मविद्या गुरु दे वदे तो ।
मुक्त स्वयें मुक्तिहि दे अहो तो, प्रेमें तयाचा प्रभु बद्ध होतो ॥ ५० ॥
प्रसाद मोठा विधि[8] पावला हो, परंतु त्यालागिंहि देव लाहो[9] ।
न दे असा, आणि शिवादिकांहीं, न वश्य हा देव अनादिकांहीं[10] ॥ ५१
उरीं सदा श्रीजगदेकमाता, गुणीं तिच्या ये घडि एक माता ।
गोपिप्रसादांश[11] तईं तिला हो, होतां रमेलाहि अतर्क्य लाहो ॥ ५२ ॥
एवं च लक्ष्मी कमलासनां[12] ही, प्रसाद ऐसा कवणासि नाहीं । .
बांधोनि घे गौळणिच्याच हातीं, ब्रह्मा रमा कौतुक हें पहाती ॥ ५३

१ दोन प्रकारचे. २ अंतर. ३ दोन शेवटांनीं. ४ नवल, चमत्कार ५ गोपाळांच्या स्त्रीसमुदायामध्यें. ६ मावता. ७ स्वकर्मानें बंधन पावणारांस. ८ ब्रह्मा. ९ लाभ; असा लाभ त्याला देव न दे. १० अनादि असा देव. ११ वक्षस्थळीं निरंतर असणारी लक्ष्मी हिला जर यशोदा गोपीस जो प्रसाद झाला त्याचा अंश जरी मिळाला तरी तो प्रसाद मोठा अतर्क्यलाभ समजुन घेते, असा भावार्थ. १२ लक्ष्मी आणि ब्रह्मदेव यांस.

बांधे यशोदा बहुतां उपायीं, यत्नाविणें वामन त्या सुपायीं ।
प्रेमेंच बांधे अजि आयत्यानें, केलें न जाणो तप काय त्यानें ॥ ६४

## बालक्रीडा.

कडे घेउनी कृष्णनाथा उदारा, गृहद्वारदेशीं उभी नंददारा ।
मिळे वायकोमात्र तेथें व्रजाची, जयां पुत्र तीचा अवो तीव्र जाची ॥ १
शिखी जसा वेणुवनींच पेटे, गाऱ्हाणियांचे उठती चपेटे ।
चित्तें मुकुंदीं अतिसानुरागा, मुखीं मृषा दाविति तीव्र रागा ॥२॥
वदनिं कोप मृषा जरि वावरे, सरस हास्य तथापि न आवरे ।
न लपणारचि अभ्रकपंजरीं, लपविली जसि दीपकमंजरी ॥ ३ ॥
वरी क्रोध सप्रेम पोटांत नारी, अपांगें अशा लक्षिती पूतनारी ।
यशोदेप्रती त्याचिया लोकलीला, अहो, वर्णिती नाशिती ज्या कलीला ॥४
कडे तूझिया दीसतो साधु हा गे, मुते उंबरा आमुच्या आणि हागे ।
पडे नेणतां पाय वो त्याचिमाजी, करी हास्य तेव्हां मुलांच्या समाजीं ॥ ५
बरें गोड तें सर्व चोरूनि खातो, कळे ठाव जो नाकळे आणिकां तो. ।
दधी दूध भक्षूनि दे मर्कटांतें, करूनी तयां तृप्त फोडी घटांतें ॥ ६ ॥
प्रकाश देहें करि कैटभारी, भारी तनूज्योति तमीं उभारी ।
भीं रीघते जे गगनीं रवीची, वीचीप्रभी सिंधुचिया छवीची ॥७॥
देखोनि हें सांगति कृष्णमाते, कीं दीप्ति त्याची न गृहांत माते ।
प्रभा रवीहूनि तमांत दावी, ते गोष्टि याची किति हो वदावी ॥ ८ ॥
हातास याच्या नव जाय कांहीं, केलें असें ज्या गृहवायकांहीं ।
त्यांच्या मुलां ताडन उग्र हातें, करी ह्मणे जाळिन या गृहातें ॥ ९ ॥

१ दारांत. २ गोकुलांतील सर्व स्त्रिया ज्यांस कृष्णानें अत्यंत त्रास दिला होता. ( तीव्र जाची ). ३ अहो. ४ अग्नि. ५ कळकीच्या वनांत. ६ ज्यांच्या मनांत कृष्णाविषयीं अत्यंत प्रीति असून बाहेरून मात्र व्यर्थ राग दाखविणाऱ्या. ७ पसरे. ८ दीपक मंजरी म्ह० दिव्याची ज्योति जशी अभ्रकाच्या पिंजऱ्यांत झांकत नाहीं तसें त्या स्त्रियांचें हास्य त्यांच्या रागाखालीं झांकलें जाईना. ९ नेत्रकटाक्षानें. १० पाप. ११ अंधकारांत. १२ कांति; अंधकारांत याची सूर्याप्रमाणें कांति दिसते. १३ लहरी. १४ कांतीची. १५ मावते.

घरीं ज्या न हातास कांहींच लागे, करी तो बहू जाच त्यांच्या मुलां गे ।
रितीं भोजनें फोडुनी कांटमोरे, गळां घालितो आणि घेतो चिमोरे ॥ १०
निद्रितांसि चरणीं तुडवीतो, लेकुरें उठवुनी रडवी तो ।
थुंकुनी भरितसे वदनातें, आग लाविन ह्मणे सदनातें ॥ ११ ॥
नाहींच केलें सदनांत कांहीं, ज्या गेहिंचा कश्मल बायकांहीं ।
न बिंदु जेथें मज गोरसाचा, न गेह तें दुर्गतिमार्ग साचा ॥ १२ ॥
जों बैसतों राखत वो गृहातें, तों सोडितो वत्स सभय हातें ।
तों वांसरें नावरती न गायी, परोपरी हा छळितो अगाई ॥ १३ ॥
व्यर्थ क्रिया करुनि सर्वपशुसमाजीं, चोरी असे करित त्या मदना चिभाजी ।
एवंच राखतहि ज्या बसतों गृहातें, त्या आंत गोरससडा करितो स्वहातें ॥१४
शिंकीं न पावे जरि हात याचा, करीतसे यत्न महा तयाचा ।
पिढ्यांवरी ठेवुनि ऊखळातें, खातो जपावें किति वो खळातें ॥ १५ ॥
इत्यादि खोडी जरि बायकांहीं, निरोपिल्या त्यावरि माय कांहीं ।
न क्रोध दावी मुख कृष्णजीचें, पाहे सुखें चित्त न उष्ण जीचें ॥ १६

सभय नयन जों जों दाखवी लोकरीती
विशद चरित गोपी त्याचि तों तों करीती ।
श्वसुख जननि जेव्हां प्रेमसंयुक्त पाहे
कडकडुनि वदे हा मानुनीया कृपा हे ॥ १७ ॥

मातेसही बोलतसे हरी तो, तीचें तयांचें मन जो हरीतो ।
माते ह्मणे हें लटिकेंचि सारें, या बायकांचीं वचनें असारें ॥ १८
नाना कुचेष्टा मजशीं करीती, उरीं कठोरीं दृढ कुस्करीती ।
देती बळें चावुनि दाम दातें, सोसूं किती या प्रमदामदांतें ॥ १९
अधेर चाटुनिया प्रमदा पिती, तुज वदेन ह्मणे तरि दौपती ।
ह्मणति सर्व वधूजननीकरें, तुजचि मारवुं रे जननीकरें ॥ २०

---

१ भांडीं, मडकीं. २ चिमटे. ३ ज्या घरांत देवास अंश मिळत नाहीं अर्थात् ज्या घरीं पंचमहायज्ञ होत नाहीत, तें घर ह्मणजे दुर्गतीचें स्थान होय, असा भावार्थ. ४ सगळे. ५ आपण सोडून दिलेलीं वांसरें वगैरे बांधण्यांत बायका गुंतल्या असतां ६. चिमणाबाळ; लहानबाळ. ७ तापलेलें ह्म० रागावलेलें.८ असत्य; असार ह्म० सत्यरहित. ९ चावे; दंतव्रण.१० बायकांचा शंडगेपणा. ११ ओष्ठ. १२ धाक लावितात. १३ स्त्रिया. १४ समुदाय.

जाचिती *धमकटी मजला गे, बाळ मी रंळि न हे मज लागे।
व्यर्थ यत्न करिती सहसा जे, मूल काय तरणीसह साजे ॥ २१ ॥
गोष्टी वदों आणिक काय माये, असोत त्या एक मनीं न माये ।
उरोजं जैसे रुतती मला गे, न वज्र हीरी मणि हेमं लागे ॥ २२ ॥
आणीक बोले ह्मणि पूतनारी, ह्मणोनियां तत्पदपूत नारी ।
फोफांटती, मोहुनि नंदराणी, जिला हरीच्या चरितीं शिराणी ॥ २३ ॥
कीं बोल हे घेउनि नंदनाचे, तूं नाचसी बापहि नंद नाचे ।
परंतु लाबाड कराल याला, ऐशा गुणाच्या मकरालयाला ॥ २४ ॥
लबाड आह्मां तरि हा असा गे, कल्पूनि गोष्टी लटिक्याचि सांगे ।
ऐशा धिटा या बहु बोलतां हे, वाचा नव्हे कृत्रिमता लतां हे ॥ २५ ॥
एवं पदीं श्रीहरि बोलिला हें, टीका भले वाचिति त्यांसि लोहे ।
प्रत्यक्ष माते प्रति जे वदेना, तयास 'एवं' 'प्रति' भाव देना ॥ २६ ॥
एवं पदामाजिहि एवमर्थ, श्रोते विचारूत भले समर्थ ।
कथा अशी हे बहुतां पुराणीं, गातां सुधेची पुरवी शिराणी ॥ २७ ॥
आतां यशोदेप्रति गोपजाया, पूर्वोक्त चेष्टाकृत दोष जाया ।
परोपरी वर्णिति कृष्णजीच्या, लीला स्मरे जे स्वमनास जीच्या ॥ २८
एवं यशोदेप्रति गोपदारा, असत्यता लावुनि त्या उदारा ।
आणीक शब्द प्रभुमाधवाचे, मृषा ह्मणोनी वदती स्ववाचें ॥ २९ ॥
आह्मी ह्मणों यास विवाहकाळीं, वधू पहावी तुजतुल्यकाळी ।
कीं गोपकन्यासम गौरवर्णा, तेव्हां ह्मणे आइक काय वर्णा ॥ ३० ॥
सुंदरत्व सुरमानवलोकीं. जीचिया लवकृपाअवलोकीं ।
मी तिचें सुखनिधानें वरीतें, नित्य नूतन मला नवरी ते ॥ ३१ ॥

१ वक्रोक्त्यादि जी थट्टा. २ कुच. ३ हिऱ्याचा मनोहर मणि; वज्रमणि. ४ सोनें. ५ पूतना राक्षसी मारणारा (कृष्ण). ६ त्याच्या चरणानें पावन झालेल्या गोपस्त्रिया. ७ श्वासोच्छ्वास टाकिती. ८ लबाड. ९ मकर म्ह० मासे यांचें आलय म्ह० स्थान जो समुद्र; हा गुणसमुद्र जो कृष्ण त्याला तुम्ही आतांपासून लबाड कराल. १० कृत्रिमपणाची वेली. ११ मिळेल; 'एवं धाष्टर्यात्' इ० भागवत-उक्तीस लक्षून म्हटलें आहे. १२ गोपस्त्रिया. १३ दोष जाण्याकरितां. १४ बायको. १५ गौरवर्ण. १६ देवलोकीं व मनुष्यलोकीं. १७ जिच्या, ज्या लक्ष्मीच्या लेशकृपावलोकनांत. १८ स्थान, माहेरघर. * बळकट; दांडगी.

मी विरक्त मजला नवरी ते, दाटुनीच वरिते मजला ते ।
राहते मजचिमाजि सदा ते, सोविती वरदही जिस देते ॥ ३२ ॥
ब्राह्मणें तुडविलें मज लातें, त्या स्थळांतहि भजे मजला ते ।
तोंचि ते मज गमे न असोसी, काय याउपरि अन्य असोशी ॥ ३३
हार दे मज उदाररमणांचा, क्षीरनीरनिधि वा रमणीचा ।
नेदेखें करिलसा सरि याची, ऐसिया सधन सासरियाची ॥३४॥
शत्रुसारहि तसा सुरवाडी, नित्य ज्यांत अशि सासुरवाडी ।
द्वीप चंदन अशोक विराजे, ज्यासि वर्णिति कवी ऋषि राजे ॥३५
इत्यादि लाबाड असे असाच, हेंही तसें मानिसि काय साच ।
धुंडोनि खातो जनगोरसा गे, आश्चर्य तेव्हां तरि थोर सांगे ॥ ३६ ॥

वधुनि असुर आणीं वेद धुंडुनि पाणी
प्रलयजलधिमध्यें मत्स्य मी चक्रपाणी ।
दधि घृत लपवीती काय दे हीनवाणी
ह्मणउनि वदतो गे काय हे सत्य वाणी ॥ ३७ ॥

आणखी विविध दैत्यकचाटें, सांगतो हळुहळुच अचाटें ।
आपणाचवरि वर्त्तविता गे, सर्व बाष्कळचि वर्त्तविता गे ॥३८॥
जसिच गोष्टि ह्मिघे तासि लौकरी, प्रगट एक नवीच कथा करी ।
घुसळितां सदनीं दधि वायका, हळुचि गोष्टि ह्मणे तुह्मि आयका ॥ ३९

आहो वधुजन ह्मणे मंथितां दधीतें,
म्यां ये रिती घुसळिलें अमृतोदधीतें ।
केली रवी ह्मणतसे कनकाचळाची,
दोरी तयास फणिच्या मणि चंचळाची ॥ ४० ॥

---

१ बळेंच. २ दानशूर. ३ भृगु ऋषीनें. ४ तीच लक्ष्मी. ५ उत्कंठा. ६ मोठ्या मोठ्या रत्नांचा हार जो मला देतो. ७ क्षीरसमुद्र. ८ रमणीचा ह्म० स्त्रीचा बाप जो समुद्र. ९नदेखें; अशा सासऱ्याची बरोबरी करील असा कोणी मला दिसत नाही. १० मत्स्यावतार धारण करून समुद्रांतुन वेद धुडुन काढिले त्या कथेस लक्षून एथें ह्मटलें आहे. ११ लढाया. १२ अचाट, बिलक्षण. १३ खोटी. १४ गोष्ट. १५ सांगतो. १६ तुह्मी जसें दही घुसळतां तसेंच मीं पूर्वीं समुद्रमंथन केलें. १७ मंदरपर्वताची रवी व वासुकी सर्पाची दोरी करून म्यां समुद्रमंथन केलें.

निराधार चाले तळीं अद्रि भारी, न त्या देवदैत्यांत कोण्ही उभारी ।
तई होउनी कूर्म दुग्धांबुडोहीं, धरीं पाठिसी त्यासि नेदीं बुडोंही ॥ ४१ ॥

फिरविजे रवि जेविं वधूगणीं, अचळ तो चळतो फणिच्या गुणीं ।
तनुस ते नुसते मुख वर्षतां, विरमतें रमतें मन हर्षतां ॥ ४२ ॥

लक्ष्मी निघाली मथितां समुद्रा, माने न कोण्हाचिहि तीस मुद्रा ।
निर्दोष इच्छीच न आपणातें, वरील त्यातें करि या पणातें ॥ ४३ ॥

ब्रह्मा वृद्ध सकाम कामरिपु तो रुद्र श्मशानीं वसे
दैत्यत्रस्त सुरेंद्र इंद्रगुरुही इंद्राभिमानी असे ।
दुर्वासादि अशांत शांत मजही जो कांत इच्छीच ना
माला हें कमला विचारुनि गळां अर्पी जगज्जीवना ॥ ४४ ॥

इच्छीना मजला सुरासुर भला ऐसा दिसेना मला
आशेशीं रमला जिच्या नर तिला तो दाससा भासला ।
श्रीवत्सादि मला शिवे न शमला ऐशा घनश्यामला
माली हें कमला विचारुनि गळां घाली जगन्मंगला ॥ ४५ ॥

काढीतसां, तुह्मि जशा नवनीतसारा
म्यां शोधिला अमृतरत्नकदंब सारा ।
लोणी मुलांस तुह्मि चारितसां स्वधामीं
पाजीं सुरां युवति होउनियां सुधा मी ॥ ४६ ॥

---

१ पर्वत. २ उचलू शकेना; पर्वत समुद्रांत बुडूं लागला तेव्हां देव किंवा दैत्य यांपैकीं कोणासच झेंपेना, तेव्हां मी कूर्म होऊन त्या पर्वतास पाठीवर धरिलें. ३ क्षीरसागरांत. ४ स्त्रीसमुदायांनीं. ५ पर्वत. ६ वासुकीसर्पाच्या दोरीनें. ७ चेहरा. ८ निर्दोष वर लक्ष्मीविषयीं निरिच्छ त्यास. ९ कामातुर. १० मदनाचा शत्रु शिव, रुद्र. ११ इन्द्र, ज्यास निरंतर दैत्यांपासून भय. १२ बृहस्पति इन्द्राचा गुरु तो. १३ रागीट. १४ पुष्पमाला. १५ लक्ष्मी. १६ ज्या लक्ष्मीच्या, अर्थात् धनाच्या, आशेस गुंतला तो तिचा दास झाला असा भावार्थ. १७ अमृतरत्नइत्यादिकांचा समुदाय. १८ आपल्या गृहीं. १९ स्त्री होऊन २० मोहिनीरूप धरून. समुद्रमंथन करीत असतां अमृत निघालें तें दैत्य घेऊन पळून गेले, तेव्हां विष्णूनें मोहिनीरूप धरून दैत्यांस मोह पाडिला व अमृताचा घट घेऊन देवदैत्यांस वांटून देतें असें सांगून देवांस अमृत दिलें व राक्षसांस मदिरा पाजविली, ही कथा पुराणप्रसिद्ध आहे. २० अमृत.

सुधाकुंभ जो लाधला देवजोतीं, हिरोनी बळें दैत्य घेऊनि जाती ।
तईं मोहिनी होउनी अंगनेचे, करीं भाव नानापरी अंग नाचे ॥ ४७ ॥
वळी त्यांत तो निर्बळांलागिं दापी, ह्मणे हें न दे आणिकांतें कदापी ।
अकस्मात ते देखती सर्व मातें, स्मरें मोहिले पावले विभ्रमातें ॥ ४८ ॥
मजाचि पाहति ते न सुधा पिती, घटचि तो करिं आणुनि अर्पिती ।
ह्मणति पाजिशि वांटुनि तूं जशीं, पिउं तसे क्रमुनी क्षण तुजशीं ॥ ४९ ॥
सुर असुर तईं मी बैसवीं वेगळाले, सहजरिपु तऱ्ही ते भाव त्यांचे गळाले ।
सकल मज पहाती, जाणती देव-राजे, असुर युवतिवेषे मोहती जेविं राजे ५०
सुधा पात्र घेऊनि रंभोरु हातें, त्वरें वाढितां मी, मुखांभोरुहातें ।
सुरारी पहातां, दिसे चंचळोला, स्तनश्री हरी वायु वस्त्राचंळाला ॥ ५१ ॥
घे मी सुधाकलश वामकरांबुजानें, वाढावया, इतर पात्र धरीं दुजानें ।
तों कंचुकी सुटतसे, वसनांचलालों, वारा हरी, दिसत सुस्तन चंचळाला॥५२॥
सुकुच कुंकुमचर्चित देखिले, मृगमदें अति सुंदर रेखिलें ।
असुर ते स्मरविव्हल मी करीं, अमृत दे त्रिदशांप्रति लौकरी ॥ ५३ ॥
ह्मणति दाउनि वक्त्रविधु वधू, अमृत सर्व न दे तमधु वधू ।
तरि मनें हरलीं मुखसारसा, गमतसे न सुधारस सारसा ॥ ५४ ॥
असुर लंपट वक्त्रसुधाकरीं, अमृत दे अमरांप्रति लौकरी ।
ह्मणुनि दे फळ कल्पतरूपें मी, विषम अर्थ न कल्पतरूपमी ॥ ५५ ॥
अमृत अमर प्याले तों न होतां विलंब. प्रगट दिसति त्यान्हीं बाहु आजानु लंब

१ देवजातीस ह्म० देवांस. २ सुंदरस्त्रियेचे भाव करून. ३ दटावी. ४ कामानें मोहून वेडे झाले. ५ जन्मवैरी तरी ते वैरभाव विसरले. ६ स्त्रीवेषें. ७ रंभा ह्म० केळीसारख्या मांडया जिच्या, सुंदरस्त्री. ८ मुख हेच अंभोरुह ह्म० कमल त्यास; मुखकमलास. ९ चळला. १० वस्त्राच्या पदराला वायु हरण करी. ११ वाम ह्म० डावा, करांबुज हस्तकमळ; डाव्या हातानें. १२ दुसऱ्या हातानें ह्म० उजव्या हातानें. १३ वारा पदर उडवी असा अर्थ. १४ केशराच्या उटीनें चर्चिलेले. १५ कस्तुरीनें. १६ कामानें पीडित. १७ देव. "म्यां मोहिनी स्वरूप धरिलें जाण । ह्मणोनि मोडुन दाखवी नयन । तें कूर्म चरित संपूर्ण । आपुले आंगी दावितो ॥" श्रीधर. १८ वधू ह्म० ती स्त्री आपल्या वक्त्रविधुस ह्म० मुखचन्द्रास दाखवून. १९ मुखकमलास. २० सारखा. २१ मुखचन्द्राचे ठायीं; सुधाकर ह्म० अमृतानें युक्त आहेत किरण ज्याचे तो, चन्द्र. २२ कल्पित रूप धारण करणारा मी. २३ कल्पतरूची उपमा ज्यास. २४ जानु ह्म० गुडघे त्यास पोंचणारे असें लांब ज्याचे बाहु.

उरीं उदधिसुता श्री शोभती शंखचक्रें हरहर! हरि कीं हा बोलती दैत्यचक्रें।

करांतें जोडूनी विनितें विनतापुत्र जवळी
उभा स्कंधीं त्याच्या त्वरित चढतां व्योम कवळी ।
शिरीं दापी दैत्यां पद गरुड, तैसाचि अमरीं
पुन्हा ध्यातां आलों, असुर वधिले फार समरीं ॥ ५७ ॥
उभा पक्षास्कंधीं चरणतलरातोत्पलदळीं
दळीं ऐसे पाडीं सुररिपु जसा वायु कदेळी ।
दळी धान्यें जांतें दळिं तशिं शिरें म्यां भराडिलीं
स्वचक्रें तीं चक्रें पळत मृतनाथास रडलीं ॥ ५८ ॥

बहू भांडला दैत्य जो कालनेमी, यमाच्या गृहा होउनी काल नेमी ।
तई जो रणीं दानवाध्यक्ष मेला, स्वयें कंस तो भार झाला क्षेमेला ॥ ५९ ॥
सुगंधेवैरी पापदुर्गंध राहे, रडे गाय होऊनि तेव्हां धरा हे ।
विधीं प्रार्थितां यादवीं जन्मलों कीं, करूं कंसविध्वंसही मृत्युलोकीं ॥६०॥
भूभार धोतो मजला निवेदी, कृष्णावतारार्थ ह्मणूनि वेदीं ।
कंसचिया त्याचि पुन्हा वधा मी, तनू धरीं हे वसुदेवधामीं ॥ ६१ ॥
इत्यादि लाबाड वदे जसाच, हेंही तसें मानिसि काय साचें ।
गोपीस हा जों परिहास वाटे, तों वैखरी जाय खऱ्याच वाटे ॥ ६२ ॥
दावी अवो नवल आदिवराह ठेवी, दाढेसि काष्ठ वरि वेष्टुनि वस्त्र ठेवी ।
रांगोनि दाखवि मुसांडिहि सूकरांची, मोठी अगे चपलता गुडघेकरांची ॥६३॥
बाहोल्यांचें फोडितो पोट हा गे, अंकीं तेव्हां लेंकरूंमात्र लागे ।

---

१ उदधि ह्म० समुद्र याची कन्या लक्ष्मी ज्याचे उरावर. २ दैत्यसमूह. ३ नम्र. ४ गरुड. ५ आकाश. ६ अमरांनीं ह्म० देवांनीं ध्यान केलें ह्मणुन पुनः आलों. ७ कमळ. ८ सैन्यांत. ९ वारा केळीस पाडतो तसा. १० सैन्यांत. ११ मी आपल्या चक्रानें त्यांचीं शिरें भरडलीं, कुटून टाकलीं. १२ दैत्यसमुदाय १३ यम. १४ शंभर मुखांचा एक दैत्य ज्यास विष्णूनें मारलें. १५ पृथ्वीला. १६ पृथ्वी. १७ ब्रह्मा. १८ ब्रह्मा मला भूभार ह्म० पृथ्वीस दैत्यांचा भार झाला आहे असें निवेदन करी. १९ गृहीं, घरांत. २० खरें. २१ थट्टा. २२ वाणी. २३ वराहावतारांतील चरित्राचें सोंग करून दाखवितो. २४ वराहाची मुसंडी.—" दांतावरी काडी धरूनी । वस्त्र घडी त्यावरी ठेवूनी । ह्मणे म्यां असें धरिली अवनी । दावी रांगोनी सूकर ऐसा ॥ श्रीधर. " २५ नृसिंहावताराचें सोंग आणून बाहुलीचें पोट फोडी तेव्हां.—" बाहुल्यांचें पोट फोडी । ह्मणे हिरण्यकश्यपाचीं काढिलीं आंतडीं । घोरें गर्जती तांतडी । भीती देखून सवांगें ॥ श्रीधर.

आक्रंदोनी जाति बाळें पळूनी, बाई आह्मां त्रास वाटे कळूनी ॥ ६४ ॥
गुडघियांवरि होय उभा संये, नवल केवळ वामनभासे ये ।
कपट चंचल चालत बोलतो, रडतियांसहि हांसवि बोल तो ॥ ६५ ॥
गळां सूत नेसूनि अंगोस्तरातें, ह्मणे मारिलें क्षत्रियां दुस्तरातें ।
कुठारेंचि या छेदिलें कंटकांतें, ह्मणे घेउनी गे करीं काटकातें ॥ ६६ ॥
धनु करुनि चुईचें चांगलें ठाण मांडी, पुढिल सरल जंघा वांकुडी वाममांडी ।
श्रवणवरि करातें ने भवाखास भंगी, घडिभरि मुरली घे ठाण मांडी त्रिभंगी ६७
घेतों भरुनि यमुनेतुनि कुंभ पाणी, तों ये वदे हळुचि गोष्टि धरुनि पाणी ।
कीं घागरी उचलिल्या उदकीं वधूनीं, मी उद्धरीं क्षिति तशी असुरां वधूनी ६८
फळें चिरूं जरि वाळुक कांकडी, नृहरिआकृति दाखवि रोकडी ।
ह्मणतसे ओंश काढुनि आंतडीं, असुर म्यां वधिला अतितांतडी' ॥ ६९ ॥
पतिचरण धुतां गे सत्कथा वामनांची
कथुनि भुलवि बाई वृत्ति तेव्हां मनाची ।

---

१ वामनावताराची लीला दाखविण्याकरितां गुडघ्यांवर उभा राहून खुजा होतो असा अर्थ.—"गुडघे टेंकुनी होय वामन । ह्मणे म्यां त्रिपद घेतलें भूमिदान । एका पोरावरी उभा राहून । ह्मणे बळी पाताळीं घालितों ॥ श्रीधर." २ सखे; गडे. ३ वामनच प्रत्यक्ष असा भास होई हें नवल. ४ ज्याचा बोल (भाषण) रडणाऱ्यांसही हांसवितो. ५ सुताचें जानवें घालून परशुरामावताराची लीला दाखवितो. ६ कुऱ्हाड. ७ कठोर अथवा कंटकांसारखे जे क्षत्रिय त्यांस. ८ आपल्या हातांत काटुक (लहानसें लांकूड) घेऊन असें बोलतोः— "एकवीस वेळां निःक्षत्री । म्यां परशुधरें केली धरित्री ।" तोचि गोकुळाभीतरीं । अवतरलों मी ह्मणतसे ॥ श्रीधर." ९ शरीराची एक प्रकारची ठेवणः— "चुईचें धनुष्य करूनी । हरी ठाण मांडी मेदिनीं । आकर्ण ओढी ओढोनी । मारीन ह्मणे राक्षसां ॥ श्रीधर." १० डावी. ११ कानापर्यंत हात नेऊन; आकर्ण धनुष्य ओढण्याचा आव घालून. १२ शिवाचें धनुष्य. १३ मुरली घेऊन कृष्णावताराची लीला दाखवितो.—"घडीभर घेतो मुरली । ऐकतां आमुची वृत्ति मुराली ॥ श्रीधर." १४ तीन ठिकाणीं वांकडें अंग करून मुरली वाजवीत उभा राहतो. १५ श्लोक ६४ यावरील टीप पहा. १६ "ऐकें यशोदे सुताचें विंदान । नसतेंच करितो निर्माण । एके दिवशीं मी पतीचे चरण । धूत होतें निजगृहीं ॥ हळूच बैसला येऊन । ह्मणे बळीनें धूतले माझे चरण । मज त्रिपाद भूमिदान । प्रल्हादपौत्रें दीधली ॥" श्रीधर.

स्वपद ह्मणतसे कीं धूय धोता असाची
धरिसि जवळ माथा तें ह्मणे गोष्टि साची ॥ ७० ॥
जो तातआज्ञेंत न पुत्र वागे, हा त्याचिया जाचितसे जिवा गे।
मी तातशब्दें निजमाय मारीं, ऐसें करी शासन त्या कुमारीं ॥ ७१ ॥
गेलों बनां करुनि गोष्टि खरी पित्याची, जो स्त्रीस वश्यहि सकाम तथापि त्याची।
आणि व्रजांतहि ह्मणे मजलागिं तातें, संस्थापिलें स्ववचनासहि सुव्रतातें ॥७२॥
हा विष्णु सर्वैक्यपणें तसाच, पिता तरी नंदचि यांस साच ।
एवं मृषा सर्व विवर्त वीतो, आईक जें होइकँ वर्तवी तो॥ ७३ ॥
ज्यांच्या घरीं चौर्य करीं न लागे, हा त्यांचिया जाचितसे मुलां गे ।
करूनियां बौद्ध शिरोरुहांतें, लुंचां ह्मणे आपुलियाचि हातें ॥ ७४ ॥
उपडितां निजकेशहि जो रडे, कैरवि दावुनि लोचन कोरडे ।
बहुत दुःख मनीं जरि कालवे, भिउनि यास तयांस न बोलवे ॥ ७५ ॥
ह्मणे मला नेदिति गोरसां जे, हा धर्म त्यांच्याचि मुलांस साजे ।
लुंचूनि हे केश सुखाभिमानी, चावूनियां दांत मताभिमानी ॥ ७६ ॥
करूनी अहो अश्व काठीकुमारां, करी फोक घेऊनियां त्या कुमारीं ।
दिसे तो करीं खड्ग जाणों सुपाणी, ह्मणे म्लेच्छ हे कल्कि मी खड्गपाणी॥७७
न गृहिं ज्या मज गोरस सांपडे, त्वरित नास्तिक बौद्ध उसळ बडे ।
ह्मणुनि होउनि कल्कि तयां वधी, मग ह्मणे बरवीं धरिं भावंधी ॥ ७८ ॥
ज्याच्या घरीं गोरस हा न लाहे, त्याच्या करी जाच असे मुलां हे ।
मेलेच जाणों पडती कुमार, दे अश्व लोटूनि तुझा कुमार ॥ ७९ ॥

---

१ ब्रह्मा. २ परशुरामानें पित्याच्या आज्ञेनें आपल्या मातेचा शिरच्छेद केला ही गोष्ट पुराणप्रसिद्धच आहे.–" जें पोर मोडी पितृआज्ञेतें । त्यासी ताडण करी स्वहस्तें । मी मारीं आपुले मातेतें । पितृआज्ञे करूनियां ॥श्रीधर." ३ "रामावतारीं मी पितृभक्त । वना जाईं चरणीं चालत ॥ श्रीधर." ४ दशरथ राजा जरी कामी व स्त्रीवश होता तरी मीं त्याची आज्ञा पाळिली. ५ वसुदेवानें. ६ ऐकीव. ७ होणारे. ८ नास्तिक. ९ केश. १० उपटा.–" ज्याचे घरीं न लाभे चोरी । त्याचिया अर्भकांसी करीं धरी । ह्मणे तुमचे शिरींचे निर्धारीं । केश लुंचीन अवघे॥" श्रीधर. ११ तसाच आपण रडून दाखवी, परंतु डोळ्यांस मात्र पाणी नाहीं. १२ दूध, दहीं, लोणी इत्यादि. १३ वाईट मार, जोराचा मार. १४ खड्ग ह्म० तरवार आहे ज्याचे हातांत तो; मी खड्ग धारण करणारा कल्कि आहें असें ह्मणे. १५ भावबुद्धि. १६ प्राप्त होणें: लाहे हा शब्द लभ् (प्राप्त होणें) या धातूपासून झाला आहे.

जें जें करी तें शिशुवृंद[1] सोशी, पुन्हा धरी आचिच गे असोशी[2]।
स्थळींस्थळीं पाडुनि त्यां मुलां गे, मध्यें हयारूढ[3] फिरोंच लागे ॥ ८०
मग ह्मणे जरि इंद्रियगोरसें[4], जन न तृप्त करी मज वो रसें ।
वधिन होउनि कल्कि तयां असा[5], श्रवणकीर्तनिं याकरितां[6] असा ॥ ८१
सर्वी तयांत जरि एक असेल साच, हा शब्द होउनि असत्यहि हो तसाच।
हेंही असो परि अहो तुज नंदराणी, नाहींत काय विदितें[7] कुलजे[8] घरांणी॥८२॥
अहो यशोदे तुज सर्व ठाव्या, गोष्टी तरी काय अशा उठाव्या ।
रंगाचिणेंही दिसतो ठसाला, भीतों ह्मणीं आइकतील सासु[9] ॥ ८३ ॥
तूं काय हे आइकसील वाणी, एथें असत्यास नसेचं वाणी[10]।
सर्वज्ञ हो नंद तथापि त्यासी, ऐसेंचि हा बोलतसे पित्यासी ॥ ८४ ॥
स्रष्टा जनांचा स्वपितामहाचों, तया चतुर्वक्रपितामहाच्या[11] ।
मी बाप आई ह्मणतो पित्यासी, लबाड वाटे न तथापि त्यासी ॥ ८५ ॥
मी मायेही बाप चतुर्मुखाचा[12], हा शब्द याच्याचि असे मुखाचा।
नाभींत गे पंकज जाणवीतो[13], जाणों तया हाच सुजाण वीतो[14] ॥ ८६ ॥
न बोले अगे तुजसी काय वाणी, न गोष्टींत याच्या असत्यास वाणी ।
सहस्रांननी आपुली[15] शेजें[16] हा गे, वदे आणि बाळां तयांमाजि हा गे ॥८७ ॥
म्हणे तुज जे श्री[17] तिचा दादुला[18] मी, उरीं वाहतों कौस्तुभाचा ललामी[19]।
कसी ते न भांडे स्तनीं कुस्करी तो, जयीं आणि यांशीं कुचेष्टा करीतो॥८८॥

अगाई जांवाई अमृतजलधीचा[20] म्हणवितो
वितो[21] विश्वातें तो स्वसुत विधि[22] हेंही मिरवितो ।
अशाही गौळें हीं लपविति दुधातें तदपि तो
पितो चौर्यें राजा म्हणवुनि तृणातें[23] खुरपितो ॥ ८९ ॥

---

१ मुलांचा समुदाय. २ आशा; उत्कट इच्छा. ३ घोड्यावर बसून. ४ इंद्रियरूपी गोरसानें. ५ याप्रमाणें; वर सांगितल्याप्रमाणें. ६ याकरितां पुराणश्रवण व हरिकीर्तन या ठिकाणीं असा ह्म० असव जा. ७ ठाऊक. ८ हे कुलीन गृहिणि. ९ सासू. १० तोटा, उणेपणा. ११ मी आपल्या आजोबाचाही उत्पन्नकर्ता तसाच ब्रह्मदेवाचाही उत्पन्नकर्ता आहें असें ह्मणतो. १२ चतुर्मुख ब्रह्मदेव. १३ दाखवितो. १४ जन्म देतो. १५ शेष. १६ शयन; अंथरूण. १७ लक्ष्मी. १८ पति. १९ भूषण; अलंकार. २० समुद्राचा. २१ जन्म देतो. २२ ब्रह्मा माझा मुलगा अशी शेखी मिरवितो. २३ आपणास राजा ह्मणवितो पण एथें तर गवत खुरपीत आहे ह्मणून सर्व बोलणें मिथ्या असा अर्थ.

दुग्धाब्धि ज्याचा ससरा सखा तो, चोरूनियां गोरसघास खातो ।
ज्याचे उरीं नित्य पहा रमा तो, गोपी उरीं सद्गुणहार मातो ॥ ९० ॥
देखोनि भी रांजण पूर्णपाणी, तो मत्स्य एकार्णवि चक्रपाणी ।
जो थापटूं दे न वळे असा गे, पाठीं धरी मंदर आणि सांगे ॥ ९१ ॥
स्वचेंडू न घे आंत घालूनि पाणी, म्हणे रांजणामाजि या फार पाणी ।
असा भ्याड एकार्णवामाजि भारी, म्हणे उद्धरीं भूमि हा कैटभारी ॥ ९२ ॥
नख दुखे निज आंगडिचीं कसा, न सुटतो तुज ठाउक तो कसा ।
करेंहे असुरास चिरीतसे, सकळ शब्द अवो वदतो असे ॥ ९३ ॥
ब्रह्मांड भेदित असें म्हणतो स्वपायें, शिंका दहीं घृत तया करितो उपायें ।
निःक्षत्रिया क्षिति करी परशींकरूनी, तो हा कुऱ्हाड उचलूं न शके धरूनी ९४
स्वयंवरीं त्र्यंबकचाप हातीं, रंगांत भंगी नृपती पहाती ।
तो हा न मोडी मृदु इक्षुदंडा, या कल्पना जाणतसे उदंडा ॥ ९५ ॥
भिउनि किंकर किंकर किंकरा, करि पिता वरदान भयंकरा ।
धरुनि त्रासहि जो जग आक्रमी, वधिल त्यासि असाचि पराक्रमी ॥ ९६
चरणचवडियां तेवीं कराच्या तळांतें, चुकउनि सकळांगे लावुनी भूतळातें ।
उडतउडत चाले पालथा जेविं मासो, खदखदखद हांसे हांसतां ये उमासो ९७

१ क्षीरसमुद्र २ सासरा; श्वशुर; दुग्धसमुद्र सासरा म्हणवितो व आपण चोरून गोरस खातो म्हणून हा सर्व मिथ्या बोलतो असा अर्थ. ३ लक्ष्मी. ४ चोख. ५ "रांजणीचें पाणी देखतां । भयवाटे तुझ्या सुता । तो प्रलयसमुद्रीं तत्त्वतां । मत्स्य कैसा झाला गे ॥ थापटोनी निजवितां जगजेठी । म्हणे हळूच थापटीं माझी पाठी । तो म्हणे मंदराचळ उठाउठी । पृष्ठावरी धरिला म्यां ॥ श्रीधर." ६ समुद्र. ७ मंदर पर्वत. ८ हात. ९ कैटभ दैत्याचा शत्रु; विष्णु. १० "आंगडियाचा कसा सोडितां । म्हणे नखें दुखती माझीं आतां । आणि म्हणतो असुर तत्त्वतां । विदारिले निजहस्तें ॥ श्रीधर." ११ नखानें. १२ आपल्या पायानें ब्रह्मांडास भेदून जाईन म्हणतो तोच शिंक्यावरील दहीं, तूप घ्यावयास नाना उपाय योजितो. १३ पृथ्वी. १४ कुऱ्हाडीनें. १५ सीतास्वयंवरप्रसंगीं. १६ शिवधनुष्य. १७ सभेत.— "इक्षु न मोडे यास जाण । म्हणतो मोडिलें भवसायकासन । जो पळतो बागुलाच्या भेणें । सांगे रावण मारिला म्यां ॥ श्रीधर." १८ ऊस. १९ पुष्कळ. २० सगळीं अंगें चुकवून. २१ मत्स्यावतारांतील लीलेचें अनुकरण करितो.— "उडत उडत होय मासा । म्हणे हा मत्स्यअवतार ऐसा । अर्भक पाहीं धरूनी ऐसा । शंखासुर हाणि पैं ॥ श्रीधर." २२ उम.

त्वरि गिरि फिरतां जो लोचनीं भाव दावी
किति म्हणउनि बाई कूर्मता ते वदावी ।
बुबुळयुगुळ चाळी झोंप डोळ्यांत भावी
करि नवल चरित्रें मागिलीं आणि भावी ॥ ९८ ॥
बाळंतिणीपुढिल घेउनि वाळकातें, मानेतळीं हळुच घालुनियां करातें।
मी गोकुळासि वसुदेव अधोक्षजा या,ठेवुनि आणिन विते जिस नंदजाया ९९
पसरवि बहु वस्त्रें कीं नदी भानुजा ते, बुडवुनिहिं तटातें जे ह्मणे तीव्र जाते ।
ढकलुनि पेट पायें यांत लाहानसा गे, मज असि यमुनेनें दीधली वाट सांगे १००
दाजी जसीं हीं लटकींच ठाणें, तैसींच आह्मांवरिही उंठाणें । ४
न वत्स चारी अझुनी न गाई, लबाड हा तोचि असा अगाई ॥ १०१
माया मृषा सर्वहि भाव लीला, हा अर्थ गोपीवचनावलीला ।
दे कृष्ण आत्मा प्रिय वामनाचा, प्रकाश जो नित्य नवा मनाचा ॥१०२

---

## वनसुधा.

(कथेचा सारांश.)

त्या प्रकरणांत श्रीकृष्णानें गोपाळांसह वनांत ज्या ज्या क्रीडा केल्या त्यांचें सारांशानें वर्णन आहे. वनांत कंसाकडील ज्या दैत्यांचा नाश कृष्णानें केला, त्यांपैकीं अघासुर व बकासुर यांच्या वधाचें वर्णन दिलें आहे. अघासुर हा मार्गांत अजगर होऊन तोंड वांसून पडला असतां सर्व गोप व गाई पर्वताची खिंड आहे असें समजून आंत शिरल्या, तेव्हां कृष्णानें आपलें शरीर मोठें करून अघासुराचा देह चिरून गाईगोपाळांस सोडविलें. त्याचप्रमाणें बकासुरानें कृष्णास गिळिलें असतां कृष्णानें दोन्हीं चंचुपुटें धरून त्यास फाडिलें.

सुगति दे अति दुष्ट अघासुरा, स्मर मना दृढ त्या अनघा सुरा ।
प्रभु ऋणी जन्हि दे परमा गती, स्वपददास्याचि ते जन मागती ॥ १ ॥

---

१ डोळ्यांत. २ कूर्माची कृति. ३ युग्म; जोडी. ४ दाखवी. ५ पुढील. ६ जन्म देते. वसुदेवानें मथुरेहून कृष्णास गोकुळीं कसें आणिलें ही कृति आपण लहान बालक हातांत घेऊन करून दाखवितो. ७ वस्त्रें पसरून म्हणतो ही यमुना नदी आहे, इचें पाणी तटावरून चाललें आहे. ८ सूर्यकन्या यमुना. ९ बक्ष. १० उत्थान. ११ गोपीवचनपंक्तीला. १२ अघ म्ह० पाप, अनघा म्ह० निष्पाप अशास. १३ देवास.

भक्तांनिमित्तचि[1] अघासहि[2] मोक्ष जाला,भक्तांसि देउनिहि मोक्ष अधोक्षजाला[3] ।
वाटे असेंचि मजला ऋण त्या जनांचें, भक्तप्रियत्व इतुकें भवभंजनाचें[4] ॥२॥

भक्तांनिमित्तें[5] वदनीं निघाला, दिला तरी मोक्षचि त्या अघाला[6] ।
तो भक्तिनें कां स्वमुखीं न घालां[7], पडेल दुःखावरि सद्य घाला ॥ ३ ॥

मारूनि अज्ञान अघासुराला, स्वानंद दे वत्सप[8] वासुरांला ।
स्वनामघोषें वदनें हरी तो, निघे स्वनामें अघ[9] तो हरीतो ॥ ४ ॥

येतां मुखांत अघमूळ[10] अघासुराला[11], नासूनि देइल सुखें अनघां[12] सुरांला ।
वाग्वल्लिकीर्तनभरें सुरराजटाळी, वाजेल जे सकळ विघ्नसमाज टाळी॥५॥

गोवृद्धिसंततिच[13] इंद्रियवत्सपाळा[14], जे देव पाळिति तयांसहि वत्सपाळां[15] ।
पापें अघेंचि गिळिलें तरि[16] यो हरी तो,तोंडांत कीं अघ[17]अघासुर जो हरीतो ॥ ६

एथें पहा तुम्हि कथा असि कृष्णजीची,द्वैपायन स्तुति करी मुनि कृष्ण[18] जीची।
सांगे कथा शुकहि तेचि परीक्षितीतें[19], जे उद्धरी अजि तयाउपरि क्षितीतें[20]॥७॥

पिउनि सविषेंही[21] हो पूतनेच्या स्तनातें, मनिं धरि जननीचें श्रीगदाहस्त[22] नातें।
निजपरमपदातें जो स्वधीरां जनां दे, गुणरहित विकुंठीं[23] श्रीमहाराज नांदे ॥८॥

राक्षसी जरि म्हणों जन नीची[24], दे मुकुंद पदवी जननीची[25] ।
सद्य ने[26] स्वपरमा सदनातें, तें खरें करि सुखप्रद नातें ॥ ९ ॥

स्वलोकास ज्या ने[27] हरी पूतनेला, करूनी तिचा शुद्धीभूत[28] नेला ।
तयाही बका धाकुटा[29] ये व्रजाला, जया शोक त्याचा महातीव्र जाला ॥१०॥

---

१ गोपाळांकारितां. २ अघासुराला. ३ कृष्णास. ४ संसारनाशकाचें. ५ भक्तांसाठींच अघासुराचे वदनीं शिरला. ६ अघासुराला. ७ त्याला तुम्ही आपले मुखीं कां घालीत नाहीं, अर्थात् त्याचें नाम तुम्ही मुखानें कां घेत नाहीं? जें नाम भक्तीनें घेतलें असतां दुःखाचा लागलाच शेवट होईल. ८ वत्सांस पाळणारा; गोपाळ. ९ पातक. १० पापाचें मूळ. ११ पापरूप असुराला. १२ निष्पाप. १३ गाई ह्याच केवळ बुद्धिसंतति. १४ इन्द्रियें ह्याच केवळ वत्सांचा समुदाय. १५ इंद्रियरूपी वत्सांस पाळणारे जे देव त्यांस जर पापरूपी अघासुरानें गिळिलें तर. १६ तो हरि तोंडांत येवो. १७ पातक ह्याच कोणी अघासुर यास. १८ कृष्णद्वैपायन मुनि म० व्यास. १९ परीक्षित राजास. २० पृथ्वीस. २१ विष लावलेल्या स्तनास. २२ गदापाणि श्रीकृष्ण. २३ वैकुंठीं. २४ नीच. २५ मातेची. २६ तत्काळ तिला निजधामास नेलें. २७ नेई. २८ पवित्र करून. (बकासुरास) २९ पुतना व बकासुर यांचा धाकटा बंधु अघासुर.

घाली ह्मणीं व्रजजनांवरि दैत्य घाला, मारूं ह्मणे हरि वनांतचि त्या अघाला ।
त्याकारणेंचि वनभोजनहेतु केला, भाताद्रयासि न शिव्यास हरी भुकेला ११
एवं व्रजाप्रति अघासुर दुष्ट यावा, त्याचा वनांत हरुनी बलगर्व ध्यावा ।
यालागिं जाय विपिनास उठे प्रभातें,न स्पष्ट जों बरवि होय रविप्रभा ते॥१२॥
बोले मुलांप्रति हरी पहिले दिशीं कीं, रात्रींच सिद्ध करणें अैशनादि शिकीं ।
जाऊं समस्तहि उद्यां वनभोजनातें, पोटांत भाव वधणें अघदुर्जनातें ॥१३॥
एके दिनीं मनिं धरूनि असें हरी तो, चाले प्रभातसमयीं खळ जो हरीतो ।
शृंगीरवेंचि करि जागृत मित्रसेना,देणार जागृतिस ज्याविण हो असेना॥१४
खडबडोनि समस्तहि धांवले, सहितवत्स हरीप्रति पावले ।
सकळ खेळति सोडुनि वासुरां, परम कौतुक जें गगनीं सुरां ॥ १५ ॥
वनीं खेळती बाळ ते वल्लवांचे, तुरे खोंविती मस्तकीं पल्लवांचे ।
फुलांचे गळां घालिती दिव्य हार, स्वनाथासवें ते करीती विहार ॥ १६ ॥
स्वकौशल्य ज्या गुंजमाळांत नाना, गळां घालिती ते करीती तनानां ।
शिरीं बांधिती मोरपत्रें विचित्रें, शरीरावरीं रेखिती दिव्यचित्रें ॥१७॥
नसोनी उणें रत्नमुक्तां सुवर्णां, उगाळूनियां मृत्तिकावर्ण वर्णा ।
तनू रेखिती कृष्णही लोकरीती, करी चित्र देहीं जसे ते करीती ॥ १८ ॥
हरिहि आपण त्यांतचि खेळतो, ह्मणुनि वर्णितसे शुकें खेळ तो ।
चहुंकडे करिती नवल क्षिती, परि हरीसचि सर्वहि लक्षिती ॥ १९ ॥
पहायास शोभा मृगां काननाची, पुढें मूर्ति जातां मृगांकाननाची ।
गडी त्या चतुर्वक्त्रबापास होतीं, धरीतीच धांवोनि निष्पाप होती ॥ २० ॥
धांवोनि लावी पहिलें करातें, श्रेष्ठत्व दे त्या अजि लेंकरातें ।
जो तो ह्मणे लाविन मीच पाणी, धरीन आधीं प्रभु चक्रपाणी ॥ २१ ॥

---

१ रानास. २ स्पष्ट रविप्रभा झाली नाहीं तोंच ह्म० अरुणोदयाबरोबर. ३ खाण्याचे पदार्थ. ४ शिंग वाजवून संवगडी जागे करून. ५ मित्र किंवा संवगडी हीच सेना. ६ चैतन्यास. ७ गोपाळांचे. ८ आपल्या स्वामीसह. ९ क्रीडा. १० ज्या गुंजांच्या माळांत त्यांचें गुंफण्याचें कौशल्य दिसे. ११ गायन १२ मोराचीं पिसें. १३ अंगावर सुंदर चित्रें काढितात. १४ रत्नास आणि मोत्यांस. १५ रंगास. १६ अंगावर चित्रें काढीत. १७ शुकमुनि. १८ मृगांची ह्म० श्वापदांची आणि अरण्याची शोभा पहाण्यास. १९ मृगांक ह्म० चन्द्र त्यासारखें आनन ह्म० मुख ज्याचें तो, अर्थात् कृष्ण. २० चतुर्वक्त्र ब्रह्मदेव त्याचा बाप. २१ हातानीं शिवून. २२ हात.

परोपरी खेळति जी[1] वनांत, अर्पूनि चित्तें जगजीवनांत ।
धरूनियां मर्कटपुच्छ[2] हातीं, तयांसवें वृक्षिं उडों[3] पहाती ॥ २२ ॥
मुखें वांकुनी लोचनभूलटातें[4], उभारूनियां वांकुल्या[5] मर्कटातें ।
अहो दाविती शब्द तैसे करीती, असे खेळती बाळ निःशंकरीतीं ॥ २३ ॥
खगांचिया[6] साउलिच्याच संगें, ते धांवती हास्यरसप्रसंगें ।
हंसाचिया दाखविती गतीतें, जे लाधले हंसगुरुगतीतें[7] ॥ २४ ॥
वनीं देखतां मेघनीलास मोर, प्रमोदें[8] करी नृत्यलीला समोर ।
तयासारिखे नाचती तोकें[9] सारे, खुणावूनि अन्योन्य कीं तो कसा रे ॥ २५ ॥
जसे दांभिक ज्ञानमुद्रा धरीती, जनां दाविती ध्यानही बोधरीती ।
तसी दाविती ते वकाभ्यासमुद्रा[10], गडी हांसवीती कृपेच्या समुद्रा[11] ॥ २६ ॥

उडतउडत चाले जेविं मंडूकजाती[12],
उकड वसति तैसे त्यांसवें तीव्र जाती ।
न बहु पसरितां ते हस्तपादादि पाणी,
तरति नवल पाहे हांसतो चक्रपाणी ॥ २७ ॥

नामप्रतापें घनसंनिभाच्या[13], प्रतिध्वनी दोति दिशा नभांच्या ।
तों तों बळें गर्जति तोकें[14] सारे, तुम्ही[15] न गर्जा ध्वनि तो कसा रे ॥ २८ ॥
रमति हांसति हास्यरसें असे, निजमनोगत ज्यांस जसें असे ।
करिच तो वनिं खेळ अहो तसे, विमल[16] जे स्मरतां मन होतसे ॥ २९ ॥
वदे शुकाचार्य परिक्षितीतें, कीं धन्य राया करिती[17] क्षितीतें ।
श्रीमूर्ति जे ब्रह्मसुखानुभूती, तीभोंवत्या खेळति त्या विभूती[18] ॥ ३० ॥
संतांसि जें ब्रह्म सुखानुभूतीं, दासांसि[19] तें दैवत सर्वभूतीं[20] ।

---

१ अहो. २ वानराचें शेपूट. ३ वृक्षावर उडण्यास. ४ डोळ्यांच्या भिवया च-ढवून. ५ वेडावणें. ६ पक्ष्यांच्या. ७ हंस गुरु जे यतिवर त्याची गति ज्यांस मिळाली आहे. ८ आनंदानें. ९ बालक. १० बकासारिखे ध्यानस्थ बसतात. ११ कृपेचा समुद्र जो कृष्ण त्यास. १२ बेडकजाति. १३ घनाकारखें स्वरूप ज्याचें त्याच्या नामप्रतापें. १४ बालकें १५ तुम्ही तसा प्र० प्रतिध्वनि उठण्या-सारखा हरिनामाचा गजर कां करीत नाहीं. १६ जे खेळ स्मरले असतां मन विमल म्र० निष्पाप होतें. १७ त्यांनीं पृथ्वीस धन्य करून सोडिलें. १८ ब्रह्मानं-दाचा जिच्या ठिकाणीं अनुभव त्या मूर्तीच्या भोंवतीं अशा विभूतीच सकल भाहेत असे ते गोपाळ कृष्णाच्या भोंवतीं खेळतांना दिसले. १९ भक्तांस. २० सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणीं.

जनां दिसे बाळक लोकरीती, क्रीडा तयाशीं शिशु जे करीती ॥ ३१ ॥
अलभ्य ज्याचा पदरेणु सिद्धां, योगेश्वरांलागुनिही भाविकां ।
प्रत्यक्ष तो शेषहि हो स्ववाचा, वर्णूं शकेना व्रज वैभवाचा ॥ ३२ ॥
वदे शुकाचार्य असेंचि राया, कीं वासुरें सोडुनियां चराया ।
क्रीडा अशा श्रीहरिशीं करीती, अलोकभाग्यें परि लोकरीती ॥ ३३ ॥
स्वजनजीवन दैत्यअंजीवनी, सगुण तो व्रजराज अजी वनीं ।
रमतसे जरि त्या जगजीवनीं, मन बुडे न बुडे मृगजीवनीं ॥ ३४ ॥
वनचरित्र सुधा व्रजकाननीं, करुनि तें हरि वामनआननीं ।
हरिच ओतुनि वैभव देतसे, अमृतबिंदु हरीच वदे तसें ॥ ३५ ॥
ग्रंथ हा वनसुधा रचला हो, दे सुधेहुनिहि फारच लाहो ।
जो वनांत हरि हा रमला हो, देतसे स्वयशहार मला हो ॥ ३६ ॥

---

## अध्याय दुसरा.

स्थिरचरात्मक जो अवघा हरी, स्वजनजीवनहेतु अघा हरी ।
सुख सुरद्रुम कामदुघा सुरां, स्मर मना वधि जेविं अघासुरा ॥ १ ॥
रसें पहाति नभीं अवघे सुर, त्वरित ये इतुक्यांत अघासुर ।
दुरुनि लक्षितसे खेळ खेळतो, बकबकीरिपु ज्यांसह खेळतो ॥ २ ॥
त्या मुलांत हरिचा प्रताप तो, देखतां अघ मनींच तापतो ।
हा म्हणे भगिनिबंधुघातकी, मींच एक उरलों तिघांत कीं ॥ ३ ॥

---

१ ज्याचें पदरज सिद्धांस किंवा योगेश्वरांसही अलभ्य. २ गोपाळांनीं कृष्णाशीं क्रीडा केल्या त्या लोकरीतीतीलच होत्या, परंतु त्यांचें भाग्य मात्र कृष्णाशीं क्रीडा करण्यांत अलौकिक होतें. ३ स्वजनांस म्ह० भक्तांस जीवन देणारा. ४ दैत्यास मारणारा. ५ अहो. ६ जर त्या जगजीवनाचे ठिकाणीं मन बुडालें तर तें मृगजळांत म्ह० संसाररूपी जीवनांत बुडणार नाहीं असा अर्थ. ७ मृगजळांत. ८ वनांतील चरित्र हीच सुधा हरि आपल्या हस्तें वामनाच्या मुखांत ओततो म्हणजे वामनाकडून वनसुधाग्रंथ हरि आपणच करवितो असा अर्थ. ९ लाभ. १० स्थावरजंगमात्मक. ११ स्वभक्तांच्या जीवनाचें कारण जो हरि. १२ बालकास. १३ कल्पतरु. १४ कामधेनु. १५ देवांस. १६ क्रीडारस. १७ दुरून. १८ बकासुर आणि पूतना यांचा शत्रु कृष्ण. १९ पूतना आणि बकासुर यांचा घात करणारा.

या मुलांसहित यास गिळावें, ते गिळूनि न पुन्हा उंगळावें ।
दोंनिमित्त न वधीं जरि सारे, क्रोध दारुण शमेल कसा रे ॥ ४ ॥
करुनियां तिळ यांसह लेंकरें, नरडिच्या रुधिरें सलिलें करें ।
बरवि देइन आजि तिळांजळी, करिन तृप्त बकी बक या जळीं ॥ ५ ॥
परंतु हातें जरि हे वधावे, कोणी ह्मणीं घेउनि जीव धांवे ।
ह्मणोनि पोटींच कलाप सारा, निघे असा हो पसरी पसारा ॥ ६ ॥
ऐसें विचारूनिच राजवाटे, निजे पहातां गिरिराज वाटे ।
मोठा धरी देह भुजंगमाचा, जो नाशकर्ता स्थिरजंगमाचा ॥ ७ ॥
अघअजगर मोठा तोंड वासूनि वाटे,
शयन करि मुलांला तुच्छ होऊनि वाटे ।
फणि परि फणीसा दीसतो हा स्वरूपीं,
ह्मणउनि शिशुवृंदें स्वैरभावें निरूपी ॥ ८ ॥
ह्मणति दुष्ट भुजंग असे खरा, तरि भिऊं न तया खलशेखरा ।
सकळ यांत निघों तरि काय हो, करिल सर्प भयानक कायहो ॥ ९ ॥
निघोनि पाहों घडि एक सारे, गिळील आह्मां खळ हा कसा रे ।
शिरावरी श्रीव्रजराज हा कीं, जो मृत्युकाळा सकळांस हाकी ॥ १० ॥
ह्मणति एक गिळी जरि साप हा, घडिमधेंचि मरेल कसा पहा ।
चिरुनि टांकि जसाचि बका क्षणें, वधिल यासि पहा कमलेक्षणें ॥ ११ ॥
जरि असा अजि निश्चय सांपडे, अजितें सर्व ह्मणोनि उसा पडे ।
अघफणांतहि हार दिसे हरी, अवें बकी बक जो निमिषें हरी ॥ १२ ॥

---

१ ओकून टाकावें. २ पूतना व बक या दोघांचा सूड उगविण्याकरितां जर मीं सगळ्यांस मारिलें नाही तर. ३ या कृष्णासह सर्व गोपाळ हेच तीळ व त्यांच्या नरडीचें रक्त हेंच पाणी घेऊन बक व पूतना यांस तिलांजलि देईन असा अर्थ. ४ [illegible]; बालगोपाळांचा समुदाय. ५ अंगाचा पसारा. ६ राजमार्गी. ७ सर्पा-[illegible]; अजगराची. ८ ज्यास फणा नव्हती तरी तो नागासारखा दिसे. ९ लोकहो. १० [illegible]. ११ याचा भयंकर देह. १२ [illegible] कृष्ण हा शिरावर असतां [illegible] करणारा असतां. १३ [illegible] व [illegible] यांस [illegible]. [illegible] १५ [illegible]; [illegible]. १६ [illegible] हरि दिसला. १७ [illegible]. बक आणि बकी.

## अध्याय ३ तिसरा.

हरिकथा परिसों अतिपावनी, करि पहा कसि त्यासि कृपा वनीं ।
भरंवसा धरितां हरिचा हरी, भवैंभयें न कसा अजि संहरी ॥ १ ॥
देखोनियां दुष्ट अघास वाटे, त्याआंत जावें अवध्यांस वाटे ।
नामध्वनीयुक्त अवीटें टाळी, ते वाजवीती स्वअरिष्ट टाळी ॥ २ ॥
गडी सर्व टाळारवें केशवाचे, असे धांवती श्रीहृषीकेशवाचे ।
सर्वें हांकिले वृंदेंही वांसुरांचें, भयें कांपले देह सर्वां सुरांचे ॥ ३ ॥
मुखीं सुरांच्या गगनीं अहाहा, अनर्थ झाला ह्मणती पहा हा ।
परंतु रक्षील हरी प्रभावें, झाले उगे मागुति याच भावें ॥ ४ ॥
पोटीं सवत्स शिशुवृंद जरी निघाला, नाहीं तयांत हरि हें कळलें अघाला ।
याता मुकुंद ह्मणऊनिच वाट पाहे, हें देखतां हरिस उद्भवली कृपा हे ॥५ ॥
देखोनि मानित असे हरि विस्मयातें, कीं सर्प हा करिल दारुण भस्म यांतें ।
जाळील लाविल न हा असुर क्षणातें,यांच्या तरी करिन मी अधुंरक्षणातें ॥६॥

निजबलप्रद सर्व खळांस मी, विषमता न सुरां असुरां समी ।
ह्मणुनि होतित दैत्यविषें मृतें, परि तयां उठवीन कृपामृतें ॥ ७ ॥

गृहसुखीं निघणें जरि मज्जना, तरि करीन भवांबुधिमज्जना ।
स्वकृतभोग घडेच जरी खरा, तरि न बाधक साधकशेखरा ॥ ८ ॥

गृहरती जरि होति सुखावहा, तरि ह्मणे मज रक्षिल देव हा ।
जरि अचूक सुखासुख पावतो, तरि तया बुडवींच न भाव,तो ॥ ९ ॥

ऐसें जरी अजगरोदरवन्हिजाळें, हें नाश पावतिल वत्सपें वत्सजाळ ।
वर्षोनि त्यांउपरि मी स्वकृपामृतातें,रक्षीन मारुनि अघासुर यां मृतांतें ॥१०॥
विचारुनि ऐशा कृपेनें हरी तो, स्वयें जो रिघे जो खळां संहरी तो ।

---

१ ऐका.२कृष्ण.३ संसारभय.४ मार्गांत पाहून.५अरिष्टास टाळणारी अशी मोठी टाळी त्यांनीं वाजविली. ६ टाळीच्या आवाजानें. ७ समुदाय. ८ हरि रक्षील हाच भाव मनांत धरून सकल सुरलोक मुके राहिले. ९ वासरांसह गोपाळ जरी त्या अघासुराचे पोटांत शिरले तरी. १० प्राणरक्षणास. ११ अधिकउणेपणा. १२ माझ्या जनांस; मद्भक्तांस जर संसारसुखांत शिरणें आहे तर त्यांस मी संसारसागरांत बुडवीन. १३ कृतकर्माचा भोग (फळ) जरी सर्वांना प्राप्त होतो तरी तो साधकोत्तमास (ज्ञान्यास) बाधक होत नाहीं. १४ मला देव रक्षील हा भाव. १५ अजगराच्या उदरांतील आग्नि, त्याच्या ज्वालेनें. १६गोपाळ. १७ वत्ससमुदाय.

पडे भक्त त्यामाजि घाली स्वदेहीं, जया आपुलें देव सर्वस्व देहा ॥ ११ ॥
पडे ज्यांत भक्त स्वयें त्यांत टाकी, उडी आणि काढून आणी तटाकीं ।
जगीं ख्याति ऐसी कराया हरी तो, निघे त्यांत जो त्या खळा संहरीतो ॥ १२ ॥

मृत्यु जे घडिसे होय अघाला, प्राण ते क्षणिंच ये अनघांला ।
दोनिं एकसमयींच कराया, जाय त्यांत ह्मणतो शुक रांया ॥ १३ ॥

प्रथम उठवितां हे देखती जों भयातें
न जिति निजगडी तों केंवि मारूं तयातें ।
करिं शरण न रक्षीं जों दुजें काम घेंना
उभयहि न घडे हें त्यांत जों मी निघेंना ॥ १४ ॥

स्वभक्तांसि जो देव सर्वस्व दे हा. अघाच्या मुखीं वाढवी तो स्वदेहीं ।
जसा वांयु दाटे तसें दुःख वाटे, निघे प्राण तो ब्रह्मरंध्राच वाटे ॥ १५ ॥
हरीच्या स्मृतीनें तनुत्याग होतो, न ये मागुती गर्भवासा अहो तो ।
हरिस्पर्श देहावसानीं अघाला, ह्मणोनी न देहांतरीं तो निघाला ॥ १६ ॥
हरिस्पर्श त्याचा अगण्या दिसांचा, करी भस्म हो पापपुण्यादिसांचो ।
समीरासवें ज्योति त्याची निघे ते, न कोणेपरी देह जाऊनि घेते ॥ १७ ॥
बऱ्या स्वर्गदेहास पुण्यें सजावें, अघें यातनेच्या शरीरास जावें । •

---

१ आपल्या देहास; ज्या संकटांत भक्त पडला त्या संकटीत आपण उडी टाकतो. २ देतो. ३ तीरास. ४ ज्या घटकेस. ५ अनघ ह्म० निष्पाप असे जे गोपाळ त्यांस अघासुरास मृत्यु आल्याबरोबर प्राण आले असा अर्थ. ६ अघाचा प्राण घेणें व गोपाळांस प्राण देणें या दोन गोष्टी एकदम करण्यास तो अघासुराचे मुखांत शिरला. ७ परीक्षितिराजास शुक सांगतो. ८ जिवंत राहणार नाहींत. या माझ्या गड्यांस जर मीं प्रथम उठविलें तर या अघासुरास पाहून भयानें ते जिवंत होणार नाहींत. ९ शरणांगतास रक्षिलें नाहीं तों दुसरें काम हातीं घेईन. १० जोंपर्यंत मी आंत शिरलों नाहीं तोंपर्यंत ह्या दोन्ही गोष्टी ह्मणजे अघास मारणें व गोगोपाळांस उठविणें होणार नाहीं. ११ सर्वस्व देतो. १२ शरीर मोठें करी. १३ प्राणवायु कोंडे. १४ मस्तकांतून. १५ पुनपुनः जन्मास. १६ मरणकाळीं. १७ अन्य देहीं; पुनर्जन्म पावला नाहीं. १८ अगणित. १९ सांठा. २० वायूबरोबर जी ज्योति (प्राण) निघाली तिणें पुनः कोणत्याही कुडींत प्रवेश केला नाहीं असा अर्थ. अर्थात् अघासुर जन्मांतरांतून मुक्त झाला. २१ दिव्य देह; पुण्य करून दिव्यदेह प्राप्त करून घ्यावा व पाप करून यातनायुक्त शरीर प्राप्त करून घ्यावें व ह्या दोहींच्या अभावीं कृष्णरूपास मिळावें असा अर्थ. २२ पाप करून.

न दोन्ही तरी कृष्णरूपीं भरावें, श्रुती बोलती शब्दसंदर्भरावें ॥ १८ ॥
भुजंगांतुनी मूर्ति जेव्हां निघाली, अघज्योति तें झेंप येऊनि घाली ।
तयांतूनि बाहेर जों देव यावा , नभीं दाखवी तेज तो दिव्य यावा ॥ १९ ॥
सवत्सें मुलें जीं मृतें त्यास देवें, पहातांचि ती ऊठती हो सदैवें ।
तयांयुक्त बाहेर जेव्हां निघाला, हरी मुक्ति दे ज्योतिरूपा अघाला ॥ २० ॥
स्तवीती नभीं देव कीं देवराया, अजी पाउलें हीं तुझीं दे वराया ।
पडे पुष्पवृष्टी वना नंदनाची, उभी मूर्ति नंदाचिया नंदनाची ॥ २१ ॥
बाहेर ये अघमुखांतुनि त्याच वेळे, लंघी नभा विबुधनाद समुद्रवेळे । -
वाद्यां मुखांत जयशब्द नमोनमो जी, संतोष तो दशशतानननी न मोजी॥२२
तो सत्यलोकांत विधातयाला, ये आइकों नाद सुभातयाला ।
निमेष होई इतुक्यांत पाहे, येऊनियां श्रीहरिची कृपा हे ॥ २३ ॥
स्वभक्तरक्षार्थ मुखीं निघाला, जे योगियां ते गति दे अघाला ।
अंतीं मुखा ये गति दे जनां मी, माहात्म्य दावी व्रजराज नामीं ॥२४
घनतनु दनुजारी वस्त्र ही पीत साजे
स्तविति सुर विमानीं देखती हो तसा जे ।
झळकति वनमाळा रत्नराजी विराजे
जलदरुचि पहा तो मोर ते देवें राजे ॥ २५ ॥
अजि अभक्तअघासुरआननीं, हरि शिरे गति दे व्रजकाननीं ।
हरिकथेंत मुखीं जर तो निघे, निजसुखींच न कां मिसळूनि घे ॥२६ ॥

---

१ पाप पुण्य यांच्या अभावी. २ कृष्णाची मूर्ति अघासुराच्या तोंड्यांतुन बाहेर आल्यावर अघाची ज्योति (प्राण) त्यावर झेंप घाली म्हणजे कृष्णस्वरूपांत शिरली. ३ तेजाचें येणें; प्रकाश. ४ मृत झालेली वासरें व मुलें. ५ नंदनवनांतील पुष्पांची. ६ पुत्राची. ७ विबुध म्ह० देव यांचा नाद (जयशब्द) नभास लंघी व समुद्रवेला म्हणजे मर्यादा ईस लंघी. ८ नमस्कार. ९ सहस्रवदन शेष. १० ब्रह्मदेवाला सत्यलोकीं देवांनी केलेल्या जयशब्दाचा नाद ऐकूं आला. ११ योग्यांस जी गति यावयाची ती अघासुरास दिली. १२ अंतकाळीं ज्याच्या मुखांत नाम येतें त्यास मी गति देतों. १३ मेघश्याम. १४ दैत्यरिपु. १५ पिवळें. १६ रत्नश्रेणी. १७ मेघाची कांति ज्यास. १८ देव मेघश्याम कृष्णापुढें मयूरासारिखे दिसले. १९ मुखीं. २० जर त्या अघासुराचें नांव हरिकीर्तनीं मुखीं हरीबरोबर निघेल तर त्यास हरि आत्मसुखामध्यें मिळवून कां घेणार नाहीं.

## अध्याय चौथा.

जो आहुती वैदिकविप्रसिद्धा, नेवे मुखीं देव मुखीं प्रसिद्धा ।
तो गोपवाळार्पित खाय घांस, श्रीकृष्ण जो संहरि हो अघास ॥ १ ॥

भक्तां जसा सुलभ अन्यजनांस नाहीं
सौलभ्य हें न कमलाकमलासनां ही ।
कीं लाभ नाम वदनीं जरि एक थारे
आतां पहा हरिचि तारक सत्कथा रे ॥ २ ॥

देऊनियां मुक्ति अघास देवें, मुलें सवें घेउनि तीं सदैवें ।
सरोवराच्या बरव्या तटातें, आला हरी नासुनि संकटातें ॥ ३ ॥

अजित काय मुलांप्रति बोलतो, अजि तसाचि भरा मनिं बोल तो ।
स्वगडियांस वदे वचनामृता, करि सजीवहि जोविं जना मृता ॥ ४ ॥
म्हणे कृष्ण त्या बाळसंता पहा रे, अरे या स्थळीं सर्व संतार्प हारे ।
करी डाव खेळाचिया संपदा हा, जया वाळवंटीं घडे संपे दाहा ॥ ५ ॥
पहा हे मऊ शीतल स्वच्छ वाळू, रुचे अन्न एथें क्षुधा तुच्छ वाळूं ।
पहा साउली दाट कैंची द्रुमांची, नव्या पल्लवीं श्री पहा विद्रुमांची ॥ ६ ॥
स्वपार्श्वींच पद्मालयाश्री जळाला, करी देखतां दाह जातो जळाला ।
न नीरांस हे स्वच्छता मानसांच्या, गती ज्यांत संतांचिया मानसांच्या ॥ ७ ॥

झाडें पुण्यफळें करूनि सुफळें केळीं क्रीं पोफळें
नारेळें सजळें विचित्र उजळें हीं रम्य सीताफळें ।
तैसीं हीं प्रबळें स्वसंचितबळें जीं तुंबळें जांवळें
पुष्पें हीं विमळें अशोक वकुळें कुंदादिकांचीं कुळें ॥ ८ ॥
पाळीयुक्त तळीं असीं न सुतळीं स्वर्गीं नवा भूतळीं

---

१ वैदिक ब्राह्मणांनीं सिद्ध केलेली. २ सुलभता. ३ लक्ष्मी. ४ ब्रह्मदेव; जसा तो भक्तांस सुलभ आहे तसा लक्ष्मीस किंवा कमलासन ब्र० ब्रह्मा यांस सुलभ नाहीं. ५ बरोबर. ६ न जिंकला जाणारा कृष्ण. ७ गोपाळ हेच संत. ८ उन्हाचा ताप दूर होतो. ९ दाहाची समाप्ति. १० वृक्षाची. ११ पोंवळ्याची शोभा नूतन पल्लवाचे ठिकाणीं दिसते ती पहा. १२ आपल्या पार्श्वभ. १३ शोभा. १४ पाण्यास. १५ पाण्यास. १६ मानससरोवराच्या. १७ फलभरांनी युक्त. १८ सुपारीचीं झाडें. १९ जलसहित. २० मोठीं. २१ उंच. २२ स्वच्छ, पांढरीं. २३ कुंद आदिकरून पुष्पांचे समुदाय. २४ बांधाऱ्यांसह. २५ पाताळांत किंवा स्वर्गांत किंवा भूमीवर अशीं तळीं दृष्टीस पडणारीं नव्हत.

वायूतें विमळीं जळीं सकमळीं जे पाळिती शीतळीं ।
अंतर्बाह्य अळी महाशतदळीं भृंगावळी सांवळी
बिंदू त्याच दळीं कसा डळमळी घे पैज मुक्ताफळीं ॥ ९ ॥
बदे कृष्ण गोपाळ बाळां जनांतें, बसूनी करूं ये स्थळीं भोजनातें ।
वनीं वत्स सोडा चरायासि पाणी, तयां पाजुनी या ह्मणे चक्रपाणी ॥ १० ॥
बरें कृष्णजी बोलसी तूं जसा रे, तसें वर्त्ततों लक्षितों तूज सारे ।
असे जेविती सोडुनी वांसुरांतें, नभीं होय आश्चर्य सर्वां सुरां तें ॥ ११ ॥
तपांचीं फळें त्या मुलांचीं तशीं कीं, अहो सोडिती सर्व निश्चिंत शिंकीं ।
हरीभोंवती मांडितां भोजनातें, वदे व्यास जे पंक्तिशोभा जनांतें ॥ १२ ॥
*कदलीदलशतपत्रीं दशशतपत्रीं मऊशिलापात्रीं ।
पुष्पीं चित्रविचित्रीं जेविति पात्रीं तरुंच्या छत्रीं ॥
शिंकांच कोणी अशनें करीती, पत्रावळी एक अनेक रीती ।
कित्येकिं दूर्वांकुर दर्भ कांहीं, केलीं स्वपात्रें व्रजअर्भकांहीं ॥ १३ ॥
निजमुख कवणाही आड दृष्टी असेना, रचुनि बसवि ऐसी भोंवती बालसेना ।
हरिवदन पहाया सर्वदृष्टी भुकेल्या, ह्मणुनि बहुत पंक्ती मंडलाकार केल्या १४
गळाला असे सर्व देहाभिमान, स्वसंस्कारशेषें कचिद्वर्त्तमान ।
असा चीमट: देह वाटे मनातें, बहू कृष्णसामीप्य त्या वामनातें ॥ १५ ॥
बहु खुजे अति वामन हो गडी, तनु जशा भवसागरसांगडी ।
स्वनिकटत्व तयां बहु देव दे, कवळ दे निजगुह्य तयां वदे ॥ १६ ॥

---

१ स्वच्छ व कमलांसहित उदकांत वायु बाळगणारीं ह्मणजे ज्यांच्या उदकाच्या योगें वायु शीतल वाहतो अशीं तळीं. २ आंतून व बाहेरून. ३ भ्रमरपंक्ति. ४ काळी. ५ उदकाचा बिंदु त्याच शतपत्रकमलाच्या दलावर मोत्यांची बरोबरी करून शोभतो. ६ मोत्यें. ७ 'तयां पाणी पाजून चरायासि सोडुनि या' असें चक्रपाणि ह्मणे, असा अन्वय. ८ शिदोऱ्या भरून आणिलेलीं शिंकीं. * ही आर्या क्षेपक असावी. अतएव क्रमांक दिला नाहीं. ९ केळ. १० सहस्रदलाचें कमळ. ११ मऊ दगड. १२ छायेंत. १३ पात्राऐवजीं कोणीं दूर्वा किंवा दर्भ पसरून त्यांवर वाढून घेतलें, कोणीं शिंक्यावरच वाढून घेतलें. १४ बालक. १५ हरीचें मुख सर्वांस सारखें दिसावें ह्मणून वर्तुलाकार पंक्ति बसविल्या. १६ लहान. १७ त्यांचीं शरीरें जशीं कांहीं भवसागर तरून जाण्याकरितां भोपळ्यांच्या सांगडी असाव्या अशी दिसली. १८ स्वसान्निध्य. १९ घांस.

अलंकार मिथ्या गमे हेंचि साच, स्वसंस्कारशेषें दिसे तो तसाच ।
असा जो खुजोंगीं स्वदेहाभिमान, प्रभू बैसवी त्यांस साम्यें समान ॥ १७ ॥
प्रारब्धयोगें जरि भोग साच, क्षणैक वाटे तरि तो तसाच ।
मिथ्या पहातां बहु दूर दृष्टीं, कीं भोग कर्मानुगुणें अदृष्टीं ॥ १८ ॥
अहंकर्तृता आणि तें कर्म साच, स्वयें मानितो अज्ञ जैसा तसाच ।
स्वभोक्तृत्वही भोगही सत्य मानी, न जाणोनि हें वर्म देहाभिमानी ॥ १९ ॥
अहंकर्तृता भोक्तृतेलागिं दावी, तरी ज्ञानकाळीं मृषा ते वदावी ।
खरें मानिलें कर्म तो भोग वाटे, जरी चालतो विश्वमिथ्यात्ववाटे ॥ २० ॥
प्रारब्ध तें निश्चित भोग दावी, भोगांत तीं दुःखसुखें वदावीं ।
तें नाठवे भोगुनि भोग कांहीं, बाळांस संतांस शुकादिकां ही ॥ २१ ॥
यो'' मला सुखचि दुःख न यो'' जी, वासना जन मनीं अशि योजी ।
भोग जे स्मरति त्यांसचि वाटे, संत चालति न या जन वाटे ॥ २२ ॥
असे संत ते बाळसंतोष जाणा, गडी श्रीमुरारी स्वयें त्यां सुजाणां ।
जरी होत दुःखी सुखी भोगकाळीं, स्मृती त्या न नित्या सुखाच्या सुकाळीं ॥ २३ ॥
क्षुधादिबाधा सरतेचि काळीं, सच्चित्सुखाच्या पडती सुकाळीं ।

---

१ सुवर्ण हें खरें असून केयूरकटकादि अलंकार हे मिथ्या आहेत, तथापि ते अलंकार संस्कारविशेषानें लहान स्वरूपास येतात. तसा प्रभु जरी अप्रमेय तरी देहाभिमानानें वामनत्व स्वीकारून सर्व मुलांबरोबर समानत्वानें बसला, असा या श्लोकाचा भावार्थ दिसतो. २ वामनत्व; खुजेपण. ३ देहच मी अशी बुद्धि. ४ प्रारब्धयोगें जरी भोग (विषयादि) क्षणैक साच (खरा) वाटे तरी तो बहु दूर दृष्टीं (दृष्टीनें) पहातां तसाच मिथ्या वाटे, असा अन्वय. ५ कारण. ६ दैवीं. ७ मी सर्व कर्ता आणि हें माझें कर्म हा भाव. ८ जैसा अज्ञ (अजाण) अहंकर्तृता आणि तें कर्म स्वयें साच मानितो तसाच देहाभिमानी हें वर्म न जाणोनि स्वभोक्तृत्व आणि भोगही सत्य मानी (मानितो) असा अन्वय. ९ ज्ञान प्राप्त झालें असतां ती अहंकर्तृता खोटी म्हणून बोलतात. १० प्रारब्धयोगें भोग निश्चयेंकरून आहे आणि भोग भोगिले तर सुखदुःखें आहेत, परंतु तें सुखदुःख बालकांप्रमाणें शुकमुनि आदिकरून संतांस भोग भोगूनही आठवत नाहीं. ११ येवो. १२ जन मनामध्यें आम्हांस सुख येवो, दुःख न येवो, अशी वासना योजितात (धरितात). १३ जे लोक सुखादिभोगाची वासना धरितात त्यांसच भोग होतात. संत ह्या जनवाटे जात नाहींत, म्हणजे भोगाची वासना धरीत नाहींत. १४ गोपाळ या ठिकाणीं असले संत होत. १५ शहाणा. १६ जरी त्यांस (गोपाळांस) ह्या भोगकाळीं सुखदुःखें होत तरी ह्या सुखदुःखांची स्मृति त्यास अनंतसुखाचे वेळीं होणारी नाहीं.

ते बाळसंतोष जयां सदा हा, संतोष जो तोष दिशांस[1] दाहा ॥ २४ ॥
संतोष तो नंदकुमार साचा, बाळांत तैशा परमा रसांचा ।
पंक्तीस दे लाभ अजी वनांत, बुद्धी जयांच्या जगजीवनांत[2] ॥ २५ ॥
हरी देह तो देहबुद्धीस मानी, मृषा स्नेह वैषम्य तत्त्वीं समानीं ।
खुजी[3] तेचि जों जों जयांची वदावी, समीपत्व तों तों तयां देव दावी ॥२६॥
एवंच जों जों जड साच वाटे, तों तों असे दूरिल याच वाटे ।
जों जों खुजा हा अभिमान होतो, समीप तों तों हरिही असो तो[4] ॥२७॥
असे कर्णिका[5] अंबुजांमाजि[6] जेंवीं[7], मुलां मध्यभागीं बसे कृष्ण जेवां[8] ।
मुखीं घास सप्रेम सर्वांस हातीं, दहींभात दे देव लीला पहाती ॥ २८ ॥
वंशी नादनटी तिला कटितटीं खोंवूनि पोटीं पटीं[10]
कक्षे वामपुटीं स्वशृंग[11] निकटीं वेतांटिही[12] गोमटी[13] ।
जेवी नीरं[14]तटीं तरूतळीं[15]वटीं श्रीशाम देहीं उटी[16]
दाटी व्योमघटीं[17] सुरां सुख लुटी घेती जटी[18] धूर्जटी[19] ॥ २९ ॥
घे हातीं कवळीं[20] मनांत कवळीं[21] त्या सुंदरा गोवळा
चित्तालागिं वळा स्वसत्त्व निवळा ध्येया[22] सांवळा कोंवळा ।
कीर्तीचा धवळीं[23] सुधाब्धिधवळीं[24] जो भक्तिचा जांवळा
प्रेमातें खवळा उठे कळवळा त्या प्रीतिनें आंवळा ॥ ३० ॥
हरी कर्णिकेच्या स्थळीं मध्यभागीं, मुलें भोंवती ह्रस्वदीर्घें[25] विभागी ।

---

१ दश दिशांस. २ जयांच्या बुद्धि जगजीवनांत ( ह्म० कृष्णाकडे आहेत ) त्या बाळांस तो नंदकुमार वनांत परमा रसाचा पंक्तीस लाभ देई. ३ वामनत्व—लहान. ४ ज्यांची देहबुद्धि जों जों खुजी ह्मणजे लहान होते तों तों तयास देव समीप होतो. ५ कमलांतील गड्डा; बीजकोश. ६ कमळामध्यें. ७ जसी. ही गोपाळांची वर्तुलाकार पंक्ति हेंच कोणी कमल, मुलें हीं त्या कमळाचीं दळें व कृष्ण त्यांच्या मध्यें बसला तोच त्या कमळाचे मधील बीजकोश असें रूपक केलें आहे. ८ जेवतो. ९ वंशी म्ह० मुरली. ही नाद करणारी नटी तीस कंबरेस खोवून. १० वस्त्रांत. ११ डावे कुशीस वाजविण्याचें शिंग खोवून. १२ वेताची छडी. १३ सुंदर. १४ पाण्याचे कांठावर जेवतो. १५ झाडाखालीं. १६ श्यामदेहावरील उटणें. १७ आकाशांत सुरांची दाटी झाली. १८ जटाधारी; तपस्वी. १९ शंकर. २० घास. २१ आलिंगन करा. २२ ध्यान करा. २३ पांढरा; ज्याची शुभ्र कीर्ति. २४ जो क्षीरसमुद्रासारखा पांढरा. २५ जशीं कमळांतील पत्रं कर्णिकेच्या सभोंवार लहानावर मोठीं या क्रमानें लाविलेलीं असतात तसे हरीनें मध्यभागीं बसून लहान मुलांच्या पंक्ति पुढें, त्यांच्या मागें त्याहून मोठ्यांच्या पंक्ति, या क्रमानें गोपाळांच्या पंक्ति बसविल्या.

लक्षनापुढें थोर अंभोजपत्रें, अंशीं वैसवीलीं भवार्कातपत्रें ॥ ३१ ॥
वत्स सर्वहि सुभोगवतांत, श्रीपती स्वशिशु भागवतांत ।
जेवितो ह्मणति भागवतांत, स्वात्मतारसविभागवतांत ॥ ३२ ॥
वर्णरीति यमकीं समजा ते, तेचि कीं विषम कीं सम जाते ।
शब्द वामनशुभानुभवाचे, त्रास ते हरिति भानुभवाचे ॥ ३३ ॥

---

## जलक्रीडा.

( कथेचा सारांश. )

एके वेळीं गोपी कृष्णास घेऊन नौकेंत बसून यमुनेंत फिरावयास निघाल्या असतां एकाएकीं नावेस छिद्र पडुन आंत पाणी येऊं लागलें. तेव्हां कृष्णानें गोपीस आपल्या कंचुकी व वस्त्रें छिद्रांत भरण्यास सांगितलें. गोपींनीं कृष्णाचे वचनावर विश्वास ठेवून तसें केलें, तरी पाणी आंत येण्याचें राहीना. मग कृष्णानें त्यांस डोळे झांकण्यास सांगितलें. आणि मग डोळे उघडून पाहतात तों आपण सर्व तीरावर आहोंत व वस्त्रें जशींची तशींच कोरडीं आहेत असें गोपींनीं पाहून त्यांस हा सर्व खेळ कृष्णानेंच करविला असें समजलें.

नमन करुनि आधीं सद्गुरुश्रीहरीतें
कथिन चरित गोपीगर्वहारी हरीतें ।
कळवि भजति ऐसें तें भवाब्धींत तारी
पशुपवधुजनातें त्या कलिंदींत तारी ॥ १ ॥
नीरानिमित्त यमुनेप्रति गोपनारी, जातां सवें कटिस घेउनि पूतनारी ।

---

१ कमलपत्रें. २ भवार्क ह्म० भव ( संसार ) हाच कोणी अर्क ( सूर्य ) यास वारण्यास आतपत्र ह्म० छत्री असा कृष्ण त्यानें. संसाररूप सूर्याच्या उष्णापासून तारणारा जो कृष्ण त्यानें. ३ उत्तम गवतांत; तृणांत. ४ भगवद्भक्त गोपाळ त्यांत. ५ भागवतपुराणांत ६ स्वात्मरसविभागवत् ह्म० आत्मरसाचा विभाग घेणारे जे शिशु त्यांत. ७ यमकांमध्यें वर्णांची रचना कधीं सम कधीं विषम जाते हें समजा. या श्लोकांत वामनपंडितांचा असा आशय दिसतो कीं, यमकाकरितां योजिलेल्या शब्दांचा अर्थ जरी कधीं वांकडा होतो तथापि एकंदरींत लक्ष स्वानुभवाचा असल्यामुळें तो भवभय हरणारा आहे. ८ सूर्यासारिखा ताप देणारा संसार; श्लोक ३१ वरील टीप पहा. ९ गोपींच्या गर्वरूपी उत्कास. १० पशुप ह्म० पशु पाळणारे गोपाळ त्यांच्या वधु ह्म० स्त्रिया त्यांस; गौळणींस. ११ कालिंदी, यमुना. १२ पाण्याकरितां. १३ कडेवर. १४ पूतनेचा शत्रु कृष्ण.

नेला तिहीं न कळतां जननीस तेव्हां, केलें विचित्र हरिनें यमुनेंत तेव्हां ॥ २ ॥
पावल्या जंव वधू यमुनेतिरीं, नाव देखिलि तिहीं बरवी निरीं ।
इच्छिती वरि बसोनि फिरावया, यत्न कांहिं न चलेच धरावया ॥ ३ ॥
सांपडेल कसि नाव वसावया, यत्न त्या पुसति विश्वविसाविया ।
कृष्ण बोलत असे किं मूढ वो, अर्भकासि पुसतां प्रऊढ वो ॥ ४ ॥
अज्ञानत्व वधूंस दावि परि तो सर्वज्ञ त्यांच्या मनीं
आहे तें करणें, परंतु वर तो बालत्व भावी जनीं ।
चित्तीं तैसेंच तो हि धरुनि मग तो कृष्ण नावेस लक्षी
ऐसें देखोनि तेव्हां स्वमनिं सकळा हर्षल्या त्या मृगाक्षी ॥ ५ ॥
कळुनि व्रजवधूंसी स्वामिचा स्नेह भारी
त्वरित मरुत नेटें चालवी नाव तीरीं ।
चढति उडति नौकेमाजि घेवोनि कृष्णा
न कळत जलमध्ये न्यावया फार तृष्णा ॥ ६ ॥
नेती नाव पुढां पुढां जरि हरी वारी जला भीउनी
जाणों कीं फिरवावयास ह्मणती आणूं तिरीं नेउनी ।
आज्ञाभंग वधूंहि फार करितां तेणें हरी कोपला,
क्रीडेमाजि अनर्थ थोर यमुनेमाझारिं आरंभिला ॥ ७ ॥
सच्छिद्र नौका जळ आंत चाले, प्रचंड वातें बुडवूंच केलें ।
तों त्या जळा हाणिती पादघातें, आणूं पहाती तिरिं नांव हातें ॥ ८ ॥
निघत सलिल नौकेमाजि अर्धास आलें
वधुसि कटिसि कृष्णा कंठपर्यंत झालें ।
ह्मणति वधु बरें कीं आधिं गे आह्मि मेल्या
सगुणमरणभेगें स्कंधिं वाहूनि ठेल्या ॥ ९ ॥

---

१ पाण्यांत. २ संपूर्ण जगाचें विश्रांतिस्थानच कृष्ण त्यास. ३ मूर्ख हो. ४ बालकास. ५ प्रौढ स्त्रिया. ६ दाखवी. ७ मृगनयना गोपी. ८ व्रजांतील स्त्रियांवर कृष्णाचा स्नेह अत्यंत आहे असें जाणून वाऱ्यानें नाव झपाट्यानें चालविली. ९ वारा. १० इच्छा. ११ पाण्यास भिऊन हरी त्यांचें जरा निवारण करी तरी. १२ फिरवावयास नेउनी तिरीं आणूं ह्मणती. १३ मध्यें. १४ भोंक पडलेली. १५ पायाच्या आघातानें पाणी बाहेर काढावयास पहात. १६ हातांनीं. १७ नौकेच्या अर्धापर्यंत पाणी शिरलें. १८ गोपीच्या कंबरेइतकें व कृष्णाच्या कंठाइतकें पाणी चढलें. १९ कृष्णास खांद्यावर घेऊन उभ्या राहिल्या.

वधूंसही कंठपर्यंत आलें, तें देखुनी कृष्ण वधूंस बोले ।
कां आणिलें वो मज एथ मोठें, या संकटीं कोण शकेल तारूं ॥ १० ॥
एक मी तुह्मि उदंड धराया, बांधल्याच न सुटी चपळा या ।
मारिल्या जरि थडीसचि मातें, सांग त्या कवण जाउनि मातें ॥ ११ ॥
जळतियावरि तेल पडे जसें, परम दुःख वधूंस घडे तसें ।
न वदवे परि प्रार्थिति वायका, ह्मणति रक्षि वधू यदुनायका ॥ १२ ॥
नौका जुनी नदिहि पूर्ण जलप्रवाहीं, आह्मी मुढा सकळ व्यर्थ अनर्थ पाहीं ।
विश्वासमूळ इतुकाच व्रजांगनांसी, कीं कर्णधार दुसरा हरि तूंचि होसी ॥ १३ ॥
केल्याही अपराध थोर न मनीं तूं तो जगाचा धनी
नोपेक्षी शरणागतास मुळ तो सांगे उपाया धणी ।
लावा कंचुकि नावरे तरि चिरें फेडूनि छिद्रें भरा
तों त्या हांसति लाजती ह्मणति गे हा जार पूरा खरा ॥ १४ ॥
परंतु त्यांच्या मनिं सत्य वाटे, लावूं सखी कंचुकि नीरवाटे ।
तरी तरी बोलति या उपायें, आहे उरीं अंचेल लाज कांये ॥ १५ ॥
मग उरीं दृढ अंचल ओढुनी, लाविती त्वरित कंचुकि सोडुनी ।
नावरेच जळ आवरल्यांस त्या, प्रार्थिती शरण येउनि त्या सत्यां ॥ १६ ॥
अशा जरी प्रार्थिति गोपनारी, वस्त्रेंहि सोडा ह्मणतो मुरारी ।
त्या लाजुनी राहति जों फिरूनी, तों दाटली नाव जळें भरोनी ॥ १७ ॥
बोलती सकळ नंदनंदना, या नदींत जरि तारिसि अंगना ।
मोल पांच कवडचा अथवा सैं, सोडवीसिल कसा वपुवोसें ॥ १८ ॥
विद्युल्लता तडतडी घन वर्षताहे, अंधार थोर रजनीसम भासताहे ।
नौकाहि तें डळमळी पवनप्रचंडें, एकीस एक वधु आंवळि बाहुदंडें ॥ १९ ॥
असा मांडला थोर आकांत जेव्हां, तशा लाविती वस्त्र सोडूनि तेव्हां ।
सखा वांचल्या लाज लौकीक वाहूं, जिवें वेंचल्या कृष्ण कोठूनि पाहूं ॥ २० ॥
नावरंधिं शिरुनी मग अंबरीं, राहिल्या व्रधु निरांत दिगंबरीं ।
हरिस तारिल असिंसें त्यांस ते, टांकिली तनुसमंधिक आसें ते ॥ २१ ॥

---

१ माराबयास. २ जळत्या वस्तूवर. ३ मूढ, मुर्ख. ४ सुकाणुं धरणारा. ५ न मानी. ६ पुष्कळ. ७ चोळया. ८ चीर ह्म० वस्त्र. ९ नावेचीं भोकें. १० पाणी ज्या वाटेनें येतें तेथें हे सखि कंचुकी लावूं असें बोलती. ११ लुगड्याचा पदर आहेच, मग कंचुक्या काढण्यास लाज कसली असा त्यांच्या ह्मणण्याचा भाव. १२ काय. १३ स्त्रिया. १४ सहा. १५ आंगवस्त्र. १६ प्रचंड वाऱ्यानें, १७ फिरवुनि. १८ अस्त्रांस. १९ पाण्यांत. २० नग्न. २१ असोशी. २२ तनची ह्म० शरीराची आशा.

प्रकृतिपर पहातां योगि आहे मतीनें
वसनरहित कांता कां करी हे मतीनें ।
हरिभजनिं मनींची टांकली लाज लोकीं
तरि हरिपदिं जाती धन्यतेमाजि लोकीं ॥ ७२ ॥

आपापुला देव स्मरोंच सांगे, वाटे तयां कीं हरि हीत सांगे ।
तो जाणवी कीं धनि ज्यास मारी, त्यातें वळें किंकर काय तारी ॥ ७३ ॥

न कळतां हरिहृत त्यांस त्या, निंनिती सकळ दैवतां सत्या ।
भाव आधिंच तयांवरि ज्यांचा, त्यांत सत्य म्हणतां हरिवाचा ॥ ७४ ॥
न पवती सुर कोणिहि तेधवां, पुढनि पाहति सुंदर माधवा ।
मग तयां सकळां कळलें असें, न रित हें अवघें हरिचें असे ॥ ७५ ॥

नियंता विश्वाचा हरिच मतिंया सत्य कळलें
कळों आलें ऐसें स्वकुळसुरसामर्थ्य न चले ।
पिता माता भ्राता हरिच अवघा सर्व कळुनी
तयालागीं आल्या शरण सकळा गर्व गळुनी ॥ ७६ ॥

जननिशी धरि बाळ दटाविल्या, वधु तशा हरिने मग मानिल्या ।
नयन झांकवि त्यांकरवींच त्या, करुनि कौतुक दाखवि त्या सत्यां ॥ ७७ ॥

नसे नाव वारा न पर्जन्य धारा, नसे नीर तीरीं उभ्या सर्व दारा ।
तशीं दीधलीं शुष्कवस्त्रें अनंतें, जशीं घेतलीं नावरूपें अनंतें ॥ ७८ ॥

पहाती जों तीरीं वधु उघडुनी नेत्र सकळा
दिसे त्यां स्वप्नाचे परि मनिं सुविस्मीत विकळा ।
कळों आलें कीं हा हरिच करितो खेळ अवघे
म्हणुनी कृष्णाचीं नमिति पदपद्मेंच निरघें ॥ ७९ ॥
म्हणति सकळ माया हे तुझी देवराया
न कळत नरें तूतें मानितो मंद जाया ।

१ जो स्मरलेला देव; तें कुलदैवत. २ चाकर. ३ सती स्त्रिया, ४ कोणीही देव पावेना. ५ मनाला. ६ कुलदेवतांचें सामर्थ्य एथें चालत नाही हें त्यांस कळलें. ७ मातेनें जरी दटाविलें तरी बाळ जसें तीसच धरितें तसें. ८ त्यांच्याकडून डोळे झांकविले. ९ त्या सती स्त्रियांना. १० स्त्रिया. ११ कोरडीं. १२ कृष्णानें. १३ असंख्य. १४ विस्मय पावून विकल झाल्या. १५ निष्पाप अशीं हरीचीं पावलें. १६ आम्ही मंद स्त्रिया तुझें खरें स्वरूप न ओळखून तला नर मानितों.

तराति भवसमुद्रीं चिंतिल्या भक्त तूतें
निजजन[2]वधुरक्षीं हे नदी काय तूतें ॥ ३० ॥
स्वजन ही जरि गर्व मनीं धरी, तरिच मित्रपणें हरि तो[3] हरी ।
उचलितां गिरि[4] गोप त्रळें बळें, कळवि त्यांस हरीच बळें बळें ॥ ३१ ॥
वधू नीरा जातां हरि तिस हरी जाणुनि मनीं
पहातां गर्वातें सकळ त्यजिला खेळ तमनी ।
. नदीमध्यें नौकेवरि निजकुळीं स्वामि सरिता
निगर्वा ह्या सख्या करुनि मग तो तारि वनिता ॥ ३२ ॥
कळोनियां ब्रह्म असें स्वभावें, नानापरी खेळतसे स्वभावें ।
आलिंगिती मोहुनियां स्वभावें, ध्याती मनीं वामन त्यास भावें ॥३३ ॥
( इति जलक्रीडा. )

---

## राधाविलास.

करुनि नमन देवा बाळरूपा हरीतें, सुरस चरित ज्याचें जें कलीलों हरीतें ।
कथिन चरित राधाकृष्णलीलाप्रबंध, तुटति श्रवणमात्रें सर्व मायीक बंध ॥१॥
कोणेके दिनिं नंदभाजसदनीं ते राधिका सुंदरी
आली सुंदर रूप पाहुनि तिचें थाया बहू घे हरी ।
राहेना जननीकडेवरि रडे लोळे महीं[10], माधवा[11]
कां रे वा उगेला न राहसि कसा मंथूं दधी के[13]धवां ॥ २ ॥
उचलि जननि त्यातें सर्वथा तो न थारे
निजवि फिरवि दावी पांखरांचे हि थारे ।
शुक पिकें[15] अणि लावे पारवे हंस मोर
हरिमन न रमेची चित्रशाळेसमोर ॥ ३ ॥
तेंही तयास न रुचे बहुकोप दावी, त्याची अगम्य करणी कवणें वदावी ।
क्रोधेंकरूनि जननी मग त्यास दांपी, राहें उगा म्हणत तें न मनी कदापी॥४।
नानाप्रयत्न जननी करितां वळेना, कां आजि बाळ चळला सहसा कळेना ।

१ तुझें चिंतन केलें असतां भक्त भवसमुद्र तरतात. २ स्वभक्तांच्या स्त्रियांस तू भवसमुद्रांतूनही रक्षिसील मग ह्या नदीतून (यमुनेंतून ) रक्षण करण्यास तुला कार्य कठीण आहे. ३ गर्व. ४ गोवर्धन पर्वत. ५ पातकाला. ६ प्रकरण; काव्य. ७ मायेसंबंधी. ८ भार्या; स्त्री. ९ हट्ट. १० भूमीवर लोळे. ११ उगाच. १२ केव्हां. १३. स्थिर राहे. १४ समुदाय. १५ कोकिला. १६ दटावी. १७ मानी.

राधेप्रती वदतसे मग नंदद्दारा, घेवोनि सांत्वन करीं हरि या उदारा ॥५॥
तियेसि तो तोष विशेष जाला, त्वरें करूनी मग त्या अजोला।
कडेवरी घेत धरोनि पाणी, राहे उगा तो मग चक्रपाणी ॥ ६ ॥
आश्चर्य मानी बहु नंददारा, जालें ह्मणे काय कसें उदारा।
मातें बहु कष्टविलें खळानें, राधे तुवां शांतविला पळानें ॥ ७ ॥
ह्मणे राधा मातें उशिर बहु जाला चपळ हा
त्वरें घ्या हो बाई रमणें घरिं पेटेल कलहा।
वदे ऐसें ठेवी हरि जननिअंकीं अणि निघे
रडे तो आक्रोशें उचलुनि कडेला जननि घे.॥ ८ ॥
कृष्ण फार करितो रुदनातें, अंतरीं धरितसे निज नातें।
मागुती जननि दे तिजपाशीं, खेळवीं ह्मणतसे व्रजवासी ॥ ९ ॥
राधा ह्मणे बहुत एथ उशीर जाला, वाटे मनीं स्वसदनीं निजकांत आला।
क्रोधेंकरूनि मज ताडिल तो न सोडी, तेव्हां जिणें सजणि काय तयांत गोडी १०
घेवोनियां कृष्ण गृहासि जावें, राधे पतीचें भय हें त्यजावें।
जेव्हां तुला कांत भरेल रागें, तेव्हां तया एथिल वृत्त सांगें ॥ ११ ॥
ऐसें तिला बोधुनि पूत नारी, दे तीजपाशीं मग पूतनारी।
मागेल तें दे न करोनि वाणी, माता अशी सांगत तीस वाणी ॥ १२॥
यानंतरें त्वरित घेउनि त्या उदारा, आली पहा स्वसदनाप्रति गोपदारा।
आनंदला हरि मनीं बहु त्याच काळीं, राधा हि ते पडलि हर्षमहाझुकाळीं १३
ठेवूनी निज मंचकावरि हरी राधा उभी राहिली
नेत्रीं ते मदनासें निंदित अशी मूर्ती बरी पाहिली।
तेव्हां ते मदविव्हला निजमनीं होऊनियां कामिनी
मानी अंतरिं खेद हा युवं नसे आणी नव्हे यामिनी ॥ १४ ॥
देखोनी तरि बाळरूप हरिचें राधेमनीं काम हा
जालासें कथिलें परंतु सकळां आश्चर्य वाटे महा।
अद्यापी शिशुदर्शनीं युवतिला उन्माद कामा नसे
राधेअंतरिं हा विकार घडला भावार्थ ऐसा असे ॥ १५ ॥

---

१ नंदाची स्त्री यशोदा. २ जन्मरहित कृष्णास. ३ हात. ४ मला. ५ पति. ६ रागें भरेल. ७ मातेच्या मांडीवर. ८ गोकुळवासी कृष्ण. ९ पवित्र स्त्री; यशोदा. १० पूतनाप्राणहरण कृष्ण. ११ कमी. १२ वाचा. १३ गोपस्त्री राधिका. १४ आनंदाच्या भरांत. १५ मदनाहून अधिक सुंदर. १६ तरुण. १७ रात्र. १८ लहान मुलास पाहून. १९ तरुण स्त्रीला. २० कामविकार.

पूर्वी हे गणिका असोनि शुचिनें कर्णाटदेशीं पहा
श्रीरंगीं तरि चित्त अर्पुनि सदा केलें व्रतातें महा ।
स्नानातें करि कार्तिकीं नुगवतां मित्रा करी पूजना
त्याचें रूप मनांत आणित सदा नेणे दुज्या याजना ॥ १६ ॥
बहुत दिन असी ते आचरे हो व्रतातें, परम सदयतेनें पाहिलें कामतातें ।
म्हणउनि तिस ने मी स्वर्गतीतें उदारा, अमरपुरिंत जाली श्रेष्ठ ते देवदारा १७
श्रीरंगतीर्थी करि मज्जनातें, धरी मनीं त्यासह कामना ते ।
यथाविधी गीतहि भाव नाना, सप्तस्वरें गाय करी तनाना ॥ १८ ॥
पण्यांगेना बहुत पावलि तेथ माना, रंभादि उर्वशि तिच्या नसती समाना ।
इंद्रादिदेव गुरु यास्तव रूप लोहो, घेऊनियां स्वमनिं मानवती तिला लों १९ ॥
कोणेके दिनिं ब्रह्मदेवसदनीं ते सुंदरी आदरें
आली गायन नृत्य तेथ करिते वेगीं असे सादरें ।
ऐकोनी मग तोषला निजमनीं मागें म्हणे हो वरा
तेव्हां ते विनयें वदे त्वरित दे श्रीरंगें ऐसा वरा ॥ २० ॥
यानंतरें वदत तीप्रति ब्रह्मदेव, द्वापारअंतसमयाप्रति वासुदेव ।
क्रीडेल नंदसदनीं शिशुरूप नारी, तो कीं रमेल तुजसीं प्रिय पूतनारी ॥ २१ ॥
त्वरित वर असा ते लाधली हो सुशीला
तदुपरि वृषभानूयोषितेच्या कुशीला ।
उपजलि मग राधा नाम ठेवूनि तीला
परम पुनित ते हो पावती श्रीपतीला ॥ २२ ॥
श्रीमत्केदारखंडीं मुनिप्रति वदला शूक जो कां महात्मा
पंचाध्यायीं पहावें चतुरनरवरीं कार्तिकीच्या महात्म्या ।
ते हो जाणा कथा हे म्हणउनि हरिला बाळरूपासि पाहे
पूर्वीच्या त्या समंधें करित हरि वरी तीवरी हो कृपा हे ॥ २३ ॥

---

१ वेश्या. २ पवित्र आचरणानें. ३ विष्णूचे ठिकाणीं. ४ मित्र म्ह० सूर्य उदयास आला नाहीं तोंच. ५ यज्ञयागादि इतर कर्में. ६ मदनाचा पिता विष्णु किंवा कृष्ण. ७ म्हणून त्यानें तिला स्वर्गगति दिली. ८ देवांची नगरी अमरावती. ९ अप्सरा. १० स्नान. ११ वेश्या. १२ लाभ. १३ श्रीरंगासारखा म्हणजे विष्णूसारखा पति दे असा वर मागितला. १४ बाळकपानें. १५ वृषभानुनामक गोप राधेचा बाप. १६ नरश्रेष्ठांनीं. १७ कार्तिकमहात्म्याचे पांचवे अध्यायीं राधेचें पूर्वजन्मवृत्त सांगितलें आहे असा अर्थ.

या योगें करुनी च बाळकवपू ऐसा असोनी हरी
तीची सुंदर ते तनू निरखुनी कामानळें ते हरी ।
जीचें रूप रतीस येथ न तुळे दासी गमे मेनका
तीच्या वर्णनिं हो पदार्थ जितुका तो साम्य वर्णू नका ॥ २४ ॥
अधर विद्रुम सम्यक रेखिला, दशन हीरसमूहच देखिला ।
परम आतुर होऊनि माधव, सुरतचुंबन इच्छि रमाधव ॥ २५ ॥
नाकीं तिच्या मौक्तिक हो सुतेज, कैंचें तसें दैत्यगुरूस तेज ।
देखोनि त्यातें मग देवदेव, कामानळें व्याकुळ वासुदेव ॥ २६ ॥
जळीं मीनें तसे चि कीं नेत्र तीचें, वरे शोभले कज्जलें हो सतीचे ।
स्मराचेच कीं बाण त्या भ्रूकमाना, हरीच्या मनीं भेदले सत्य माना ॥ २७ ॥
कुच तिचे घन वर्तुळ देखिले, मृगमदांकित सुंदर रेखिले ।
निरखुनी मग पाहतसे हरी, करिं धरीन अशी मति तो धरी ॥२८॥
वदनकमल कैसें शोभताहे सतीचें, विभव कवण वर्णी यामिनीच्या पतीचें ।
नयनिं मग मुरारी पाहताहे मुखातें, अवनि सकळ जाली मानि ऐशा सुखातें २९
जाला हरी बहुत व्याकुळ पंचबाणें, राधाहि ते परमविव्हळ त्याप्रमाणें ।
जाला ह्मणे युवं जरी असता मुरारी, मी लाधत रतिसुखास हि आजि भारी
ऐसा वधू हेतु मनीं उभारी, हा भाव जाणोनिहि कैटभारी ।
सर्वांतरीं साक्षि असा हरी तो, ते इच्छि लीलाच तशा करीतो ॥ ३१ ॥
परस्परें हेतु हि एक जाला, याकारणें कीं नटणें अजाला ।
ह्मणुनि झाला युवही हरी तो, तीची स्वयें कामव्यथा हरीतो ॥ ३२ ॥
तों देखिलें परम सुंदर रूप तीनें, हें दाविलें परम लाघव श्रीपतीनें ।
सव्रीड होउनि मनीं उगलीच राहे, त्यानंतरें करित माधव तो त्वरा हे ॥३३॥
तो मंचकीं धरि करीं कर सुंदरीचा, झाडी त्वरें जरि हि आदर श्रीहरीचा ।
हें काय हो करितसां रविमध्यव्योमीं, जावें जिवें पतिगृहाप्रति आलिया मी ॥

१खालचा ओठ. २पोवळें. ३चांगला. ४दंतपंक्ति केवळ हिऱ्यांची ओळच दिसली. ५ मोत्यें ६ दैत्यगुरु ह्मणजे शुक्र; त्या मोत्यांचें तेज शुक्राच्या चांदणीलाही नाहीं. ७ मासा. ८ काजळानें. ९ कमानीसारख्या वांकड्या भिवया. १० कस्तूरी. ११ वैभव; थोरवी. १२ यामिनीचा ह्मणजे रात्रीचा पति जो चन्द्र त्याचें वर्णन राधेच्या मुखापुढें कोण करील. १३ मदनानें. १४ तरुण किंवा मोठा झाला असता तर. १५ राधा असा मनांत हेतु आणी. १६ मदनाची पीडा. १७ सलज्ज; लज्जायुक्त. १८ आकाशाच्या मध्यभागीं. १९ मी जिवें जावें ह्मणजे मला मरावें लागेल.

हे वागती नगरिंचे नर आणि नारी, एकांतिचें सुरतसंगरें पूतनारी ।
हे देखती नयनिं लोक विहार जेव्हां, म्यां हारिलें हरि पहा स्वकुळासि तेव्हां३५
सांगे हरीप्रति बहू परि तो न राहे, वक्षस्थलावरि बळें कर ठेवुं पाहे ।
हें ऊघडें सदनदार दिसोनि येतें, राधा ह्मणे हरिसि झांकुनि शीघ्र येतें ॥३६॥
भरंवसा वचनीं हरिला नये, धरुनि अंचलें तीसरसी चि ये ।
अगळ घालुनियां मग सुंदरी, हरिस घेउनि ये रतिमंदिरीं ॥ ३७ ॥
त्यानंतरें खचितरत्नपलंगशेजे, नानाविधी रतिविलास करीतसे जे ।
तेव्हां निजें अधरचुंबन घे हरी तो, मर्दी कुचांस वसना स्वकरें हरीतो ॥३८॥
कामालया युवति झांकितसे करानें, तो काढिला कर करें कमळावरानें ।
त्यानंतरें सुरतकार्य करी हरी तो, राधेचिया सकळ वृत्ति अशा हरीतो॥३९॥
पोटीं चतुर्दशहि जो भुवनें भरीतो, हा जन्मला यदुकुलाग्रमणी हरि तो ।
राधेचिया *चुचुकमंडळिं हस्त ठेवी, शंभूशिरीं कमल शोभत शुभ्र जेंवी॥४०॥
दंतांबरीं आणि उरोजयुगीं सतीच्या, दंतक्षतें स्वकरजें समयीं रतीच्या ।
लागोनि तप्त हृदयीं बहुसाल झाली, खालों हरीस मग ते स्वबळेंचि घाली४१
कशी बोलली राधिका गोपदारा, बहू श्रांत जालेति येथें उदारा ।
ह्मणोनी च म्यां वैपरीत्यें रमावें, न लागे चि येथें तुह्मांला श्रमावें ॥४२॥
तो तिशीं रमतसे अनुरागें, राधिकेसि न वदे अणुं रागें ।
प्रेमयुक्त हरि तो अधें राहे, चुंबिते तंव सखी अधरा हे ॥ ४३ ॥
न वैपरीत्यरतिसंगरिं मग्न राधा, झाली परंतु मनिं भावि निजापराधा ।
अन्याय नो अघहरी स्वबळेंचि केला, या गोष्टिचा सगुण तो नसतां भुकेला४४
म्यां कासया संगरिं या चुकावें, कांहो तरी आत्मसुखा मुकावें ।
संताप हा कीं जरि यासि झाला, वंदीन या मी पदपंकजाला ॥ ४५ ॥
अर्पुनी स्वमन नंदकुमारीं; हे निमग्न वृषभानुकुमारी ।
माजला रस बहु उभयांत, ये तिचा पति अशा समयांत ॥ ४६ ॥
प्रवेशावें गेहीं तव दिसतसे द्वार दिधलें
उभा राहे शब्देंकरुनि महिलीं चित्त हरिलें ।

---

१ युद्ध. २ घराचें दार. ३ पदर. ४ तिच्या बरोबर. ५ आडसर. ६ लोक. ७ ओष्ठ. ८ नखानें. ९ फार. १० थोडेंही. ११ प्रीतीनें. १२ अधः; खालीं. १३ युद्ध. १४ वृषभानूची कन्या राधा. १५ गृहीं. १६ महिला ह्मणजे स्त्री; शब्देंकरून ह्म० हांक मारून त्याणें तिचें लक्ष ओढिलें. * स्तनामीं.

असे आला द्वारीं रमण हरि या काय करणें
मला ऐसें जालें त्वरित सखया प्राण त्यजणें ॥ ४७ ॥
तदुपरी स्वमनीं कुमुदेक्षणी, परम विव्हळ होउनि ते क्षणीं ।
उठतसे मग ते वरिच्या वरी, वसन कंचुकि कुंतले सांवरी ॥ ४८ ॥
निढळीं ठेवुनियां करपंकजा, ह्मणतसे मदना मज अंत्यजा ।
छळियलें ह्मणूनी घडलें असें, पुढिल संकट हें निरसे कसें ॥ ४९ ॥
ह्मणे माते अंबे शरण विनयें आजि तुजला
अशा आकांतीं हो सदयहृदये रक्षि मजला ।
उपेक्षा हे माझी न करिं अनुकंपा करिं हरी ।
करूनी देवेशा झडकरि भयातें परिहरीं ॥ ५० ॥
अंगीं विराली बहु सारसाक्षी, तों आठवी अंतरसार साक्षी ।
होता लघु तो युव पूर्ण जाला, हें काय आशक्य अधोक्षजाला ॥५१॥
त्यागी शिशुत्वा युवरूप दावी, तो काय हो पूर्वतनू न दावी ।
हा निश्चयो जाणुनियां मनातें, प्रार्थीतसे श्रीमधुसूदनातें ॥ ५२ ॥
राधा ह्मणे हरिस थोर अनर्थ जाला, द्वारीं कृतांतसमें तो मग कांत आला ।
हाकोटितो उघडिं दार ह्मणोनि मातें, हें काय हो श्रवण होत नसे तुह्मांतें ॥५३
जाला उशीर पति येइल फार रागा, तूं गुंतसी भ्रमर जेंवि रमे परागीं ।
हा तों मला निधन काळ गमे उदारा, येऊनियां रमण त्या हाणिलेंचि दारा ५४
कां आजि म्यां नंदगृहीं वसावें, आणोनियां आजि तुह्मां फसावें ।
हें काय मी फार वदों कृपाळा, हा बोल माझ्याचि असे कपाळा ॥५५॥
रमेश करिल तूझें काय हो देवदेवा, सबळ जनक नांदे नंद तो वासुदेवा ।
झडकरि लघु व्हावें बाळलीला धरावी, मजवरि अनुकंपा हे सुजाणा करावी ५६
वदत हरि सखे तूं सांगसी हो उदारे, परम गहन कैसें तें घडे गोपदारे ।
त्यजुनि युवपणातें बाळ होणें सुजाणे, रचित सकळ सृष्टी तोहि धाता न जाणे ५७
परब्रह्म तूंतें वदे लोक सारा, नसे सांच हें व्यर्थ भासे पसारा ।
असे सूचली गोष्ट तेही वदावी, खरें हें तरी बाळरूपासि दावी ॥ ५८ ॥

---

१ कमलनयना. २ केश. ३ कपाळ. ४ हस्तकमल. ५ चांडाळा. ६ दया; कृपा. ७कमलनयना. ८मनांतील सर्व जाणणारा कृष्ण. ९बाळपण. १०तारुण्य. ११यमासारिखा शिक्षा करणारा. १२पति. १३ हाक मारितो. १४मला. १५ पुष्परज. १६मरणाचा समय. १७ बंद केलें; आडविलें. १८ फसवावें. १९पिता. २० गोपस्त्रिये; गौळणी. २१ब्रह्मा-णीं; आपली. २२ ज्यानें सकळ सृष्टि रचिली त्या ब्रह्मदेवासही तरुणाचा बाळ करणें ठाऊक नाहीं. २३ सत्य.

ऐसें वदोनी मग पादपद्मा, वंदी मुनीमानसभृंगसद्मा ।
त्यागीन जी प्राण दयासमुद्रा, ह्मणे पडे तों वदनास मुद्रा ॥ ५९ ॥
उर्वी पडे केळि जशीच वातें, देखोनि ऐसें मग माधवातें ।
आली कृपा त्या मधुकैटभारी, तो आपुली पूर्व तनू उभारी ॥ ६० ॥
त्यानंतरें उठवि येउनि कृष्ण तीला, जाला उशीर वनिते तुझिया पतीला ।
पाहें ह्मणे मजकडे तरि चक्रपाणी, आणीं स्वकांत सदनांत धरोनि पाणी॥६१॥
ऐकोनियां वचन हें मग गोपदारा, उघ्दोडुनी नयन पाहत त्या उदारा ।
तों रांगतो जवळि बाळ तया चि काळीं, देखोनियां पडलि हर्षमहासुकाळीं६२
घेउनी मग कडेसि उदारा, पातली झडकरी गृहदारा ।
काढुनी मग तिनें अगळासी, या ह्मणे भितरिं हो गुणराशी ॥६३॥
उभा केधवांचा असे द्वारदेशीं, दिसाचें च तूं काय गे द्वार देशी ।
असी क्रोधवाणी वदे कांत तीसी, वदे आदरें सुंदरी ते पतीसी ॥६४॥
या सांगतें अर्थ तुह्मांसि सारा, सोडोनि द्या क्रोधमहापसारा ।
गेलें अजी नंदगृहा उदारा, खेहें मला बैसवि नंददारा ॥ ६५ ॥
सों ते करी मंथन नंदराणी, राधे ह्मणे यासि तुझी शिराणी ।
तेव्हां हरी गाढ धरी रवी तो, नानापरी बाळ विवर्तवीतो ॥ ६६ ॥
नेदी च मंथन करूं तिस अब्जपाणी, तेव्हां मनीं बहुत हिंपुटि नंदराणी ।
मातें ह्मणे उचलिं यासि कडेसि घेईं, राधे शिशू समजवीं सदनासि नेईं ६७
त्यानंतरें घेउनि श्रीधराला, आलें च मी शीघ्र अजी घराला ।
नानापरी खेळविला न मानी, निजें पुढें घें तइं सौख्य मानी ॥ ६८ ॥
मिथ्या नव्हे गोष्टि अशी च साची, मीही निजें कृष्ण निजे तसाची ।
आलेति केव्हां न कळे मनासी, निद्रा असे पापिणि कार्यनाशी ॥ ६९ ॥
गेहीं न माणूस दुजें उदारा, याकारणें म्यां दिधलेंचि दारा ।
निद्रा तयीं गाढ भ्रमासि घाली, स्मृती शरीरांतुनि हो निघाली ॥ ७० ॥
क्रोधयुक्तरवेंगर्जन कानीं, ऐकतां चि उठिल्यें दचकोनी ।
शंकलें मनिं बहूत उदारा, कुघडीं त्वरित येउनि दारा ॥ ७१ ॥
हा अर्थ आणूनि मनाचिमाजी, सर्वज्ञ हे हो करणें क्षमा जी ।

---

१ मुनीचें मानस हाच कोणी भ्रमर त्याचें सद्म म०घर जो हरि. २ झांकण. ३ भूमीवर जसी केळ पडावी तसी ती पडली. ४ हात धरून. ५ उघडून. ६ वराच्या दाराशीं. ७ भांत. ८ केव्हांचा ९ द्वार देतेस, लावतेस. १० आवड. ११ कमलहस्त कृष्ण. १२ कष्टी. १३ मला. १४ रागाचा मोठा ध्वनि.

ये हास्य ऐशा वचनें पतीला, आलिंगिलें हो ह्रदयीं सतीला ॥ ७२ ॥
देखिलें नयनिं नंदकुमारा, बाळरूपतनुसज्जितमारा ।
पावला पति मनीं सुखराशी, आणिं गे प्रतिदिनीं स्वगृहासी ॥७३ ॥
बरें ह्मणे भोजन शीघ्र घाली, कृष्णासि घेवोनि कडे निघाली ।
त्या नंदसद्मप्रति गोपजाया, बाई ह्मणे घेईं अधोक्षजा या ॥ ७४ ॥
आश्चर्य मानी बहु नंदराणी, राधे अशी काय तुझी शिराणी ।
ह्मणोनि राहे उगला हरी तो, छळी मला नष्ट परोपरी तो ॥ ७५ ॥
नेत जा प्रतिदिनीं स्वगृहातें, फावल्या घरिं ह्मणे युवती ते ।
ठेवुनी मन हरीपदपद्मीं, राधिका त्वरित ये स्वसुसद्मीं ॥ ७६ ॥
ऐसा हा सुरतविलास वासुदेवें, केलासे निजजनतारणा सुदेवें ।
यालागीं परम पवित्र हा सुवांचे, गाती ते प्रियकर होति वामनाचे ॥ ७७॥

इति श्रीराधाविलास.

---

# राधाभुजंग.

( कथेचा सारांश. )

एके वेळीं राधा कृष्णावर रुसली असतां तिला पश्चात्ताप होऊन तिणें त्याजकडे आपला दूति पाठविली. तिणें कृष्णास घेऊन येऊन राधेस भेटविलें. एवढीच कथा या प्रकरणांत आहे. या प्रबंधास राधाभुजंग असें नांव देण्याचें कारण यांत राधेच्या भुजंग ह्मणजे प्रिय जो कृष्ण त्याचेंच विशेष वर्णन आहे ह्मणून हें नांव दिलें असें वामनपंडित ह्याच्या शेवटच्या श्लोकांत सांगतात.

हरीचा वियोगाग्निसंताप राधा, न सोसूनियां आठवी स्वापराधा ।
सखी एक दूती प्रिया फार तीची, बहू शाहणी मूर्ति जे भारतीची ॥ १
करी तीस काकुलती सारसाक्षी, ह्मणे भेटवीं सर्वसंसारसाक्षी ।
हरीवीण झाल्यें बहू दीन माये, त्रिलोकीं सये दुःख माझें न माये ॥ २
निजानंद जो सर्वदा मोदराशी, तया भेटवीं आजि दामोदरासी ।
जयावीण कोणी स्वखेदा न वारी, त्वरें आणिं तो गे सये दानवारी ॥ ३
वियोगाग्नि जाळी मला केशवाचा, न बोलों शके ते सये क्लेश वाचा ।

---

१ मदनास. २ घर. ३ हरींच्या पायीं मन ठेवून. ४ आपल्या घरीं. ५ चांगल्या वाणीनें. ६ वामनपंडितास अथवा वामनरूपी ईश्वरास. ७ विरहाग्नीपासून झालेला ताप. ८ निरोप नेणारी दासी किंवा सखी. ९ वाणीची; सरस्वतीची. १० कमलनयना राधा. ११ मावत नाहीं. १२ आनंदराशि. १३ दैत्यशत्रु कृष्ण. १४ दुःख. १५ वाणीनें.

न तें सांगवे दुःख जें काम दे हो, त्वरें आणि वो त्या घनश्यामदेहा ॥ ४ ॥
तनू जाळितां त्रास येना शशीला, प्रभा दाविताहे सये नाशशीला ।
उरे वीझतां जाळ भो विंगळांची, फुलांची तशी माळ भावी गळ्यांची ॥ ५ ॥
दिशा जाळितो चंद्रमा आजि दाहा, असा निर्मितो या तनूमाजि दाहा ।
नव्हे चंद्र हा कोण कोणी वदेना, सुधारश्मि तो ये रिती ताप देना ॥ ६ ॥
न ये नीरदश्याम तों मी न जेवीं, नदी शुष्क तीमाजि तो मीनें जेवीं ।
तृषा लागली नाथओष्ठामृताची, शरीरास ज्यावीण भिक्षा मृतांची ॥ ७ ॥
सये कृष्णउत्कंठित प्राण कंठीं, धरूनी वळें काळ निर्वाण कंठीं ।
ह्मणे भर्वशानें तुझ्या प्राण वाहे, खरें हें ह्मणोनी तिची आण वाहे ॥ ८ ॥
दुजी कोण तत्पादराजीव दावी, वृथा अन्यथा गोष्ट कां जी वदावी ।
वदे लोचनीं नीरें सक्लेशें वाहे,अवस्था ह्मणे सांग वो केशवा हे ॥ ९ ॥
अशी राधिका बोलतां दीनवाणी, भरे कंठ झाली पराधीनें वाणी ।
धरूनी तिला पोटिशीं दूतिका ही, रडे आणि सांगे तिला नीति कांहीं॥१०॥
ह्मणे खोड खोटी तुह्मां मानिनींची, पुढें तूं तरी बुद्धि हे मानिं नीची ।
हरी दुःख त्या नागनक्रोद्धरासी, नको दावूं सांजणी क्रोधराशी ॥ ११ ॥
धरी मत्स्यकूर्मादिरूपें दहा हा, तयाहीवरी क्रोध केला अहाहा ।
धरी सागरीं पाठिशीं मंदरासी, हरी तोचि कीं हा निजानंदराशी ॥ १२ ॥
जगन्नाथ जो कृष्ण नानावतारी, स्वयें होउनीयां जना नाव तारी ।
हरी काम क्रोधादिकां सां जणांसी,नको कोप त्या तारका साजणासी ॥ १३ ॥
खगेंद्रीं अहींद्रीं नुरे जेथ दावा, तया दाविसी क्रोधरूपाग्नि दावा ।
वनामाजि निर्वैर त्या व्याघ्र गाई, कशी क्रुद्ध त्यांशींच तूं वो अगाई ॥१४॥
तरी खेद तूं टाकिं हो सापराधे, करीना हरी तूं जशी कोप राधे ।

१ हा काम (मदन) जें दुःख देतो तें. २ घनासारखा श्यामवर्ण ज्याचा देह त्या कृष्णास. ३ प्रकाश. ४ निखारा. ५ गळ्यांतील. ६ दशदिशा. ७ तसा शरीरामध्यें चन्द्र दाह ( ताप ) उत्पन्न करितो. ८ चंद्र अमृतकिरण असल्यामुळें तो असा ताप देणार नाहीं. ९ मेघश्याम. १० मासा. ११ मेल्याची. १२ कृष्णाकरितां उत्कंठित झालेले प्राण कंठामध्यें धरून काळ काढल्यें. १३ कठिण. १४ त्याचे पदकमल. १५ अश्रु. १६ क्लेशाने, दुःखानें. १७ पराधीनासारखी. १८ मानिनी स्त्रियांची. १९ गजेंद्र व नक्र यांचा उद्धार करणारा. २० प्रिये; गडे. २१ अतिक्रोध. २२ दशावतार. २३ मंदारपर्वत. २४ काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, दंभ ह्या सहा शत्रूंस. २५ पक्ष्यांचा राजा गरुड. २६ सर्पांचा स्वामी; ज्याच्या ठायीं सर्प व गरुड यांत वैर नाही. २७ अपराध करणारे. २८ तू जशी कोप करितेस तसा कोप हरि करीत नाहीं.

स्वयें जातसें मीच आजी वनातें, त्वरें आणितें त्या जगज्जीवनातें ॥ १५ ॥
म्हणे दूतिका टाकिं वो काळजीला, स्वयें आणितें शीघ्र गोपाळजीला ।
वदोनी असें चालिली काननातें, वनीं देखिलें त्या मृगांकाननातें[1] ॥ १६ ॥
शिरीं पाय त्या गोपकांतापतीचे[2], नमूनी वदे शोकसंताप तीचे[3] ।
म्हणे चूक तीची क्षमा देवराया, करूनी पुन्हा पाय हे दे वराया ॥ १७ ॥
जरी चूकि झाली तरी राधिकेला, नव्हे योग्य हा जो तुम्हीं औंधि केला ।
तुम्हांला म्हणूं काय मी लोकपाळा, असे बोल आम्हां स्त्रियांच्या कपाळा ॥१८॥
वियोगें जिणें वर्जिलें अन्नपाणी, मुखातें सदा वाहते खिन्न पाणी ।
करें पूर्ण तारापती अर्ध जाला, घना दाटि त्याशीवरी मूर्धजांला ॥ १९ ॥
मुखीं गुंतला सर्वदा एकपाणी, दुजा तर्जनीनें हरी शोकपाणी ।
तरी काय सांगों तिच्या मी कराची, प्रभा जो हरी तप्तचामीकराची ॥२०॥
सुधेतुल्य पाजूनि दंतच्छेदांसी, कशी आजि केली जशी तुच्छ दासी ।
मसे पाड जेथें जगत्स्वामिनीचा, तया काय लेखों अशा कामिनीचा ॥२१॥
तथापि स्त्रिया भाग्ययुक्ता सदैवा, भजों तूज ज्या नित्य मुक्ताल देवा ।
मनीं काम या वायकांचेच पेटे, तुम्हांला न तत्सायकांचे चपेटे ॥ २२ ॥
जरी प्रीति हे होय देवा नरांसी, तया नाचवूं जे रिती वानरांसी ।
कुयुक्ती वृथा ये स्थळीं कामिनीच्या, प्रभा चंचळा जेंवि सौदामिनीच्या ॥२३॥
म्हणोनीच टाकूनि सर्वां उपायां, सकामा तरी सेवितों याचि पांया ।
असे बोल बोलोनियां पादपद्मा, धरी मस्तकीं ज्या पदीं नित्य पद्मा ॥ २४॥
अशा प्रार्थुनीयां हृषीकेश वाचे, धरी पाय सप्रेम त्या केशवाचे ।
घरा भक्तिभावें सखा चालवीला, न अन्या नरासारिखा चाळवीला ॥२५॥
करूनी क्षमा सर्व रांधाघराशी, हराया तिची कामबाधा घराशी ।
तिच्या चालिला दूतिकाहस्तहस्तीं, धरूनी जसा डूलतो मत्त हस्ती ॥ २६ ॥

---

१ चंद्रासारखें मुख ज्याचें त्यास. २ गोपस्त्रियांचा स्वामी. ३ राधिकेची विरहव्यथा सांगे. ४ पीडा; मनोव्यथा. ५ हात; मुखावर नेहमी हात टेकून सचिंत बसते. ६ चंद्र. ७ केश. ८ शोकामुळें डोळ्यांस आलेलें पाणी. ९ तापविलेलें सोनें. १० अधर; तुम्ही तिला अधरामृत पाजून आतां अगदी तुच्छ दासीप्रमाणें कां टाकिली. ११ लक्ष्मीचा. १२ हिशेब; गरज; जरूर. १३ भाग्यवान्. १४ काम पेट घेतो. १५ त्या कामाच्या बाणाचे. १६ मार; तडाका. १७ विजेच्या प्रभा जशा चंचल तशा त्यांच्या युक्ति ('वानराप्रमाणें नाचवूं ह्या युक्ति ) चंचळ अर्थात् व्यर्थ होत. १८ लक्ष्मी. राधा. १९ अपराधी; राधेच्या पापराशी. २० दूतीचा हात धरून. २१ डोलतो.

प्रतीक्षा करी मंदिरीं कंबुकंठी, त्रुटी जे युगाहूनिही थोर कंठी ।
शुभें सूचती तों अकस्मात तीला, ह्मणे दूतिका आणितें श्रीपतीला ॥ २७ ॥
ह्मणे लोचनाचें लवे दिव्य पातें, पहायास लोकत्रयाच्या नृपातें ।
त्वरें आजि भेटेल मांडीस मांडी, ह्मणोनि स्फुरे भाव उल्लास मांडी ॥२८॥
ह्मणे कृष्णजी आजि दृष्टी पडावा, भुजांमाजि माझ्या हरी सांपडावा ।
हरीचा रतीसंग तोही घडावा, शुभें सूचितां अर्थ हा ऊघडावा ॥ २९ ॥
असा हर्ष मानूनिया गोपदारा, उठे जाय तत्काळ बाहेर दारा ।
पहाते वरी दूरि चाळोनि दृष्टी, ह्मणे लाभ आहे नवा हा अदृष्टीं ॥ ३० ॥
अकस्मात तों मूर्ति गोविंदजीची, दिसे पुत्रता मानितो नंद जीची ।
पहातां प्रियेनें प्रियाच्या मुखासी, त्रिलोकामध्यें दाटि झाली सुखाची ॥३१॥
भुजीं कंचुकी फाटताहे तडाडां, करीं कंकणें फूटतीही कडाडां ।
पुढें होउनी तत्करांभोरुहातें, उरोजीं धरी गाढ रंभोरु हातें ॥ ३२ ॥
घरामाजि नेवोनियां ये रितीनें, मुकुंदास आलिंगिलें गाढ तीनें ।
वियोगें तुझ्या दीन मी चक्रपाणी, ह्मणे तों भरे लोचनामाजि पाणी ॥३३॥
पुशी चक्रपाणी करें अभ्रु तीचे, जया वर्णिती वृंदें वेदश्रुतीचे ।
करी जो स्वदासांचिया ध्वस्त[13] काळा[14], जळें काजळें तो तिच्या हस्त काळा ३४
शिरीं वंदिती वेद पादांबु ज्याचें, पुशी तो तिचें नीर नेत्रांबुजांचें ।
कुचाग्रावरी बिंदु जे कां जळांचे, पुशी थेंब काळे निळे काजळाचे ॥३५॥
हराया तिचे सर्व ते कष्ट भारी, करी मुक्त नीवी तिला कैटभारी ।
समारंभआरंभ ऐसा रतीचा, धरी सर्व जानूवरी भार तीचा ॥ ३६ ॥
स्वयें फेडुनी शीघ्र चोळीस तीच्या, कुचांतें करें शीघ्र चोळी सतीच्या ।
उरोजीं रती सर्वदा हस्त नाचे, तिचे नीववी सर्व दाह स्तनांचे ॥ ३७ ॥
कुचाग्रांवरी हार मुक्ताफळाचा, रतीं शोभतो श्रीहरीच्या गळांचा ।
शिळा गंडकी मूर्ति पुष्पायुधाची, वरी माळ ते शुभ्र धारा दुधाची ॥३८॥

---

१ शंखासारखा कंठ आहे जिचा. २ चुटकी; निमेष; अल्पकाळ. ३ बकुल. ४ मांडिती झाली. ५ नशीबी; दैवीं. ६ नंद ज्या मूर्तीला पुत्रभावानें समजतो. ७ त्रिलोकांत सुख ( आनंद ) मावेना असा अर्थ. ८ त्याच्या ( कृष्णाच्या ) हस्तकमलांस. ९ स्तन. १० सुंदर स्त्री राधा; रंभा ह्म० केळीसारख्या मांड्या आहेत जिच्या. ११ डोळ्यांमध्यें. १२ समूह. १३ नाश. १४ अभ्रु पुसल्यामुळें तिच्या काजळाच्या मळानें ( अभ्रूनें ) ज्याचा हात काळा झाला. १५ पादोदक; तीर्थ. १६ नेत्रकमळांचें. १७ अश्रुबिंदु. १८ निरी. १९ गुडघ्यावर. २० संताप. २१ मोत्यांचा. २२ मदन.

रतिस्वेद शुद्धाभिषेकासि पाणी, करी तेथ निर्माण शंखाब्जपाणी ।
यजी कृष्णमूर्ती अशा चूचुकाच्या, रतीमाजिही भक्तिच्या सूचकाच्या ३९
जया अंबरा स्पर्श भूतांबराचा, न मूर्तीस या स्पर्श दंतांबरोचा ।
कटीं सूक्ष्म राधा वयें धाकटी जे, शिळाभार वाहे उरीं संकटीं जे ॥ ४० ॥
जगद्व्यापका मन्मथा काय जी तो, स्तनद्वंद्वरूपें हरीही यजीतो ।
जगीं जे स्थळीं द्वंद्व संपुष्ट होतो, पहा देव तो ते स्थळीं स्पष्ट होतो ॥ ४१ ॥
करी गोपिकां संगलीला हरी तो, जिणें विश्वपापावलीला हरीतो ।
पदें पावती वर्णितां उंच देहीं, रते तो व्रजस्त्रीसरोमांचदेहीं ॥ ४२ ॥
रती कामगेहीं समारंभ भारी, रतीनाथ रोमीं गुढ्या त्या उभारी ।
स्मरक्रीडतां ये रिती संग जाला, गमे तोचि अष्टादिकां अंगजाला ॥४३॥
नगाऱ्या पदीं घोष एकेचि काळीं, सुवाद्येंच कीं त्या रताच्या सुकाळीं ।
ध्वनी त्या स्मराच्याच वाजंतरांचे, न त्या उत्सवीं नाद वाद्यांतरांचे ॥४४॥
नर भ्रांत देखोनि पुंभावरीती, रसज्ञा स्त्रिया भोगकाळीं वरीती ।
म्हणोनी प्रिया आपणा सांवरूनी, करी या रतीच्या विलासावरूनी ॥४५॥
जसे वर्णिती कामशास्त्रीं निबंधीं, यथापूर्व बंधा न सोडोनि बंधीं ।
अकस्मात घाली तळीं श्रीपतीतें, वरूनी करी ऊफराटे रतीतें ॥ ४६ ॥
स्थिरब्रह्म येथें चल स्वैरमाया, तिहीं घेतलीं दोन रूपें रमाया ।
न हाले हरी त्यावरी गोपदारा, करी रम्य चांचल्य लीला उदारा ॥ ४७ ॥
उठे ऊफराट्या विलासाचि माजीं, असा घोष तो मेखलेच्या समाजीं ।
तिच्या उत्तमांगाहुनी उत्तमांगीं, फुलें वर्षती त्याचि सर्वोत्तमांगीं ॥४८ ॥
उभारी हरी छत्र मीनध्वजाचें, हराच्या भयें राज्य विध्वंस ज्याचें ।
बहू हर्षले देव देखोनि दृष्टीं, पडे ब्रह्मलोकींहुनी पुष्पवृष्टी ॥ ४९ ॥

---

१ शंख व अब्ज (कमल) हातांत आहेत ज्याच्या तो. २ ओष्ठ. ३ जिची कमर सूक्ष्म किंवा नाजूक. ४ पूजतो; हरि हा स्वतः स्तनद्वयरूपी जो मदन त्याची वर सांगितल्याप्रमाणें पूजा करितो. ५ ज्या लीलेनें विश्वाच्या पापपंक्तीस नाहींसें करतो. ६ राधेचा रोमांचयुक्त देह तेथें. ७ लव; बारीक केश. ८ रोमांच, वेपथु (कंप) इत्यादि शरीराचे आठ सात्विक भाव. ९ पायांतील अलंकारांचे ध्वनि तेंच वाद्यें. १० इतर वाद्यांचे. ११ कृष्ण आणि राधा हे स्थिर ब्रह्म व चंचल माया यांचींच हीं दोन रूपें. १२ कंबरपट्टा. १३ मस्तकावरून. १४ सर्वोत्तम कृष्ण मस्तकावर राधेच्या मस्तकावरील फुलें पडत. १५ राज्य. १६ मदनाचें. १७ मदनाचें राज्य शंकराच्या भयानें लयास गेलेलें आतां कृष्णानें पुनः उभारिलें असा अर्थ.

स्मराचा रथ स्वामि गोपाळ साजे, ध्वजीं राधिका मीननेत्री विराजे ।
पताकांस दृष्टांत तीच्या कचांचे, जरी बांधिले गुच्छ भारी कुचांचे ॥ ५० ॥
हरी ऊर्ध्वरेता द्रवे गोपजाया, रमे जो तिचा शोक संताप जाया ।
जयाला न या भोगआल्हादवार्ता, निमे तेंचि कामाग्निनें जे दवार्ता ॥ ५१॥
रतांतीं तिच्या त्या सुखाच्या समुद्रा, पडे वर्णितां मौन वाचेस मुद्रा ।
सुखीं मग्न सर्वा प्रतीती सतीच्या, नुरे स्फूर्ति वृत्तीमधें तीस तीच्या ॥५२॥
निजानंद सिंधूमधें जेविं योगी, सुखें मज्जनीं कल्पनेच्या वियोगीं ।
गळां हस्त वक्षस्थळीं कृष्णजीच्या, रतांतीं दडे कामना पूर्ण जीच्या ॥५३॥
जरी टाकिल्या कामना वामनानें, कथा वांगल्या विश्वनावा मनानें ।
तरी निर्गुणात्मत्व दे देव तारी, मना आवडे कृष्णलीलावतारी ॥ ५४ ॥
न या तों कथा मन्मथा बायकांच्या, दिनोद्धारका द्वारकानायकाच्या ।
सकामा जरी श्रोतयां काम वाटे, तरी चित्त लागो घनश्यामवाटे ॥ ५५ ॥
ह्मणोनीच वर्णीतसे वामनाची, अशी वैखरी हेचि सेवा मनाची ।
मुखीं वर्णितां ग्रंथ हा केशवाचा, अहो चाळिता तो हृषीकेश वाचा ॥५६॥
कथा वर्णिली जे भुजंगप्रयातें, असें वर्णिलें जेथ राधाप्रियातें ।
असे नाम राधाभुजंग प्रबंधा, हरी कीर्तनें वर्गनें क्षिप्रबंधा ॥ ५७ ॥

इति श्रीराधाभुजंग समाप्त.

---

## गोरसहरण.

( कथेचा सारांश. )

श्रीकृष्णानें गोकुळांत गोरस चोरून खाण्याकरितां अनेक प्रसंगीं ज्या ज्या युक्ति केल्या त्यांतील एका प्रसंगाचें या प्रकरणांत वर्णन आहे.

श्रीविघ्नराजविधिजापद सद्गुरूचें, वंदीन याविण मनीं सहसा न रूचे ।
नानावतार धरि एक अनेक ज्याला, मी सर्वदा शरण दीन तया अजाला ॥ १
जो ब्रह्मरूप अवतार बहू धरीतो, नानारुपें स्वजन सेवक उद्धरी तो ।
भूभारवारणदशांतिल आठवा हो, नंदालयीं प्रगट तो हरि आठवा हो २

१ मासा. २ ब्रह्मचारी. ३ निवे; शीतल होई. ४ बुडतो; जसा योगी कल्पनाबाधा दूर झाली ह्मणजे स्वानंदसमुद्रांत बुडतो. ५ वाणी. ६ भुजंगप्रयातवृत्तामध्यें. ७ मित्र; उपपति. ८ प्रकरण. ९ गणपति. १० सरस्वती. ११ जन्मरहित. १२ भूमीचा भार हरण करण्याकरितां धारण केलेल्या दश अवतारांतील हा आठवा अवतार. १३ नंदगृहीं. १४ स्मरण करा.

व्रजमुलां सह गोकुळपाल तो, निज सुखें विविधोपरि खेळतो ।
ठकुनि गोपवधू रस घेतसे, चपळ तो मन चोरुनि नेतसे ॥ ३ ॥
वर्षे वेदवर्षांचि या बाळकाची, कशी कीर्ति ऐका जगत्पाळकाची ।
सर्वे सौंगडे ते बरे शीकवीले, सदा माधवें गोरसा सोंकवीलें ॥४॥
जे सोंकले गोपकिशोर सीची, ते आणिती पाळत गोरसाची ।
गेली असे गौळणि ते जळाला, तों येति गोपाळ तया स्थळाला ॥५॥
संपूर्ण भाग्योदय होय जीचा, तिच्या घरा ये सुत नंदजीचा ।
जो चिंतनें सर्व भया हरीतो, ऐका पुढें काय करी हरी तो ॥ ६ ॥
लोटोनिया गेहकपाट हातें, पाहे पुढें ऊर्ध्व तया गृहातें ।
शिक्यावरी पात्र दिसे पयाचें, आरंभिलें साधन हो तयाचें ॥ ७ ॥
दूरस्थ तो यत्नहि बहु सूचवीतो, पाटावरी पाट हरी रचीतो ।
त्याहीवरी स्थापुनि गोपजोला, त्याच्या गळां आपण रूढ जाला॥८॥
पात्रा पयाच्या करिं मोहरीनें, पाडूनिया छिद्र तया हरीनें ।
घटाघटी वाजति ते धरूनी, आच्छादिलें अंबर सांवरूनी ॥ ९ ॥
मग कर वदनाशीं घट्ट दोन्ही करूनी, कवळित पय धारा अंजुळीनें वरूनी।
डळमळ करि शिंकें कंप तेणें शिराला, अवघड घडलें हें साधनीं श्रीधराला॥१०
असा श्रीहरी तो पयाला पिताहे, तळीं सौंगडे त्यांजला ओपितांहे ।
अशामाजि ये तेथ ते गोपजाया, तिणें रोधिलें मार्ग नेदीचें जाया ॥ ११ ॥
तदा माधवें अंतरीं आडवीलें, मुखीं दुग्ध होतें बरें सांठवीलें ।
मुकुंदासि गोपी धराया निघाली, तिच्या लोचनीं दुग्ध फुंकोनि घाली ॥१२॥
गोपांगना नेत्र पुसे करानें, गंतव्य केलें मुरलीधरानें ।
ऐसा ठकी जो व्रजअंगनांसी, रक्षू ह्मणे तो मुनिसज्जनांसी ॥ १३ ॥
दारों दारा येत सांगों जनासी, चोळी चोळी पल्लवें लोचनासी ।
काळा काळा नातळे सितरोनी, गेला गेला बाळ चोरी करूनी ॥१४॥

---

१ नानातऱ्हेनें. २ ठकवून. ३ वेदसंख्या वर्षें ह्मणजे चार वर्षांचें वय. ४ सो. बती. ५ गोपबालक. ६ खरी. ७ घराचें दार. ८ वर डोळे करून. ९ दूर.१० गोपबालकास त्या पाटांच्या राशीवर उभा करून त्याच्या मानेवर आपण उभा राहतो; याप्रमाणें शिंक्यावरील गोरस काढून खातो. ११ देतो. १२ गोपस्त्री. १३ अडवून धरिला. १४ न देई. १५ डोळ्यांत. १६ जाणें; पलायन. १७ ठकवी. १८ व्रजांतील स्त्रियांस. १९ स्त्री दाराकडे येऊन. २० पदरानें.

काळा रूपें अंतरीं हा तसाच, साची बोली चोरटा हा दिसाच ।
नाहीं शंका मानसामाजि याला, माझ्या नेत्रीं घातलें हा पयाला ॥१५॥
व्रजवधु मग तेथें पावलीया समस्ती, अगइ ह्मणति केसी पातली यास मस्ती ।
वय तरि लघु वर्षें वेद सीमा वयाची, उकरिति परि थोरा हे असे मौत्र याची १६
जैसीं मुलें आणिक सानें माना, तसा चि हा हें सदृशा न माना ।
केला भटाचा अपमान साचा, आहे वहू कातर मानसाचा ॥ १७ ॥
हा धाकुटा परि बहूंवस नष्ट बाई, पाजा हळूच करिं सोडुन वत्स गाई ।
जावें पयास हि न घेउनि व्यर्थ कां ग्यां, बैसा ह्मणे निजघरांत उभ्या रिकाम्या १८
गेहामध्यें चोर तैसाचि वागे, आतां यातें गोरसा लांबवा गे ।
आह्मां कांहीं आकळेना हरी तो, संतोषें कां तोषवूं ना हरी तो॥ १९ ॥
ठाकूनि गेल्यावरि पूतनारी, मिळोनि तेथें अगणीत नारी ।
परस्परें बोलति वाक्प्रहारीं, सारें तया कृष्ण भवापहारी ॥ २० ॥
अशीं कौतुकें शेषशायी करीतो, करी कथेनें अविद्या हरी तो ।
कथेच्या रसें शुद्ध केलें मनाला, कलीमाजि या तारिलें वामनाला॥२१॥

इति श्रीगोरसहरण समाप्त.

---

## हरिविलास अथवा कालियामर्दन.

### ( कथेचा सारांश. )

कालिया नामें एक महासर्प कालिंदीचे एके डोहांत गरुडाच्या भयानें फार दिवस सकुटुंबपरिवार वस्ती करून राहत होता. त्याचें विष इतकें तीव्र असे की, त्याच्या योगानें पाण्यास कढ येत असे, व वाफेच्या योगानें अंतरिक्षांत उडून जाणारे पक्षी होरपळून आंत पडून मरत, त्या पाण्यावरून वाहणाऱ्या वायूच्या योगानें आसपासचीं झाडें व वनें सुद्धां दग्ध झालीं होतीं. त्या सर्पास तेथून घालवून दिल्यावांचून आसमंतातच्या प्राण्यांस सुख व्हावयाचें नाहीं, असें मनांत आणून श्रीकृष्णानें वसंतऋतुंत एके दिवशीं कालियाच्या डोहाकडे गाई चारण्यास आणिल्या. दोनप्रहरीं जेव्हां गाई व गोप ह्यांनीं यमुनेचें उदक प्राशन केलें तेव्हां तीं मृत होऊन पडलीं. परंतु कृष्णानें त्यांस अमृतदृष्टीनें उठवुन कालियास शिक्षा करण्या-

---

१ वरून दिसण्यांत काळा तसा अंतर्यामी पण काळाच आहे. २ दिवसाचाच. ३ माया; कपट. ४ लहान. ५ योद्धे राक्षस त्यांचा. ६ भिलरा. ७ फार. ८ कृष्ण. ९ कठोरशब्दांनीं. १० माया.

करितां आपण डोहांत उडी टाकिली. उडी टाकतांच कालियानें त्याचे शरीरास वेढे घालून मर्मस्थळीं दंश केले, परंतु श्रीकृष्णानें शरीर फुगविलें तेव्हां सर्पाच्या शरीराचे तुकडे व्हावयास लागले म्हणून तो वेढे सोडून दूर पळूं लागला, परंतु श्रीकृष्णानें त्यास धरून त्याचे फणांवर संपूर्ण विश्वाचा भार टाकून नृत्य केलें, तेणेंकरून तो अगदीं हतगर्व होऊन शरण आला. त्याच्या स्त्रिया हीं येऊन त्यांनीं फार स्तुति केल्यावरून कृष्णानें कालियास जीवदान देऊन त्यास दूर समुद्रांत घालवून दिलें व सांगितलें कीं, तुला इतःपर गरुडापासून भीति नाहीं. ह्या वेळेस कृष्ण फक्त सहा वर्षांचा होता. इकडे गोकुळांत दुश्चिन्हें होऊं लागलीं त्यावरून कृष्णास कांहीं तरी अपाय झाला आहे असें समजून नंद, यशोदा व संपूर्ण व्रजांतील लोक तेथें जमून शोक करूं लागले. तेव्हां श्रीकृष्णानें लौकरच बाहेर येऊन सर्वांस आनंद दिला. इतकी कथा ह्या प्रकरणांत वर्णिली आहे.

फणिफणावरि[1] नृत्य करी हरी, प्रकृति जो भवबंध[2] करी हरी[3] ।
त्रिभुवनीं जनिं काननिं दीसतो, स्मर मना प्रभु यामिनिदीस[4] तो ॥ १ ॥
त्रिभुवनीं जगजीवन दीसतो, करि कृपा यमुनाख्यनदीस[5] तो ।
मथुनियां भुजगा अतिकाळ या, दवडुनी[6] खळ दुर्मति काळया[7] ॥ २ ॥
तत्पदीं करुनियां नमनातें, तत्कथा सुखनिधान[8] मनातें ।
वाटतें ह्मणुनि वर्णिल वाचा, स्वाद कृष्ण गुणलेशलवाचा[9] ॥ ३ ॥
ग्रंथ हा हरिविलास ह्मणावा, प्राकृतांत सहसा न गणावा ।
गोवळ्यांतहि[10] वसोनि हरी तो, सत्कथा करुनि बंध हरीतो ॥ ४ ॥
धेनु चारित उभा गवतांत, श्रीहरी ह्मणति भागवतांत ।
प्राकृतांतहि अशी शुकवाणी, दीसते बरवि कौतुकवाणी ॥ ५ ॥
आत्मा जगज्जीवन वामनाचा, जो सोहळो[11] नित्य नवा मनाचा ।
नामामृतें ग्रंथ कलौ[12] करीतो, नामें जना तारक लौकरी तो ॥ ६ ॥
सेव्य देवमुनि मानव संतीं[13], तो वनीं सुखनिधान वसंतीं ।
क्रीडतां स्वजन संकट वारी[14], जे[15] पितीं सविष[16] दुर्धर वारी ॥ ७ ॥

१ सर्पाच्या फणेवर. २ संसारबन्धन. ३ हरण करी. ४ रात्रंदिवस. ५ यमुना नांवाच्या नदीस. ६ महाकाळरूपी सर्पास दवडून यमुनेवर कृपा करी. ७ खळ व दुष्ट बुद्धि असा कालियानामक सर्प त्यास. ८ सुखाचें स्थान. ९ श्रीकृष्णाच्या गुणांचा लेश लव (अत्यंत थोडा अंश) याचा स्वाद. १० जसा हरि गोवळ्यांत राहूनही भवबंध हरण करितो तसा हा हरिविलास ग्रंथ प्राकृतांत असूनही भवबंध हरण करील असा भाव. ११ उत्साह. १२ कलियुगांत. १३ देव, मुनि, मनुष्य व संत यांस पूज्य. १४ निवारण करी. १५ जे स्वजन. १६ विषयुक्त जल.

म्हणुनि दंड उदंड भुजंगमा, करुनियां सुख दे खिरजंगमा ।
शुक नृपासि वदे चरिता तया, हरिकथा असि भागवतांत या ॥ ८॥
हरि जे रिति धरी भुजगातें, वाहतो जलजनाभ जगातें ।
तो भुजंगम शिरीं नट नाचे, ते विलास परिसा नटनाचे ॥ ९ ॥
नाचली फणिफणावर साची, कृष्णमूर्ति तयि सौ वरसांची ।
हे कथा कथितसे शुक राया, लोक तीनहि कृतार्थ कराया ॥१०॥
करी धन्य पायें वना जीवनातें, स्मरा रे स्मरा त्या जगज्जीवनातें ।
विरिंचादिकीं मंत्र ज्यांचा जपावा, वनीं वाजवी तो महाराज पांवा ॥११॥
परिसुनी वनिं गाई नाद त्या पांवयाचा, विचरति समजोनी अंतरीं भाव याचा।
हरिगुणगण गाती भोंवत्या गोपजाती, श्रवणपठणमात्रें ज्यांचिया ताप जाती १२
एके दिनीं गोप वसंत तापें, तृषार्त मार्तंडकरप्रतापें ।
पुढें वनीं धुंडिति सर्व पाणी, मागूनि ये दूरुनि चक्रपाणी ॥१३॥
ते पावले नदिस तो न्हद कालयाचा, जेथें निवास भुजगा अतिकाल याचा ।
ज्याच्या विषें विषम तें न्हदनीर भारी, प्याले समीप नसतां मधुकैटभारी ॥१४
धेनु गोपहि तया जलपानें, ज्या विषानल कढे जल त्यानें ।
पावले सकळही मरणातें, अंतरोनि हरिच्या चरणातें ॥ १५ ॥
पावला इतुकियांत हरी तो, जो स्वकीय जनमृत्यु हरीतो ।
त्याचिया करिति जे स्मरणातें, होति ते वश कसे मरणातें ॥ १६ ॥
आपणाविण अनाथ असे जे, कालनिद्रित धरातळसेजे ।
त्यां कृपेंकरुनियां अवलोकी, जन्ममृत्यु हरि जो तिहिंलोकीं ॥१७॥
काळसर्पविषपानमृतातें, जीववी स्वनयनें अमृतातें ।
वर्षतां, पशुप धेनु अशेषें, ऊठती खडबडूनि विशेषें ॥ १८ ॥
मग उठूनि परस्पर पाहती, पशुप विस्मित होउनि राहती ।
विष पिऊनि मरोनि कसे रिती, म्हणति जीवन हेंचि विचारिती ॥१९॥

---

१ चराचर जीवांस. २ परिक्षितीस. ३ ज्याप्रमाणें हातांत पुष्पहार धरावा त्याप्रमाणें जो सर्पास धरणारा. ४ कमलनाभ ब्रह्मा. ५ ऐका. ६ नर्तनाचे; नाचण्याचे. ७ साहा वर्षांची. ८ वनास व पाण्यास. ९ ब्रह्मादि इतर देवांनीं. १० मुरली. ११ फिरतात. १२ ज्या हरिगुणगानाच्या श्रवणानें व पठणानें. १३ वसंतऋतूच्या प्रखर उष्णानें. १४ सूर्याच्या किरणांच्या तापानें. १५ डोह. १६ डोहाचें पाणी. १७ मधु व कैटभ दैत्यांचा शत्रु कृष्ण १८ उदकप्राशनामुळें. १९ भूशय्येवर मृत्यूनें निजलेले. २० शय्या. २१ अमृतातें वर्षतां. २२ गोपाळ. २३ सगळे.

जो जगीं स्वजनमृत्यु हरी तो, आठवे अवघियांस हरी तो ।
जीववी निजकृपाअवलोकीं, कोण त्याविण दुजा तिहिंलोकीं ॥२०॥
गोविंदामृतदृष्टिवृष्टि करितां आतां मरोनी जिते
कीं चित्तास सचेतना स्मृतिपणें देहादिकां योजिते ।
जे मेले गरलानलें करुनियां ते ऊठले हें खरें
केलें हें हरिनेंचि या अवघियां देवांचिया शेखरें ॥ २१ ॥
पशुप आणि पशु विषजीवनें, मरति त्यांसहि दे हरि जीवनें ।
दवडि तेथुनि दुष्ट भुजंगमा, परम बाधक जो स्थिरजंगमा ॥ २२ ॥
छाया जियेच्या उदकास काळी, केलें तिये शुद्ध तयाचि काळीं ।
श्रीइंद्रनीलद्युति काळियानें, कृष्णेंचि जे दूषित काळियानें ॥ २३ ॥
श्रीकृष्ण काळा यमुनाहि काळी, दंडूनि काळा फणि तेचि काळीं ।
कालिंदिचें जीवन शुद्ध केलें, कथामृता ज्या जग हे भुकेलें ॥२४॥
तिघां कृष्णरूपें तिघां कृष्ण वर्णे, तिघांलागिं कृष्णाह्वय दोंदोंच वर्णे ।
पुराणीं वदे श्रीशुक श्लोकें राया, पुढें ग्रंथविस्तार याचा कराया ॥ २५ ॥
कृष्णरूपचि जया जग सारें, कृष्ण त्यास मग सार असारें ।
कृष्णवर्णहि तिघां सविशेषीं, कृष्णशब्द अतएव विशेषीं ॥ २६ ॥
कृष्णनीर यमुना अति कृष्णा, तींत कृष्णफणि देखुनि कृष्णा ।
ये कृपा करि सुधा यमुनेला, सागराप्रति तिचा यम नेला ॥ २७ ॥
सुधासिंधुचा बिंदु हा एक कानें, नृपें घेतला वर्णितां श्रीशुकानें ।
करीती पुढें प्रश्न राजा मुनीला, स्मरोनी हृदंभोरुहीं मेघनीला ॥ २८ ॥

---

१ हरण करितो. २ जिवंत होतो. ३ विषाग्नीनें. ४ श्रेष्ठ. ५ विषोदकानें. ६ प्राण. ७ दुष्टसर्प कालिया त्यास. ८ पीडा करणारा. ९ ह्या श्लोकाचा अन्वयः—'जिच्या उदकास छाया काळी, जे काळियानें दूषित तिये तयाचि काळीं इन्द्रनीलद्युति काळियानें कृष्णेंचि शुद्ध केलें. १० इन्द्रनील मण्यासारखी ज्याची काळी कांति त्यानें. ११ कृष्णानेंच. १२ कालिया. १३ कृष्ण, यमुना, व कालिया ह्या तिघां-च्याही नावांत काळा अशा अर्थाचे दोन दोनच वर्ण आहेत, वरील श्लोकांत कृष्ण काळा, यमुना काळी, व सर्पहि काळा असें ह्मटलें आहे. १४ "विलोक्य दूषितां कृष्णां कृष्णः कृष्णाहिना विभुः" इत्यादि शुकोक्ति. १५ सारहित. १६ काळें पाणी. १७ काळी. १८ कृष्णास. १९ यमुनेस सुधा ह्म० अमृताप्रमाणें मधुर केली. २० यम; मृत्यु. २१ कानानें कथामृताचा बिंदु घेऊन श्री० शुकाचार्यांनीं सांगितलेली थोडीशी कथा श्रवण करून परिक्षित राजानें त्यास पुढें प्रश्न केला. २२ हृदयकमळीं मेघवर्ण कृष्णाचें स्मरण करून; अंभोरुह ह्मणजे पाण्यांत उगव-णारें कमळ.

कसें मर्दिलें काळयातें स्ववाचा, वदावें ह्मणे पौत्र तो पांडवाचा[1] ।
अजी[2] श्रीशुकाचार्य तें खोलपाणी, धरी त्यांत सर्पा कसा चक्रपाणी ॥ २९ ॥
युगें बहू त्या उदकाचिमाजी, कां लोटलीं सांग भुजंगमा जीं ।
कृष्णें तयां जीवविलें मृतांतें[3], पुढें वदावें चरितामृतातें ॥ ३० ॥
अजी कृष्णें कृष्णेमधिल[4] फणि काळा[5] दवडिला
कथेचा जो भाग त्वरितचि तुह्मीं हा निवडिला ।
परंतु श्रीकांतें परम भगवंतें निजसुखें,
चरित्रें जीं केलीं अमृत तुमच्या वाटति मुखें[6] ॥ ३१ ॥
रमा ब्रह्मा शंभु त्रिभुवनपतीसेव्यचरणें
स्वतंत्रें गोपत्वें[7] धरणिवरि याचें विचरणें[8] ।
अजी मानी तृप्ति श्रवण करितां त्यासि कवणें,
त्रिलोकीं क्षेमार्थे[9] त्रिभुवनपतीचें भिरवणें ॥ ३२ ॥
प्रश्न हा परिसतां शुकयोगी, श्रोतयां त्रिभुवनीं उपयोगी ।
वाटलें सुख बहूत कृपाळा, बोलतो हरिचरित्र नृपाळा ॥ ३३ ॥
सांगे कथा शुक भवांबुधितें तराया[10], कीं काळया ह्रदिं[11] असे यमुनेंत राया ।
जैसें कढैतें[12] कढतें घृत अग्नितापें, तैसें ह्रदोदक भुजंगविषप्रतापें ॥ ३४ ॥
ऊसळे सळसळां जळ डोहीं, ज्यावरी खग[13] शके न उडोंही ।
अंतरिक्षगत[14] पक्षि जळोनी, लक्ष लक्ष पडताति गळोनी ॥ ३५ ॥
काळिया तरि जळांतचि आहे, जाय दूरि[15] गरळानळ आहे ।
उष्ण वारि विष वाफ नभाला, व्यापितां न उडवे शलभाला[16] ॥ ३६ ॥
व्यापुनी विष असे गगनाशी[17], त्यामधीं उडति ते खग नाशी ।
आग त्यावरिलिया पवनाची, राख ते करि समीप वनाची ॥ ३७ ॥
ह्रदीं ज्या विषाच्या जलाच्या तरंगीं[18], फिरे वायु येऊनि तो अंतरंगीं[19] ।
करी स्पर्श ज्याला तयाच्या कणाचा[20], हरी प्राण तो प्राणियांच्या गणाचा[21] ॥ ३८ ॥

---

१ परीक्षित राजा अभिमन्यूचा मुलगा ह्मणून पांडवांचा नातु. २ अहो. ३ मृत झालेले गोगोपाळ त्यांस. ४ यमुनेमधील. ५ कालियासर्प. ६ श्रीकृष्णानें जीं चरित्रें केलीं तीं तुमच्या मुखानें ऐकिली असतां अमृतासारखीं वाटतात. ७ गोपवेषानें. ८ फिरणें. ९ सुख देण्याकरितां. १० संसारसमुद्र तरून जाण्याकरितां. ११ यमुनेमध्यें डोहांत. १२ कढईमध्यें. १३ पक्षी. १४ आकाशामधून उडणारे. १५ त्याला. १६ टोळाला. १७ विष गगनाशी व्यापून असे ह्म० असतें झालें. १८ लाटावरून; ज्या विषयुक्तजळाच्या लाटांवरून वायु फिरे. १९ अंतर्यामीं २० त्या मरुतांच्या कणाच्या (अंशाचा). २१ समुदायाचा.

चंड वेग विषविक्रम ज्याचा; शेष वासुकिचिया अनुजाचा ।
त्या खळासि खलमर्दन पाहे, दंडही करि तथापि कृपा हे ॥ ३९ ॥
जीवनांत जगजीवन नाहीं, देखिली असि विषें यमुना ही ।
दंड जो करिल दुष्ट मतीतें, तोचि केवळ अनुग्रह तीतें ॥ ४० ॥
इच्छिला नदिअनुग्रह राया, या मिसें भुजगगर्व हराया ।
थोर एकचि कदंब तटाकीं, त्यावरूनि उडि अच्युत टाकी ॥ ४१ ॥
जाळणार विष जीवकदंबा, जाळवे न तरु तोचि कदंबा ।
त्यावरी अमृतबिंदु गळाला, जाळवे न तरु तोचि खळाला ॥ ४२ ॥
ने जई विहगराज सुधेतें, पातला गरुड या वसुधेतें ।
त्या तरूवरि तई बसला हो, घे तई द्रुमसुधारसलाहो ॥४३॥
हरि चढोनि नयाच तरूवरी, खेरशना वसनासह सांवरी ।
कसुनि कास कसी कनकांबरें, दृढ करी कटिसूत्र कटीं बरें ॥ ४४ ॥
प्रचंड डावा भुजदंड भारी, सव्यें करें वाजवि कैटभारी ।
गर्जोन वृक्षावरि त्या तटाकीं, उडी विषाच्या सलिलांत टाकी॥४५॥

कडे आधीं पाणी रथचरणपाणी करुनियां
उडी टाकी हांकेसरसि उदकीं सांवरुनियां ।
भुजंगाचा डोहो गहनहि अहो जो खळबळी
वसे जेथें सर्प स्वगृह करुनीयां खळ बळी॥ ४६ ॥

पाणी धनुःशत उचंबळलें ऱ्हदाचें, ज्यामाजि तें विषचि तुंबळ दुर्हृदाचें ।
कल्लोळलोळ भयकारक ये तटाका, आश्चर्य हें जरि गमेल मनांत टाका ४७

१ हें 'चंडवेग विषवीर्य' ह्या पदाचें भाषांतर आहे. ज्या विषाच्या प्रसाराचा वेग भयंकर आहे. २ जो कालिया केवळ वासुकि सर्पाचा धाकटा भाऊच. ३ दुष्टांचा शासनकर्ता कृष्ण. ४ शिक्षा लावूनही ज्याणें त्यावर कृपाच केली. ५ पाण्यांत. ६ कृपा; दुष्टबुद्धि सर्पास जो दंड तोच तिला अनुग्रह. ७ निमित्तानें. ८ जीवसमुदाय. ९ अमृताचा थेंब. १० गरुड. ११ पृथ्वीवर. १२ तेव्हां ह्या द्रुमानें म्ह० कदंबवृक्षानें सुधारसाचा लाभ घेतला. १३ कंबरपट्टा व वस्त्र सांवरलें. १४ कमर बांधुन. १५ सुवर्णाच्या वर्णासारखें वस्त्र म्हणजे पीतांबर. १६ कडदोरा. १७ कमरेवर. १८ उजव्या हातानें. १९ रथचरण म्हणजे चक्र तें आहे हातांत ज्याच्या; चक्रपाणी. २० खळबळ वाजूं लागला. २१ दुष्ट. २२बलिष्ट. २३शंभर धनुष्यें उंच. "उडीसरसें त्या वेळे । शतधनुष्यें उदक उंच गेलें । कल्लोळ तीरास आदळले । विषनीराचे तेधवां ॥" श्रीधर । २४ दुष्टहृदय जो कालिया त्याचें. २५ लाटांचे लोळ. २६ टाकून द्या.

कीं अनंतबल ज्या प्रबलाचें, काय हो नवल याच बलाचें ।
हें चरित्र सुर मानव तारी, वर्णिजे ह्मणुनियां अवतारी ॥ ४८ ॥

अमृतहरिविलासीं श्रीहरी हा विलासे
प्रथम हरिविलासें तूंचि म्यां सेविलासे ।
कथिसि निजचरित्रा तूंचि हे वामनाला
भ्रम परिहरुनी दे नित्य हेवा मनाला ॥ ४९ ॥

---

## अध्याय २.

ऱ्हदीं उडी घालुनियां निघाला, आला खळाच्या सदनास घाला ।
विलास येथूनि दुजा हरी तो, करी खळाचा मद जो हरीतो ॥ १ ॥
खेळे जळीं त्या खळदंड पाणी, विदारिती श्रीभुजदंड पाणी ।
जळांत हस्ती करि विक्रमातें, दावी तसा श्रीहरि विक्रमातें ॥ २ ॥
आफळी ऱ्हदजळीं भुजदंड, त्रास तो करि खळास उदंड ।
घोषें तो परम दुःसह मानी, कालिया विषमदें अभिमानी ॥ ३ ॥
कर्णहीनें नयनीं ध्वनि घेतो, क्रुद्ध होउनि भुजंग निघे तो ।
देखिला ढवळि जो स्वजळाला, देखतांच हृदयांत जळाला ॥ ४ ॥
देखिलें नयनिं नंदकुमारा, शामसुंदर बऱ्या सकुमारा ।
मंद हास्य अतिरम्य मुखाचें, दाखवी स्वमुख नित्य सुखाचें ॥ ५ ॥
जें येंथ न कोणे उपमेसमान, नानातपीं जेथ रमेस मान ।
श्रीवत्स ऐसा हृदयांबुजांत, दयार्णवीं एक दयांबु ज्यांत ॥ ६ ॥
हरी तेज सौंदर्य पद्मोदराचें, असें श्रीपदद्वंद्व दामोदराचें ।
न रूपास ज्या साम्य वेदीं पुराणीं, पहातां पुरेना जयाची शिराणी ॥ ७ ॥
खेळे जळीं तो खळगर्वहंता, हरावयाला फणिची अहंता ।
ज्याव्रीण कोणी स्वमदा न वारी, तो देखिला ये रिति दानवारी ॥ ८ ॥

---

१ शोभतो. २ हरिविलासप्रकरणांत. ३ इच्छा. ४ घरावर. ५ दरवडा. ६ खेळ. ७ हत्ती जसा पाण्यांत पराक्रम करतो तसा पराक्रम दाखवी. ८ डोहामधील पाण्यांत कृष्णानें हस्त आपटले. ९ मोठा. १० आवाज. ११ सर्पास कान नाहींत ह्मणून तो डोळ्यानींच ऐकतो. १२ हालवी. १३ रागानें जळत राहिला. १४ जें हृदयांबुज ह्म० हृदयकमल. १५ जेथें ह्म० ज्या हृदयांत रमेस (लक्ष्मीस) नाना तपें केल्यानें मान मिळतो. १६ हरण करी. १७ कमळाचा अंतर्भाग. १८ कृष्णाचें पादयुगल. १९ आवड, कौतुक. २० दुष्टाच्या गर्वाचा नाश करणारा कृष्ण. २१ दानवांचा शत्रु कृष्ण.

देखोनि तो क्रुद्ध फणींद्र झाला, धांवोनियां श्रीगरुडध्वजाला ।
मर्मस्थळीं दंश करूनि दांतें, दावी बळें विक्रमसंपदांतें ॥ ९ ॥
स्वसर्पदेहें मग कृष्णजीची, श्रीमूर्ति सत्कीर्ति पवित्र जीची ।
अनंतकल्याणगुणावतारी, आच्छादिली जे भुवनांसि तारी ॥१०॥
लोकरीति जगदीश्वर दावी, ते अपूर्व ह्मणऊनि वदावी ।
हें न जाणत जन व्रजवासी, दुःख शोक करितील जिवासी ॥ ११ ॥
त्यामाजि जे संनिध गोपजाती, गाई गुरें दुःखपथासि जाती ।
तीरीं समस्तांसहि कृष्णभावीं, झाली वदे श्रीशुक तेंचि आधीं ॥१२॥
भुजंगें हरी वेष्टिला सर्व देहीं, न हाले न चाले न कांहीं वदेही ।
असें देखती सर्व मूर्छेस जाती, महादुःखशोकें भयें गोप जाती॥१३॥
ज्यां लाभ हा तो प्रियपूर्णकाम, ज्याच्या पदीं देहकलत्रकाम ।
समर्पिलें ये रिति त्या अजाला,देखोनि त्यांतें बहु शोक झाला॥१४॥
मूर्छा विमानीं गगनीं सुरांला, आक्रांत गाईवृषवांसुरांला ।
आक्रंदती मांडिति रूदनातें, देखोनि ऐसें मधुसूदनातें ॥ १५ ॥
कृष्णाकडे अर्पुनि लोचनातें, भयें पहाती भयमोचनातें ।
स्वशोक यांला बहु तीव्र जाला, दावी महोत्पातें अति व्रजाला ॥१६॥
उत्पातधाकें यमुनातटातें, यावें पहावें निजसंकटातें ।
व्रजीं अरिष्टें ह्मणऊनि दावी, कथा अशी ये रितिनें वदावी॥ १७ ॥
वृत्तांत ऐसा यमुनेस जाला, तों सूटला त्रास महा व्रजाला ।
कांपे धरा वर्षति तीव्र तारा, देखोनि गांवांत निघे न वारा ॥ १८॥
बहु अकाळ विजा पडती क्षिती, लवति लोचन ते भय लक्षिती ।

---

१ सर्प. २मोठा पराक्रम. ३ ह्या श्लोकाचा अन्वयः—मग जीची सत्कीर्ति, पवित्र, जे अनंतकल्याणगुणावतारी, व जे भुवनासी तारी अशी ते कृष्णजीची मूर्ती स्वसर्पदेहें आच्छादिली. ४ अनंत व कल्याणकारक अशा गुणांनी अवतरणारी. ५ दुःख; व्याधि. ६ कामना पूर्ण करणारा. ७ ज्यांणी आपला देह, कलत्र आणि काम ज्याच्या पदीं समर्पिले आहेत.८ जन्मरहित कृष्णाला. ९बैलांस.१०ओरडतात. ११ डोळे. १२ भयापासून सोडविणारा कृष्ण त्यास. १३ व्रजामध्यें अपशकून सुचविणारे उत्पात सु० दुश्चिन्हें झाली. १४आपलें संकट व्रजांतील लोकांनीं येऊन पहावें ह्मणून कृष्णानें उत्पात उत्पन्न केले असा अर्थ. १५ महाभय. १६ पृथ्वी कांपूं लागली. १७ उल्कापात झाले. "चपळा पडती कडकडून । अद्भुत सूटला प्रभंजन । उडुगण पावती पतन । लोक शोकें विव्हळ ॥ " श्रीधर । १८स्त्रियांच्या डाव्या व पुरुषांच्या उजव्या नेत्रानें लवून दुश्चिन्हें दर्शविली.

अतिसमीप अनर्थ गमे मना, हरि असो सुखि हे मनकामना ॥१९॥
नभीं उल्कापात क्षितिवरिहि उत्पातें दिसती
हरी कोठें आहे ह्मणुनि जन अन्योन्य पुसती ।
हरी गेला राना त्यजुनि बळरामास सदनीं
असें हें जाणोनी वदति अति दुःशब्द वदनीं ॥ २० ॥
न बळरामहि आजि अजी वनीं, ह्मणुनि निश्चय कृष्ण अजीवनीं ।
करिति धैर्यहि जाय गळोनियां, प्रभुमहत्त्व तयां न कळोनियां ॥२१॥
हरी चित्त वित्त प्रिय प्राण ज्यांचा, न सोसे वियोगाग्नि पादांबुजाचा।
न उल्लंघवे दुःखशोकार्णवातें, उडे धैर्य जैसीं तृणें जीर्ण वातें ॥२२॥
हरीच्या वियोगाचि सीमा न साहे, व्यथा प्राप्त सर्वांचिया मानसा हे ।
वियोगानळें जाळितां काळजीला, जगाच्या लयाचा गमे काळ जाला २३
धरूनी मनीं सर्व या काळजीला, निघाले पहायास गोपाळजीला ।
सवें चालिली बालवृद्धादि सेना, हरीवीण जीवित्व कोणा दिसेना॥२४॥
परम वृद्ध वहू लवले कटीं, धरुनि यष्टि करीं अति संकटीं ।
त्वरित चालति बाळहि रांगती, हरिचिया सुपथीं सकळां गती ॥ २५ ॥
ज्यांसि नित्य हरिदर्शन वोढी, चालिल्या तरुण आणि नवोढी ।
अंतरीं धरुनि दैत्यजनारी, चालिल्या वडिलही व्रजनारी ॥ २६ ॥
स्वयें काळ जो मृत्युकाळादिकांहीं, नसे त्रास त्या श्रीहरीलागिं कांहीं ।
असें राम जाणूनि त्यातें न वारी, ह्मणे यांस नेतो स्वयें दानवारी ॥२७॥
जाणोनियां ये रिति कृष्णभावा, जो जाणताहे अनुजप्रभावा ।
ह्मणे हरी प्रेरुनि ने जयांला, मी कां निवारूं सकळां तयांला ॥ २८ ॥
दुःख तें करुनि तीव्र जिवासी, चालिले सकळही व्रजवासी ।
रज्जु कृष्ण भवसर्प हरीतो, धुंडिती सकळ गोप हरी तो ॥ २९ ॥

---

१ इच्छा. २ अनर्थदर्शक चिन्हें. ३ एकमेकांस. ४ आज. ५ मृत्युमध्यें. ६ हरि हाच केवळ ज्यांचें मन, धन, आणि प्रियप्राण होय. ७ हरीच्या पादकमलाचा वियोगरूपी अग्नि. ८ समुद्र. ९ वाऱ्यानें जसें गवत उडतें तसें त्याचें धैर्य उडून गेलें. १० काळीज; हृदय. ११ शेवट, नाश. १२ जीव; प्राण. १३ कंबर वांकलेले वृद्धजन. १४ काठी हातीं धरून. १५ ओढ; बळकट इच्छा. १६ स्त्रिया; वधु. १७ मनांत. १८ भय. १९ बळराम. २० दानवारि कृष्ण हा जर या लोकांस स्वतः नेत आहे तर मीं यास कां निवारावें. २१ आपला धाकटा बंधु जो कृष्ण त्याच्या सामर्थ्यास. २२ कृष्ण हीच दोरी तिजवर झालेला संसार हाच सर्प त्याचा भास जो हरण करितो.

चैतन्यरज्जु भुजग स्थिरजंगमाचा
त्यालागिं आवरण देह भुजंगमाचा।
गोपाळ धुंडिति तया निज देवराया
साकार जो चरण त्यांसहि दे वरायां॥ ३० ॥

ह्मणुनि शुक ह्मणे कीं आइकें गा नृपाळा
पशुपं निगमरीती धुंडिती त्या कृपाळा।
हरिचरणरजांतें लक्षुनी गोपजाती,
सकळहि यमुनेच्या जे तटाकास जाती ॥ ३१ ॥

सुरवर धरि माथां शंभु पादांबु ज्याचें
क्षितिस विभव ज्याच्या दिव्यपादांबुजाचें।
धरणिवरि तयांच्या लक्षितां लक्षणांतें
परि न लंवितिति कोठें ते सुशील क्षणातें ॥ ३२ ॥

जलज वज्र यवांकुश देखिले, ध्वज मनोहर सुंदर रेखिले।
उमगलीं धरणीं तलमंडनें, हरिपदांबुरुहें भवखंडनें ॥ ३३ ॥
अमित गोपदअंकित वाट ते, श्रुतिपथोपम जी मज वाटते।
श्रुतिपथीं हरिचें पद धुंडणें, तसिं पदें प्रभुचीं क्षितिमंडणें ॥ ३४ ॥
गोशब्द येथें श्रुति सूचवीतो,दावी रसीं श्रीशुकजी चवी तो।
जे गोपदीं पाय रमापतीचे, सद्रूप ते अर्थ तया श्रुतीचे ॥ ३५ ॥

---

१कृष्णरूपी रज्जूचे ठायी सर्पाप्रमाणें भासमान असा संसार.२वेष्टण.३स्वरूप धारण करून. ४ सेवन करण्यास. ५ गोपाळ. ६ वेद जसे त्यास शोधितात तसे गोपाळ त्यास शोधूं लागले.वेद त्यास शोधितात ह्म०तो कसा आहे, त्याचें स्वरूप काय, तो कोठें आहे इत्यादि ज्ञानाची प्राप्ति करून घेतात.७पादोदक.८वैभव;थोरपण.९भूमीवर.१० चिन्हें. ११ लाविती; क्षणभरही उशीर लावीत नाहींत. १२ कमळ वज्र इत्यादि त्याचे पायांवरील चिन्हें धुळींत उमटलेलीं त्यांणी पाहिलीं. १३ पादकमलें. १४ संसाराचें खंडन ह्म० नाश करणारीं पदांबुरुहें. १५ असंख्य गाईगोपाळांच्या पावलांनी चिन्हित अशी वाट. १६ वेदमार्गासारखी, कारण वेदामध्यें अनेक विषयांतून हरि ह्मणजे ब्रह्म धुंडावयाचें असतें त्याप्रमाणें या असंख्य पदपंक्तींतून कृष्णाचीं पाउलें ओळखून काढावयाचीं आहेत. १७ भूमीला भूषण देणारी. १८ गोशब्दाचा अर्थ वाणी असाही आहे. या अर्थावरून गोपद या पदाचा अर्थ श्रुतिमार्गांमधील हरीचें पद असा सुचविला जातो. १९ गाईच्या उमटलेल्या पावलांत जसे हरीचे पाय शोधावयाचे तसे श्रुतींमध्यें काय शोधून काढावयाचें आहे? अर्थात् हरीचे पाय ह्मणजे सर्व हरि ह्मणजे ब्रह्मच आहे, त्यावांचून इतर कांहीं नाहीं असा अर्थ.

असा तो गोमार्ग[1] श्रुतिपथ जसे कां निगम[2] ते
अनात्मत्वत्यागें वदति निज जे वस्तु[3] गमते ।
तसें गोपाळांचें त्यजुनि पद त्या विश्वगुरुच्चीं[4]
पदें तीं पाहाती स्वजन मनिंच्या[5] कल्पतरुचीं ॥ ३६ ॥

आत्मता कथुनिही प्रतिकोशीं[6], वेदकोश दुसरा उपदेशी ।
ब्रह्मपुच्छ[7] ह्मणते श्रुति जेथें, आत्मता निखिल केवळ तेथें ॥३७॥
ब्रह्म तें ह्मणति जें श्रुति पुच्छ, ज्ञानमात्र जड ज्यांवरि तुच्छ।
रज्जुही[8] वरि मृषा फणि जैसा, काळिया हरि तनूवरि तैसा ॥३८॥
अहो पुच्छ[9] तें काळियानें स्वपुच्छें, दिसेना असें वेष्टिलें कृष्णतुच्छें ।
असे त्या भुजंगामधें हार जैसा, हरी काळियाच्या शरीरांत तैसा॥३९॥
भुजंगें असें वेष्टिलें त्या हरीतें,अविद्यादिकां[10] ज्ञान ज्याचें हरी तें ।
करी कर्म तो लोक जैसें करीती: पुढें दावितो एथुनी लोकरीती ॥४०॥
पावले नदितटा व्रजवासी, सर्वही धरुनि तीव्र जवासी[11] ।
जो मुकुंद भवबंध हरीतो, देखिला भुजगबंधें[12] हरी तो ॥ ४१ ॥
भुजगवेष्टित कृष्ण कलेवरीं[13], पुरुष चेष्टितही न कळे वरी ।
दुरुनि देखति लोक समस्त कीं, उरगबंधन आनखमस्तकीं[14] ॥ ४२ ॥
नदीतटीं मूर्छित गोप सारे, राया हरी देखियला असा रे ।
आक्रंदती वत्स गुरें तटाकीं, नेत्रोदकें तो पशुवृंद टाकी ॥ ४३ ॥
असा देखतां कृष्ण गोपाळ गाई,अहाहा अहाहा अगाई अगाई ।
स्त्रिया बोलती सर्वही कष्ट भारी,करीती ऱ्हदीं लक्षिती कैटभारी॥४४॥
मृतपतीसह जेविं पतिव्रता, स्वमरणीं सकळांसहि तीव्रता ।
हरिविणें ह्मणती न जिणें बरें, मरण ये समयीं गुळखोबरें ॥ ४५ ॥

---

१ गोमार्ग ह्मणजे गाईगोपांच्या पावलांनीं अंकित मार्ग हा श्रुतिमार्गासारखाच आहे, कारण ह्यांत परब्रह्म कोणचें हें जसें निगम पाहतात तसेंच व्रजवासी लोकांनीं त्या पदपक्तींत हरीचीं पाउलें पाहिलीं. २ वेद. ३ ब्रह्म. ४ विश्वाचा स्वामी कृष्ण त्याचीं. ५ भक्तांच्या मनांतील कल्पतरु, कृष्ण. ६ पंचकोशांत ह्मणजे पहिला अन्नमयकोश, दुसरा प्राणमयकोश, तिसरा मनोमयकोश, चौथा विज्ञानमयकोश व पांचवा आनंदमयकोश. ७ अखेरीस किंवा शेवटीं जें काय राहिलें ते ब्रह्म. ८ दोरीवर जसा सर्पाचा मिथ्या भास होतो. ९ तें ब्रह्म अर्थात् कृष्ण. १० माया. ११ वेग. १२ भुजंग ह्मणजे सर्पानें बांधलेला. १३ शरीरावर. १४ पायांच्या नखांपासून मस्तकापर्यंत. १५ [illegible]

स्वदेह कृष्णाचपुढें पडो हा, जे ते ह्मणे देखुनि पापडोहा ।
बुडावया धांवति एक वेळा,तो राम त्या सिंधुसि होय वेळा ॥ ४६ ॥
बळें ह्मणे अवघे तुह्मि आइका, सकळ गोंवळ गौळणि वायका ।
भय कदापि न या व्रजनायका, असुख कोण करी सुखदायका ॥४७॥
अशा रामशब्दासि घेऊनि कानीं,यशोदादि संपूर्ण त्या गोपिकांनीं ।
दिले प्राण नाहीं तया वायकांहीं, गमे धैर्य त्या रामवाक्यींच कांहीं ॥४८॥
नंदादिकां सर्वहि गौळियांला, त्या रामवाक्येंच करूनि यांला ।
विश्वास कांहीं हृदयांत झाला, ते पाहती सर्व बळानुजाला ॥ ४९ ॥
गोपिका हरिपदीं अनुरक्ता, त्याविणें त्रिभुवनांत विरक्ता ।
सर्पवेष्टित अचेष्टित कांता, देखतां रडति त्या व्रजकांता ॥ ५० ॥
हरिसवें रमल्या दिनयामिनी, वदति तेंचि परस्पर कामिनी ।
नयनिं नीर कथारस आननीं, वसलिया यमुनातटकाननीं ॥ ५१ ॥
यशोदेसवें बैसल्या गोपजाया, हरीकारणें सिद्ध प्राण त्यजाया ।
यशोदेस त्यांस व्यथा तत्समाना, शवाच्या जशा पुतळ्या वर्तमाना ॥५२॥
देखोनि डोहीं व्रज लोकपाळा, हाणोनि घेती युवती कपाळा ।
भूमीवरी हाणिति मस्तकांहीं, हरीविणें शून्य समस्त कांहीं ॥ ५३ ॥
स्वशोक सर्वांसहि तीव्र जाची, देखे व्यथा हेंचि अति व्रजाची ।
पुरे करी येथुनि लोकलीला, निर्दाळिती जे श्रवणें कलीला ॥ ५४ ॥

कष्टी स्वगोकुल असे स्वनिमित्त भारी
स्त्री बाल वृद्ध पशु देखुनि कैटभारी ।
राहे मुहूर्तभरि आणिक लोकरीती
पाहे स्वहेतु जन शोक कसा करीती ॥ ५५ ॥

निरूपिलें जे रिति या प्रबंधीं, मुहूर्त राहेनि भुजंगबंधीं ।
बंधांतुनी शीघ्र निघे हरी तो, जो बंध लोकीं अवघे हरीतो ॥ ५६ ॥

---

१ शोकसमुद्रास. २ तीर; कांठ. ३ बळराम. ४ कृष्ण. ५ जो दुसऱ्यास सुख देणारा व ज्याचे स्वाधीन सुख त्यासच दुःख कोण देणार. ६ बळरामाचे आश्वासनाचे शब्द ऐकून. ७ यांला गौळियांला असा अन्वय. ८ बळरामाचा कनिष्ठ बंधु कृष्ण त्यास. ९ सर्पानें वेढलेला व निश्चेष्ट असा त्यांचा प्रिय कृष्ण. १० व्रजस्त्रिया. ११ रात्रंदिवस. १२ स्त्रिया. १३ नेत्रांनीं अश्रु टाकीत व मुखांनीं कृष्णकथा गात. १४ प्रेताच्या; त्या सर्व स्त्रिया निर्जीव पुतळ्यासारख्या दिसल्या असा अर्थ. १५ तरुणस्त्रिया. १६ आपल्याकरितां सर्वांस झालेला शोक. १७ लौकिकरीति. १८ पातकाला. १९ दुःखी. २० रचनेंत; या प्रकरणांत. २१ भवबंध.

स्वतनु फुगवि कांहीं बंधनीं कैटभारी
तट तट करि त्याचा देह तें कष्ट भारी ।
त्वरित उकलि वेढे सर्प कांपे थरारी
झडकरि फणिबंधाबाहिरी ये मुरारी ॥ ५७ ॥
क्षणभरी जरि देहे[1] न सुटता, तटतटां स्थळिंच्या स्थळिं तुटता ।
बळ असें कळलें खळसत्तमा[2], दुरुनि लक्षितसे पुरुषोत्तमा ॥ ५८ ॥
डोळे विशाळ अतिवर्तुळ कोपतापें, जे स्तब्ध रक्त[3] बहु उष्ण विषप्रतापें।
दृष्टांत दे शुकहि मडुकभांजनाचे[4], तैसेच नेत्र अतिदारुण दुर्जनाचे ॥ ५९ ॥
झाली व्यथा बहुत कोपें[5] मनीं न थारे[6], नासापुटीं[7] निघति दारुण उष्ण वारे ।
श्वासासवें वमतसे गरळा[8] कराळा[9], पाण्यावरी हरिस लक्षितसे निराळा॥६०॥
फणिफणावरती व्रजराज[10] तो, प्रकरणीं पहिल्यांत[11] विराजतो ।
करिल दंडें[12] उदंड[13] भुजंगमा, निजसुखप्रद जो स्थिरजंगमा ॥ ६१ ॥
हा लोकरीतीच विलास[14] देवें, केला शुकें दाखविला सदेवें ।
जो रज्जुसर्प[15] स्थिरजंगमाचा, वेष्टी तया देह भुजंगमाचा ॥ ६२ ॥
म्हणुनि हरिविलासीं[16] लोकलीलाविलास[17]
त्रिभुवनपति तुझा कीं असा भाविलास ।
पदयुग फणिमाथां जे जगद्धाम[18] नाचे
सुखकर करु लोकीं शब्द हे वामनाचे ॥ ६३ ॥

## अध्याय ३.

आतां शुकाचार्य म्हणे नृपा हे, दंड[19]प्रसंगात कृपाच पां हे ।
कीं पादपद्में जगदीश्वरानें, तो मर्दिला सर्प रमावरानें[20] ॥ १ ॥
क्रुद्ध तो ह्रदजळीं[21] परमेशा, लक्षितो दुरुनि साप रमेशा ।

---

१ सर्पाचें शरीर. २ खलश्रेष्ठ. ३ लाल. ४ लाल तापलल्या मडक्यासारखे ज्याचे डोळे. ५ राग. ६ राहे. ७ नाकपुडींत. ८ विष ९ भयंकर. १० व्रजाचा राजा कृष्ण. ११ कृष्णानें सर्पाच्या फणांवर नृत्य केलें तें पुढील प्रकरणीं म्हणजे तृतीय अध्यायांत वर्णिलें आहे असा अर्थ. १२ शिक्षा. १३ मोठी. १४ खेळ. १५ जो स्थावरजंगम विश्वाचा रज्जुसर्प म्ह० दोरावर जसा मिथ्या सर्पाचा भास होतो तद्वत् भासमान कृष्णरूप ईश्वर त्यास. १६ हरिविलासप्रकरणांत. (अध्याय १ ला श्लोक ४९ पहा.) १७ लोकरीतीस अनुसरून स्वां केलेला खेळ. १८ घर. १९ शिक्षा करूनही कृपा कशी केली ती पहा. २० लक्ष्मीपतीनें. २१ डोहांतील पाण्यामध्यें.

त्या खळा फणिसही हरि पाहे, ते कथा परिस दिव्य नृपा हे ॥ २ ॥
थोर वेग वदनीं रसनांचे, दुर्विष प्रतिमुखीं रस नाचे ।
दंत आंत शिशु भूमिधरांचे, प्रांत चाटित असे अधरांचे ॥ ३ ॥
ज्याच्या विषाचे उदकीं चपेटे, वनाग्नि ज्याच्या नयनेंच पेटे ।
देखे असा गर्व भुजंगमाचा, निर्माणकर्ता स्थिरजंगमाचा ॥ ४ ॥
जवळि खेळत खेळत पातला, झडप घालुनियां करं घातला ।
गरगरां धरुनी भ्रमवी नभीं, गरुड सर्प जसा धरितां न भी ॥ ५ ॥
अहो तोहि पाहे अवसर डसायास हरिला
परंतु श्रीकृष्णें भ्रमण करितां गर्व हरिलों ।
शरीरीं फांसोळ्या बहु खुळखुळ्या होउनि ढिल्या
गती तत्प्राणाच्या सकळहि गळ्यांमाजि चढल्या ॥ ६ ॥
नासिलें भ्रमविनेंचि बळानें, क्षीण देखुनि खळा प्रबळातें ।
शेपुटी धरि अधोमुख हातीं, कौतुकें स्वजन सर्व पहाती ॥ ७ ॥
समग्रही सत्त्वं अलक्ष्यें यातें, नेलें तरी देहबळ क्षयातें ।
निःसत्त्व मानी फणि आपणातें, तरी वळें तो उचली फणांतें ॥ ८ ॥
अधोमुख श्रीहरि साप हातीं, धरी असा गोपवधू पहाती ।
डसावया जों मुख सांवरीतो, देखे हरी तो सहसा वरी तो ॥ ९ ॥
मुरडुनि नरडी करें दुजानें, धरुनि असें धरिलेंच पुच्छ ज्यानें ।
रगडुनि फणिकंठ कैटभारी, उपरि चढे करि नाटय नीट भारी ॥ १० ॥
फणांवरी सारथि पांडवांचा, आरंभ मांडी मग तांडवांचा ।
पादांबुजीं देव शिखामणीचा, फणीचिया दीप्तिशिखा मणीचा ॥ ११ ॥
उदक चंचळ चंचळ त्या फणा, फिरवितो फणि जे रिति गोफणा ।
चपळ नृत्य करी वरि मोकळा, सफळ ज्याकरितां सकळा कळा ॥ १२ ॥
जो प्रवर्तक विलासकळांचा, जो कलीप्रद कलासकलांचा ।

---

१ दिव्य कथा. २ जिव्हांचे. ३ लहान. ४ शेषाचे. ५ ओष्ठप्रांत. ६ वेग. ७ स्थावरजंगम पदार्थास उत्पन्न करणारा. ८ हात. ९ फिरवी. १० भीत नाहीं. ११ वेळ. १२ हरण केला. १३ कंठांत प्राण आले. १४ गरगरां फिरवून. १५ बळ. १६ अतर्क्य. १७ श्रीहरि हातीं सापास अधोमुख धरी. १८ कंठ. १९ दुसऱ्या हातानें. २० नृत्य. २१ पांडवांचा व विशेषेंकरून अर्जुनाचा साह्यकारी कृष्ण. २२ नृत्य. २३ पायांनीं. २४ देवशिरोमणि. २५ कांसाच्या ज्वाळा. २६ चालक.

जे शिवादिक गुरु नटनांचे, त्यांसि आदिगुरु तो नट नाचे ॥ १३ ॥
जो रची अघटिताघटनांतें, तो करी फणिवरी नटनांतें ।
काय विस्मय विलासमयाचा, हा कथारस तया समयाचा ॥ १४ ॥
चपळ तो पळतो उदकावरी, उखळतो खळ तो हरि आवरी ।
कुलपती लपती फणि ते किती, भुजग ती जगती तळ टाकिती ॥ १५ ॥
आरंभल्या ऊपरि नृत्य काय, तेथें करी कौतुक विश्वकाय ।
देवीं कसा श्रीहरि पूजिला हो, ओत्यांसि याऊपरि तोचि लाहो ॥१६॥
विमानांतुनी वृंद वृंदारकांचे, नभीं मल्लिकाकुंदमंदारकांचे ।
फुलांचे समूह स्वनाथावरी ते, बहू वर्षती ज्यासि लक्ष्मी वरीते ॥ १७ ॥
आणूनि नानाविध पूजनाचे, पदार्थ जेथें सुरराज नाचे ।
ते पूजिती त्या पुरुषोत्तमातें, जो पूज्य सर्वा सुरसत्तमातें ॥ १८ ॥
पूजूनि पुष्पादि अनेकरीती, स्तोत्रें विचित्रें नमनें करीती ।
सुवाद्यघोषें सुर गीत नाना, गंधर्व गाती करिती तनाना ॥ १९ ॥
समूह गाती विबुधांगनांचे, श्रीरंग मध्यें विविधांग नाचे ।
सुरस्त्रियांचे ध्वनि टाळियांचे, मर्दी असे हो फणि काळियाचे ॥ २० ॥
मृदंग एकी कितिएक वीणा, संगीतविद्याकुशल प्रवीणा ।
नाचोनि मर्दी हरि काळियातें, त्या वाजवीती करटाळियांतें ॥ २१ ॥
तुडवि काळियमौलि समस्त कीं, म्हणि चुकोनि उरे शतमस्तकीं ।
प्रतिशिरांतुनिही मद नाशितो, हर अनंग करी मदनास तो ॥ २२ ॥
तयामाजि ज्या मस्तकीं तो लवेना, पुन्हा त्यास मर्दी जसा हालवेना ।
करूनी असा नाच देवें नटाचा, फणी मर्दिला हाणहाणोनि टांचा ॥२३॥
मुखांतुनी शोणित वाहताहे, होऊनिया मूर्छित राहताहे ।
ऐशा प्रकारें खलगर्वहंता हरी तयाची सगळी अहंता ॥ २४ ॥
शता शिरामाजिहि जे लवेना, मर्दी तयातें मग हालवेना ।
होताच चेदा अवघें अहीनें, आच्छादिले मस्तक सत्त्वहीनें ॥ २५ ॥

१ नृत्यकलेचे गुरु शंकर आदिकरून त्याचाही जो आदिगुरु. २ सृष्टीस. ३ नृत्य. ४ विलासरूपी. ५ संपूर्ण विश्व हेंच ज्याचें शरीर. ६ देवांनीं. ७ लाभ. ८ देवांचे समूह. ९ देवांचा राजा. १० देवश्रेष्ठांस. ११ देवस्त्रिया. १२ तऱ्हेतऱ्हेचें अंगकौशल्य दाखविणारा. १३ देवांगनांच्या टाळ्यांचे ध्वनि. १४ डोकें. १५ सगळें. १६ त्याच्या शंभर शिरांतुन एखादें शिर तुडवावयाचें राहील या शंकनें. १७ गर्व. १८ शंकरानें जसें मदनास अनंग ह्म० शरीररहित केलें. १९ वांकेना. २० रक्त. २१ नाशकर्ता. २२ हरण करी. २३ गर्व. २४ दुर्बलानें.

निजेला मूर्छेनें भुजंगपति तो मृत्युशयनीं
मुखें रक्तें ओकी तरलगरळा क्रूरनयनीं ।
शतांमध्यें जें जें शिर उचलि निःश्वाससहित
प्रभू तें तें मर्दी निजपदतळें अव्यवहित ॥ २६ ॥

शिरें पदाऊपरि सत्त्वहीनें, जाणो फुलें अर्पियलीं अहीनें ।
केला असा तो फणि नम्र देवें, झाडूनि त्याचा मद वासुदेवें ॥२७॥

राहिल्या सकळही चपळा या, यत्नही न करवेच पळाया ।
गर्व सर्व हरिला भुजगाचा, आठवे मग गुरु त्रिजगाचा ॥ २८ ॥

फणांछत्रें ऐसीं सकळहि हरीनें तुडविलीं
मुखें रक्तें धैर्यें सकळहि मनाचीं उडविलीं ।
मनामध्यें सर्पस्थिरचरगुरूचेचि चरण
स्मरोनीयां गेला न कळत शिरीं तेचि शरण ॥ २९ ॥

नारायणा आठवि सर्पराणा, पावें ह्मणे गा पुरुषा पुराणा ।
स्वयें शिरीं नाचतसे कळेना, वेदांसि ज्याचें पद आकळेना ॥ ३० ॥

धरुनियां उदरीं स्थिरजंगमा, तुडवितां बहु कष्ट भुजंगमा ।
मग नितंबिनि[10] त्या भुजगाचिया, शरण येति पित्यास जगाचिया ॥३१॥

नागिणीच परि मानवनारी, कामरूप धरि तो पवनारी ।
होउनी मनुजरूप रमावें, त्या स्त्रियांसह असें करमावें ॥ ३२ ॥

कृष्ण हा त्रिभुवनेश्वर साचा, हा निजात्मरस सर्व रसांचा ।
हें कळोनि शरणा चरणातें, आलिया स्तविति आचरणातें ॥ ३४ ॥

श्रीअनंत विविधां अवतारां, जो कथा करुनि केशव तारी ।
तोचि धन्य करि या भुवनातें, वेद गर्जति अशा स्तवनातें ॥ ३५ ॥

---

१ सर्प. २ मरणोन्मुख. ३ चंचल किंवा तीव्र विष. ४ श्वास टाकण्याकरितां. ५ स्वस्थपणें काहीएक व्यवधान ह्म० अडचण न येतां ६ छत्रीसारख्या फणा. ७ चराचर पदार्थांचा स्वामी जो परमात्मा त्याचें मनांत स्मरण करून तो सर्प त्यास शरण गेला; परंतु तोच शिरावर आहे हें त्यास कळलें नाहीं. ८ शरण ज्याला जावयाचें तो मनुष्य. ९ उदरी स्थिरजंगम पदार्थ धरून, अर्थात संपूर्ण विश्वाचा भार टाकल्यामुळे सर्पास फारच कष्ट झाले. १० त्या सर्पाच्या स्त्रिया. ११ जगाचा पिता त्यास. १२ मनुष्यरूप. १३ सर्प. १४ कृष्णानें सद्यः केलेलें जें आचरण किंवा वर्तन त्याचें स्तवन करूं लागल्या. १५ वेदही असेंच स्तुति करितात.

देवांचिया या स्तवनासि कानीं, घेऊनियां नागिणिवायकांनीं ।
श्रीकांत नारायण हाचि यातें, केलें तिहीं हो दृढ निश्चयातें ॥ ३६ ॥
ऐकोनि गातां सुरगायकांनीं, कानीं बरें नागिणिनायकांनीं ।
सर्वेश हा सर्वसमान साचा, केला असा निश्चय मानसाचा ॥ ३६ ॥
शरण त्या रिघती समजोनियां, न फणि मूर्छित मूढ निजोनियां ।
न सुरगायन तें श्रवणीं पडे, न हरि हा ह्मणुनी स्मृति सांपडे ॥ ३७ ॥
परि शरणागत याचि वासुदेवा, भुजगहि तो स्वमनेंचि देवदेवा ।
जरि शरण तया तरी अहाहा, कवण ह्मणे मज पीडितो महा हा ॥३८॥
हरिस ज्या स्मरतो मनिं कालिया, शरण सुंदरि त्यासचि आलिया ।
परि परोक्ष भजे फणिराज तो, भुजगियां अपरोक्ष विराजतो ॥ ३९ ॥
हुडकितां निजरज्जुहि साप तो, गमतसे ह्मणऊनिच कांपतो ।
हरिचि पाहतसे मनिं वाट तो, हरिच तो शिरिं अंतक वाटतो ॥ ४० ॥
न सर्प हा रज्जु ह्मणोनि ठावें, त्याचें मनीं तें भय कां उठावें ।
जो कां भितो मानुनि सर्प साचा, तो त्रास त्याच्या हरि मानसाचा ॥४१॥
अजि जयां अपरोक्ष दिसे हरी, इतर दुःखहि तद्वचनें हरी ।
हरिसि जाणति नागिणि जाणत्या, ह्मणुनि सोडविती पति जाण त्या ॥४२॥
शुकहि सूचवि हेंचि कथारसीं, न वदतां स्फुट वैखरि फारसी ।
प्रकरणीं पुढिल्या व्रजनायका, स्तविति सादर ते स्तुति आयका ॥ ४३ ॥
जो कां सखा सारथि पांडवांचा, विलास ऐसा करि तांडवांचा ।
जो नाट्यनामास कलौ करीतो, हा मृत्यु जन्मांतक लोकरी तो ॥ ४४ ॥
कृष्णतांडवविलास ह्मणावा, हा तृतीय ह्मणऊनि गणावा ।
अर्पिला हरिचिया पदपद्मा, ज्या पदीं त्रिभुवनेश्वरि पद्मा ॥ ४५ ॥

---

१ कानामध्यें घेऊन, ऐकून. २ लक्ष्मीपति. ३ सर्पस्त्रियांनी आपल्या कानांनी सुरगायक ( गंधर्व ) त्याची स्तुति करताहेत असें ऐकून. ४ त्या त्याच्या स्त्रिया शरण गेल्या पण तो मूर्छित फणी शरण गेला नाही. ५ मी वासुदेवाला शरण गेलों असून हा कोण दुसरा महापुरुष मला पीडा देतो, असें सर्प हरीस न ओळखून ह्मणतो. ६ त्याच्या स्त्रिया. ७ अप्रत्यक्ष; मनांतून. ८ रज्जु असून सर्पासारखा दिसल्यामुळें तो भिऊन कांपत होता. अर्थात ज्यास मनांतून तो शरण गेला तोच हा श्रीकृष्ण असून त्यास काळ दिसला. ९ त्राऊक असतां. १० भीति. ११ शहाण्या. १२ वाणी; फारसा पाल्हाळ न करतां. १३ मित्र. १४ साहकारी. १५ नर्तन. १६ त्रिभुवनाची स्वामिनी लक्ष्मी.

## अध्याय ४.

भुजंगासि देखोनि तैशा प्रकारें, भुजंगस्त्रिया कोण कोण्या प्रकारें ।
कशा प्रार्थिती सर्वही श्रीशुकानें. असें वर्णिलें आइका जी स्वकानें ॥१॥
धरूनि पोटीं स्थिरजंगमातें, मर्दी तसें कृष्ण भुजंगमातें ।
छत्रें फणांचीं अति कष्ट भारी, तीं पावतो ज्यांवरि कैटभारी ॥ २ ॥
नाचे नाचत असोनि नटाचा, हाणतो सरसिजाननं टांचा ।
हानि यास्तव भुजंगबलाचा, दृष्टि त्यावरि पडे अबलांची ॥ ३ ॥
पतिभयें अति विव्हल झालिया, शरण कृष्णपदाप्रति आलिया ।
स्मृति नुरे कबरांबरभूषणीं, मन समर्पियलें व्रजभूषणीं ॥ ४ ॥
स्तन मुखीं धरुनी पति लेंकुरें, हरिस दाविति त्या युवती करें ।
हृदयिं भाविति कीं व्रजपालकें, न वधिजे फणि देखुनि बालकें ॥ ५ ॥
पसरती युवती वसनांचला, करतळीं अबला अति चंचला ।
हरिस काकुलती करिती जैला, किति अशा कितिएक कृतांजली ॥ ६ ॥
श्रीहरीस करिती नमनातें, तत्पदीं करुनि लीन मनातें ।
अर्पिती पतिफणा सुमनातें, प्रार्थिती भुजगसंयमनातें ॥७॥
हरिपदीं पतिमोक्षणतीव्रता, मनिं जयां अतिधन्य पतिव्रता ।
भुजंग दुष्ट असे जरि कां पती, स्वगुरुदैव तदर्थचि कांपती ॥ ८ ॥
अभय मागत रक्षिल त्या जना, धरुनि निश्चय हा भवभंजना ।

---

१ तें शुकानें केलेलें वर्णन आपल्या कानांनी ऐका. २ स्थावरजंगमात्मक जग. ३ कैटभ दैत्याचा शत्रु, कृष्ण. ४ नटाचें नृत्य करीत असून. ५ सरसिज म्ह० कमल, आनन म्ह० मुख, कमलाप्रमाण मुख आहे ज्याचें असा कृष्ण. ६ नाश. ७ स्त्रिया. ८ पतीसाठीं भय. ९कबर म्ह० केशबंधन, वेणी; अंबर म्ह० वस्त्र, भूषण म्ह० अलंकार; यांच्या ठिकाणीं हा द्वंद्व समास आहे. कृष्णपदास शरण आल्यावर सर्पस्त्रियांस आपलें वस्त्र कोठें, वेणी कोठची व भूषणं कोणतीं इत्यादिकांविषयीं विस्मरण पडलें. १० व्रजाचें भूषण जो कृष्ण त्याचे ठिकाणीं. ११ तरुण स्त्रिया; सर्पस्त्रिया. १२ हातानें. १३ बालकांस पाहून तरी कृष्णानें कालियास मारूं नये म्हणून त्यांच्याकडे बोट करून दाखवितात. १४पदर. १५दाण्यांत. १६ हात जोडून. १७ श्रीहरिपदीं. १८ नम्र. १९ कालियाच्या फणा हीच पुष्पें. २० कालियास शिक्षा करणारा कृष्ण त्यास. २१ पति मुक्त होण्याविषयीं ज्यांच्या मनांत त्वरा त्या पतिव्रता धन्य. २२ सर्प दुष्ट खरा, परंतु तो पति असल्यामुळें त्यांस तो गुरु व देवता यांच्या जागीं आहे म्हणून त्या स्त्रिया कांपूं लागल्या. २३ भयापासून जे जन रक्षण मागतील त्यांस तो रक्षील हा निश्चय आणून. २४ संसारनाशकास.

शरण येउनियां कमलालया, स्तविति त्या करुणावरुणालया ॥ ९ ॥
हरिची स्तुती नागपत्न्या करीती, श्लोकप्रकारांत ही लोकरीती ।
बहु गोड ते श्लोक हे एकवीस, स्फुरे अर्थ गंभीर जेथें कवीस ॥ १० ॥
दंडयोग्य फणि हा खळ साच, श्लोक ये रिति निवेदि तसाच ।
श्लोक त्यावरि दहा नमनाचे, श्रोतयां सुखनिधान मनाचे ॥ ११ ॥
श्लोक पांच करुणा उपजाया, त्या निवेदिति भुजंगमजाया ।
न्याय्य दंड ह्मणुनीच वदोनी, श्लोक हे प्रथम त्यांतचि दोनी ॥ १२ ॥

नव्हे हा अन्याय त्रिभुवनगुरूचा तिहिं जगीं
गमे न्याय्य स्वामी करिसि जितुका दंड भुजगीं ।
अशाला दंडाया धरिसि अवतार त्रिजगतीं
कृपेनें ताराया तव चरण जाला निज गती ॥ १३ ॥

दंडही करुनि दुष्ट खळासी, वर्तणें सम तुझें सकळांसी ।
गर्व नासुनिहि तें पद देशीं. देसि जें गुरुपणें उपदेशीं ॥ १४ ॥
ठाउकेंचि पुरुषां वनितांतें, कीं सुतांसहि दटावुनि तीतें ।
दंडही करुनि ते शिकवीजे, नीति सांगति जनांसि कवी जे ॥ १५ ॥
दंडही करुनि दैत्यरिपूतें, आयुधें परम त्यावरि पूतें ।
हाणतांच भवबंध हरीतो, तू अशेषजनबंधु हरी तो ॥ १६ ॥
दासांसि दास्येंचि खळांसि दंडें, तूं मुक्ति देतोसि, अशीं उदंडें ।
कर्में तुझीं त्यांत अलौकिक रीती, देशी फळें कर्म जसें करीती ॥ १७ ॥

एवं अनुग्रह खळां जरि निग्रहांत
येना तरी विषमता तव विग्रहांत ।

---

१ लक्ष्मीचें वसतिस्थान. २ करुणेचा सागर त्यास. ३ भागवतांतील ज्या श्लोकांवर वामनपंडितांनी ही टीका केली ते श्लोक. ४ 'न्याय्यो हि दण्डः कृतकिल्बिषेऽस्मिन' इत्यादि भागवतांतील श्लोक. ५ सांग, संचय. ६ स्त्रिया. ७ योग्य दंड. ८ सर्पास जितका दंड करतोस तितका सर्व न्याय्यच आहे अन्याय नाहीं, हें आह्मांस समजतें. ९ स्त्रियांला. १० पुत्रास. ११ बापानें. १२ जी नीति जनांस कवि शिकवितात तीच नीति बाप मुलांस शिकवितो. १३ देवांचे शत्रु दैत्य त्यांस. १४ पवित्र. १५ संसारबंधनाचा नाश करितो. १६ संपूर्ण लोकांचा बंधु जो तूं हरि. १७ दासांस त्यांचें दास्य करून व दुष्टांस दंड करून तूं मुक्ति देतोस. १८ अशीं उदंड म्ह० पुष्कळ तुझीं कर्मे त्यांत. १९ विलक्षण रीतीनें २० कृपा. २१ दंडांत. २२ अधिकउणेपणा. २३ देहांत; शरीरांत.

कर्मानुरूप फल दंड करूनि देशी
दुष्टांसही गति भल्यास हितोपदेशीं ॥ १८ ॥

सहजपूर्णकृपानिधि जो हरी, खलमद प्रभु दंडमिसें हरी ।
म्हणुनि बोलति कीं त्वदनुग्रह, स्वपतिदुर्मदनाशकनिग्रह ॥ १९ ॥

दुष्टासही दंड अनेकरीती, श्रीसूर्यपुत्रादिक जे करीती ।
हस्तें तुझ्या दंड अनन्य ज्याला, मेला तरी धन्यचि धन्य झाला ॥२०॥

स्वामि जो सविधिशंभुजगाचा, तोचि दंडकर या भुजगाचा ।
वासना दुरित दंड करीती, त्यास नाश तव दंडक रीती ॥ २१ ॥

प्रत्यक्षही दिसतसे खल सर्पकाय
हा दोषमात्र हरिसी म्हणवेल काय ।
जें पाप संचित पुढें क्रियमाण दोहीं
पासूनि आजि सुटला न शकों वदोंही ॥ २२ ॥

एवं तुझा क्रोधहि वंजे नाहीं, कोपें कृपा हे खल दुर्जनाहीं ।
दुष्टांस ही दंड तुझ्याच हातीं, त्या निर्भेहीं संत कृपा पहाती ॥ २३ ॥

जो अन्यघातास सदा भुकेला, स्वयेंच तैशासहि दंड केला ।
कोण्या तपाचें फल देवदेवा, नेणों असें बोलति वासुदेवा ॥ २४ ॥

अजि किती तपला न कळे तपें, विविध सोसुनियां हिमें आतपें ।
गुरुकुळीं अथवा प्रथमाश्रमें, बहुत जन्म वनस्थ महाश्रमें ॥ २५ ॥

त्यजुनि मान धनादिक मीपणा, स्वपर टाकुनि केवळ आपणा ।
बहुत देउनि मानधनें जना, परम तत्पर या तव पूजना ॥ २६ ॥

---

१ दुष्टांस दंड करून गति देतोस व भल्यास म्ह० साधूस हिताचा उपदेश करून गति देतोस. २ पूर्णकृपेच्या नैसर्गिक ठेवा. ३ प्रभु दंडाचें निमित्त करून खळाचा गर्व हरण करतो. ४ तुझा अनुग्रह हा आमचा पति कालिया याच्या गर्वाचा नाश करणारा निग्रह आहे. ५ सूर्यपुत्र यम. ६ ब्रह्मदेवासहित शंकर आणि सर्व जगत् यांचा स्वामी. ७ शिक्षा करणारा. ८ पातक. ९ दुष्ट सर्पाचा देह. १० पूर्वी संचित केलेलें व पुढें केलें जाणारें या दोन्ही पातकांपासून सुटला. ११ बोलूं शकत नाहीं. १२ फुकट, व्यर्थ. १३ शिक्षेमध्यें. १४ दुसऱ्याच्या नाशास. १५ दुसऱ्या-करून दंड न करतां तूं स्वतःच त्यास दंड केलास हें कोणत्या तपाचें फळ ? १६ आम्ही जाणत नाहीं. १७ शीत आणि उष्ण सोसून. १८ ऊन; उष्णता. १९ पहिला ब्रह्मचर्याश्रम. २० वनांत राहून; वानप्रस्थाश्रमांत. २१ हें माझें व ० तुझें हा भाव टाकून.

किंवा तुलें लक्षुनि सर्वभूतीं, केली दया कीं हरिच्या विभूतीं ।
धर्में अशा श्रीहरि तुष्टलाहे, तरीच हा लाभ यथेष्ट लाहे ॥ २७ ॥
जो तूं स्वयें जीवन सर्वभूतीं, तो दाविसी यासि कृपाविभूती ।
हा लाभ जी भूतदयेविनाही, लाधेल कोणी घडणार नाहीं ॥ २८ ॥
जीव तूं हरि जगीं सकळांचा, दंड आपणचि होसि खळांचा ।
सर्वभूतकरुणेविण हाता, हें न ये फल कदापि पहातां ॥ २९ ॥
स्वयें करूनी बहुतांसि दंड, निःपाप केले त्रिजगीं उदंड ।
त्यांहूनि याचें बहुभाग्य देवा, ह्मणूनिया प्रार्थिति वासुदेवा ॥ ३० ॥
देवां न हा लाभ न दानवांला, ब्रह्मादिकां वा मुनि मानवांला ।
कोण्या तपाचा महिमा कळेना, भाग्यास या हेतुचि आकळेना ॥ ३१ ॥
तपति देव मुनींद्र समस्त कीं, चरणरेणु पडो निज मस्तकीं ।
रज अलभ्य तुझें स्थिरजंगमा, तदपि लभ्य शिरींच भुजंगमा ॥ ३२ ॥
शिरिं जया तव रेणु असा पडे, सुकृत तें न मनांतहि सांपडे ।
पदरजासि अशा अतिदुर्लभा, भुजग पात्र कसा व्रजवल्लभा ॥ ३३ ॥
कमलजा तुझि जे निजनायका, तिसहि लाभ न हा व्रजनायका ।
बहु तपें करितां जगमाउली, विनटली तव या मृदु पाउलीं ॥ ३४ ॥
बहुत काळ अकाम करी तपें, विविध सोसुनियां हिमें आतपें ।
तुझि निजात्मकें भक्तिच साधली, चरणरेणु रमा मग लाधली ॥ ३५ ॥
अजित तूं मथिसी वरुणालया, वरि तुतेंचि रमा करुणालया ।
हरिदिनादि महाव्रततीव्रता, करुनि पावलि जी तुज सुव्रता ॥ ३६ ॥

---

१ सर्वप्राणिमात्रांच्या ठिकाणीं तूं भरला आहेस असें मनांत आणून. २ लाधला; प्राप्त झाला. ३ भूतदया ह्म० सर्व प्राणिमात्रांवर सारखी दया केल्यावांचून ह्या तुझ्या कृपाविभूतीचा लाभ कोणासही होणार नाहीं. ४ सकल जनाचा तूं जीव किंवा जीवन. ५ सर्व प्राणिमात्रांवर दया केल्यावांचून. ६ पुष्कळ लोक. ७ दैत्यांस. ८ मनुष्य. ९ सांपडेना. १० तुझे चरणरज मस्तकीं पडावेत ह्मणून समस्त देव व मुनि तपश्चर्या करितात. ११ स्थावरजंगम पदार्थांस तुझे चरणरज अलभ्य आहेत. १२ तथापि. १३ ज्याच्या शिरीं. १४ पुण्य. १५ हे व्रजनायका. १६ लक्ष्मी. १७ पट्टराणी. १८ जगाची माता लक्ष्मी. १९ लीन झाली. २० निष्काम बुद्धीनें. २१ शीतोष्ण. २२ अद्वैत. २३ लक्ष्मी. २४ पावली. २५ सागराचें तूं मंथन करिसी. २६ हे करुणेच्या गृहा. २७ एकादश्यादि तीव्र व्रतें करून. २८ उत्तम व्रतें करणारी लक्ष्मी.

चपल जे पळ जेविं युगें करीं[1], विरमेली[2] रमली धरितां करीं ।
तव रजीं वर जीं चल[3] लक्षणें, गवसते वसते इतरीं क्षणें ॥ ३७ ॥
व्रजपती[4] जप तीस तुझा सदा, न मनिं ते मनिं तेज दुजें कदा ।
तिस कळा सकळा तुज अर्पणें, चपल ते पळते अजि या गुणें ॥ ३८ ॥
तव रमा वर मागुनि ज्या रजीं[5], विनटली[6] नटली[7] बहु फार जी ।
अजितसा जित सापहि साधिला, विभव हें भवहेलन[8] लाधला ॥ ३९ ॥
सांपडे[9] चरणरेणु जयाला, यत्न ते इतर सिद्धि जयाला ।
सर्वथा न करितीच रमेशा, यावरी वदति हे परमेशा ॥ ४० ॥
चरणरेणु जिहीं शरणागतीं[10], वरियला त्यजिल्या सकळा गती ।
क्षिति[11] न इच्छिति सागर मेखळा[12], सुख रसातल[13] राज्यहि शृंखला[14] ॥ ४१ ॥
तव पदाब्जरजांसचि[15] मागती, इतर त्यांस तृणांच[16] समा गती ।
न सुरराज्य[17]सुखादिक वासना, न मनिं इच्छिति पद्मभवासना[18] ॥ ४२ ॥
चरणरेणुस या शरणागती, करिति ते अजरामरणा[19] गती ।
इतर सिद्धिहि योगकळांचिया[20], न मनिं इच्छिति ते सकळांचिया ॥ ४३ ॥
उपडणें भव कामजटा[21] किती, सकळ केवळ मुक्तिहि टाकिती ।
त्यजिति सर्वहि सार असार जीं, धरिति एकचि भाव असा रजीं ॥ ४४ ॥
असे तुझे जे पदरेणु देवा, ते लाधला हा खळ वासुदेवा ।
आश्चर्य हें मानुनि सर्परामा[22], निवेदिती विश्व मनोभिरामा[23] ॥ ४५ ॥
चरणरेणु असे पुरुषोत्तमा[24], दिसति लभ्य अशा खलसत्तमा[25] ।
विभव[26] लभ्य अशांस अशेषही[27], किति ह्मणूनि निरूपिल शेषही[28] ॥ ४६ ॥

---

१ दोन्ही हातांनीं. २ विश्रांति पावली. ३ चंचल. ४ हे व्रजनायका तुझाच ती सदा जप करी. ५ रमा तव वर मागून ज्या रजीं विनटली असा अन्वय. ६ लीन झाली. ७ शृंगार केला; शोभायमान झाली. ८ संसारनाश. ९ ह्या श्लोकाचा अन्वयः—हे रमेशा (तुझा) चरणरज ज्याला सांपडे ते इतर सिद्धि जयाला (म्ह० इतर सिद्धीस जाण्यास) यत्न सर्वथा न करतीच. १० ज्या शरण आलेल्या लोकांनीं तुझा चरणरज वरिला (सेविला) ते लोक समुद्रवलयांकित पृथ्वीचें किंवा पाताळाचेंही राज्य इच्छित नाहींत. ११ पृथ्वी. १२ समुद्र हाच जिचा कमरपट्टा आहे अशी पृथ्वी म्ह० संपूर्ण पृथ्वी. १३ पाताळ. १४ बेडी. १५ तुझ्या पादपद्मासंबंधी रजःकण. १६ त्यांस इतर गति तृणासमान. १७ देवांचें राज्य; स्वर्ग. १८ ब्रह्मदेवाचें पद. १९ जन्ममरणरहित अशा गतीतें इच्छित नाहींत. २० ध्यानादि योगादि साधनांच्या सिद्धि. २१ संसारसंबंधी इच्छेचीं मूळें. २२ सर्पस्त्रिया. २३ संपूर्ण विश्वाच्या मनाला सुंदर दिसणारा. २४ पुरुषांमध्यें उत्तम जो. २५ खळांमध्यें श्रेष्ठ. २६ ऐश्वर्य. २७ सगळें. २८ शेषसर्प.

सदा क्रूर दुर्बुद्धि या कालियाची
तमामाजि[1] उत्पत्ति ज्या कालिं याची।
कळेना तुझा भाव कीं कां खळाला
दिला लाभ हा थोर उत्संखळाला ॥ ४७ ॥

पादतोय[3] पति[4] शंभु जगाचा, मस्तकीं धरि, तुवां भुजगाचा।
मौलि[5] वृंदहि तया चरणानें, मर्दिला अमृत आचरणानें[6] ॥ ४८ ॥
इच्छितांचि तव पादरजाला, मानितोसि परमादर जाला।
दाखऊनि अमिता[7] विभवाला, नाशिसी अजि अनादि भवाला[8] ॥ ४९ ॥
माथां धरायास तशा[9] रजाला, आश्चर्य कीं पात्र भुजंग जाला।
कर्तव्य तुझें सहसा कळेना, ब्रह्मादि देवांसहि आकळेना ॥ ५० ॥
सर्पावरी विश्वनिधान[10] नाचे, हे शब्द त्यांच्या[11] वनितानंनांचे[12]।
कर्णी विलासें परिसे[13] हरी तो, प्रपन्नदुःखें[14] प्रभु जो हरीतो ॥५१॥
पदरजमहिमा[15] भुजंगरामीं[16], विनविति तुज रमामनोभिरामा।
पदरजमहिमाख्य हा[17] विलास, त्रिभुवननाथ रचूनि सेविलास ॥ ५२ ॥

---

## अध्याय ५.

कृपा हे तुझी दंडशब्दा न सहे[18], असे वर्णिले मूळिंचे श्लोक सा[19] हे।
भुजंगस्त्रिया भाग्य गाती पतीचें, दयालुत्व वर्णूनियां श्रीपतीचें ॥ १ ॥
पतीच्या शिरीं जो निजानंद[20] नाचे, दहा श्लोक त्या देवकीनंदनाचे।
मुखीं वर्णिती श्रीपदांभोरुहातें[21], करीती नमस्कार रंभोरु[22] हातें ॥ २ ॥
तुज वंदन अजी भगवंता, तूं पुरीं[23] स्थिरचरांत अनंता।

---

१ तमोगुणामध्यें. २ चपळ. ३ पायाचें तीर्थ. ४ जगाचा पति शंभु म्ह० शंकर. ५ मस्तक समुदाय; फणासमूह. ६ अमृतासारखें आचरण करणाऱ्या म्ह० जीवन देणाऱ्या चरणानें. ७ अपरमित ऐश्वर्य. ८ संसारास. ९ योग्य. १० सगळ्या विश्वाचा ठेवा जो कृष्ण तो. ११ कालिया सर्पाच्या. १२ स्त्रियांच्या मुखांचे. १३ ऐकतो. १४ शरण आलेल्या लोकांचीं दुःखें. १५ पायांच्या धुळीचा महिमा. १६ सर्पस्त्रिया. १७ हा चतुर्थ विलास रचून तूं सेविलास. १८ सहन होत नाहीं. १९ साहा. २० आत्माराम. २१ श्रीपद म्ह० लक्ष्मीचें स्थानरूप पदकमळास. २२ रंभा म्ह० केळ, ऊरु म्ह० मांडी,— कदलीप्रमाणें ज्यांच्या मांड्या अशा सर्पस्त्रिया. २३ स्थिर आणि चर पदार्थांत तूं परिपूर्ण भरलेला आहेस.

भूषणीं कनक ये रिति भूतीं, तूंच कीं सकळ भूत विभूतीं ॥ ३ ॥
परब्रह्म जें शुद्ध तें तूंचि देवा, समस्तांचिया आत्मया वासुदेवा ।
असंख्यात शक्तीस कोणी न मोजी, जयाच्या, तयातें नमोजी नमोजी ॥४॥
अनंतशक्ति प्रभु वासुदेवा, तूं ज्ञानविज्ञाननिधान देवा ।
तूं ब्रह्म तूं निर्गुण निर्विकार, तूं तत्त्वता न प्रकृतिप्रकार ॥ ५ ॥
महाकाळ तूं जो गिळी काळ सारे, दिसे तुजमध्यें दुजा काळसा रे ।
निमेषादि कालास जो पाहताहे, गिळूनी तया शेवटीं राहताहे ॥ ६ ॥
निमेषादि जो काळ हा शक्तिरूपी, उठे लीनही होय तूझ्या स्वरूपीं ।
तया साक्षि तूं पाहसी पद्मनाभ, स्वयें मुख्य तो काळ तूं काळनाभ ॥ ७ ॥
नमो काळरूपा नमो विश्वरूपा, नमो विश्वसाक्षे अनादिस्वरूपा ।
नमो विश्वकर्त्या जगत्कारणाला, स्वयें कारणातीत नारायणाला ॥ ८ ॥
तूं ईश ये रिति उपाधि जयासि विद्या
तूं जीवही धरुनिही असती अविद्या ।
जो स्वानुभूतिरहितत्रिगुणाभिमान
त्यातें नमो स्थिरचरांतहि जो समान ॥ ९ ॥
सिद्धांतरूपें नमनें करूनी, तदन्य जे वाद तयां हरूनी ।
सच्छास्त्रसिद्धांत पुनर्वदोनी, त्या वंदिती श्लोक असेच दोनी ॥१०॥
नमो अनंतास अतींद्रियास, कूटस्थ जो केवळ तूं तयास
सर्वज्ञता शेषहि तो न मोजी, ज्याची, तया तूज नमो नमोजी॥११॥
उपासना धन्य असे रितीचीं, तुझी करीती कमलापतीची ।
यथारुची जे भजताति देवा, त्यांतें तसा भाससि वासुदेवा ॥ १२ ॥

---

१ भूषणामध्यें ह्म० अलंकारामध्ये जसें कनक ह्म० सोनें भरलेलें आहे तसा तूं सर्व भूतांचे ठिकाणी भरलेला आहेस, अर्थात् अलंकार जसे सोन्याचे विकार तशी सर्व भूतें तुझेच विकार होत. २ हे समस्तांच्या आत्म्या वासुदेवा. ३ ज्याच्या असंख्य ह्म० अपरिमित शक्तीस कोणी मोजूं शकत नाही त्यास नमस्कार असो. ४ सांठा. ५ त्रिगुणरहित व विकाररहित. ६ मायाकृत विकारवान्. ७ तूंच काळ आहेस व इतर काळही तुझीच छाया आहे. ८ निमेष, घटका, वर्ष इत्यादि काळाच्याही अगोदरचा व मागून राहणारा असा अर्थ. ९ कमल आहे नाभीचे ठिकाणीं ज्याच्या. १० नमस्कार. ११ ज्याच्या स्वरूपास आरंभ कोठें झाला व शेवट कोठें झाला हें कळत नाही असा. १२ जो जगास उत्पन्न करण्यास कारण झाला, परंतु ज्याच्या उत्पत्तीस कोणीच कारण नाही असा स्वयंभू. १३ ज्ञानोपाधीचा व अज्ञानोपाधीचा स्वामी. १४ आत्मानुभवानें गेला आहे सत्त्वादि गुणत्रयात्मक अभिमान ज्याचा. १५ लक्ष्मीपति.

जसे वर्णिती अंधे बैसोनि हस्ती, भरूनी तदंगांसही स्वस्वहस्तीं ।
तुतें वर्णिती अज्ञ ऐशा प्रकारें, तयां वाटसी तूं तसा त्या विकारें ॥१३॥
जया सांपडे हस्तिचा पाय हस्तीं, वदे तो स्वयें स्तंभरूपेंचि हस्ती ।
जया सांपडे कान तो शूर्प दावी, असी आत्मता सर्वशास्त्रीं वदावी ॥१४॥
धरी दांत खुंटा गमे त्यास हस्ती, पडाडे असा जो धरी पुच्छ हस्तीं ।
मनीं टोणग्याचेपरी ही पहाती, जया लागलें स्थूल लांगूल हातीं ॥१५॥
पादादिरूपांतहि तोचि हस्ती, स्तंभादिरूपें कळलाचि हस्ती ।
असाचि तूं भाससि वादियांला, तर्कादिशास्त्रांत अनादि यांला ॥ १६ ॥
त्या हस्तिचें रूप तथापि सारें, तें नेणती जे कुमती असारें ।
तसें न जाणोनि जगांत नाना, कुर्युक्तिवादें करिती तनाना ॥ १७ ॥
ज्याच्या मतीं तत्त्व जसें जयाला, कानीं पडे तेंचि खरें तयाला ।
तो वाच्य सिद्धांत तया मताचा, निर्वाह त्या त्याच असे मताचा ॥१८॥
वाच्यांशता वाचक जे प्रबंध, जे वाचितां होति विशेष बंध ।
वाच्यांश त्या आणिक वाचकांहीं, तुझ्याच शक्तीस्तव शक्ति कांहीं ॥१९॥
वदे शब्द शाखाखुणें चंद्र दावी, गुरूनें तुझी गोष्ट ऐसी वदावी ।
वदा आश शब्दें स्फुरे श्रोतयांला, तसें तत्त्व तें तत्त्ववादें तयांला ॥२०॥
मापें जसें मोजिति धान्य पाणी, शब्दें तसा दाविति चक्रपाणी ।
सर्वांसही शब्दचि जो वदे हा, तूं मूळ त्याही ध्वनिरूप देहा ॥ २१ ॥
न दुंदुभी दुंदुभिच्यात्र नादीं, शब्दांमध्यें तूं न असा अनादी ।

---

१ अंधळे. २ त्याच्या आंगास आपले हात लावून; अंधळ्यास हत्ती दिसत नाहीं, तरी हस्तस्पर्शानें ते त्याचें स्वरूप वर्णन करितात, तसे अज्ञजन तुझें रूप वर्णितात व त्या त्याप्रमाणें तूं त्यांस भासतोस. ३ हातांत. ४ ज्या अंधळयाला हत्तीचा पाय सांपडला तो ह्मणतो हत्ती खांबासारिखा आहे, ज्याला कान सांपडला तो ह्मणतो तो सुपासारखा आहे. याप्रमाणें सर्व शास्त्रकारांनीं, ज्यास जसें जसें त्याचें स्वरूप भासलें तसें तसें त्याचें वर्णन केलें आहे. ५ निरनिराळया शास्त्रांच्या आधारानें त्याच्या स्वरूपाविषयीं वाद करणारे. ६कोणत्याही शास्त्रवेत्त्याला त्याचें पूर्ण स्वरूप कळलें नाहीं तरी आह्मांस त्याचें स्वरूप कळलें आहे असें कोणत्या तरी युक्तीनें ते आपलें मत सिद्ध करितात. ७ डहाळीच्या खुणेनें चन्द्र दाखविणें. ८ नौबत. ९ जसा दुंदुभीच्या नादांत दुंदुभि राहत नाहीं, परंतु नादास दुंदुभि कारण आहे; तसा तूं शब्दांत राहत नाहींस ह्म० शब्दांनीं तुझें वर्णन करवत नाहीं परंतु शब्दास तूं मूलकारण आहेस.

शब्दास तूं मूळ परंतु शब्दीं, न शुंडितां दीससि कोटि अब्दीं ॥ २२ ॥
शब्दींच तूं सांपडतासि जेव्हां, कां दाविते वेद गुरूसि तेव्हां ।
वर्णूनि ही निर्गुणबोधरीती, तें आश्रय श्रीगुरुचा धरीती ॥ २३ ॥
गुरुमुखेंचि गुरूसहि तें कळे, श्रुतिमुखेंचि न पावति ये कळे ।
म्हणुनि तूंचि अनादि गुरू कवी, प्रथम जो विधिला निज शीकवी ॥२४॥
बहुत युक्तिबळें उठती मतें, घडाति तींच असंमत संमतें ।
म्हणुनि वेद निघे तव आननां, सुपथ दावित जो भवकाननीं ॥ २५ ॥
त्रिकांडें तो वेदहि तूंचि देवा, सकाम निष्कामहि वासुदेवा ।
विज्ञानकांडीं निगमस्वरूपा, नमो नमो जी तुज देवरूपा ॥ २६ ॥
घेतां असा वंदनरूप लाहो, त्रिकांड वेदात्मक वर्णिला हो ।
उपासनाकांड तयांत नौरी, वर्णूनियां वंदिती पूतनारी ॥ २७ ॥
उपासनाकांडनिवृत्तकर्मे, समर्पणें भागवतैकधर्में ।
अर्पूनि कर्में तव चारि रूपें, ते भाविती संत सुखस्वरूपें ॥२८ ॥
तूं चित्त बुद्धि मन आणि अहंकृतींत, स्वात्मा स्वयें स्फुरसि निश्चय हा मतींत ।
हा व्यूह विष्णुमयमूर्तिचतुष्टयाचा, झाला असे यदुकुळीं अवतार याचा ॥२९॥

श्रीकृष्ण तूंचि वसुदेवकुमार देवा,
चित्तासि जो स्फुरसि केवळ वासुदेवा ।
जें शुद्ध सत्त्व वसुदेव तयासि सज्ञी
हें गुह्य ठाउक असे सकळां अभिज्ञां ॥ ३० ॥

१ वर्षांनीं. २ जर शब्दांना तुझें स्वरूप समजतें तर वेदावरून तुझ्या स्वरूपाचें ज्ञान झालें असते मग गुरु कशास पाहिजे ? नुसत्या शब्दांनी तुझी ओळख होत नाहीं म्हणूनच गुरु करावा म्हणून सांगितलें आहे ३ वेद. ४ गुरूलाही दुसऱ्या गुरूच्या मुखानेंच तुझें स्वरूप कळलें. ५ कळेला; योग्यतेला. ६ ब्रह्मदेवास. ७ आत्मज्ञान. ८ सिद्धान्त. ९ मुखीं. १० संसाररूप अरण्याचे ठायीं. ११ कर्म, उपासना आणि ज्ञान अशीं तीन कांडें. १२ नमस्काराचा लाभ. १३ सर्पस्त्रिया. १४ पूतनाशत्रु; कृष्ण. १५ भागवतांत सांगितलेला धर्म म्ह० परमेश्वराची निष्काम आराधना करणें हा धर्म सकाम कर्मकांडापेक्षां किंवा उपासनाकांडापेक्षांही उत्तम होय. १६ चित्तचतुष्टयाच्या ठिकाणीं म्हणजे चित्त, बुद्धि, मन आणि अहंकार यांचे ठिकाणी विद्यमान असणारी. १७ अहंकारांत. १८ समुदाय. १९ चित्तचतुष्टयाचा. येथें वामनपंडित वसुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध यांस यथाक्रमें चित्तचतुष्टयाचे अवतार असें मानितात पुढें श्लोक ३५ व ३६ पहा. २० जें शुद्ध सत्त्व तेंच वसुदेव होय. २१ नांव. २२ जाणणारांस.

सत्वचित्तेंहि अचेतन देवा, त्यासि जीवन तसा वसुदेवा ।
अन्य तूजविण न प्रिय मानी, मीपणें जरि तनूअभिमानी ॥ ३१ ॥
शून्य विश्व तुजवांचुनि देवा, वाटतें प्रिय असा वसुदेवा ।
प्रीतिहेतु वसुदेव कुमारा, शामसुंदरतनू सकुमारा ॥ ३२ ॥
चित्ताख्य सत्त्व वसुदेव कुमार देवा, चित्तेंचि तूं स्फुरसि जास्तव वासुदेवा ।
चित्तेंकरूनिच तुझी परमानुभूती, चित्तींच आत्मपण तूज समस्तभूतीं ॥३३॥
चित्तेंचि तूं स्फुरसि केवळ सर्व देहीं, विश्वीं तसा प्रकटसी वसुदेवगेहीं ।
इत्यादि तत्त्व वसुदेवकुमार देवा, होऊनियां प्रकट दाविसि वासुदेवा ॥३४॥
चित्तें जगीं स्फुरसि तूं सकळांस जैसा, चित्तप्रकाश वसुदेवकुमार तैस
संकर्षणाख्य तव मूर्ति अहंपणांत, तो राम भाविति उपासक आपणांत ॥३५॥
प्रद्युम्न बुद्धिगत तो सुत रुक्मिणीचा, होणार पुत्र तव देवशिखामणीचा ।
नातू तुझाचि अनिरुद्ध मनोभिमानी, ऐसें उपासक जन प्रभु तूज मानी ॥३६॥
जयांसि हीं ठाउक चारि रूपें, ते पाहती स्वात्मसुखस्वरूपें ।
जे नेणती त्यांसहि हाचि देव, चित्तादिकीं केवळ वासुदेव ॥ ३७ ॥
याकारणें सर्वहि जीवराशी, तूंचि स्वयें हें कमळांवरासी ।
निवेदुनी ईश म्हणुनि नारी, त्या मागुतीं वंदिलि पूतनारी ॥ ३८ ॥
प्रकाशिसी तूं गुणें वासुदेवा, गुणींच आच्छादुनि घेसि देवा ।
गुणाचिया वृत्तिकरूनि लक्षा, येसी नमोजी तुज त्या अलक्षा ॥३९॥
प्रकाशुनी पाहसि तूं गुणाला, निजप्रकाशें निज आपणाला ।
लीला जयाच्या न विकाररूपा, तया नमोजी तुज चित्स्वरूपा ॥४०॥

---

१ सत्वचित्त हें अचेतन आहे; कारण गुणत्रयावांचून एकट्या सत्त्वगुणानें सृष्टि उत्पन्न होत नाहीं, तेव्हां त्यास जसा तूं जीवन देणारा तसा तूं सत्त्वरूपी वसुदेव त्यासही जीवन आहेस. २ जरी वसुदेवाचे तनूंत मीपणाचा अभिमान आहे तरीही तो तुजवांचून दुसरी कोणतीही गोष्ट प्रिय मानीत नाहीं. ३ तूं वसुदेवास असा प्रिय आहेस की तुजवांचून त्यास सर्व विश्व शून्य वाटतें. ४ अनुभव. ५ वसुदेवाच्या घरीं. ६ अहंकाराची अधिष्ठात्री तुझी मूर्ति त्यासच बळराम म्हणतात. ७ बुद्धीची अधिष्ठात्री मूर्ति तो प्रद्युम्न होणार. ८ देवश्रेष्ठाचा. ९ जे चित्तचतुष्टयाची तुझी मूर्ति ओळखीत नाहींत त्यांस हे प्रत्यक्ष दृश्यमान अवताररूपी तेच देव. १० लक्ष्मीपतीला. ११ तूं सत्त्वादि त्रिगुणांचा प्रकाशक म्ह० प्रदीप आहेस व त्या गुणांनींच आपल्याला झांकून घेणारा आहेस. १२ तूं अदृश्य असतां गुणांच्या वृत्तीवरूनच लक्ष्यांत येणारा आहेस. १३ अदृश्या. १४ विकाररहित ज्याच्या लीला किंवा विहार.

तूं सिद्धिदाता सकळां विकारा, नमो नमो त्या तुज निर्विकारा[1] ।
जो वर्तवीता[2] सकलेंद्रियांतें, तो तूं हृषीकेशें[3] नमूं तयातें ॥ ४१ ॥
तूं इंद्रियें वर्तवुनी विरक्त, कोठें न होसी विषयानुरक्त ।
की तूं मुनी आदिगुरू मुनीला, नित्य स्वयें मुक्त सरोजनीला[4] ॥४२॥
तूं साक्षि गा सर्व मनोगतींचा[5], अध्यक्ष तूं सर्व[6] जगत्पतींचा ।
न विश्व होऊनि विराटरूप[7], कीं सर्पही रज्जुच[8] चित्स्वरूप ॥ ४३ ॥
ज्ञानस्वरूपा जडसर्पहारा[9], द्रष्टृत्वें[10]रूपें करिसी विहारा ।
तूं कारण स्थावरजंगमाचें, निमित्त रज्जूच[11] भुजंगमाचें ॥ ४४ ॥
वंदूनियां ये रिति पीतवासा[12], प्रसन्न देखोनि जगन्निवासा[13] ।
त्या प्रार्थिती श्रीकमलापतीतें, कीं सोडवीं आमुच्चिया पतीतें[14] ॥ ४५ ॥
प्रकरणीं पुढिल्या जगदीश्वरा, विनवितील असें कमलावरा[15] ।
करिति वदन एथ विलासिनी[16], भुजगिनी यमुनाव्हदें[17]वासिनी ॥ ४६ ॥
म्हणुनि भुवनवंद्य[18] हा विलास, त्रिभुवननाथ[19] रचूनि सेविलास ।
स्मरण सतत दे पदांबुजाचें, धरि मुकुटावरि शंभु अंबु[20] ज्याचें ॥ ४७ ॥
हरिचरितविलास पांचवा हा, परिसुनि कृष्णपदांबुजींच वाहा[21] ।
अजि विभैव[22] पहा पदांबुजांचें, धरि मुकुटावरि अंबु शंभु ज्यांचें ॥४८॥

---

## अध्याय ६.

अंगीकरूनि वदल्या खळदंड आधीं, हा कटला पति असा न धरूनि आधी[23] ।
कीं या मिसेंकरुनि होउनि तुष्ट देव, प्राणप्रदान पतिचें करु वासुदेव ॥ १ ॥

---

१ तूं निर्विकार असून सर्व विकारांचा सिद्धिदाता आहेस. २ ज्या इन्द्रियाचें जें काम तें त्याकरवीं करविणारा. ३ इन्द्रियांचा स्वामी. ४ सरोज म्ह० कमल त्याप्रमाणें आहे नीलवर्ण ज्याचा. ५ परापरगतिज्ञ. ६ जगाच्या स्वामीचाही स्वामी. ७ तूं विराटस्वरूप म्ह० विश्वस्वरूप असूनही विश्व नाहींस. ८ रज्जूवर सर्पाचा भास होऊनही मूळचा रज्जु तोच खरा तसा तुझ्या चित्स्वरूपावर विश्वाचा भास होऊनही तें चित्स्वरूपच खरें. ९ संसाररूपी सर्पास दूर करणारा. १० साक्षिरूपानें. ११ सर्पाचे भासास जशी दोरी कारण तसा तूं सर्व स्थावरजंगमाच्या अस्तित्वास कारण. १२ पीतांबरधरास. १३ सर्व जगामध्यें ज्याचा वास आहे असा. १४ कालियास. १५ लक्ष्मीपतीस. १६ स्त्रिया. १७ यमुनेच्या डोहांत राहणाऱ्या. १८ भुवनांतील सर्व जनांस वंद्य असा. १९ हे त्रिभुवनाच्या नाथा. २० तीर्थ. २१ अर्पण करा. २२ वैभव; माहात्म्य. २३ मनोव्यथा.

तों तो प्रसन्न हरि देखियला भला हो, नेदी तथापि पतिमोक्षण लाभ लाहो।
यानंतरें ह्मणति कीं स्थिर[2]जंगमातें, तूं बुद्धिदायक तसाच भुजंगमातें ॥ २ ॥

याकारणें यास करीं कृपाच, ह्मणोनि हे श्लोक असेचि पांच।
प्रार्थूनि ऐसें कमलापतीला, त्या नागिणी सोडविती पतीला ॥ ३ ॥

तूं सूत्रधारीच जनाश[3]यांचा, करूनि सृष्टि स्थिति नाश यांचा।
ज्या ज्यांस संस्कार जसे रितीचे, उद्बोध तैसे करिसी मतीचे ॥ ४ ॥

तूंचि स्वयें प्रेरक वासुदेवा, अन्याय याचा तरि काय देवा।
क्षमा करावी जगदेकबंधो, अनंतकारुण्यगुणैकसिंधो ॥ ५ ॥

तूं विश्वरूप तुजवीण दुजें न कांहीं
तुझ्याच राजसहि तामस सात्विकाही।
मूर्ती परंतु तुज सांप्रत सात्विका या
झाल्या प्रिया अजि न तामस मूढ काया ॥६॥

शुभ्र सात्विकचि या स्थितिकाळीं, आवडे न तनु तामस काळी।
हें खरेंचि परि बाप जगाचा, मायबाप तरि तूं भुजगाचा ॥ ७ ॥

यानंतरें प्रार्थिति या प्रकारें, कीं हे क्षमा यावरि निर्विकारें।
आजी करावी खळजीवनाशा, कीं थोर आह्मां पति जीवनाशा ॥ ८ ॥

अन्याय केला जरि बालकानें, क्षमा करावी जगपालकानें।
तूं मायबाप स्थिरजंगमाचा, हा सोसिं अन्याय भुजंगमाचा ॥ ९ ॥

जो श्रीतनूस[13] डसतां अपराध झाला
तो दंश बाधक नव्हे गरुडध्वजाला[14]।

---

१ पति जो कालिया यास सोडुन देणें. २ स्थिर आणि जंगम पदार्थांस जशी तूं कर्माविषयीं बुद्धि देणारा आहेस तसा सर्पासही कर्माविषयीं बुद्धि देणारा आहेस. ३ लोकांच्या हृद्गताचा चालक. ४ उत्पत्ति स्थिति आणि लय. ५ उत्तम बोध; सदुपदेश. ६ कर्में करविता. ७ जगाचा एकच निग्रहानुग्रहकर्ता. ८ कारुण्यगुणांचा ह्म० करुणेचा एकच सागर. ९ विश्वांतील एकंदर त्रिगुणात्मक मूर्ति ह्या तुझ्याच आहेत, परंतु सध्यां त्वां सात्विक मूर्ति धारण केल्यामुळें सात्विक मूर्ति तुला प्रिय झाल्या व तामस मूर्ति अप्रिय झाल्या. १० सात्विकाची शुभ्र मूर्ति तुला याकाळीं प्रिय झाली तामसाची काळी मूर्ति अर्थात् कालियाची कृष्णमूर्ति तुला अप्रिय झाली, तथापि तूं त्या कालिया सर्पाचा मायबाप आहेस ह्मणुन त्याचें रक्षण करणें तुला योग्य आहे. ११ हे खल ह्म० दुष्ट यांच्या जिवाच्या नाशकर्त्या. १२ पतिजीवनाविषयीं आशा. १३ कृष्णाचे शरीरास. १४ विष्णु-

याच्या विषें भय जगीं गरुडास नाहीं
तें दुःख देइल कसें गरुडासना हीं ॥ १० ॥

किमपि दुःख तुतें गमतें तरी, उपजता तुज कोपहि अंतरीं ।
तदपि नेणत हा सुरसत्तमा, तुज अजी डसला पुरुषोत्तमा ॥ ११ ॥
मूढ मूर्ति हरि या भुजगाची, शांति माउलिच तूं त्रिजगाची ।
हा चुके न अपराध कराया, तूं क्षमेस न चुकें सुरराया ॥ १२ ॥
ताडिलेंच भृगुनें तुज लातें, श्लाघ्य होय हृदयीं तुजला तें ।
गाति या अमृत आचरणातें, भक्त जे शरण या चरणातें ॥ १३ ॥
हे आयके शब्द तदंगनांचे, रंगीं फणाच्या विविधांग नाचे ।
तों चालिला प्राण भुजंगमाचा, न भार सोसे स्थिर[12]जंगमाचा ॥ १४ ॥
तें पाहतां काकुळती करिती, त्रैलोक्यनाथासहि लोकरीती ।
वस्त्रां[13]चलातें पसरूनि दान, त्या मागती देखुनियां निदान ॥ १५ ॥
कृष्णजी अजुनि कां न पहा हा, प्राण कीं त्यजि भुजंग अहाहा ।
दीसते तनु शवासम याची, आस ते इतुकि या समयाची ॥ १६ ॥
प्राणभीक पतिची करुणातें, मागतों शरण ज्या चरणातें ।
प्रार्थितों तुज कृपानिपुणासी, दे रमापति अहेवपणासी ॥ १७ ॥
परम तत्पर ज्या पतिजीवनीं, विनविती यमुना[19]ह्रदजीवनीं ।
पतिस सोडि असा वर मागती, वरिति आपणही पर[20]मा गती ॥ १८ ॥
विनवितों हरि आणिक किं[21]करी, तुजचि कीं उपदेशहि हा करीं ।
कवण धर्म तुझा करितां बरें, स्ववदनें वदिजे कन[22]कांबरें ॥ १९ ॥
धर्म भागवत सांग हरी तो, जो समस्त अशुभांस हरीतो ।
भक्तिनाशक अशेष भयांतें, दे तितें[23]चि न फलां उभयांतें ॥ २० ॥

---

१ जर या कालियाच्या विषाचें भय गरुडास नाहीं तर गरुडावर बसणारा त्यास कोठून असणार. २ गरुड आहे आसन ज्याचें असा विष्णु किंवा कृष्ण. ३ मनांत. ४ सुरश्रेष्ठा. ५ मायेनें मूढ झालेली. ६ भृगुऋषीनें. ७ लत्ताप्रहारसहनरूपी अमृताचरण. ८ या तुझ्या चरणास. ९ त्या सर्पस्त्रियांचे. १० मंडळावर. ११ पुष्कळ आहेत अंगें ज्याला तो. १२ स्थिरजंगमात्मक जगत् ज्याच्या पोटांत असल्यामुळें जो अति जड झाला आहे. १३ पदर पसरून पतिप्राणदान मागतात. १४ अंत. १५ प्रेतासारखी. १६ आशा. १७ कारुणिक जो तूं त्यास. १८ अवैधव्य; सौभाग्य. १९ यमुनेच्या डोहांतील उदकामध्यें २० पतीस सोडून आम्हांसही उत्तम गति दे असा वर मागतात. २१ सेवकाचे विज्ञापना. २२ पीतरंगी वस्त्र परिधान करणाऱ्या अशा कृष्णानें. २३ भक्तीलाभ.

काकूळती ये रिति बायकांनीं, केली तितें श्रीगुरुराय कानीं ।
घेऊनि आत्मा स्थिरजंगमाचा, पुरे करी दंड भुजंगमाचा ॥ २१ ॥
ऐसी शुकाचार्य परिक्षितीतें, सांगे कथा धन्य करी क्षितीतें ।
या ऊपरी कालियमोक्षणांची, लीला वदे श्रीकमलेक्षणाची ॥ २२ ॥
आतां ह्मणे श्रीशुक कीं नृपाळा, ऐशा प्रकारें स्तवितां कृपाळा ।
आली कृपा त्याच जनार्दनातें, पुरे करी कालियमर्दनातें ॥ २३ ॥
पायेंकरूनि भुजगाधिप लोटिला हो, हा शेवटीं पदरजें शतकोटि लाहो ।
गुंडाळल्या पदयुगीवरि वर्त्तमाना, झिंझाडुनी ढकलिल्या भुजगेंद्रमाना २४
तों कालिया होउनि सावधान, देखे रमाकांत दयानिधानें ।
भजावया श्रीगरुडध्वजाला, तत्काळ तोही नररूप झाला ॥ २५ ॥
धरुनियां नररूप कृतांजेली, चरण वंदुनि ते हरिचे जळीं ।
हळु हळू प्रभुसी अतिसंकटें, वदतसे शिशु जे रिति धाकुटें ॥ २६ ॥
आह्मी ह्मणे उपजतां खळ दुष्ट भारी, कीं क्रोध दीर्घ अतिदारुण कैटभारी
उत्पत्ति केवळ तमोगुण तामसाची, हे तों नव्हे अनृत गोष्टि असीच सांची २७
प्राण्यास संस्कार कधीं सुटेना, स्वभावबेडी सहसा तुटेना ।
श्रीमूर्ति तूह्मी हरि सारसाक्षी, हें जाणती सारअसारसाक्षी ॥ २८ ॥
गुणत्रयें विश्व तुवांचि केलें, नाना स्वभावीं विषयीं भुकेलें ।
प्रकार नानाविध ज्यांत देवा, तूं निर्मिसी सर्वहि वासुदेवा ॥ २९ ॥
त्यामाजि आह्मी तरि सर्पजाती, कीं दुष्ट संस्कार कधीं न जाती ।
माया तुह्मी हे कशि हो त्यजावी, हे दुस्तरा कोविं तरोनि जावी॥ ३० ॥
बोलोनि आतां बहु कोण कामें, दोहींसही कारण पूर्णकामें ।
सर्वज्ञ तूं बांधिसि सोडवीसी, अनादि हे गोष्टि नव्हे नवीसी॥ ३१ ॥

---

१ कानी घेऊन ह्म० एकून. २ पृथ्वीस धन्य करणारी ३ नंतर. ४ सोडण्यांचां. ५ कमलाप्रमाणे डोळे आहेत, ज्यांचे त्या कृष्णाची. ६ परीक्षितीस. ७ पायावर ठेवलेल्या. ८ असलेल्या; ठेवलेल्या. ९ सावध. १० दयेचा ठेवा. ११ मनुष्यरूप. १२ हात जोडून. १३ लहान बालक. १४ खोटी. १५ खरी. १६ पूर्वजन्मीं घडलेल्या कर्माचा संस्कार. १७ कमलनेत्राची. १८ सत्त्व रजस् आणि तमस् या तीन गुणांनीं. १९ ज्यास भिन्न गुणांमुळें भिन्न स्वभाव व भिन्न स्वभावामुळें भिन्न विषयांची गोडी असें त्रिगुणात्मक विश्व. २० ज्यांचे दुष्ट संस्कार कधीं जाणारे नव्हत. २१ तरावयास अशक्य अशी हे तुह्मी माया. २२ कार्य. २३ तारण्यास किंवा मारण्यास. २४ कामना पूर्ण करणारा. २५ तूं संसारांत बांधणारा व सोडविणारा आहेस ही गोष्ट नवी नव्हे तर अनादि काळची आहे.

स्वयेंच देऊनि अशा प्रवृत्ती, स्वयेंच दावी खळदंडवृत्ती ।
हें कां ह्मणावें तरि आकळेना, सर्वज्ञ तूं त्याविण हें कळेना ॥ ३२ ॥
वैषम्य त्याला तरि बोलवेना, वाग्देवता ये रितिनें लवेना ।
उगेंचि त्याच्या चरणीं भजावें, तूं राक्षिं ऐसें शरणार्थ जावें ॥ ३३ ॥
यालागि आतां करणेंचि दंड, करीं तरी आणिकही उदंड ।
कृपा करावी जरि हेंचि वाटे, सर्वज्ञ तूं लावि तशाच वाटे ॥ ३४ ॥
हरिपुढें पसरी फणि विग्रहा, ह्मणतसे अजि टाकुनि आग्रहा ।
जरि दया तरि दावि अनुग्रहा, करि पुन्हा अथवा अतिनिग्रहा ॥ ३५ ॥
शुक ह्मणे शरणा गति हो खरी, भुजग जे वदला निजवैखरी ।
परिसतां हरि त्याप्रति बोलतो, धरणिनायक आयक बोल तो ॥ ३६ ॥
क्षमा दुरन्याय करूनी देव, जें बोलिला त्याप्रति वासुदेव ।
तें तों विलासीं पुढिल्या पहावें, परापराधांस असें सहावें ॥ ३७ ॥
सर्वापराधी खळ दुष्ट भारी, दावी तरी शांतिचें कैटभारी ।
ऐसी क्षमा तोचि मुकुंदभक्त, कीं त्यास कोणी न दिसे विभक्त ॥३८॥
जिव्हा स्वदातें रगडी कदापी, दुःखें तरी तो कवणासि दापी ।
हरीचिया भक्तजनाचि मौजी, सर्वात्मभावें असि हे क्षमा जी ॥ ३९ ॥
उरीं भृगूची हरि लात सोसी, ऐसी क्षमेचीच सदा अंसोसी ।
क्षमा धरूं वृत्ति असी मनाची, प्रार्थी हरीतें मति वामनाची ॥ ४० ॥
ऐसा क्षमानामक हा विलास, रचूनि म्यां तूं हरि सेविलास ।
क्षमा मला दे अजि वासुदेवा, सर्वात्म भक्तीच करूनि देवा ॥ ४१ ॥

---

## अध्याय ७.

आत्मा सम स्थावरजंगमात्रा, क्षमा दुरन्यायं भुजंगमात्रा ।

---

१ कर्म करण्याची इच्छा. २ दुष्टास दण्ड करण्याचे मार्ग. ३ आलोक्यांत किंवा ध्यानांत येत नाहीं. ४ वाणी. ५ दंड करावयाचा असेल तर तो पुष्कळच कर. थोडा करूं नको, कृपा करणें असेल तर तसा मार्ग दाखव. ६ देहाला. ७ कृपा. ८ मोठी शिक्षा. ९ वाणी. १० हे धरणीनायका ह्म॰ पृथ्वीपालका परीक्षिति राजा. ११ मोठा अपराध. १२ दुसऱ्याचे अपराधास. १३ सहन करावें. १४ क्षमा. १५ निराळा. १६ भय दाखविणें १७ मध्यें. १८ उत्कट इच्छा. १९ आमच्या मनाची वृत्ति अशी क्षमा धरो असें वामन पंडिताचें मन हरीची प्रार्थना करतें. २० सर्पाचा अन्याय.

करी हरी घेउनि शब्द कानीं, निवेदिले जे आजि बायकांनीं ॥ १ ॥
तयावरी प्रार्थियला अहीनें, प्रपन्नरीती मदगर्वहीनें ।
आतां तया उत्तर देव देतो, नृपाप्रति श्रीशुकही वदे तो ॥ २ ॥
शुक ह्मणे मृदु शब्द वदे असे, हरिपुढें फणि तो पडला असे ।
परिसतां प्रभु वैखरि बोलतो, नृपति सादर आइक बोल तो ॥ ३ ॥

नको येथें राहों गमन करिं डोहा त्यजुनियां
स्वबंधूशीं सिंधुप्रति निजगृहा जाइं जुनियां ।
विलंबातें टाकीं व्रजजन तटीं तळमळी
तटा जाणें जाण त्वरित मजला पादकमळीं ॥ ४ ॥

केली क्षमा यद्यपि त्यास दंड, धन्यत्वही त्यास दिलें उदंड ।
लावी असा दापुनि त्यास वाटे, दुष्टास त्या त्रासचि फार वाटे ॥५ ॥
बोलेल जें दापुनि अप्रमेय, हें वर्णिजे तें पुढिल प्रमेय ।
अध्याय जो या दशमीं तिसावा, ह्या श्लोक तेथील जसा विसावा ॥६॥
वाणी न येथें वदली शुकाची, वाचा पुढें वर्णिल गोपिकांची ।
कीं बोल हे गातिल गोपिकाही, ह्मणोनि येथें न वदेचि कांहीं ॥ ७ ॥
शब्द हे वदति गोपबायका, कां ह्मणाल तरि तेंचि आयका ।
यां मिसें हरिचरित्रही निघे, वैखरी सफलता करूनि घे ॥८॥
श्रीरासरंगीं हरि रंगला हो, त्याहूनि आधीं रतिरंग लाहो ।
गोपींस दे कृष्ण अनेकरीती, तों गोपिका गर्व मनें करीती ॥ ९ ॥
हुडकितां अवघीच वसुंधरा, व्रजवधू चतुरा अति सुंदरा ।

---

१ जे शब्द बायकांनी ( नागपत्न्यांनी ) निवेदिले ते कानीं घेऊन ह्म० एकून. २ कालियानें. ३ शरण जाऊन. ४ प्रभु कृष्ण जी वाणी बोलतो ती. ५ स्वबंधूस-हवर्तमान दूर समुद्रांत निघुन जा. ६ गोकुळांतील सर्व लोक तटावर माझ्यासाठीं तळमळताहेत ह्मणून येथून समुद्रास जाण्यास विलंब करूं नकोस. ७ पायानें. ८ जरी दंड केला तरी क्षमाही केली. ९ ज्याचें प्रमाण किंवा इयत्ता करितां येत नाहीं असा कृष्ण. १० सिद्ध करण्याची गोष्ट. ११ दशमस्कंधीं. १२ विश्रांति. १३ कृष्ण कालियास काय बोलला हें पुढें कृष्णाची लीला करणाऱ्या गोपींच्या मुखांत येईल असा अर्थ. ह्याच विलासांतील श्लोक ३३ व ३४ पहा. १४ या निमित्तानें ह्म० कृष्णाचें सोंग घेणाऱ्या गोपीच्या मुखांतून कृष्णाचे बोल काढले वर गोपींनीं कृष्णाच्या क्रीडा स्वतः कशा केल्या ह्या कथेचें येथें वर्णन करावयास सांपडेल. १५ रममाण झाला. १६ लाभ. १७ पृथ्वी.

आतां प्रमेय पुढिल्या चरणद्वयाचें, गोपी वदे वचन तें अजे अद्वयाचें ॥३२
गमन तूं करिं दुष्ट भुजंगमा, परम बाधक जो स्थिरजंगमा ।
वळखसी न खळा खलमर्दना, पशुपनंदनरूपजनार्दना ॥ ३३ ॥
मी जगीं प्रगटलों खळदंडा, कारणें तुजसमाच उदंडा ।
दंडिल्या बहुत म्यां खळ जाती, देह सांडुनि अनर्गल जाती ॥ ३४ ॥
दटाविला ये रिति कृष्ण जीनें, ह्मणोनियां गोपवधूंत जीनें ।
प्रकार हे कालियमर्दनाचे, केले वदे शब्द जनार्दनाचे ॥ ३५ ॥
यानंतरें प्रस्तुत बोलताहे, ते आयका शब्दसुधालताहे ।
विषें तुझ्या हें जल तीव्र जातें, तें वाटतें संकट या व्रजातें ॥ ३६ ॥
ह्मणूनि बोलेल हरी खळाला, त्याचा असा गर्व जरी गळाला ।
तें तों विलासीं पुढिल्या पहावें, लीलाविलासांत असें रहावें ॥ ३७ ॥
विलास हा सप्तम माधवाचा, लीलाविलासाख्य रचूनि वाचा ।
अर्पी तया शामल सुंदरातें, श्रीइंदिरेच्यां प्रियमंदिरातें ॥ ३८ ॥
लीलाविलासेंच चरित्रमाला, खेळोनि गोपी पुरुषोत्तमाला ।
गाती तराया सकळांस नौव, लीलाविलासाख्य ह्मणूनि नांव ॥ ३९ ॥

---

## अध्याय ८.

सर्पास यानंतर, वासुदेव, निरोप देतो अजि देवदेव ।
ते आयका शब्दविलास कानें, जे वर्णिले श्रीहरिचे शुकानें ॥ १ ॥
दंडूनि केली मजला क्षमा जी, आतां असोंदे यमुनेचिमांजी ।
पार्थी ह्मणी हेंचि भुजंग मातें, ह्मणूनि बोलेच भुजंगमातें ॥ २ ॥
जळ पितो करितील निमज्जन, पशुप गोवळ गौळणि मज्जन ।

---

१ जन्मरहित. २ ज्यावांचून दुसरा कोणीच नाही; जो एकच आहे. ३ दुष्टांचा संहारकर्ता जो मी त्या मला. ४ पशुप ह्म० पशूंतें पाळणारा जो गवळी नंद त्याचा पुत्ररूप जो मी जनार्दन त्यास कसा ओळखीत नाहीस. ५ खलदंडाकारणें प्रगटलों असा अन्वय. ६ तुझ्या सारिख्या उदंड खळजाति म्यां दंडिल्या. ७ सर्पादि दुष्ट जाति. ८ अप्रतिबंध. ९ जिणें काळियमर्दनाचें नाटक केलें ती हे कृष्णाचे शब्द बोलली. १० अमृतवल्ली. ११ लीला विलास हें सप्तम विलासाचें नांव. १२ जो श्यामसुंदर लक्ष्मीचें मंदिर होय. १३ अनेक चरित्रें. १४ पुरुषांमध्यें जो उत्तम असा कृष्ण. १५ नौका. १६ क्रीडा. १७ यमुनेमध्येंच. १८ सत्वर. १९ मला. २० स्नान. २१ पशुपाळ गवळी व गौळणी असे मज्जन ह्म० माझे जन.

तवविषें अति दूषित जीवनें, क्षण न लागत नाशिल जीवन ॥ ३ ॥
म्हणुनि टाकुनियां यमुनाऱ्हदा, त्वरित जाई म्हणे खलदुर्हदा ।
वरहि देउनियां कमलावरें, दवडिलाच फणी जगदीश्वरें ॥ ४ ॥
ऱ्हदजळांतहि म्यां गरुडासनें, गुणकथा रचिल्या तव शासनें ।
स्मरति जे जन सांजसकाळिं या, न तुमचें भय पावति काळिया ॥५॥
विष तुझें न तया करि भस्म रे, सतत हें खलशासन जो स्मरे ।
तुज जई न तयांसहि पाहवें, व्रजसमीप कसें वद राहवें ॥ ६ ॥
जातां वरें येथुनि तूज साचें, दावी हरी भाव अजी असाच ।
हें दीड पद्यें हरि बोलिला हो, देऊनियां ही वरदान लाहो ॥ ७ ॥
देउनी किमपि अन्य वरातें, बोलतो हरि भुजंगवरातें ।
कीं करीं त्वरित रे गमनातें, ये स्थळीं धरिं उदास मनातें ॥ ८ ॥
परमतीर्थ अतःपर हें जना, करिति ते पितृतर्पण मज्जना ।
स्मरति हें ममशासन कौतुकें, जळति पापकुळें भवहेतुकें ॥ ९ ॥
यांत जों तव भुजंगमसेना, तीर्थरूपपण यास असेना ।
भाव कीं धरि मनीं गमनातें, ये स्थळीं करिं उदास मनातें ॥ १० ॥
: त्यांस न बरा उभयांचा, धाक ज्यास खगराजभयाचा ।
कीं ऱ्हदांतुनि भुजंग निघेना, तोंचि तो गरुडही सुड घेना ॥ ११ ॥
द्वीप जें रमणक स्वकुळाचें, स्थान थोर भुजगां सकळांचें ।
त्या स्थळीं खवळुनी गरुडाला, सर्प या ऱ्हदजळांत दडाला ॥ १२ ॥
हे कथा शुक पुढें नृपतीतें, सांगणार पुसतां नृप तीतें ।
या ऱ्हदींच खगराज निघेना, नीरि चंचुभरि येउनि घेना ॥ १३ ॥
दिशा दहाही स्वतपें भरीतो, वसे जळीं या ऋषि सौभरी तो ।

१ पाणी. २ प्राण. ३ लक्ष्मीपतीनें. ४ गरुडावर बसणारा. ५ शिक्षा करून. ६ हे काळिया. ७ खरोखरच तूं येथून गेलास तर तुझ्या बऱ्याची गोष्ट आहे. ८ भागवतांतील दीड श्लोक. ९ लाभ. १० भुजंगश्रेष्ठास. ११ स्नान. १२ जन्ममरणास कारणभूत अशीं पापकुळें. १३ सर्पसमुदाय. १४ तीर्थासारखी पवित्रता. १५ त्या सर्पास. १६ दोन गोष्टी म्ह० येथें राहावें तरी फायदा नाहीं. येथून बाहेर जावें तर गरुडाची भीति. १७ गरुड. १८ रमणक नांवाचे द्वीपांत सर्पांची वस्ती होती व तेथेंच कालिया पूर्वी राहत होता. १९ लपला. २० त्या कथेस. २१ जाईना. २२ पाणी. २३ ज्याच्या तपस्तेजानें दशदिशा उज्ज्वल झाल्या असा सौभरिनामक ऋषि.

खगेंद्र एके समयीं भुकेला, आहार या नीरेंचरींच केला ॥ १४ ॥
नको ह्मणे सौभरि सर्वथा रे, तो भक्षिल्यावांचुनिया न थारे ।
तों बोलिला सौभरि एक राया, त्या प्राणियांलागिं सुखी कराया ॥१५॥
खगेंद्र याऊपरि या तटाकीं, येऊनियां यावरि हात टाकी ।
मरेल तत्काळ पुन्हा न वांचे, हें बोलतों मी निजसत्य वाचे ॥ १६ ॥
गोष्टि हे समजली गरुडाला, तो भिऊनि अतिशीघ्र उडाला ।
सर्प त्यास खवळूनि दडाला, या जळीं स्थळ न अन्य जडाला ॥१७॥
त्रास हा हरितसे भुजगाचा, मायबाप हरि सर्व जगाचा ।
कीं खगेंद्र भय तूज असेना, जाइं घेउनि भुजंगमसेना ॥ १८ ॥
भुजंगातें देतो वर वरद जो सर्वहि जगा
ह्मणे ज्याच्या त्रासें निज[6]रमणकद्वीप भुजगा ।
स्वयें तूं टाकूनी ऱ्हद धरुनियां यांत असती
न तो[7] पक्षी भक्षी तुज सहजही जेथ वससी ॥ १९ ॥
भय तुझें हरिलेंच समस्त कीं, चरण ज्यां दिधले तव मस्तकीं ।
सकळ सर्पकुळां जरि दापितो, गरुड खाय[8] तुतें न कदापि तो ॥ २० ॥
भयनि[9]र्वारण हा वर लाधला, पदरजें परमार्थहि साधला ।
भुजंग आणिक नागिणि बायका, अजित पूजिति तें अजि आयका ॥२१॥
ह्मणे शुक प्राण जना मृतां[10]तें, मानूनि तैसें वचनामृतातें ।
त्या नागिणी[11] नाग निरं[12]जनातें, नमूनियां मांडिति पूजनातें ॥ २२ ॥
गंधा फुला अं[13]बर भूषणातें, अर्पूनियां त्या व्रज[14]भूषणातें ।
पुसोनियां श्रीक[15]रुणांबुधीतें, भुजंग गेला आजि अं[16]बुधीतें ॥ २३ ॥
जेव्हां प्रया[17]णांप्रति सिद्ध झाला, वंदूनियां श्रीगरुडध्वजाला ।
प्रदक्षिणा त्या खलशि[18]क्षगातें, करूनि गेला कमले[19]क्षणातें ॥ २४ ॥

---

१ ह्या डोहांतील उदकांत जे प्राणी राहत होते त्यांचा आहार केला. २ राहींना. ३ प्राण्याला; सर्प येथें येऊन राहिल्यामुळें अन्यप्राण्यास येथें अवकाश मिळेना असा अर्थ. ४ गरुडापासून तुला भय नाहीं. ५ सर्व जगास वर देणारा. ६ तुझी स्वभूमि ह्म॰ रमणक द्वीप. ७ गरुड. ८ खाणार नाहीं. ९ भय दूर करणार असा वर. १० मृतजनास प्राण द्यावा त्याप्रमाणें हें कृष्णाचें वचनामृत ऐकून. ११ नागिणी आणि नाग ह्म॰ कालिया नाग आणि त्याच्या स्त्रिया. १२ मायारहितास; निष्कलंक; निरुपाधिक. १३ वस्त्र. १४ गोकुळास भूषण अशा कृष्णास. १५ करुणेच्या सागर अशा कृष्णास. १६ समुद्रास. १७ जाण्यास. १८ दुष्टास शिक्षा लावणारा त्यास. १९ कमलाप्रमाणें नेत्र आहेत ज्याचे त्यास.

स्त्रिया लेंकरें सोयिरे साप सारे, बहूकाळ डोहांत ज्याचे पसारे ।
सर्वे चालिलें काळियाच्या समुद्रा, मुकुंदांघ्रिपद्में शिरीं ज्यास मुद्रा २५
भुजंगासवें नीच ही सर्प जाती, नदींतूनि पाण्यामधूनीच जाती ।
विषाचीं कुळें चालिलीं क्षिप्र संगें, भुजंगेंद्र सर्वांस लक्षि प्रसंगें ॥ २६ ॥
जाती जळीं भार भुजंगमाचे, संहारकर्ते स्थिरजंगमाचे ।
सर्पांविणें ज्यांत दुजें दिसेना, कीं त्याचिया स्त्रीतनयादि सेना ॥ २७ ॥
भुजंग स्वयें सर्वही एक जाती, भुजंगाधिपालागिं वेष्टूनि जाती ।
भुजंगप्रयातांत या श्लोकवृत्तीं, गणाची जसी एक जाती प्रवृत्ती ॥ २८ ॥
असी चालतां स्त्रीकुमारादि सेना, विषाचा नदीमाजि मारा दिसेना ।
त्यजी काम तो निस्पृही तेंवि झाली, महावासना आगि तेही विझाली २९
काढितांचि खलसाप रमेशें, ते नदी अमृत त्या परमेशें ।
ठेविली करुनि कौतुकवाणी, ते नृपाप्रति वदे शुक वाणी ॥ ३० ॥
सुटे स्पर्शतां प्राण ज्या जीवनातें, समीरें करी भस्म जें जीवनातें[12] ।
करी त्याच नीरें जगज्जीवनातें[13], स्मरा हो स्मरा त्या जगज्जीवनातें[14] ॥ ३१ ॥
दिसे सौम्यें[15] गेले महाव्याळ[16] जीचे, अहो स्पर्शतां पाय गोपाळजीचे ।
विषाचे विझाले जळीं क्षिप्र ताप, त्रिलोकेश पादांबुजांचे प्रताप ॥ ३२ ॥
होती विषें पूर्ण यमानुजा[19] ते, संतप्त जीचें जल भानुजा[20] ते ।
झाली नदी दिव्य सुधारसाची[21], कृपा हरीच्या पदसारसांची[22] ॥ ३३ ॥
उष्णरश्मि[23]तनया नियमाची, जे सहोदर[24] बहीण यमाची ।
दुष्टसंगहि युगें[25] भुजगाचा, उद्धरी तिसहि नाथ जगाचा ॥ ३४ ॥

१ प्रपंच. २ ज्याच्या शिरावर कृष्णाच्या पादकमलाची निशाणी आहे अशा कालियाबरोबर. ३ पुत्र. ४ समुदाय. ५ एका ज्ञातीचे. ६ भुजंग जावयास लागले हें वर्णन येथें आहे म्हणून तें भुजंगप्रयातवृत्तांत वर्णिलें असा भाव. या वृत्तांत सर्वगण एकजातीय आहेत म्ह० या वृत्तांत चारही 'य' गण आहेत, 'भुजंगप्रयातश्चतुर्भिर्यकारैः' इ०. ७ काम सोडल्यावर मनुष्य जसा वासनारहित निस्पृही होतो त्याप्रमाणें ती नदी विषमुक्त झाली. ८ महावासनारूप अग्नि. ९ रमापतीनें, कृष्णानें. १० ज्या पाण्यास स्पर्श केला असतां. ११ ज्या पाण्याच्या वाऱ्याच्या योगें. १२ प्राणांस. १३ जगाचें रक्षण. १४ कृष्णास. १५ शांत. १६ मोठाले सर्प. १७ ज्या यमुना नदीचे. १८ लोकत्रयाचा जो ईश म्ह० स्वामी त्याच्या पादकमलाचे. १९ यमाची बहीण यमुना नदी. २० सूर्यकन्या म्ह० यमुना. २१ अमृत. २२ पदकमलांची. २३ उष्णरश्मि म्ह० सूर्य त्याची तनया. २४ सख्खी बहीण. २५ पुष्कळ काळ.

होता भुजंगें ऱ्हद उष्ण जीचा, नखेंदु लागे तिस कृष्णजीचा ।
तो होय तत्काळ सुधेसमान, ऱ्हदें जया या वसुधेस मान ॥ ३५ ॥
हरिविलास सुधारस नाम हा, परम तारक सर्व जनां महा ।
विषजलास सुधारसकारका, नमन हें भवसागरतारका ॥ ३६ ॥
शोधिली रविसुता परमेशें, नाशिले सकळ ताप रमेशें ।
क्रोध काम दवडी स्वजनाचे, कालियावरि जसा हरि नाचे ॥ ३७ ॥
हरिकथारस नित्य नवा मना, प्रियपदार्थ अनित्य न वामना ।
तरिच शोधुनि जीव नदीस तो, मतिस या जगजीवन दीसतो ॥ ३८ ॥

## अध्याय ९.

करुनि शुद्ध अजी ऱ्हदिनीऱ्हदा, दवडितांचि खळा अतिदुर्ऱ्हदा ।
नदितटाप्रति ये व्रजनायक, व्रजजनां सकळां सुखदायक ॥ १ ॥
प्राण ज्या निघति मानवदेहीं, तो उठे खडबडूनि वदे ही ।
ये रिती उठति ते व्रजवासी, धांवती धरुनि तीव्र जयासी॥ २ ॥
कड्यावरुनियां उड्या प्रथम टाकुनी त्या गड्या
सखे पशुप भेटती तडतडां भुजीं आंगड्या ।
फुगोनि तनु फाटती मगगटीं कडीं दाटती
सुखें अमित वाटती विरहसिंधु ते आटती ॥ ३ ॥
जलजलोचनि त्या व्रजकामिनी, जलदशामल देखुनि भामिनी ।
नयनीं पाहति तृप्ति नव्हे मना, अधिक वाढविती स्मरकामना ॥ ४ ॥
फुगती देखुनि सुंदरि सुंदरा, गमतसे सुखरूप वसुंधरा ।
तटतटां कुचकंचुकि फाटती, विरहसिंधु अशेषहि आटती ॥५ ॥
देखतां अनुज तो अभिराम, क्षेम दे बहु बळें बळराम ।

१ डोह. २ नखचंद्र. ३ ज्या ऱ्हदाच्या योगानें पृथ्वीस मान आहे. ४ विषयुक्त जलास अमृताप्रमाणें करणारा. ५ शुद्ध केली. ६ सूर्यकन्या; यमुना ७ अशाश्वत वस्तु. ८ व्रजाचा स्वामी कृष्ण. ९ वेग १० पशुपाळ गवळी. ११ भेटतांना आनंदानें अंग फुगून आंगरखे फाटले असा भाव. १२ अमर्याद सुखें. १३ कृष्णाचा विरह हा जो आतां पर्यंत समुद्रासारखा वाटला तो एकदम दिसेनासा झाला. १४ कमलनेत्रा. १५ मेघासारखा श्यामवर्ण. १६ स्त्रिया. १७ मदनचेष्टा किंवा बाधा. १८ सुंदरी म्ह० त्या स्त्रिया त्या सुंदरास ( कृष्णास ) पाहून आनंदानें फुगल्या. १९ सर्व. २० धाकटा बंधु कृष्ण. २१ सुंदर.

हांसतां मुखसुधाकर पाहे, नित्य नूतन मुकुंदकृपा हे ॥ ६ ॥
हास्य देखुनि करी अनुजाला, भाव कीं मजचि शोक न झाला ।
कीं मला अमित विक्रम ठावा, शोक कां मग मनांत उठावा ॥ ७ ॥
नंद नंदनमुखा अवलोकी, धन्य आपणचि मानवलोकीं ।
भेटतां सकळ वीसरला हो, नंद घे श्रुति अगम्यहि लाहो ॥ ८ ॥
वर्णितां न अकळे निगमातें, मूर्ति वंदित असे मग मातें ।
पोटिसीं दृढ धरी घननीला, सोडवे न हरि तो जननीला ॥ ९ ॥
स्तनयुगीं फुटला सहसा रस, स्रवति जीवन लोचनसारस ।
विसरली अजि मीपणतूंपणा, सुत सुखी अवलोकुनि आपणा ॥ १० ॥
श्रीवत्सांका श्रीयशोदा स्वअंकीं, घेतां प्रेमा मोजवे तो न अंकीं ।
भ्याले गातां वृंदे वेदश्रुतीचे, त्याच्या देहीं वर्षती अश्रु तीचे ॥ ११ ॥
प्रेमयुक्त न असी जननीच, श्रीव्रजात न अजी जन नीच ।
भोंवता व्रजवधूजनपाळा, हा असा शुक ह्मणे जनपाळा ॥ १२ ॥
वत्स धेनुवृषभांसह सारे, पाहतां हरिस त्या सहसा रे ।
अर्पिती नयनिं दृष्टि निघेना, तृप्ति लेशें मन मानुनि घेना ॥ १३ ॥
आनंद झाला वृषवासुरांला, आनंद झाला गगनीं सुरांला ।
आनंद झाला धरणीस भारी, स्पर्शे पदाब्जें जिस कैटभारी ॥ १४ ॥
आनंद नाम स्मरतांचि वाचे, आनंद गातां गुण माधवाचे ।
आनंद हा नित्य नवा मनाचा, आनंद आत्मा प्रिय वामनाचा ॥ १५ ॥
आनंद तो दशशतानननहीं न मोजी, आनंद दे व्रजजनांस तया नमो जी ।
आनंदनामक विलास असा हरीचा, आनंद आवरण वारण केसरीचा ॥ १६ ॥
देहबुद्धि यमुनाऱ्हद यांत, क्षुब्ध कालियमना हृदयांत ।
कामपन्नग न कंटक थारे, हे स्मराल जरि कृष्णकथा रे ॥ १७ ॥

---

१ मुखचंद्र. २ तुझा अमित पराक्रम मला ठाऊक आहे ह्मणून मला शोक झाला नाहीं असा आपला भाव बळरामानें हास्य करून दर्शविला. ३ पुत्रमुखास. ४ श्रुतीलाही अगम्य असा लाभ. ५ वेदांस. ६ जननी यशोदा तिला. ७ एकाएकी. ८ दुग्ध. ९ ढाळिती. १० अश्रु. ११ नेत्रकमलें. १२ श्रीवत्सलांछन ज्याच्या हृदयावर आहे अशा कृष्णास. १३ मांडी. १४ आंकड्यांनीं ह्मणजे त्या प्रेमाचें गणित करवेना. १५ समुदाय. १६ व्रजांतील स्त्रियांचा घेरा. १७ राजाला. १८ बैल. १९ लेशभरही मन तृप्ति घेईना. २० पृथ्वीस. २१ पादकमलानें. २२ कृष्ण. २३ सहस्रवदन शेष. २४ नमस्कार. २५ हा माझा देह आहे अशी बुद्धि. २६ कामवासना हाच सर्प. २७ राहणार नाहीं.

रति धरा हरिचीं बहु तीव्र जी, हरि असे तुमच्याच मतिव्रजीं ।
हरि रुचे स्मरतां बरवा मना, करि दया कनकांबर वामना ॥ १८ ॥
कलियुगीं जरि कृष्णकथारती, तरि न हे भवकंटक भारती ।
जितचि मुक्तिपदीं तरि थारसी, जरि मना रमसील कथारसीं ॥ १९॥

इति श्रीहरिविलास संपूर्ण.

## नौकाचरित्र.

( कथेचा सारांश )

यमुनेमध्यें राधाप्रमुख गोपी कृष्णासह नौकाक्रीडा करीत असतां कृष्णानें गोपींचा भाव पाहण्याकरितां तुफान उत्पन्न करून नौका बुडवावयास लाविली, व त्यांचा आपले ठिकाणीं पूर्णभाव जाणून त्यांचें रक्षण केलें.

कोणे एक दिनीं हरी गवळणी घेऊनि वृंदावनीं
येवोनि रविनंदिनीतिरतटा नौका विलोकी जुनी ।
बोले त्या मृगलोचनांप्रति हरी अत्यंत संतोषुनी
जावें नीर तरूनिया परतिरा नौकेंत या बैसुनी ॥ १ ॥
राधा बोलतसे धवाप्रति कसी अत्यंत नम्रोत्तरें
आह्मांला न कळे जळांतिल गती हे नाव कैसी तरे ।
तूं तों बालक अंगनो सकळिका नावेंत बैसोनिया
कान्हो त्यांस ह्मणे तुह्मी न करणें चिंता असा निर्भया ॥ २ ॥
ऐकूनी हरिउत्तरा व्रजवधू नावेंत त्या बैसुनी
मध्यें माधव शोभला शशि जसा वेष्टीत तारागणीं ।
नौका चालविली जळीं पहुडली तों, काय केली असे,
कृष्णें ते समयीं विचित्र करणी, कौशल्य केलें असें ॥ ३ ॥
सूर्यातें लपवी सुदर्शन नभीं टाकोनिया सत्वरा
देखोनी तम लोचनीं मग मनीं चिंतातुरा सुंदरा ।

---

१ सुख; आनंद; गोडी. २ तुमची मति किंवा मन हेंच गोकुळ त्यांत. ३ सुवर्ण-वस्त्र परिधान करणारा. ४ रुचि. ५ संसाररूपी कांटे. ६ स्थिर होसील. ७ दिवशीं. ८ रविसुता यमुना हिच्या कांठीं. ९ स्त्रिया, गौळणी. १० पाणी. ११ पती. १२ तूं लहान व आह्मी बायका. १३ कृष्ण. १४ व्रजांतील स्त्रिया. १५ चन्द्र जसा तारांगणांनीं मध्यें शोभतो. १६ अंधकार.

आतां काय किजे उपाय रचिजे या माधवा रक्षिजे
केंवी नाव तरोनि जाइल तिरा आतां कसें वांचिजे ॥ ४ ॥
चिंता त्या करिती निशा प्रगटली झाला रवी अस्त हा
तों कृष्णें पवनाप्रती सुचविलें तूं सूट वेगें महा ।
इंद्रातें यदुवंशभूषण करी आज्ञा कसी आयका
चारी मेघहि एकदांचि वरुषे ऐसें करीं कौतुका ॥ ५ ॥
आज्ञा हे हरिची धरी निजशिरीं वायू शचीचो पती
झंझाटा मग सूटला गडगडां मेघोदरीं गर्जती ।
वीजांचे कडके भडाड भडके एकेसरें दाटती
मोठी वृष्टि पडे तयीं जलमयी संपूर्ण झाली क्षिती[4] ॥ ६ ॥
ऐसा हा प्रळयो शशांकवदना[5] देखोनि आकांतल्या
ब्रह्माचा समयो निदान गमला कल्पांतसा भासला ।
वाऱ्यानें लहरी[6] उडे गगनिं ते नौका उलंडे जळीं
कान्हा हा भयभीत होईल म्हणी त्या झांकिती अंचळीं[7] ॥ ७ ॥
पाहे कौतुक पन्नगारिप्रभु तो सत्त्वासि त्यांच्या कसा
मृत्यूलागिं भिती किती मजप्रती रक्षीति या राजसा ।
तेव्हां काय करी हरी लवकरी नौकेस छिद्रें करी
त्यामाजी जल येतसे मग पहा घाबीरल्या सुंदरी ॥ ८ ॥
मोठें सकट मांडलें यदुपती कैसें परी रक्षिजे
नाना छिद्र पडूनि वारि भरलें यालागिं कैसें किजे[9] ।
तों बोले व्रजपाळ गोकुळपती आहे तया यत्न कीं
छिद्रें हीं बुझगें तुह्मीं सकळिकीं फेडूनिया कंचुकी ॥ ९ ॥
कंसारीवचनाप्रती परिसुनी हें गोपिका मानल्या
रामा[11] त्या नवयौवना[12] निजकरें चोळ्या तिहीं फेडिल्या ।
नावे छिद्र बिळीं विलोलनयना[13] त्या घालिती कंचुकी
तेणें तों जल नावरे लहरि[14] त्या नावेंत येतात कीं ॥ १० ॥
बाळा[15] त्या सकळा मिळोनि वदती हा वारि तों नावरे

१ रात्र. २ इन्द्र. ३ महावात. ४ पृथ्वी. ५ चंद्रानना गौळणी. ६ लाटा. ७ पदरांनीं. ८ पन्नगारि म० सर्पांचा शत्रु जो गरुड त्याचा स्वामी कृष्ण. ९ करावें. १० चोळ्या. ११ स्त्रिया. १२ तरुण. १३ चंचल आहेत नेत्र ज्यांचे अशा. १४ लाटा. १५ स्त्रिया.

धांवें विश्वपते कृपा करिं हरा नेई तिरा नाव रे ।
या कृष्णाप्रति रक्ष रक्ष गिरिजाकांता त्वरें धांव रे
सर्वांचा करुणानिधी तुजप्रती कैसी नये कींवें रे ॥ ११ ॥
ऐसी जों करुणा करीत अबला तों काय बोले हरी
चीरें फेडुनि सर्वही तुह्मि बुझा छिद्रें बहू सत्वरीं ।
लज्जा त्या त्यजुनी विलासगमनीं वस्त्रें करें फेडिलीं
कृष्णालागुनि वांचवूं ह्मणुनियां छिद्रांत त्या घातलीं ॥ १२ ॥
छिद्रेंही बुझलीं परंतु जळ हें नौकेमधें चाललें
गोपींचा कटिमध्यभाग उघडा व्यापोनिया राहिलें ।
कृष्णाचे हृदयीं जळा गवसिलें तेव्हां कसें वर्तलें
गोपींहीं हरिलागुनी निजकरीं स्कंधांवरी घेतलें ॥ १३ ॥
मोठा लोटहि नावरे दिसतसे संपूर्ण नौका जळें
नारींच्या निजकंठ वारि चढलें कृष्णाशिरीं ठेविलें ।
आतां ठाव नसे हरीस उरला कोणेस्थळीं ठेविजे
वेगें त्या यदुनंदना सकलही गोपांगना रक्षिजे ॥ १४ ॥
ऐशीया करुणोत्तरा यदुविरें ऐकोनियां सादरें
गोपींचा निजभाव जाणुनि मनीं संतोष दामोदरें ।
तेव्हां काय करी हरी लवकरी चक्रासि पैं काढिलें
तेव्हां तो पडला प्रकाश रविचा वेगें तमा छेदिलें ॥ १५ ॥
गेलें अभ्र विरोनियां पवनही जाला अती मंद हा
नौकेचें जळ शोषिलें परतिरा गेले त्वरेशीं पहा ।
ऐशा देखुनि कौतुकासि वनिता आश्चर्य मानीतसे
लीला हे अवघी विचित्र करणी कौशल्य केलें असे ॥ १६ ॥
राधा माधव गोपिका सकलही आल्या अशा भुवना
आज्ञा घेउनियां हरि प्रियवधू गेल्या स्वयें भुवना ।
मातीं ऐकति हें प्रितीकरुनियां मोक्षास ते पावती
मागे वामन ठाव देई मजला पायीं तुझ्या श्रीपती ॥ १७ ॥

इति श्रीनौकाचरित्र संपूर्ण.

---

१ पार्वतीपाति, शंकर. २ करुणा. ३ स्त्रिया. ४ वस्त्रें. ५ मंदगामी स्त्रिया. ६ खांद्यावर. ७ सुदर्शनचक्र. ८ अंधकार. ९ वारा. १० जमिनीवर. ११ भुवनास; घरास.

# कात्यायनी व्रत

अथवा

## गोपीवस्त्रहरण.

( कथेचा सारांश. )

श्रीकृष्ण आपणांस पति प्राप्त व्हावा ह्मणुन गोपकुमारींनीं कात्यायनी देवीची पूजा आरंभिली. हेमंत ऋतूंत त्या कुमारी नित्य अरुणोदयीं उठून कालिंदींत स्नान करून देवीची वाळूची मूर्ति करून पूजा करीत असत. ह्मणून या आख्यानास 'कात्यायनी व्रत' असें ह्मणतात. एके दिवशी पहांटेच गोपी तीरावर वस्त्रें ठेवून कालिंदींत स्नान करित असतां कृष्ण अकस्मात् येऊन त्यांचीं सर्व वस्त्रें गोळा करून कदंबवृक्षावर जाऊन बसला. ह्मणून या आख्यानास 'गोपीवस्त्रहरण' असेंही ह्मणतात. नंतर सर्व गोपींस बाहेर आणवून त्यांजकडून नमस्कार करवून त्यांस त्यांचीं वस्त्रें दिलीं; आणि सांगितलें कीं, तुमचें व्रत सफळ झालें व तुमची इच्छा पुढें शरदृतु येईल तेव्हां रासक्रीडेंत पूर्ण होईल.

जडपटव्यतिरेकेंमुखें हरी, तदपि अन्वय दाउनि दे हरी ।
कथिन तोचि कथारस आरसा, नमुनि त्या हरिच्या पदसारसा ॥ १ ॥
तनूं गोकुळीं गोपिका सत्त्ववृत्ती, हरीवीण अन्यत्र ज्यांला निवृत्ती ।
तयाशींच त्या तन्मयत्वें रमाया, व्रजीं पूजिली ब्रह्मविद्यादिमाया ॥ २ ॥
अशा दिव्य अध्यात्मरूपें हरी तो, करूनी कथा जो अविद्या हरितो ।
करी त्यामधें भक्तिची सूचनाही, विनाभक्ति विज्ञान कांहींच नाहीं ॥ ३ ॥
मतीचे पती जे अहंगोप होते, हरी देखतां होति निःसार ते ते ।
दिसे ज्यांस आत्मा स्वयें कंसहंता, तयां कां रुचे कांतरूपें अहंता ॥ ४ ॥
परब्रह्मविद्येसि जेव्हां भजावें, तयीं द्वैतसंस्काररूपा त्यजावें ।
विसंवों नये सर्वथा ब्रह्मविद्या, तरी बोध बिंबोनि नासे अविद्या ॥ ५ ॥

---

१ सोनें हें कारण व दागिना हें कार्य. सोन्याचा दागिन्यांत अन्वय आहे. दागिन्यास सोनें ह्मटलें तरी चालेल, पण दागिन्यांत सोन्याचा व्यतिरेक आहे, ह्मणजे दागिना सोन्यांत वास्तविक नाहीं. त्याप्रमाणें, जडपट ह्म० जग हेंच वस्त्र, ह्याचे ठिकाणीं तंतुरूप परमेश्वराचा व्यतिरेक (अभाव) आहे. ह्मणजे जग हें वस्तुतः परमेश्वर नाहीं. पण जगद्रूपी कार्यामध्यें परमेश्वराची सत्ता आहे हा अन्वय. २ पदकमलांस. ३ हा व याच्या पुढील श्लोक हे तीन हस्तलिखित पोथ्यांत आढळत नाहींत. काव्येतिहाससंग्रहांत मात्र आढळतात. ४ निःसत्त्व. ५ ज्ञानरूप आदि माया. ६ ज्ञानानें. ७ अज्ञान. ८ अहंकाररूपी. ९ ज्ञान. १० ज्ञान. ११ अज्ञान.

आत्मता गुरुमुखें समजावी, बोधरीतिहि अशी सम जावी ।
चित्त तन्मय करी अशि विद्या, सेवितांचि वितुळेचि अविद्या ॥ ६ ॥
असा देखुनी कृष्ण आत्मा वधूंनीं, रमायासि त्याशीं अविद्या वधूंनी ।
तयाची तिहीं सेविली स्वैर* माया, तदैक्यें तया श्रीहरिशीं रमाया ॥७॥
विद्या हरिप्राप्तिस हेतु वाटे, ते सेवितां ताप तयां न वाटे ।
न द्वैत जाळी मग काळजाला, हेमंत तो यास्तव काळ जाला ॥ ८ ॥

कृष्णानिमित्त भजतां हरिची सुविद्या
तो काल होउनि हरींचि हरी अविद्या ।
" मी मार्गशीर्ष " ह्मणुनी स्वमुखें वदे तो
जो या कथारसिं अशा रिति भाव देतो ॥ ९ ॥

गीतेमधें पुरुष तोचि सहस्रशीर्षा
मासास आत्मपण दे प्रभु मार्गशीर्षा ।
कीं हा फिटे विरहभेद तयाच मासीं
द्वैतत्व दे पद तया पुरुषोत्तमासी ॥ १० ॥

शुक्तीमधें रजत योग्य दिसे भजाया
मायेसि पूजिति हरींतचि गोपजाया ।
कीं मार्गशीर्ष हरिरूप तयाचि मासीं
पूजूनि तीस रमल्या पुरुषोत्तमासीं ॥ ११ ॥

एवं हरीची हरिमाजि माया, त्या पूजिती या हरिशीं रमाया ।
चित्तंतु तो वस्त्र जडभ्रमांतें, हरूनि दे त्याच सुमध्यमांतें ॥ १२ ॥
अध्यात्मरीतीच कथा वदावी, ह्मणोनि तो कृष्णचि भाव दावी ।
परंतु साधारण माधवाची, वाचा मुखें हो महिमा नवेची ॥ १३ ॥
यालागिं सर्वांस कथा कळाया, श्रीव्यास विख्यात करी कळा या ।
ह्मणोनि दावूनि विचार साचा, ओलेश्लुधाशब्द कृपा रसाचा ॥ १४ ॥

---

१ हा श्लोकही आमचे जवळील पोथ्यांत नाहीं. काव्येतिहाससंग्रहांत मात्र आहे. २ स्त्रियांनीं. ३. नाश करून. ४ कृष्ण. ५ हरण करी. ६ अज्ञान. ७ " मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः " असें भगवद्गीतेंत वाक्य आहे ( अध्याय १० श्लो ३५. ) ८ सहस्र आहेत शिरें ज्याला असा विराट् पुरुष. ९ शिंपल्याचे ठिकाणीं जसा रजताचा ह्मणजे रुप्याचा भास होऊन अज्ञानी पुरुष रुपें ह्मणून घ्यावयास जातो तद्वत गोपी हरीचे ठिकाणीं मायेचा भास आहे त्या मायेस भजावयास लागल्या. १० जड पदार्थरूपी जें वस्त्र त्यामध्यें तंतुरूपानें असणारा परमेश्वर. ११ ज्ञानमार्गानें. १२ नवीन. * यथेच्छ.

हेमंत शीतल ऋतू स्थिर[1]जंगमास
श्रीमार्गशीर्ष पहिला हरिरूप मास[2] ।
मासांत त्याच फळ दे प्रभुशक्ति माया
पूजूनि तीसचि तदैक्यपणें रमाया ॥ १५ ॥

ह्मणोनि गोपी हरिशीं रमाया, आराधिती सर्व मिळोनि माया ।
हेमंतकाळीं प्रथमींच मासीं, क्रीडावया श्रीपुरुषोत्तमासीं ॥ १६ ॥
त्यजुनि अन्न हविष्यां[3]चि भक्षिती, निजति गोम[4]यलिप्त शुभक्षिती ।
नियम आणिक सर्वहि रक्षिती, फळ[5]पणें हृदयीं हरि लक्षिती ॥ १७ ॥

उषःका[6]ळीं स्नानें करिति [7]यजिती श्री[8]भगवती
नदीतीरीं जेव्हां किरण अरु[9]णाचे उगवती ।
करूनी देवीची सु[10]तनु सिकतो[11]मूर्ति जपती
तिच्या मंत्रातें कीं व्रजप[12]सुत हा हो निजपती ॥ १८ ॥
तटीं कालिंदीच्या प्रतिदिवस मासव्र[13]तधरा
करीती श्रीपूजा स्मरति फळरूपें गिरिध[14]रा ।
पहातां ही माया फळ परम चिद्रूप गवसे
अलंकारीं नाना निजधनपणें हे[15]मेंचि वसे ॥ १९ ॥
फळाचे आशेनें स्मरत असतो तेंवि भलता
अनायासें कृष्णीं स्मृति परतली ते शुभ लं[16]ता ।
हरी ध्याती गाती स्मरति यु[17]वती त्यास सकळा
स्त्रियांचें यालागीं व्रत सफळ झालें अविक[18]ळा ॥ २० ॥

सफळ कर्म करी हरिची स्मृ[19]ती, हरि हरी ह्मणतां ह्मणते स्मृ[20]ती ।
परि तयास हि सत्य न[21]मो हरी, जरि ह्मणे हरिचें मन मो[22]हरी ॥ २१ ॥
स्मृति मनीं हरिनाम मुखीं परी, नमन सत्य घडे न तदूपरी ।
ह्मणुनि वृंदुनि घेउनि अं[23]बरें, हरुनि ही दिधलीं कनकां[24]बरें ॥ २२ ॥

---

१ सर्व स्थावरजंगम पदार्थांस. २ महिना. ३ हविष्यान्न; यज्ञास योग्य असें अन्न. ४ शेणानें सारविलेल्या जमिनीवर. ५ व्रताचें फळ ह्मणजे कृष्णप्राप्ति तिकडे लक्ष लावून. ६ मोठ्या सकाळीं. ७ पूजन करिती. ८ देवी कात्यायनी. ९ सूर्य सारथी याचे. १० सुंदर. ११ वाळूची मूर्ति. १२ व्रजांचा पालक जो नंद त्याचा मुलगा. १३ एक महिना व्रत करणाऱ्या. १४ गोवर्धन पर्वत धारण करणारा कृष्ण. १५ सोनें. १६ लतेप्रमाणें स्मृति पसरली. १७ तरुण स्त्रिया. १८ संपूर्ण. १९ स्मरण. २० मन्वादिक ऋषींनीं केलेलीं धर्मशास्त्रें. २१ नमस्कार. २२ मोहविणारें. २३ वस्त्रें. २४ कृष्णानें.

कर्मार्पणाचा क्रम सांग जाला, तैं लाधल्या त्या पशुपांगजाला ।
अध्यात्मरीती हरि पावला हो, ध्यावा असा यावरि भाव लोंहो ॥२३॥
अन्यदेवतनुही जरि पूजी, सर्वही सुर सुरारिरिपू जी ।
कीं समस्त नगही कनकाचे, देवदेह विधिच्या जनकाचे ॥ २४ ॥
परंतु जों जीं अवतारसत्वें, देती फळें स्वात्मसुधारसत्वें ।
ब्रह्मादिही या सुरराज साचा विलास जो राजसतामसाचा ॥ २५ ॥
परि[12] चरणनगातें मस्तकार्हत्व नाहीं
* श्रुतिशिरसुख कैचें श्रीमुकुंदाविना ही ।
जरि सकळ फळें तो देव गीतेंत वर्णी
पितळि पदिं न साजे जेंवि शोभा सुवर्णी ॥ २६ ॥
जो सर्वरूप हरि आपण पूज्य झाला, लागे समस्त फलदत्वहि त्या अजाला ।
शोभे जसें चरणभूषणही सुवर्णे, तें शोभतें कनक आपुलिया सुवर्णे ॥ २७ ॥
परि पदीं पदमात्रचि शोभवी, कनक ये रिति कामुक जे भवीं ।
इतर आप्त फळें इतराकृती, हरिस सेवुनि घेति न जे कृती ॥ २८ ॥
एवं हरी इतरदैवतकल्पकां ही, देतो फळें तदनुरूपचि अल्प कांहीं ।
कीं गोपिका फळहि मानुनि देवराया, भाग्योदयें भजति त्या प्रभुतें वराया २९
फळमिसेंचि असा करि जो पण, प्रभुचि तो फळ केवळ आपण ।
ह्मणवुनी स्वतनू फलरूपिणी, स्ववर दे मति ही स्वनिरूपणीं ॥ ३० ॥
कात्यायनीपूजन वायकांचें, तें अर्चन श्रीव्रजनायकाचें ।
तत्रापि त्यांचें फळ हाचि जाला, जपोनियां मागति त्या अजाला ॥३१॥
आला स्वयें वरद तो वर द्यावयाला, ज्यांचा असे विदित अंतरभाव याला ।
जों मज्जनें करिति त्या यमुनेंत नारी, तों ये कितीक गडि घेउनि पूतनारी ३२

१पूर्णपणें;ययासांग कर्म झाल्यावर.२पशुपाळ जो नंद त्याचा अंगज ह्म०मुलगा जो कृष्ण. ३ प्राप्त होवो. ४ दुसऱ्या देवाची तनु ह्म० मूर्ति जरी पूजिली तरी ती विष्णूचीच मूर्ति पूजिल्याप्रमाणें; कारण जसे दागिने तितके सोन्यापासून, त्याप्रमाणें अन्य देवांच्या मूर्तिही विष्णुपासूनच. ५ दैत्यारि विष्णु. ६ अलंकार. ७ सोनें. ८ ब्रह्मदेव. ९ बाप. १० हा श्लोक आमचे जवळील तीन्ही पोथ्यांत नाहीं. ११ अमृत. १२ ' ह्मणउनि पद गा ते मस्तका० ' असा एक पाठ आहे. १३ पायांतील भूषण डोक्यावर ठेवण्याच्या योग्यतेचें नाहीं. १४ पितळेच्या ठिकाणीं सोन्याची शोभा येत नाहीं; ' परि पद नग साजे जेंवि शोभा इ० ' असा एक पाठ आहे. १५ सोनें. १६ सोनें. १७ चांगल्या रंगानें. १८ हा आणि पुढील दोन श्लोक काव्येतिहाससंग्रहांत मात्र आढळतात. १९ संसारी. २० पूजन. २१ कृष्ण. २२ जन्मरहित जो कृष्ण त्यास. २३ वर देणारा. २४ मनांतील भाव. २५ स्नानें. २६ कृष्ण. * वेदांत ज्ञानसौख्य.

प्रतिदिनीं उदकांत दिगंबरा, निघति पोंहति ठेवुनि अंबरा ।
हरि अशा समयीं *चरमे दिनीं, करित ये पदपावन मेदिनी ॥ ३३ ॥
हरी आला ऐशी खुण विदित नाहीं निपट ते
अशा काळीं तीरीं प्रभु उचलि येऊनि पट ते ।
कदंबाच्या स्कंधीं कपटपट तंतूचि हरि तो
चढे तो मिथ्यत्वें प्रथम जड वस्त्रेंचि हरितो ॥ ३४ ॥
अनात्म वस्त्रें पहिलीं हरीतो, दावूनि चित्तंतुस दे हरी तो ।
ह्मणोनि शाखेवरि आपणांतें, दावूनि त्यांसी करि या पणातें ॥ ३५ ॥
देखोनि हांसति गडी प्रभुमाधवाचे, त्यांतें वदे हरि सहास्य अगाधवाचे ।
कीं अंबरें तरिच देइन गोपदारा, तीरीं जरी ह्मणति कीं 'आजि दे उदारा' ३६
जळीं खेळतां पोहतां बायकांनीं, असा शब्द हा आयकीला स्वकानीं ।
फिरोनी पहातां तिहीं स्त्री कदंबीं, हरी देखिला वक्रदृष्टी कदंबीं ॥३७॥
प्रपंचद्रुमाचीच शाखा अहंता, चिदात्मा दिसे ये रितीं कंसहंता ।
फिरोनी द्रुमीं लक्षितां दृष्टिवृत्ती, जडत्याग तो होय शाखानिवृत्ती॥३८॥
जडपट निरसी जो श्रीगुरू श्रीहरी तो, उघडाचे मग तंतू जो अविद्या हरीतो
हरितनु हरिवस्त्रें ज्ञानतंतू प्रभा ते, निरखित उफराटे दृष्टिनें सुप्रभातें ॥३९॥
स्वहृदयांत अखंडचि रेखिला, स्वपटहारक तो हरि देखिला ।
वसति येउनियां उथळा जळीं, विनविती प्रभुलागिं कृतांजळी ॥ ४० ॥
बैसोनियां कंठजळांत नारी, त्या कांपती प्रार्थिति पूतनारी ।
सामोपचारें व्रजगोपदारा, आधीं असें बोलति त्या उदारा ॥ ४१ ॥
कीं शोच्यता ज्याकरितां व्रजाला, जाणों तथा तूज अधोक्षजाला ।
भला कसा सत्वर अंबरातें, द्या जी दयासिंधु दिगंबरातें ॥४२॥
भला नंद हा कीर्ति लोकांत साची, भला पुत्र त्याचाच तूंही तसाची ।
जळीं बैसलों तीव्र दे शीतें कंपा, नयां अंबरें दे अजी सानुकंपा ॥४३॥

---

१ नग्न. २ वस्त्र. ३ आपल्या पदपंक्तीनें पवित्र करीत येई. ४ पृथ्वी. ५ स्पष्ट. ६ वस्त्रें. ७ मायारूप वस्त्रातील तंतु असा. ८ हास्य करून. ९ गंभीर वाणीनें. १० हे उदारा कृष्णा आमचीं वस्त्रें दे असें ह्मणतील तरच त्यांस वस्त्रें देईन असा पण केला. ११ स्त्रीसमुदायांनीं. १२ कदंब वृक्षावर. १३ प्रपंचरूपी वृक्षाची. १४ फांदी. १५ कृष्ण. १६ प्रातःकाळी. १७ आपलीं वस्त्रें हरण करणारा. १८ हात जोडून. १९ कंठपर्यंत खोल पाण्यांत. २० सामानें. २१ शोच्यता. २२ गोकुळाला. २३ कृष्ण. २४ दयासागर. २५ नग्न अशा आह्मी त्यांस. २६ थंडी अंगास कंप सुटे २७ थंडीनें अंग कांपलें. २७ दया करून. * शेवटचे दिवशीं.

गोष्टीस प्रत्युत्तर ही वदेना, दोमें स्ववस्त्रें व्रजराज देना ।
तों दानें[3] आरंभिति गोपजाया, मिसें तया मन्मथकोप जाया ॥४४॥
करिसिल जसि आज्ञा तूं तसें अंग नाचे
करुं तुज वश ऐसे देह हे अंगनांचे ।
गेहति हि परि होऊं सुंदरा क्षिप्र दासी
तुज तनुहि समर्पू सर्वसौख्यप्रदासी ॥ ४५ ॥
मदनपाशबळें हि न आंवळे, हरि न दान परीवचना वळे ।
निमिषं विस्मित होउनि राहती, मतिस भेदें करूं मग पाहती ॥ ४६ ॥
म्हणति धर्म समस्तहि जाणतां, न करि ये रिति पाप सुजाणेंता[12] ।
करुनि सार विचार करीं बरा, त्वरित दे बसनें कनकांबरें[13] ॥ ४७ ॥
मतिस भेद करोनि हि पाहिला, गणं म्हणे न उगा हरि राहिला ।
मग चतुर्थ उपाय हि दाविती, भिउनि देइल हें मनिं भाविती ॥ ४८ ॥
चारी उपाय कथिले कथिलेचि सारे, आत्मार्पणाविण वळेल हरी कसा रे ।
दानांत ते घडतसे तनुसंपदा तें, अर्पू म्हणोनि म्हणती हरिच्या पदातें ॥४९॥
अंबरें अजि न कां पर देशी, काय तूज गमतों परदेशी ।
हा तुझा निववुं दंडक राया, जो समर्थ खळदंडें कराया ॥ ५० ॥
आत्मार्पणेंचि हरिचे फळतील पाय
कीं भक्ति हे परि तिहीं गणिला उपाय ।
अंगीकरी प्रभु न यास्तव त्या क्रमानें
जोडे कधीं न हरि अन्य पराक्रमानें ॥ ५१ ॥
परंतु त्यांचीं कनकांगदानें, न मान्य केलीं कनकांगदानें ।
वाटे हरी फार उदास त्याला, हें दुःख जालें बहुधा स्त्रियांला ॥५२॥
रतिसुखविषयीं त्या सर्व जाल्या निरासें[23]
व्रतफळ पण नाहीं वाटला तो निरासें[24] ।

---

१ सौम्य उपायानें; सामोपचारानें. २ गोकुळाचा राजा कृष्ण. ३ गोपींनीं साम दान, भेद व दंड ह्या अनुक्रमें चारी उपायांनीं कृष्णाजवळ वस्त्रें मागितलीं. साम उपाय थकला तेव्हां त्यांनीं दुसरा उपाय जो दान तो करून पाहिला. ४ स्त्रियांचे. ५ गृहिणी; कुलीन. ६ अति लौकर. ७ सर्वसुख देणारा. ८ आकळला जाईना. ९ दानानेंही. १० पळ. ११ तिसरा उपाय करून पाहातात. १२ बहाणा. १३ कृष्णा. १४ स्त्रीसमूह. १५ दंड. १६ वस्त्रें;—हा श्लोक आमच्या जवळील पोथ्यांत नाहीं. १७ निराश्रित. १८ बाहु. १९ शिक्षा. २० सुवर्णदेहाचें अर्पण. २१ सुवर्णाचीं अंगदें म्हणजे बाहुभूषणें धारण करणाऱ्या कृष्णानें. २२ स्त्रियांस. २३ निराश; आशारहित. २४ नाश.

म्हणुनि च हरि योजी त्यांस त्याचि प्रसंगीं
निजसुखअभिलाषीं[1] घातल्या क्षिप्र[2] संगीं ॥ ५३ ॥
म्हणे दासी होतां वचन जरि माझें करितसा
करा जो मी स्वामी विधि[3] वदतसें लौकरि तसा ।
न बैसावें नीरीं[4] मजजवळि येऊनि बरवें
म्हणावें " दे वस्त्रें " निज हसितवक्त्रें[5] शुभ्ररवें[6] ॥ ५४ ॥
हरिवचन असें जों त्यांचिया जाय कानीं
व्रत सफळ तिहीं तें मानिलें बायकांनीं ।
मग म्हणति असें कीं बोळला अंगदानें[7]
तदुचित रचिला हो यत्न रत्नांगदानें[8] ॥ ५५ ॥
निघाल्या कालिंदी मधुनि सकळा इंदुवदना
करद्वंद्वें[10] गोपी लपवुनि उभ्या कामसदना[9] ।
पुढें एकी एकीप्रति ढकलिती आणि लपती
नदीतीरीं ऐशा तरुवरि उभा गोकुलपती ॥ ५६ ॥
तरुस्कंधीं[11] वस्त्रें सितें[12] हरितें[13] आरक्त[14] असितें[15]
निजस्कंधीं[16] कांहीं वदन मिरवे मंदहसितें ।
कदंबाचे शाखेवरि नवघनश्यामल[17] हरी
वधूवृंदीं[18] दृष्टी पसरि करुणासिंधुलहरी ॥ ५७ ॥
त्रपात्यागें[20] प्रीत प्रभु बहुत जाला हरि परी
स्थळें जीं कामाचीं करयुगुळ[21] देखे तदुपरी ।
क्रिया कामस्थानीं भजनविषयीं काम दवडी
जसा कामी भक्त प्रभुवर तसे त्यास निवडी ॥ ५८ ॥
क्रिया सर्व होते असे दोनि हात, स्वकामस्थळीं हें असे तो पहात ।
सकामा जरी सेवितां लाज नाहीं, असे वश्य ऐसा स्वभक्ता जनांहीं ५९
द्यावा निजांगसुखलाभ[22] वधूजनांतें
ऐसी कृपा उपजली भवभंजनांतें[23] ।

---

१ इच्छा. २ सत्वर. ३ आचार; प्रकार. ४ पाण्यांत. ५ हास्ययुक्त मुखानें. ६ शुभ शब्दांनीं. ७ शरीरदानानें. ८ रत्नाचीं अंगदें धारण करणाऱ्यानें. ९ चंद्रवदना स्त्रिया. १० उभय हस्तांनीं. ११ कदंबवृक्षाच्या फांदीवर. १२ पांढरें. १३ हिरवें. १४ तांबडें. १५ काळें. १६ आपल्या खांद्यावर. १७ नव्या मेघाप्रमाणें श्यामवर्ण. १८ स्त्रीसमूहांत. १९ लाजा. २० लज्जात्यागानें. २१ दोन्ही हात. २२ आपल्या शरीराचा लाभ. २३ संसारनाशकास.

तों आड काम वस्त्रावरि दोनि पाणी
ते काढिल्यांविण न दे वर चक्रपाणी ॥ ६० ॥
परंतु गीतेंत रथांगपाणी, करि प्रतिज्ञा उचलोनि पाणी ।
कीं भक्त माझा नव जाय वायां, हें सत्य पार्था वद मानवा या ॥ ६१ ॥
दुराचारी भारी भजन जरि माझें करितसे
कृपेनें तो माझ्या त्यजित गुणही लौकरि तसे ।
स्ववाणी गीता हे निज बिरुद सांभाळित असे
न झांकावें हस्तीं स्मरगृह वदे शब्दचि असे ॥ ६२ ॥
कामालयावरुनि काढुनि दोन्हि पाणी
कृष्णाकडे करिति कीं अजि चक्रपाणी ।
दे अंबरें म्हणुनि मागति गोपदारा
हें युक्तिनेंचि करणें पडिलें उदारा ॥ ६३ ॥
म्हणे केलें देवीव्रत तुम्हि विचारूनिच परी
विवस्त्रें स्नानें या मलिनपण आलें तदुपरी ।
तया प्रक्षालाया मज निजकरद्वंद्वनमनें
करा ऐशा शब्दीं हरि हरि जगन्मोहन मनें ॥ ६४ ॥
व्रताच्या फळीं ठेविला प्राण सारा, जयां इच्छिती मुक्तही सर्वसारा ।
स्वयें तोचि हे गोष्टि ही बोलताहे, गमे निष्फळास क्रियेची लता हे ॥ ६५ ॥
अंगहीन म्हणतांनि निरास, भाव हा धरुनियां करि आस ।
प्राण न त्यजुनि मानवदेहा, तो कृपाब्धि निजशब्द वदे हा ॥ ६६ ॥
अशा शब्दबाणें निघो प्राण पाहे, परी स्तंभनीं हेतु जाली कृपा हे ।
म्हणे शीघ्र वंदा मला यावरूनी, फळाशा बऱ्या राहिल्या सांवरूनी ॥ ६७ ॥
केला नमस्कार परंतु कांहीं, लज्जा तिहीं रक्षिलि बायकांहीं ।
कीं कामगेहावरि एक पाणी, एका करें वंदिति चक्रपाणी ॥ ६८ ॥
कामस्थळें काम हि वास जाला, एके करें वंदिति त्या अजेला ।
परंतु कामावरि एक हात, हेंही हरी तोचि असे पहात ॥ ६९ ॥

---

१ रथांग म्हणजे चक्र आहे हातांत ज्यांच्या असा. २ हात. ३ "कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति" इ० ( भगवद्गीता अध्या० ९ श्लोक ३१ ). ४ कामसदन. ५ हात. ६ विचार करून. ७ वस्त्ररहित; नग्न. ८ तें मालिन्यपण धुण्यास. ९ दोन्ही हातांनीं नमस्कार करा. १० कृष्ण. ११ हरण करी. १२ मोक्षास गेलेले. १३ ईश्वरासः कृष्णास. १४ आशा. १५ अतिप्रेम. १६ अन्यरहित कृष्णास.

त्यजुनिहि फळवांछा काम्यकर्मेंकरीती, त्रिपथरिपु सख्ये तें सर्वथा लोकरीती ।
सकळफळत्यकर्मत्याग संन्यास साचा, ह्मणुनि उमज होतो या कथेच्या रसाचा

कामालयाउपरि ठेवुनि एक पाणी
एका त्यजूनि नमिला प्रभु चक्रपाणी ।
जो काम्यकर्म करि आणि मनीं अकामें
मानीतसे व्रजवधूजन पूर्णकामें ॥ ७१ ॥

असोतिही काम्यनदीतटाकीं, त्या कामना जो निजभक्त टाकी ।
तो धर्म संन्यास हरीच सारा, करी हरी काम्यपथा असारा ॥ ७२ ॥
कर्मे स्वभक्त करितो परि काम नाहीं, तें टाकवी हरि नसे जरि कामना ही ।
यालागिं कामसदनावरि एक पाणी, तो काढिल्याविण न दे वर चक्रपाणी ७३

ह्मणे प्रायश्चित्त स्वविहित विचारें न घडलें
दुजें या दोषाचें परिहरणही आड पडलें ।
गुरूतें देवातें नमन करि एका जरि करें
तयाचा छेदावा कर ह्मणति शास्त्रज्ञ निकरें ॥ ७४ ॥
परी प्रायश्चित्तें स्वपदनमनीं सर्व घडती
फलप्राप्तिद्वारें त्वरित अवघींही उघडती ।
ह्मणे श्रीकांतां त्या मज करयुगें वंदन करा
मग प्रेमें मागा वदतिच खुणा वृजनिकरा ॥ ७५ ॥

स्वहित मानुनियां व्रजकामिनी, करयुगें नमिती गजगामिनी ।
उचलुनी भुज मागति अंबरा, पसरुनी करयुग्म दिगंबरा ॥ ७६ ॥
एकि येउनि पुढें स्वदुकूला, मागती जसि महा अनुकूला ।
जों तितें इतर अंबर दावी, गोष्टि ते सरस काय वदावी ॥ ७७ ॥
वनीं गोपिकांतें हरी चाळवीतो, तिचें वस्त्र नेदी दुजें दाखवीतो ।
हरीतें ह्मणे गोपिका सारसाक्षी, तुझे हातिचें पैलं तें सारसाक्षी ॥ ७८ ॥
कौतुकें अशिंच सर्व करी तो, जो मुकुंद भवबंध हरीतो ।
गोपिकांस दिधलें वसनातें, हर्षयुक्त करिती वश नातें ॥ ७९ ॥

---

१ निष्काम. २ कृष्ण; कामना पूर्ण करणारा. ३ मार्ग. ४ निःसार. ५ इच्छा. ६ दूरीकरण. ७ एका हातानें. ८ लागलीच. ९ ज्यांस पाय वंदिले असतां सर्व प्रायश्चित्तें घडतात. १० त्या मज लक्ष्मीपतीस. ११ समूह. १२ गोपी. १३ गजगती. १४ वस्त्र. १५ रेशमी वस्त्र. १६ भलतेंच वस्त्र. १७ न देतां. १८ दुसरें. १९ कमल-नेत्रा. २० दुसरें. २१ सर्वद्रष्टा ( ईश्वर ).

नेसोनि वस्त्रें मग गोपदारा, तीरीं उभ्या पाहति त्या उदारा ।
तेव्हांच त्या श्रीपतिशीं रमाया, त्या दाविती नेत्रविकारमाया ॥८०॥
इतुकियांत रवी तिहिं देखिला, उगवतां निजशत्रुच लेखिला ।
करुनि अंगुलिभंग तयास त्या, अति निखंदिती त्यासमयीं सत्या ॥ ८१॥
जो वियोग हरिशीं करि मित्र, त्यासि तो ह्मणति सर्व अमित्र ।
तत्त्व यांत इतुकें अवलोकीं, धन्य तोचि जन मानवलोकीं ॥ ८२ ॥
रति न लाधलिया कुमुदेक्षणीं, उगवला रवि ज्यास्तव ते क्षणीं ।
ह्मणति मागुति योग कधीं घडे, स्वसुख दारवटा कइं ऊघडे ॥ ८३ ॥
कधि घडेल अशी परमा गती, ह्मणुनि येविषयीं वर मागती ।
परि मनांतचि कीं हरि जाणतो,सकळ साक्षि दयाळु सुजाण तो ॥८४॥
भाव हा समजलाच हरी तो, जो मुकुंद भवबंध हरीतो ।
धन्य त्यांसि करितो वरदानें, तें असा वर दिला वरदानें ॥ ८५ ॥
भोगाल वेगें मज देवराया, गोपींस दामोदर दे वरा या ।
दामोदरार्थी शुक भाव दावी, ते व्यासवाणी रुचिनें वदावी ॥ ८६ ॥
दामोदरार्थी शुकभाव देतो, कीं नावडे त्यासि मनें वदे तो ।
कीं गोष्टि जेव्हां न रुचे मला हो, तनूंत दामोदरनाम लाहो ॥ ८७ ॥
व्रजप्रेमबद्ध स्वपोटीं सदा मी, यशोदा करी बद्ध ऐशास दामीं ।
व्रजीं याचिया गोपिका स्त्रीस्वभावें,रतिप्रीतिनें रंगल्या स्व स्वभावें ॥८८॥
नेदूं कैसा यांसहि मी वरातें, ह्मणोनि वाटे कमलोवरातें ।
आतांचि भोगूं तरि हे पहांट, ग्रामस्थ येतांचि भरेल हाट ॥ ८९ ॥
ह्मणोनिया लावुनि संध्य वाटे, पुढें रमावें मनिं हेंचि वाटे ।
यालागिं दामोदर हेचि वाणी, बोले फळाचीं न करोनि वाणी ॥ ९० ॥

व्रजा जा ये वेळे तुह्मि सकळ सिद्धाच अबळा
व्रताची हे चर्या त्वरित फळ देईल सबळा ।
शरद्रात्री येती तरु फळति नाशी शशि तमा
रमाल श्यामा हो तुह्मि मजशीं तेव्हां प्रियतमा ॥ ९१ ॥

---

१ नेत्रकटाक्ष. २ सूर्य. ३ मानिला. ४ बोट मोडणें. ५ निंदिती. ६ गोपकुमारी. ७ सूर्य. ८ शत्रु. ९ कमलाक्षी स्त्रिया. १० मागून; पुनः. ११ दरवाजा. १२ शहाणा. १३ संभ्यानें. १४ कसा देऊं नको. १५ लक्ष्मीपतीस. १६ गांवांतील लोक. १७ बाजार. १८ आतां. १९ वाटेस. मार्गास. २० कमताई; उणीव. २१ शरदृतूंतील रात्री. २२ चंद्र. २३ अंधकारास. २४ सोळा वर्षांचे स्त्रीस श्यामा ह्मणतात."

प्रकाशी तो तीर्थे तरि तसिहि ते होय सबळा
निजानंदप्रामी पद निजवरें दे निजबळा ।
नव्हे माया वस्तु प्रकृति पुरुषावीण अबळा
व्रजस्त्रीतें तेथें म्हणुनि म्हणतो देव अबळा ॥ ९२ ॥
वृत्ती तुह्मी हरि ह्मणे अबळा असिद्धा, सिद्धा तथापि मज आत्मपणें प्रसिद्धा ।
सिद्धांत कीं अनुभवाल तुह्मी सुजाणा, जाणा मला भजति संत जया सुजाणा
प्रवृत्तिप्रसंगांत दावी निवृत्ती, तया माधवातें समर्पूनि वृत्ती ।
कथा वर्णिली वामनें केशवाची, जगीं धन्य तो यांत जो लेश वाची ॥ ९४

इति श्रीकात्यायनीव्रत समाप्त ।

---

## ऋषिपत्न्याख्यान किंवा यज्ञपत्न्याख्यान.

### ( कथेचा सारांश. )

श्रीकृष्ण मोठ्या पहाटेस गोपींस व्रताचें फल देण्याकरितां गेला हें पाहून गोपाळ लगबगीनें बरोबर शिदोऱ्या न घेतां त्याच्याकडे वनांत गेले. तेथें दोनप्रहरीं गोपाळ भुकेनें व्याकुळ होऊन कृष्णास अन्न देण्याकरितां विनवूं लागले. तेव्हां कृष्णानें त्यांस सांगितलें कीं, येथें जवळच यज्ञशाळा आहे, तेथें शास्त्रज्ञ ब्राह्मण मजकरितां यज्ञयागादि कर्में करिताहेत, त्यांचेजवळ अनेकविध अन्नें आहेत. त्यांस मी अन्न मागतों ह्मणून सांगा. तेव्हां गोपाळ धांवत जाऊन त्यांनीं त्यांजवळ अन्न मागितलें; परंतु ब्राह्मणांनीं त्यांस कांहींच उत्तर केलें नाहीं, इतकेंच नाहीं तर त्या ब्राह्मणांनीं त्यांस व रामकृष्णांस निर्भर्त्सून पिटून लावलें, तेव्हां गोपाळ निराश होऊन कृष्णाकडे परत आले. मग कृष्णानें त्यांस सांगितलें कीं, एक यत्न फुकट गेला तरी दुसरा करून पहावा, तर आतां तुह्मी त्या ब्राह्मणांच्या स्त्रियांकडे जाऊन मजकरितां अन्न मागा. त्याप्रमाणें गोपाळांनीं करितांच सर्व विप्रस्त्रिया अन्न घेऊन कृष्णाकडे धांवत आल्या. नंतर ब्राह्मणांसही पश्चात्ताप होऊन त्यांस कृष्णाचे कृपेनें यज्ञांचें फळ प्राप्त झालें.

सलज्जांची लज्जा हरि परिहरी आशु भजनीं
असा गोपीवस्त्रें हरुनि विभु दावी शुभजनीं ।
स्वभक्ता नारीही नर भजति त्याहूनिहि वरा
द्विजस्त्री प्रेमें हें स्फुट करि नमो त्या यदुवरा ॥ १ ॥

---

१ हे दोन श्लोक आमचे जवळील तिन्ही पोथ्यांत नाहींत. २ मनोवृत्ति. ३ यांहेर्ते. ४ लज्जायुक्त अशा गोपकुमारी. ५ लवकर. ६ प्रभु. ७ यादवांचा राजा कृष्ण.

म्हणुनी गोपींचीं वरद वसनें जे दिनिं हरी
द्विजस्त्री भक्तीनें प्रगट दिवसीं त्या करि हरी ।
स्वकांता ते विप्र स्तविति निज धिक्कार करिती
कथाब्धी यामध्यें चतुर जन तें तत्त्व मथिती ॥ २ ॥
करुनि नमन कृष्णा तें कथातत्त्व वाचे
कथिन मि गुण कांहीं त्यामधें माधवाचे ।
न भजत हरि झाले नष्ट थोर द्विजाती
प्रिय हरि अबळा त्या त्या सुमुक्तीस जाती ॥ ३ ॥

अंबरें हरुनियां वरदानें, गोपिकांसि दिधलीं वरदानें ।
धांवले पशुप गोवळ सारे, काय हा जन म्हणे वेळसा रे ॥ ४ ॥
सिदोऱ्या न घेताचि टाकुनि जाती, सर्व आपुलाल्या चतुष्पादजाती ।
मिळाल्या त्वरेनें मृगांकाननातें, असे धांवले गोप ते काननातें ॥ ५ ॥
हरि बहुत पहाटे दूर गेला वनातें, म्हणउनि पशुपाळीं मांडिलें धांवनातें ।
जसि दिलि गमनाज्ञा गोपकन्यांसि देवें, चहुंकडुनि मिळालीं गोपवृंदें सदैवें ६
जाय त्यांसह हरी परभारा, दावितो द्रुमशिरीं परभारा ।
हे म्हणे तरु परार्थचि सारे, धन्य मानव दयाळु कसा रे ॥ ७ ॥
हे परार्थक विलास कळांचें, देह भूरुहवरां सकळांचें ।
वे करें वदत हें फळ पानें, सेविती पशु तृणें जळपानें ॥ ८ ॥
सभाग्या तरूच्या फळापल्लवांतें, स्वयें घ्या वदे ये रिती वल्लवांतें ।
कृपायुक्त नम्रावरी हात टाकी, बसे त्या स्थळीं भानुकन्यातटाकीं ॥९॥
असा दूरि टाकूनि वृंदावनातें, हरी पाजुनी धेनुवृंदा वनातें ।
बसे देखुनी पुष्पिता काननातें, गडी सेविती श्रीमृगांकाननातें ॥ १० ॥

---

१ वस्त्रें. २ हरण करी. ३ द्विज आपल्या स्त्रियांस स्तवूं लागले व स्वतःचा धिक्कार करूं लागले; कारण स्त्रियांनीं कृष्णास ओळखिलें, त्यांनीं ओळखिलें नाहीं असें या कथेचें तत्त्व चतुरजन जाणतात. ४ कथासमुद्र. ५ मंथनकरून काढतात. ६ लक्ष्मीपति जो कृष्ण त्याचे गुण. ७ न भजल्यामुळें. ८ ब्राह्मण. ९ त्या विप्र स्त्रिया. १० चांगल्या मुक्तीस. ११ वस्त्रें. १२ वर देणारा कृष्ण त्यानें. १३ वरांचीं प्रदानें. १४ पशुपाल असे गोवळी. १५ वेडा. १६ न्यहारी. १७ गाईगुरें. १८ चंद्रवदन कृष्ण, ह्याकडे. १९ वनास. २० पळणें. २१ गोपाळांचे समुदाय. २२ परस्पर. २३ वृक्षाच्या डोक्यावर. २४ फलपुष्पाचा जो भार वृक्षांचे शिरावर आहे तो परासाठीं म्हणजे दुसऱ्यासाठीं आहे. २५ वृक्ष. २६ गवत. २७ गोपाळ. २८ नम्र झालेल्या वृक्षावर. २९ यमुनातीरीं. ३० धेनुसमुदाय. ३१ वनाकडे. ३२ फुललेल्या वनास. ३३ मृगांक म्ह० चन्द्रवदन कृष्ण त्यास.

तेथें क्षुधेंकरुनि त्या पशुपालकांनीं, हे घातली विनवणी व्रजबालकांनीं ।
कीं प्राण आजि अजि भूक हरी हरीतो, देऊनि अन्न बहु तृप्त करी हरी तो॥११

म्हणे हरी येथुनि यज्ञशाळा, समीप हे दीसतसे विशाळा ।
स्वर्गानिमित्तें यजनें करीती, तेथें असे अन्न अनेकरीती ॥ १२ ॥
म्हणाल आम्ही पशुपाळजाती, ते श्रेष्ठ शास्त्रज्ञ महाद्विजाती ।
मागों कसें अन्न तयां द्विजांतें, द्यावें परी तें निजपुण्य जातें ॥१३॥
तरी स्वयें जात तुम्हीं नसा रे, मागा मदाशेंच करूनि सारे ।
कीं नाम माझें मम अग्रजाचें, सांगा तुम्हीं सैन्य समग्र ज्याचें ॥ १४॥
निरोप ऐसा पशुपांसि झाला, ते मागती अन्न तया द्विजांला ।
कीं येथुनी सन्निध कृष्ण रामें, आले स्वयें विश्वमनोभिरामें ॥१५॥
हे थोर कोण्हीच न यांसमान, द्यावाच यांच्या वचनासि मान ।
द्या अन्न ऐसें जरि साचें वाटे, आह्मांस लावा अथवा स्ववाटे ॥१६॥
हें ऐकिलें कीं वसुधामरांनीं, न मान्य केलें तरि पामरांनीं ।
नेदूं असेंही परि ते द्विजाती, न बोलतां गोप निराश जाती ॥ १७॥
वृत्तांत ऐसा पशुपालकांनीं, निवेदितां घे पशुपाल कानीं ।
लक्षूनि माया करि मंद हांस, केला जिणें मोह महामहांसें ॥ १८ ॥

बोले पुन्हा हरि तयांप्रति लोकरीती, कीं एक यत्न नव्हेतां दुसरा करीती ।
प्रार्था अशाचि तुह्मि जाउनि विप्रदारां, त्या अन्न देतिल तुह्मांसि महाउदारा१९
अत्यंत मी प्रिय जयांसि जगन्निवास, ज्यांच्या मतीस मजमाजि सदा निवास ।
माझ्या कथा बहुरुची परिसोनि कानीं, ध्यानीं तिहीं वसविलें मज बायकांनीं२०
स्नेहस्वभाव सहज स्वत एव साचा, तत्रापि वास मजमाजिच मानसांचा ।
तो मी असें जवळि हे परिसोनि वाणी, देतील अन्न बहु त्या न करूनि वाणी२१

ऐकूनि हे शब्द अगाध वाचे, गडी पुन्हा धांवति माधवाचे ।
ते यज्ञशाळेचमधें द्विजाति, तों पत्निशाळेंप्रति गोप जाती ॥ २२ ॥

---

१ कृष्णाचे कानी. २ आज. ३ अहो. ४ मोठी. ५ यज्ञ. ६ गोवळी. ७ मोठे ब्राह्मण. ८ बळरामाचें आणि माझें नांव सांगून अन्न मागा. ९ तुह्मी सकळ माझी सेना आहां ह्मणून सांगा. १० बळराम. ११ सुंदर. १२ हें आमचें सांगणें खरें वाटेल तर. १३ अथवा आह्मांस देत नाही ह्मणून वाटे लावा. १४ भूदेव जे ब्राह्मण त्यांनीं. १५ क्षुद्र. १६ देत नाहीं. १७ आशाभंग होऊन. १८ हे मायेनें वेढिले आहेत असें जाणून. १९ हास्य. २० मोठ्या मोठ्या लोकांस. २१ एक यत्न सफळ न होतां. २२ ऋषिपत्न्या. २३ सर्व जगांत आहे वास ज्याचा. २४ वसति. २५ ऐकून. २६ मनाचा. २७ कमताई. २८ गंभीर, खोल. २९ ब्राह्मण. ३० ब्राह्मणस्त्रियांचे मंदिरास.

विप्रस्त्रिया साहुनि पाक सारा, ध्याती मुकुंदा जगदेकसारा।
अलंकृता मौक्तिकमाणिकांनीं, मनीं मुखीं माधव आणि कानीं॥२३॥
देखूनियां हे हरिदास त्यांतें, नमो ह्मणूनी नमिती सत्यांतें।
सन्मान देऊनि अनेक रीती, आला हरी हें श्रुत ते करीती॥ २४॥
द्विजांच्या पत्न्यां हो वचन वदतों हें मनिं धरा
तुह्मीं प्रेमें चित्तीं स्मरत असतां ज्या गिरिधरा।
स्वयें आला आहे बहुत जवळी येथुनि हरी
तया द्या अन्नें जो स्वजनजठराग्नी परिहरी॥ २५॥
ऐकतां निकट आगमनातें, नावरेच अनुराग मनातें।
अन्न षड्रस चतुर्विधजाती, घेउनी हरिचसन्निध जाती॥२६॥
समुद्रातें उच्चस्थळिंहुनि मिळों जाति सरिता
सुखाब्धीतें जाती त्वरितचि तशा प्रेमभरिता।
पिता पुत्र भ्राता जिस तिस निवारी निजपती
तरी गेल्या तेथें पशुपजनयुक्त व्रजपती॥ २७॥
गडी गाती कीर्ती स्तविति वडिला बंधुस बळा
पहाती ते दृष्टीं करुनि अवळीं भाग्य सवळा।
तटीं कालिंदीच्या सुललित अशोकद्रुमवनीं
स्वगोपाळांमध्यें करि पदरजें धन्य अवनी॥ २८॥
ऐकोनि जो स्वहृदयांतचि रेखिलें हो,प्रत्यक्ष तोचि नयनीं हरि देखिला हो।
आलिंगिला निजमनें प्रभु त्या सत्यांनीं,केलें तयाउपरि वंदन त्यास त्यांनीं॥२९
श्रुतिसहि वदवेना जो हृषीकेश वाचे,पुशिति कुरळकेशीं पाय त्या केशवाचे।
चरणकमलयुग्मीं शामला भृंगमाला, मिरविति सुख तेव्हां स्थावरा जंगमाला॥
हरी ह्मणे कीं तुह्मि विप्रदारा, महासभाग्या परमा उदारा।
पहावया पातलियाच मातें, अलभ्य जो मी त्रिदशोत्तमांतें॥ ३१॥

१ अन्नसिद्धि. २ जगांत एक श्रेष्ठ असास. ३ माणिकमोत्यांचे अलंकार घालून. ४ गोप. ५ पतिव्रता स्त्रियांस. ६ ऐकविती ७ स्त्रियाहो. ८ कृष्णास. ९ उदरस्थ अग्नि; क्षुधा. १० जवळ, समीप. ११ प्रीति. १२ कडु, तिक्त, अम्ल, कषाय, लवण, आणि मधुर, असें षड्रस अन्न. १३ लेह्य, पेय, चोष्य, आणि खाद्य अशा चार जातींचें. १४ नद्या. १५ सुखसमुद्रास. १६ प्रेम हेंच उदक घेऊन. १७ जाऊं नको ह्मणून सांगे तरी. १८ गोपाळांनीं युक्त असा कृष्ण जेथें होता तेथें. १९ बळरामास. २० स्त्रिया. २१ सुंदर. २२ अशोकवृक्षाच्या वनांत. २३ पृथ्वी. २४ लिहिला. २५ स्त्रियांनीं २६ नमस्कार. २७ आपल्या केशांनीं त्यांनीं त्याचे पाय झाडिले. २८ चरणद्वयीं. २९ मिरवत ३० देव त्यांमध्यें जे श्रेष्ठ त्यांस.

जडा अनर्थातें समान साचा, जो अर्थ तो मी प्रियमानसाचा ।
सर्वांसही गोडचि वाटलों कीं, प्रीतीसही एकचि वाट लोकीं ॥ ३२॥

स्वयें स्वात्मा तो हा हरि म्हणुनि या पावन कळे
न घेती भक्तीचा परम निज सद्भाव न कळे ।
स्वभक्तीमुक्तीचें विरजण न नामीं प्रियपणा
विलंबें सिद्धीची उडवि रुचि ते भक्ति कृपणा ॥ ३३ ॥

अशा प्रियातें पुरुषोत्तमातें, पहावया पातलियात्र मोतें ।
हे युक्ति कीं मी प्रिय मानसाचा, सर्वां प्रियांमाजि समान साचा॥३४॥

तनुधनविषयांचा सर्व जो जो पसारा
अनृतचि परि माझा त्यामधें व्याप सारा ।
लहरिहि तृषितातें गोड ते जीवनानें
प्रिय सकळहि केले म्यां जगज्जीवनानें ॥ ३५ ॥

प्रियें सारीं जेणें प्रिय परम तो वो स्वभजनीं
असा मी त्या मातें तुह्मि गवसिलें प्रेमभजनीं ।
असें जें हें केलें बहु उचित वाटे मज परी
पती जेथें तेथें गमन करणें एतदुपरी ॥ ३६ ॥

तुह्मीं जावें जेथें स्वपति करिती देवयजन
स्त्रियांच्या योगें तें करितिल समाप्ती द्विजजन ।
सुखाच्या त्या गोष्टी वदत सुख दे श्रीहरि परी
बहु क्लेशी झाल्या गमन वदला जें तदुपरी ॥ ३७ ॥

बहु क्लेशी झाल्या श्रवणिं पडतां हें द्विजसत्या
जंळातें नेत्रांच्या पुसुनि वदती श्रीपतिस त्या ।
अहा हा देवा तूं परम करुणासागर हरी
तयाहीमध्यें हें नवल उठली क्रूर लहरी ॥ ३८ ॥

हे शब्द योग्य न तुतें पुरुषोत्तमातें
मिथ्या नको करुं तुझ्या निगमार्गमातें ।
वायां न जाय निज भक्ति अशी स्ववाणी
साची करूनि न करीं करुणेसि वाणी ॥ ३९ ॥

---

१ मला. २ शरीर धन इत्यादि विषयांचा पसारा खोटा असून सर्वत्र मी भरलों आहें. ३खोटा.४ लाटा.५ पाणी.६ यावर.७ देवांची पूजा.८कारण धर्मपत्नीवांचून यज्ञादि कर्में होत नाहींत. ९ आण्यास सांगितलें तें.१० अश्रु. ११ तूं करुणासागर असून अशी क्रूरपणाची त्यांत लाट उठली हें नवल.१२ वेदांतज्ञान. १३ कमताई.

# वेणुसुधा

## ( कथेचा सारांश ).

श्रीकृष्ण मधुवनामध्यें वेणु वाजवीत असतां त्याचा अमृतासारखा गोड ध्वनि ऐकून सर्व चराचर विश्व मोहून गेलें. ही कथा या प्रकरणांत वर्णिली आहे; म्हणून यास वेणुसुधा हें नांव दिलें आहे. गोपी वेणुध्वनि ऐकतांच सर्व कामें टाकून वनांत धांवत गेल्या. नंतर कृष्णानें रासक्रीडेस आरंभ केला.

मधुरवेणुरवें[1] मन मोहरी[2], मधुवनीं मधु[3]शत्रु नमो हरी ।
करुनि वंदन तत्पदसारसा[4], कथिन वेणुसुधारस आरसा ॥ १ ॥
वनीं वाजवी वेणु जेव्हां मुरारी[5], व्रजीं चित्त कामें स्त्रियांचें थरारी[6] ।
तया वर्णिती प्राण ठेवूनि कंठीं, वधूवृंद[7] तो संकटें दीन[8] कंठी ॥२॥
अंगवक्र अधरीं धरि पांवा[9], गोपवेष हरि तोचि जपावा ।
वामबाहुवरि गालहि डावा, तो ठसा[10] स्वहृदयांत पडावा ॥ ३ ॥
वेणु जेंवि अधरीं स्वररंध्रीं[11], अंगुली स्मरति गोपपुरंध्री[12] ।
कोमळा सुचपळा अतिलंबा, सप्तही स्वररसा अविलंबा ॥ ४ ॥
ऐसिये हरिचिये मुरलीनें, कामतत्परमनें स्मरलीनें[13] ।
मोहिलीं सहवधूत्रिदशांचीं[14], आमुचीं न नवलें सुदृशांचीं[15] ॥ ५ ॥
गायनीं अमर[16] जे अभिमानी, आणि देवललना[17] स्वविमानीं ।
त्या स्त्रियांसहित दैत्यजनारी[18], मोहिलें म्हणति या व्रजनारी ॥ ६ ॥
वेणुध्वनी तो सुरगायकांनीं[19], त्यांच्या विमानांतहि नायकांनीं[20] ।
आश्चर्य कांनीं पडताचि केलें, न तृप्त झालें मन हें भुकेलें ॥ ७ ॥
स्मरशरें[21] विकळा सुरकामिनी, गलित[22]नीविहि[23] नेणति भामिनी[24] ।

---

१ शब्दें. २ मोही. ३ मधुदैत्याचा शत्रु हरि. ४ त्याच्या पादकमलाला. ५ मुर दैत्याचा शत्रु कृष्ण. ६ कांपूं लागलें. ७ समुदाय. ८ स्त्रियांनी दिवस संकटानें कंठिला ( घालविला ). ९ मुरली. १० स्वरूप. ११ भोंक. १२ स्त्रिया. १३ कामवासनेंत गढून गेलेली. १४ वधूंसह देवांचीं मनें सुद्धां मोहिलीं मग आमचीं मनें मोहिलीं यांत नवल नाही. १५ चांगल्या आहेत दृष्टि ज्याच्या अशा. १६ देव; गंधर्व. १७ देवांगना; अप्सरा. १८ दैत्यांचे शत्रु देव यांस स्त्रियांसहित मोहिलें. १९ गंधर्व. २० देवांगना. २१ कामविकारानें. २२ गलित. २३ विगलित झालेली किंवा सैल झालेली वस्त्रग्रंथि. २४ स्त्रिया.

हरिस देखुनि त्या अधरामृता, त्वरित इच्छिति त्याविण ज्या मृता ॥ ८ ॥

कितीकी अशा बोलती गोपदारा, दुज्या गोपिका वर्णिती त्या उदारा ।
महाथोर आश्चर्य हें आयका यां, असें प्रार्थिती दूसऱ्या बायका यां ॥ ९ ॥

आयका नवल हें अबळा हो, कीं स्थिरा घनिं विजा प्रबळा हो ।
हार ये रिती मुकुंद उरीं वो, देखतां न उरतेच उरी वो ॥ १० ॥
वास ज्यांतचि रमारमणीचा, श्याम ऊर वरि हार मणीचा ।
वेणुगान समयांत हरी तो, डोलतां जनमनास हरीतो ॥ ११ ॥
अधरिं वेणु धरी जइं तो हरी, विरहिणी जनचित्तहि मोहरी ।
व्रजवधूंसि खुणा व्रजराज तो, मुरलिमाजि वदोनि विराजतो ॥ १२॥
करूनी वियोगें मुखें दीनवाणीं, वसे तों विनोदें रमाकांतवाणी ।
अकस्मात त्या वेणुनें कर्णरंध्रीं, निघे सौख्य तत्काळ पावे पुरंध्री ॥१३॥
क्षण असें सुख पावति मागुती, त्वरित त्या अधरामृत मागती ।
जसजसा ध्वनि गोड गमे मना, तसितसी उपजे स्मरकामना ॥ १४ ॥
मोहती व्रजपशू मृग गाई, आमुचें नवल काय अगाई ।
स्तब्ध होति लिखितें जसिं चित्रें, वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें॥१५॥
ज्यांसि न स्मरण हल्स दंनांत, ग्रास ते न गिळिती वदनात ।
निद्रितेंचि अथवा लिहिली हो, चित्रिचीं न गमती पहिलीं हो ॥१६॥
मातृस्तनींचा रस आननांत, तों होय वेणुध्वनि काननांत ।
गळे गिळेना पय वांसुरांतें, आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ १७ ॥
उचलुनि श्रवणें श्रवणामृता, पशु पिती रस जीवन जो मृता ।
जवळि दूरहि वृंद अहो असे, मधुवनीं हरि जेथ उभा असे ॥१८॥

---

१ त्याजवांचून ज्या मेल्याप्रमाणें होत. २ स्त्रिया. ३ इकडे या आणि ऐका. ४ ह्या. ५ स्त्रियाहो. ६ मेघावर विद्युल्लता जशा स्थिर राहाव्या त्याप्रमाणें मेघश्याम हरीच्या उरावर हार पाहून. ७ भान. ८ रमा ह्म० लक्ष्मी ह्या स्त्रीचा. ९ कौस्तुभमणि. १० मोही. ११ शोभतो. १२ गोपस्त्रिया वियोगानें दीनासारखें मुख करून बसत. १३ कृष्णाची वाणी. १४ कानांत; कर्णद्वारीं. १५ स्त्री; गोपवधू. १६ मागून; पुनः. १७ हृदयरूप मृहांत. १८ व्रजांतील पशूंची वेणुध्वनीनें अशी अवस्था झाली कीं ते निद्रित आहेत किंवा चित्ररूप आहेत हें पाहतां ते चित्ररूपच आहेत, पहिले स्थितींत म्हणजे निद्रित नाहींत असें वाटे. १९ दुग्ध. २० मुखांत. २१ [illegible]; वनांत. २२ दुग्ध. २३ कान उभारून पशू श्रवणामृतध्वनि ऐकूं लागले. २४ अवळच्या आणि दूरच्या पशुवृंदांची अशी स्थिति झाली.

चरित्रें करी आणिकींही हरी तो, स्वलीलावशें जो अविद्या हरीतो ।
स्त्रिया वर्णिती आणिकी एक लीला, तिला आयका नाशिते जे कलीला ॥१९॥
मल्लवेष रचिला अभिराम, श्रीधरप्रभु संवें बलराम ।
मोरपत्र मुकुटीं तरुपत्रें, नेत्र सुंदर जशीं शतपत्रें ॥ २० ॥
सये असा म्यां हरि देखिला गे, तो प्रेमरंगीं मनिं रेखिला गे ।
पाचारितो वेणुरवेंचि गाई, आश्चर्य तेव्हां करितों अगाई ॥ २१ ॥
गोधेनीं वहु पुढें नेव जावें, ठाव एकचि धरूनि थिजावें ।
वाजवी ह्मणुनि जो निज पांवा, कृष्ण तोचि हृदयांत जपावा ॥ २२ ॥
पशु जसे ध्वनिनें स्थिर राहती, तशि जळें न नद्यांतिल वाहती ।
व्रजवधू सम होति नद्या सये, सुकृतें अल्प विकल्प न यांस ये॥२३॥
केलीं सुपुण्यें जरि गोपिकांहीं, झालीं अपूर्णेचि तथापि कांहीं ।
कीं धन्य आह्मी व्रजअंगनांहीं, तरी सदा श्रीहरिसंग नाहीं ॥ २४ ॥
भुजा कांपती नित्य आलिंगनातें, न फावे तरी सर्वदा अंगनांतें ।
जनांचा मनीं धाक वाटे जळाला, अवस्था दिसे हे नद्यांच्या जळाला ॥२५॥
हरिप्रेम आह्मां जसें अंतरंगीं, नद्यांचें तसें दीसतें वो तरंगीं ।
भुजा कांपती त्याचि आलिंगनातें, व्रजीं होय आह्मां जसें अंगनांतें ॥ २६ ॥
आह्मांतही देखुनि कृष्णजीतें, प्रेमें जळें लोचनिं येति जीतें ।
भयें जनाच्या वरिल्या वरी ते, नेत्रींच नेत्रोदक आवरीते ॥ २७ ॥
नद्यांतही स्तब्ध असेच पाणी, आह्मां तयांही सम चक्रपाणी ।
स्वल्पें सुखें आमुचिया अदृष्टीं, तैशाचि याही दिसताति दृष्टी ॥ २८ ॥
होऊनि शीतळ सुगंध समीर जातो, कृष्णाकडे तरि पदांबुजिंच्या रजां तो ।
आणूं ह्मणूनि उचलूनि भुजातरंगा, ज्या प्रार्थिती पवन दावुनि अंतरंगा २९

---

१ आपल्या लीलेच्या योगानें. २ अज्ञान; माया. ३ पापास. ४ सुंदर. ५ बरोबर. ६ मोरांचीं पिसें. ७ कमळें. ८ सखे. ९ प्रेमरूप रंगानें. १० तसबीर काढिली. ११ गाईंनीं; गो हेंच धन. १२ न जावें. १३ थांबून राहावें. १४ पुण्यसंचय. १५ गोपींनीं पुण्यकर्में केलीं खरीं, तथापि त्यांतील कांहीं अपूर्ण राहिलीं ह्मणून त्यांस हरीचा निरंतर संग नाहीं असा भावार्थ. १६ स्त्रिया. १७ अंतर्यामीं; अंतःकरणांत. १८ लहरीमध्यें. १९ हरीस पाहून प्रेमानें आलेलें डोळ्यांस पाणी डोळ्यांबाहेर येऊं देत नाहीं. २० नशीबीं. २१ वायु. २२ तो वायु कृष्णाच्या पादकमलाचें रज वाहून आणो ह्मणून त्या नद्या भुजातरंग उचलून त्यास प्रार्थितात. २३ नदीचे तरंग हे तिचे भुज. २४ मनांतील अभिप्राय.

कथिति ये रिति ज्या व्रजनायका, वदति त्यांस तुज्या व्रजनायका ।
म्हणति हे परिसा नवल क्षणे, त्रिभुवनेश्वर मानवलक्षण ॥ ३० ॥

सुंदर सरसें हरीच्या वर्णिती विक्रमातें
अनुचर चरणाचे गाति कीर्तिक्रमातें ।
परम पुरुष विष्णु श्रीशौ हा वाटला गे
स्मरति चरित त्यांला मुक्तिची वाट लागे ॥ ३१ ॥

वनीं हा असे पर्वतीं सर्व गाई, तई देखिलीं कौतुकें वो अगाई ।
दुरूनी करूनी कृपा चारितो वो, स्ववंशीरवें त्यांसि पाचारितो वो ॥३२॥
फळें मोक्ष काम्यें सुखें पुष्पजाती, असें वेद वेदांत वर्णूनि जाती ।
फळें दोनि हीं विष्णु देणार साचा, तया दाखवी नाद वंशीरसाचा ॥३३॥
फळें दोनि हीं जे स्थळीं देव दावी, तनू तेचि साकार त्याची वदावी ।
असा विष्णु वृक्षालतांमाजि पावा, अहो वाजवी तो गुरुत्वें जपावा ॥३४॥
स्वशब्देंचि जो व्यापकालागिं दावी, स्वयें विष्णुची मूर्ति तेही वदावी ।
फुलांची फळांची पडे वृष्टि भारी, लतावृक्षरूपें दिसे कैटभारी ॥ ३५ ॥
लतांमाजि कांटे तरूंमाजि पानें, उभे रोमें ते वेणुपीयूषपानें ।
फळीं आणि पुष्पीं तयीं वृक्षभारीं, सुखें त्या दिसे त्यांत तो कैटभारी ॥३६॥
वृक्षां लतांसहि घडे गुरुभावें लोकीं, की विष्णु दाविति जनास कृपावलोकीं।
प्रेमें सुखें करिति विष्णुनिरूपणातें, श्रेष्ठत्व साधिति लतात्वतरूपणातें ॥३७॥
मुखें वर्षती विष्णुनामामृतातें, सुधा पाजिती मृत्युलोकीं मृतांतें ।
रसस्राव ऐशापरी गोड भारी, जसा संत शब्दामधें कैटभारी ॥ ३८ ॥

---

१ गोपी. २ व्रजस्त्रिया. ३ क्षणभर. ४ मानवलक्षणांनी युक्त असा देव. ५ देव. ६ रसभरित. ७ श्री म्ह० लक्ष्मी हिचा स्वामी. ८ आपल्या वेणूच्या ध्वनीनें. ९ बोलावतो. १० तप यज्ञ इत्यादि कर्मांची सुखें हीं पुष्पें होत, कामना आणि मोक्ष हीं फळें होत, असें वेदांतांत सांगितलें आहे. ११ काम्य आणि मोक्ष हीं फळें. १२ लता आणि वृक्षरूपें हरि दिसला; कारण लता वृक्ष जसे पुष्पें आणि फळें देतात तसा हा हरि सुखें हीं पुष्पें व काम्य व मोक्ष ह्या फळांची पुष्कळ वृष्टि करूं लागला. १३ लतांमध्यें कांटे असतात तसे वेणुध्वनीनें उठलेले रोमांच हेच हरीच्या शरीररूपी लतांवर कांटे होत. १४ अमृतासारखा वेणूचा गोड ध्वनि ऐकल्यानें. १५ लता आणि वृक्षासही गुरुपण आलें, कारण ते कृष्ण असा फळें पुष्पें देणारा वृक्षाप्रमाणें आहे हें शिकवितात. १६ हरिनाम हेंच अमृत त्याचा वर्षाव. १७ अमृत. १८ मृत झालेल्यास.

## प्रसंग २.

दिसे जेधवां जे रितीनें जिला हो, तसा वेतसे ते मनामाजि लाहो ।
कितेकीं अशा आणिली गोपदारा, प्रकारांतरें वर्णिती त्या उदारा ॥ १ ॥
ह्मणे एक ग्यां कृष्णजी देखिला गे, असा कीं ललाटीं टिळा रेखिला गे ।
पहातां पहातां पहावाच वाटे, रुते चित्त जाऊनि नेत्राच वाटे ॥ २ ॥
आपादमाळा प्रभुकृष्णजीची, सुधा पिती षट्पद कृष्ण जीची ।
प्रदक्षिणा ते अवघे तिला हो, करूनि गुंजारव घेति लाहो ॥ ३ ॥
गुंजारवें भ्रमर गुंजति त्यांत देवें, वेणुध्वनी मिसळिला मृदु वासुदेवें ।
आपादकंठ वनमाळ अशी विराजे, तें सेविती मधुप होउनि देवराजे ॥ ४॥
वेष हो रचियले भ्रमरांचे, वृंद ते ऋषिवरां अमरांचे ।
या मिषें स्तविति भक्तचि जाणा, सेविती हृदयसाक्षिसुजाणा॥ ५ ॥
त्यांस आदर करी अधरीं तो, वेणु ये रिति मुकुंद धरीतो ।
कीं जया उठति षट्पदवाचा, ते रिती रसहि वेणुरवाचा ॥ ६ ॥
विभव त्या समयांतिल आयका, नवल कीं खग या व्रजनायका ।
भजति वेष्टुनियां अति त्यो रसें, सुरस वेणुचियाच अवो रसें ॥ ७ ॥
वनीं राजहंसीं पिकोनीं शुकानीं, ध्वनी गोड तो आइकोनी सुकानीं ।
त्वरें येउनी सेविलें श्रीहरीतें, महापापही नाम ज्याचें हरीतें ॥ ८ ॥
वदन लावुनि ते सकल क्षिती[21], नयन झांकुनि अन्य न लक्षिती ।
स्थिर मनें करुनी स्थिर आसना, करिति ते खग कृष्णउपासना ॥९॥
त्या खगीं क्षिति कितेक चावर, व्यापिली प्रभु मधें जिचा वैर ।
भोंवते विहग शोभते धरा, श्रीपतीसह मनांत ते धरा ॥ १० ॥
क्रीडे असें आणिक पूतनारी, तें गाति अन्या रिति पूत नारी ।

---

१ जेव्हां. २लाभ. ३ कपाळावर. ४ तिलक; गंधाचा किंवा कस्तुरीचा टिका. ५ त्याच्याकडे एकसारखे पाहत असतां आमचें मन नेत्रद्वारें त्याचे ठिकाणीं जाऊन गुंततें. ६ पायांपर्यंत पोंचणारी. ७ज्या माळेंतील पुष्परस. ८ कृष्णवर्ण ह्म० काळे भ्रमर. ९ गुणगुण शब्द. १०लाभ. ११ मृदु ध्वनि. १२ भ्रमर. १३ देवांनीं वनमाळेचें सेवन करण्याकारितां भ्रमरांचीं रूपें धरिलीं असा भाव. १४ समुदाय; ते भ्रमरांचे समुदाय नव्हते तर ऋषींचे व अमरांचे ह्मणजे देवांचे होते. १५ भ्रमरांचा शब्द. १६ ऐश्वर्य. १७ पक्षी. १८ राग; प्रीति. १९ कोकिलांनीं. २०पोपटांनीं. २१ जमिनीस तोंड लावून. २२ दृढ आसन करून ह्म० निश्चल बसून. २३ चाहूर ह्मणून भूमि मोजण्याचें एक प्रमाण आहे. १२० बिघे. २४ स्वामी. २५ पक्षी. २६ पृथ्वी. २७ कृष्ण. २८ पवित्र स्त्रिया.

कीं जें वदे तें परिसा सयां हो, त्या एकचित्तेंचि रसाळ या हो ॥ ११ ॥
दिव्य हार बरवेच तुरे हो, कृष्ण रामहि असे चतुरे हो ।
तेधवां गिरितटीं निजपांवा, वाजवी हरि तसाचि जपावा ॥ १२ ॥
स्वयें तुष्ट संतुष्टवी तो जगातें, अगांतें नगांतें मृगांतें खगांतें ।
असें क्रीडतां काळ माध्यान्ह झाला, घनें देखिलें तों सख्या त्या भजाला ॥ १३ ॥
हळुहळू घन गर्जत वर्षतो, धरुनि साउलिही वरि हर्षतो ।
नवविधा निजभक्तिहि दावितो, समगुणें स्वसखा हरि भावितो ॥ १४ ॥
जगज्जीवन श्रीहरी आणि काळा, करितो जगीं जीवनाच्या सुकाळा ।
असा मेघही यानिमित्तें सखा हो, सुहृद्भाव ऐसा नसे आणिका हो ॥ १५ ॥
झणीं उष्ण लागे सख्या केशवातें, म्हणुनी त्वरें येउनी लेश वातें ।
मुकुंदावरी मेघ तो छत्र झाला, करी स्वात्मदेहार्पण श्रीभजाला ॥ १६ ॥
करुनि सख्य निजात्मनिवेदना, घन भजे पहिलें मधुसूदना ।
प्रगट दास्यहि त्याचि मिषें करी, धरि धन्यांवरि साउलि लौकरी ॥ १७ ॥
छत्रात्मता अर्पुनियां अजाला, धरूनियां साउलि दास झाला ।
करूनिही स्वात्मनिवेदनातें, दास्यें भजे श्रीपुरुषोत्तमातें ॥ १८ ॥

आणीक भक्तिरस जो शुक सूचवीतो
त्या त्या क्रमेंच नृप येत असे चवी तो ।
कीं मंदमंद घन गर्जतसे नभीं हो,
शंका धरूनि तरि काय म्हणूनि भी हो ॥ १९ ॥
मेघध्वनी मुरलिहूनि विशेष होतो
तेव्हां घडे महदतिक्रम कीं अहो तो ।
शंका अशी तरि उगा घन कां असेना
हें मंदगर्जननिमित्त असें दिसेना ॥ २० ॥

नभींहूनि तेव्हां अशी गर्जना ही, करी वृष्टि मौन्यें तरी वर्ज नाहीं ।

---

१ ऐका. २ सख्याहो. ३ आनंद. ४ माळा. ५ चतुर जनहो. ६ पर्वत, वृक्ष, मृग आणि पक्षी यांस. ७ मेघानें. ८ कृष्णास. ९ नऊ प्रकारची भक्ति ती अशीः— "श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥" १० घन हा समगुणांनीं हरि माझा मित्र आहे असें दाखवितो. ११ उदकाचा सुकाळ. १२ मित्रपण. १३ वाऱ्यानें. १४ छत्री. १५ स्वदेहार्पण. १६ सेवा. १७ स्वामी. १८ आपला देह हा छत्रीसारखा कृष्णास अर्पून. १९ परिक्षिति राजा. २० भय पावतो. २१ मोठी चूक.

घडी एक वर्षे घडी एक राहे, उगा कां नसे मेघ टीका करा हे ॥ २१ ॥
श्रवणभक्तिमधें घनराज तो, करुनि कीर्त्तनभक्ति विराजतो ।
स्वमनिं भाव असा शुक नेमुनी, कुशळ बुद्धिसि ओढुनि ने मुनी ॥ २२ ॥
हळुहळू घन गर्जतसे नभीं, मुरलिहूनि चढेल ह्मणोनि भी ।
श्रवणभक्ति अतिक्रमवर्ज तो, करित कीर्तनही घन गर्जतो ॥ २३ ॥
मिळोनि गातां प्रभुवेणुसंगें, ह्मणी चढे गर्जन त्या प्रसंगें ।
शंका जरी यावरि हे वदावी, तथापि भक्तिद्वयभात्र दावी ॥ २४ ॥
पुढें होउनी एक जो गाय नाचे, तसे संगती गाति त्या गायनाचे ।
असा वेणु ऐकूनिही मेघ गातो, करी एकदां सर्व भक्ती अगा तो ॥ २५ ॥
रंगांतें एक हरिचे गुणगाय नाचे, संगी तसेच गुण गातिहि गायनाचे ।
ते साधिती श्रवणभक्तिहि गात सारे,बोले नृपास शुक मेघ अगा तसा रे॥२६॥
वेगळ्या नवहि भक्तिरसांचा, एकदांचि करि आदर साचा ।
कीर्तन श्रवण भक्तिहिमाजीं, सूचवी शुकमुनींद्र समाजीं ॥ २७ ॥

त्या गर्जती श्रवणभक्ति नवांच माजी
श्रीव्यास तत्सुतहि त्यां उभयां समा जी ।
येथें दिसे स्मरणभक्तिचि सूचना ही
कीं विस्मृतीस अशि हे पदवीच नाहीं ॥ २८ ॥
गोडी दिली प्रतिरसासहि जीवनानें
भक्षूनि ते विविधही जन जीवनां ने ।
भक्ति स्व ये रिति जिणें स्मृतिजीवनानें
तेही नवांत गणिली जगजीवनानें ॥ २९ ॥
हे सूचली स्मरणभक्तिहि मानवांत
श्रेष्टत्व दाखवि जिचा महिमा नवांत ।
भूमीवरी पडति मेघतुषार कांहीं
तें पादसेवन गमेचि शुकादिकांही ॥ ३० ॥

---

१ व्याख्या—मेघ तर मोठ्यानें गर्जेना, कदाचित् मुरलीहून आपला ध्वनि उंच चढेल ह्मणून मंद गर्जतो असें ह्मणावें तर उगीच कां बसत नाहीं.तसेंच मेघ घटकाभर वर्षाव करतो घटकाभर यांबतो ह्याचें कारण काय ? तर ह्याचें कारण शुक असें सांगतात कीं घन हा श्रवणभक्तीमध्यें कीर्तन भक्तिही करितो.२ आनंदाचे भरींत. ३ " ऐकोनि गाति सह गायक गाय नाचे । तैशा रिती श्रवणभक्तिहि गात सारे" असा पाठ आहे. ४ उदकानें. ५ जीविस्वास. ६ कृष्णानें. ७ नवविध भक्तींत. ८ बारीक थेंब.

ह्मणे मुनी कीं सुमनें करूनी, वर्षे सख्यातें घन त्यावरूनी ।
धुतां जलत्वें पद या प्रकारें, सेवी तुषारें सुमनानुकारें ॥ ३१ ॥
भूमि हे चरण माधवजीचे, सृष्टिपुष्टिहि पदें भव जीचे ।
वर्षतां क्षितिवरी सुमनांतें, पादसेवन घडे सुमनातें ॥ ३२ ॥

वर्षे तुषार परि ते सुमनें शुकानें
भावें अशा कथियलीं अति कौतुकानें ।
कीं मूर्तिचे पदहि धूवुनि अंबुदानें
पुष्पांजळी मग दिली निजअंबुदानें ॥ ३३ ॥

चरणिं तोयदें सेवि तसा पडे, निववितां तनु.अर्चन सांपडे ।
स्नपनें देत भजे कुसुमांजळी, सुमनशब्दें तसा महिमा जुळी ॥ ३४ ॥
नमस्कार सर्वात्मभावें करीती, जळींही तया देव तो एकरीती ।
वरूनी घन स्तब्ध तो वंदनाची, करी भक्ति नंदाचिया नंदनाची ॥ ३५ ॥
गीतेंतही अर्जुन वंदनातें, श्रीविश्वरूपा यदुनंदनातें ।
मागें पुढेंही करि सव्यसाची, सख्या नमी तो घनही तसाची ॥ ३६ ॥
मागें पुढें वंदन तुज पायीं, तूं सर्व वंदू तुज सर्वठायीं ।
अनंतसामर्थ्य पराक्रमी तू, सर्वांपटीं जाणसि सर्व तंतू ॥ ३७ ॥

## प्रसंग ३.

नवविधा असि भक्ति घना घडे, भ्रमकेंवाडहि जीस्तव कुघडे ।
भजति आणिक गौळणि वायका, ह्मणति अद्भुत हें तुह्मि आयका ॥ १ ॥
स्थळीं स्थळीं गौळणि या रितीच्या, कथा करीती कमलापतीच्या ।
कोणी यशोदेस समीप होत्या, निरोपिती तीप्रतीही अहो त्या ॥ २ ॥
यशोदे तुझा पुत्र वंशस्वरांनीं, सुधा ओष्ठिंची वर्षतो या स्वरांनीं ।
तई भोंवतें मोहती देवजाती, जयांचीं मनें उन्मनेवास जाती ॥ ३ ॥
कमलसंभव आणिक शंकर, त्रिदशनाथ सर्वे सुर किंकर ।
ह्मणति सर्वहि त्यास नमो हरी, करुनि मोहित जो मन मोहरी ॥ ४ ॥

१ पुष्पें. २ मेघानें पाय धुऊन पायावर तुषार पाडिले हीच त्यानें पुष्पांनीं त्याची पूजा केली. ३ " तुष्टि पुष्टिहि पदीं भव जीचे " असा एक पाठ आहे. ४ फुलें. ५ मेघ तुषार, वर्षला, परंतु शुक त्यास कृष्णाचे पायावर पुष्पवृष्टि मानिता झाला. ६ मेघानें. ७ आपल्या जलदानानें. ८ मेघ. ९ स्नान. १० मुलगा. ११ " नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोस्तु ते सर्वत एव सर्व ॥ " इत्यादि भगवद्गीता अध्याय ११ श्लोक ४०. १२ भ्रांतिरूप दरवाजा. १३ यशोदेप्रति. १४ वेणुनादानें. १५ तोंडांतील अमृत ध्वनिरूपानें वर्षतो. १६ आपल्या रानांत. १७ देवलोक. १८ आनंदाचें वेड. १९ ब्रह्मदेव. २० इंद्र. २१ चाकर. २२ मोही.

कीं ताळ कीं मंद असें कळेना, रागस्वराचें घरें आकळेना ।
रसाचेंमध्यें अवघे बुडाले, विचार ज्यांच्या मतिचे उडाले ॥ ५ ॥
भरें रसाच्या अतिनम्रमाना, मूर्ती अशा सर्वहि वर्त्तमाना ।
सभोंवते ये रिति देवजाती, नादामृतामाजि बुडोनि जाती ॥ ६ ॥
टाकूनि लज्जा स्थिति लोकरीती, वार्त्ता यशोदेप्रति त्या करीती ।
निर्लज्जतेनें व्रजगोपदारा, आणीकही वर्णिति त्या उदारा ॥ ७ ॥
पशुखुरीं बहु खिन्न वसुंधरा, सुत तुझा अवलोकुनि ते धरा ।
अधरिं वेणु धरी श्रम तो हरी, वर्षतो रस तो तिस तो हरी ॥८॥
सुत तुझा क्षितिचें कुशल क्षणें, करि पदें ध्वजअंकुशलक्षणें ।
चरण लावुनि वो जलजा तसे, गजगती जगतीवरि जातसे ॥ ९ ॥
मुखीं वेणु ऐसा वनामाजी वागे, गमे सौख्य देतो क्षितीच्या जिवा गे ।
यशोदे अशा लावितां तीस पाय, स्मरें आमुचा थोर केला अपाय१०
जो अशा रिति वनांत हरी तो, भूमिचा श्रम अशेष हरीतो ।
वाजवी मुरलि दैत्यजनारी, त्या रसेंचि भुलल्या व्रजनारी ॥ ११ ।
अशामाजि वो चालिलों काननातें, विलासें पहाया मृगांकाननातें ।
यशोदे दुरूनीच तुझ्या कुमारें, मनें मोहिलीं व्यापिलीं जें कु-मारें १२
तरु स्तब्ध नेणे जशा लोकरीती, तशा गोपिका भाव तेव्हां करीती ।
शिरीं[18] मोकळे केश वस्त्रें गळालीं, मनें मोहिलीं येरितीं वेगळालीं ॥ १३ ॥
दुरुनि हो व्रजनाथनिरीक्षणीं, गलित होउनि जाय निरी[20] क्षणीं[21] ।
मन मुरे पवनीं चळतां सरे, शिथिल होउनि अंबरें[22] नीसरे[23] ॥१४॥
ऐशाच आणीकहि गोपदारा, लीला हरीच्या वदती उदारा ।
कीं मोजितो नंदकुमार गाई, आश्चर्य तेव्हां करि वो अगाई ॥ १५ ॥
देव ज्यास ह्मणताति नमो[24] जी, तो वनांत हरि गोधन[25] मोजी ।
कंधरीं[26] तुळशिहार करीं तो, घेउनी गणित कृष्ण करीतो ॥ १६ ॥

---

१ स्वराचें स्थान. २ आनंदरस. ३ वेणुध्वनीच्या अमृतामध्यें. ४ लौकिक वर्तन. ५ पृथ्वी. ६ वर्षाव करतो. ७ पृथ्वीचें. ८ एक घटकेंत. ९ ध्वज अंकुश इत्यादि ज्यावर लक्षणें आहेत अशा पावलानें. १० कमळासारखे. ११ पृथ्वीवर. १२ सगळा. १३ दैत्यांचा शत्रु कृष्ण. १४ अरण्यास. १५ चंद्रवदन अशा कृष्णास. १६ कु–मारें ह्म० नीच मदनानें. १७ गोपिका मूढ होऊन तरूप्रमाणें स्तब्ध झाल्या व लोकरीति सर्व विसरल्या. १८ डोक्यावर. १९ अवलोकन केल्याबरोबर. २० वस्त्रग्रंथि. २१ क्षणांत. २२ वस्त्र. २३ निसरून जाई. २४ नमस्कार. २५ गाई. २६ कंठीं, गळ्यांत.

प्रिय अनुचर गौळी धन्य खांदा तयांचा
तदुपरि भुज जो या मुक्तिच्या दातयाचा ।
धरुनि तुळसिमाळा दूसरा बाहु भारी
व्रजपशुगणनेला* कंठभारी उभारी ॥ १७ ॥

असा गोधनें मोजितो आणि गातो, करीतो सुखी वेणुनादें जगा तो ।
अशाही विलासांत आश्चर्य दावी, मृगी मोहिल्या गोष्टि तेही वदावी ॥१८॥
व्रजवधूंसम हो हरिणी हरी, करि मनें मुरलीध्वनि जो हरी ।
वसति त्यां धरुनी प्रभुसंगती, पतिसुतादिसुखांत न रंगती ॥ १९ ॥
वाटे न ज्यांला मृग कृष्ण नाथ, स्व-स्वामिही मानिति कृष्णनाथ ।
या कृष्णजीच्या गृहिणी गणाया, लेखा स्वसांम्यें हरिणीगणा या ॥ २० ॥

व्रजयुवति गृहाशेपासुनी नित्य मुक्ता
फिरति धरुनि चित्तीं जेविं या नित्यमुक्ता ।
रुचि तशि न मृगींला या मृगांकाननांची
तनु नयनिं पहाती श्रीमृगांकाननाची ॥ २१ ॥

हरिसमीपचि केवळ राहती, परिसती मुरली मुख पाहती ।
व्रजवधूंसम पावलिया गती, मग तसें अधरामृत मागती ॥ २२ ॥
यशोदेपुढें आणिखी गोपदारा, अशा वर्णिती कृष्णलीला उदारा ।
ह्मणे निर्मिले दिव्य जे दामें कुंदीं यशोदे बहू शोभती ते मुकुंदीं ॥२३॥
हार शोभति गळां व्रजपाळा, भोंवता पशुपगोव्रजपाळा ।
वेणु गोड अधरीं स्वकरीं तो, कौतुकेंच यमुनेंत करीतो ॥ २४ ॥
ह्मणति गौळणि वत्स तुझा हरी, व्रजवधूजनचित्त अवो हरी ।
मुरलिमाजि विनोदकळा करी, ह्मणतसे सुख देइन लौकरी ॥ २५ ॥
भिउं नका ह्मणतो तुह्मि कामिनी, दिवस जाउनि पातलि यामिनी ।
करिन जें अति इष्ट तुह्मां असे, करि विनोदहि वेणुमधें असे ॥ २६ ॥
असा उभा हो यमुनातटाकीं, विनोदवाणी मुरलींत टाकी ।
समीर तेव्हां मलयाद्रिवासी, हळू हळू सेवित माधवासी ॥ २७ ॥

---

१ सेवक. २ मुक्ति देणारा हा कृष्ण त्यांचे खांद्यावर हात ठेवितो. ३ हरिणी. ४ "वसति त्याहि अशा पदसारसानवळि ज्यां न गमे मृग सारसा" असाही पाठ आहे. ५ हरिणीला. ६ पति. ७ प्रपंचाची आशा. ८ कृष्णाची. ९ "मुरलि वाजवितां मुख पाहती." असाही पाठ आहे. १० माळा. ११ कुंदपुष्पांनीं केलेल्या. १२ पशुप ह्मणजे गवळी, गोव्रज ह्म० गोसमुदाय आणि पाळा ह्म० त्यांचा वेढा. १३ गोकुळांतील वधूंचें मन हरण करी. १४ रात्र. १५ मलयपर्वतसंबंधी वायु; दक्षिणवायु. * मोजण्यासाठीं.

उभे भोंवते वृंद वृंदारकांचे, गळां हार वो कुंदमंदारकांचे ।
असे वेष्टुनी पूजिती सर्व देव, दिसे हा स्वयें त्यांत देवाधिदेव ॥ २८ ॥
असा गोधनाच्या श्रमातें हरीतो, करार्या सुखी अमृतेंही हरी तो ।
करीती नमस्कार तों वृद्ध वाटे, तयां देखतां दुःख आह्मांस वाटे ॥२९॥
गोंविती जरठ नंदनंदना, टोणपे पडति आड वंदना ।
शीघ्र सोडिति तया न वाट ते, गोष्टि हे विषसमान वाटते ॥ ३० ॥
त्वरा यावयाची तुझ्या नंदनातें, न मानीच हा इष्ट त्या वंदनातें ।
यशोदे असें वर्म त्यांला कळेना, मनोभाव वृद्धां तयां आकळेना ॥३१॥
वनीं सेविती वृद्ध पद्मासनादी, व्रजीं चालतां वंदिती तो अनादी ।
असा लागतां वेळ येतां उदारा, व्रजीं अंगुळ्या मोडिती गोपदारा॥३२॥
अशा संकटें पावतां गोकुळातें, सुखें दे समूहा वियोगाकुळातें ।
तयावीण जो रोग नेत्रीं हरी तो, स्वसंदर्शनाच्या सुधेनें हरीतो ॥३३॥
खुरांचा धुरोळा मुखीं आणि हारीं, व्रजीं येतसे कृष्ण ऐशा विहारीं ।
दिनांतीं असा धेनुवृंदांत वाटे, शशी देवकीगर्भसंभूत वाटे ॥३४॥
मंदविघूर्णित वो नयनांचळ, व्रजवधूंवरि ते करि चंचळ ।
शशि चकोरकुळीं सुख दे तसे, विविध मान वधूंप्रति देतसे ॥ ३५ ॥
कुंडलें जडित दीप्ति फांकली, दाविती दिनमणीस वांकुली ।
धूलिधूषितहि गंडमंडळीं, स्वप्रभा मिरविली सुकुंडलीं ॥ ३६ ॥

यदुपति दिवसांतीं ये रितीं पातलों गे
गजपतिगतिं येतां गोड चित्तांत लागे ।
मुदितवदन सांजे ये जसा चंद्रमा गे
सुखकरपण ज्याला व्योमिंचा चंद्रमा गे ॥ ३७ ॥

स्वगोधनें लक्षितें ये हरी तो, दुःखें दिगंतींहुनिही हरीतो ।
गाई सुखी ये रितिनें करीतो, देणार आह्मां सुख लौकरी तो ॥ ३८ ॥

---

१ देवांचे २ कुंद व मंदार पुष्पांचें. ३ गाई. ४ आह्मांस. ५ वृद्ध. ६ अड वैगारे. ७ बोटें. ८ वियोगानें व्याकूळ झालेल्या गोपीसमूहास. ९ आपल्या दर्शनामृतानें. १० गाईच्या खुरांनीं उधळलेली धूळ. ११ हारावर. १२ लीलेनें. १३ सायंकाळीं. १४ चंद्र. १५ मदानें फिरणारे. १६ नेत्रप्रांत; नेत्रांचे कोपरे. १७ पक्षिविशेष. १८ कर्णभूषणें. १९ सूर्य. २० वेडावून दाखविती. २१ गाल प्रदेशीं. २२ संध्यासमयीं. २३ आला. २४ हत्तीच्या गतीनें. २५ आनंदयुक्त. २६ आकाशांतील. २७ पहात. २८ चारी दिशांपासून

प्रतिदिनीं दिवसा भजनोयका, स्मरति ये रितिनें भजनोयका ।
रमति त्याचसवें प्रतियामिनी, हरिविण क्षण नेणती कामिनी ॥३९॥

निशा कृष्णध्यानीं प्रिय विषयनिष्ठा दिवस तो
निजे रात्रीं जागा जडजन दिनीं त्या न वसतो ।
हरीचे जे दास क्रमिति हरि गाऊनि दिस ते
तिये रात्रीं ध्याती तरि असिच गोपींस दिसते ॥ ४० ॥

व्रजांत जो जागृत लोक सारा, जों या कथा वर्णित लोकसारा ।
कृष्णांगसंगार्थ निघोनि जाया, या सिद्ध तों ते डुलती निजाया ॥४१॥
अहा भाग्यवंता महागोपदारा, अशा गाति या कृष्णलीला उदारा ।
असा बोलिला श्रीशुकाचार्य राया, कथा या त्रिलोकीसही उद्धराया ॥४२॥

वामनाननमिषें वसुधेतें, धन्य कृष्ण करि वेणुसुधेतें ।
वर्णनीयगुण वर्णुनि लोकीं, तो कृतार्थ रस जो अवलोकी ॥ ४३ ॥
करी धन्य गोपाळजी वामनातें, कथाछंद लावूनि त्याच्या मनातें ।
महाभाग्य हें अन्यथा काव्यरीती, वृथा ज्या कवीलोक वार्त्ता करीती४४
हरिगुणामृत जींत पदोपदीं, अशि हि वेणुसुधा हरिच्या पदीं ।
रचुनि वंदुनि अर्पुनि वामनें, धरियला हरि नित्य नवा मनें ॥ ४५ ॥

---

## रासक्रीडा.

(कथेचा सारांश).

कात्यायनी व्रताचे समाप्तीस श्रीकृष्णानें गोपींस वर दिल्याप्रमाणें शरदृतु वेतांत एके दिवशीं पूर्णिमेचे रात्रीं वेणुध्वनीनें गोकुळांतील सर्व गोपींस वनांत बोलावून आणिलें. नंतर त्यांसहवर्तमान अनेक तऱ्हेच्या लीला करून त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण केले. त्यास 'रासक्रीडा' किंवा 'रासोल्हास' असें म्हटलें आहे.

करुनि नमन गोपीवल्लभा श्रीपतीतें
कथिन चरित त्याचें जें भवातें हरीतें ।

---

१ गोपिका. २ कृष्णास. ३ प्रत्येक रात्रीं. ४ स्त्रिया. ५ रात्र. ६ भक्ति. ७ चालवितात. ८ दिवस. ९ वामनपंडिताच्या मुखाच्या निमित्तानें. १० वेणुसुधाख्यान. ११ वामन कवीस. १२ कथेचा नाद. १३ दुसऱ्या विषयावर काव्य करणें हें वृथा; कृष्णकथापर काव्य करण्याची बुद्धि होणें हें महाभाग्य. १४ ठायीं ठायीं. १५ मनानें. १६ 'गोपीवल्लभाच्या पदातें' असाही पाठ आहे.

वरद वर दयेनें दे व्रजीं कामिनींला
मनिं धरि रमणेच्छा देखतां यामिनीला ॥ १ ॥
प्रगटतील शरदृतुयामिनी, तयिं तुह्मी मजसीं व्रजकामिनी ।
रतिं रमाल तमालतनू असा, वर वदोनि ह्मणे स्वसुखें असा ॥ २ ॥
शरत्कालरातीं फुलें पुष्पजाती, नदीचे तिरीं मोगरे कुंदजाती ।
असें देखतां आपल्या त्यां वरातें, करूं सत्य हें वाटलें श्रीवरातें ॥३॥
पूर्वेस पूर्ण उगवे शशि ज्या सुकाळीं
दे औषधीस सुख त्या स्वकळासुकोळीं ।
दिक्सुंदरीमुख उटी पति यामिनीचा
जाणों सुकुंकुमकरें प्रिय कामिनीचा ॥ ४ ॥
चंद्रप्रभा करित थोर खमंडलाला
देखोनि त्या हरि अखंडित मंडलाला ।
जो वाजवी स्वरगतीं व्रजराज पांवा
नाशावया मरण तीव्र जरा जपावा ॥ ५ ॥
तो इंदु सुंदर रमावदनासमान
देखोनि दे व्रजवधूवदनास मान ।
कीं या अगे ह्मणुनियां व्रजराज पांवा
जो वाजवी हरि मनीं चतुरीं जपावा ॥ ६ ॥
कृष्णानुरक्ता पहिल्यांच होत्या, वेणुध्वनी आयकती अहो त्या ।
आधींच कृष्णीं सकळा सकामीं, पांवा करी फारचि वृद्धि कामीं ॥ ७ ॥
वेणु तो परिसतां व्रजदारा, चालिल्या त्यजुनियां गृहदारा ।
टाकिलीं सकळही गृहकामें, व्याकुळा परम होउनि कामें ॥ ८ ॥

---

१ वर देणारा. २ गोकुळांत. ३ गोपिकांना. ४ रात्रीला. ५ तमालवृक्षाचे पानासारखा सांवळा. ६ पुष्पसमूह. ७ जाई. ८ कात्यायनी देवीचें व्रत केलें तेव्हां लेला वर. ९ लक्ष्मीपति. १० त्या पूर्णचंद्राच्या कळा. ११ विपुल. १२ पूर्व दिशा हीच ज्याची सुंदरी ह्मणजे वधू तिचें मुख. १३ उजळ किंवा टवटवीत करी. १४ रात्रीचा पति ह्मणजे चंद्र. १५ उत्तम कुंकवाचा तिलक लावून. १६ आकाशमंडल. १७ स्वैरगति; स्वेच्छ. १८ कृष्ण. १९ मुरली. २० जन्ममरणापासून मुक्त होण्यासाठीं. २१ चंद्र व लक्ष्मी यांच्या वदनाप्रमाणें गोपींचें सुंदर वदन पाहून त्यास मान देता झाला. २२ 'अगे तुह्मी इकडे या' असें ह्मणून. २३ चतुर पुरुषांनीं. २४ अनुरक्त. २५ मदनाची वृद्धि. २६ व्रजस्त्रिया. २७ घर दार. २८ मदनानें.

दुहिति[1] त्या त्यजिती निजदोहनें, मन असें हरिलें मनमोहनें ।
त्यजुनि रांधण[2] वाढण धांवल्या, त्वरित कृष्णपदाप्रति पावल्या ॥ ९ ॥
स्तन धरूनि मुखीं पिति लेंकरें, त्वरित लोटुनियां निकरें करें ।
द्विरदराजगती[3] गजगामिनी, हरिस पावलिया व्रजकामिनी ॥ १० ॥
त्यजुनि पतिस एकी[4] सेवितां त्या पतीतें
मधुरमुरलिमोहें पावल्या श्रीपतीतें ।
त्यजुनि अशन[5] आल्या त्यांचिया आननांत[6]
कवळ[7] हरिस त्याहि पावल्या काननांत ॥ ११ ॥
कृष्णगीत रुचतां श्रवणातें[8], कर्मकांड[9] रुचि दे कवणातें ।
भीक कां नृपतिनें उकळावी, या कथेंत अशि गोष्टि कळावी ॥ १२॥
परिसतां व्रजराजकथारसा, मधुपचित्त[10] मिळे पदसारसा ।
करिति कर्महि ते नर मागुती, हरिकथांचि तयां परमा गती[11] ॥ १३॥
कथारसीं चित्त निमग्न सारें, कर्में जडें सर्व तयां असारें ।
व्यत्यस्त[12] होतें जरि तें करावें, कां काननीं नीर चिरें भरावें ॥ १४ ॥
सव्यें करूनि करितो पितृतर्पणातें, यज्ञोपवीत अपसव्य सुरार्पणातें[13] ।
देवां स्वधा[14] ह्मणउनी यजितां वदे तो, स्वाहा ह्मणोनि पितरां तिलपिंड[15] देतो १५
व्यत्यस्त[16] ऐसें करि कर्म सारें, ज्याला हरीचीं श्रवणादि सारें[17] ।
आल्या तशा वेणुरवें करूनी, व्यत्यस्त वस्त्राभरणें[18] धरूनी ॥ १६ ॥
कटीं[19] शेले शाला कनकमय[20] ओळीं मिरवती
शिरीं नेसायाचीं धरिति वसनें दिव्य[21] युवती ।
पखेवाळ्यां[22] नाकीं श्रवणिं झळके नासिकमणी[23]
हरीतें जे पावे वरि भलतसें तेंचि रमणी ॥ १७ ॥

---

१ गाईच्या धारा काढीत असतां. २ स्वयंपाक. ३ हत्तीच्या गतीनें. ४एकजण. ५ भोजन. ६ मुखांत. ७ घास तोंडांत तसाच असतां त्या हरीकडे काननांत आल्या. ८ कानास. ९ यज्ञयागादि कर्मे. १० चित्त हें भ्रमर होऊन पदकमलावर जातें. ११उत्तमगति. १२ विपरीत; उलट. १३अपसव्य करून देवतांचें तर्पण करितो. १४ देवतांस आहुति किंवा भाग देतांना स्वधा ह्मणावें व पितरांस देतांना स्वाहा ह्मणावें. १५ तिलांजलिसहित पिंड. १६ उलटें. १७ सारभूत. १८ जेथील भूषणें व वस्त्रें तेथें न घालतां अन्य ठिकाणीं घालून; हें पुढील श्लोकांत व्यक्त केलें आहे. १९ कमरेंत. २० सोन्याचीं वलयें. २१ नेसण्याचीं दिव्य वस्त्रें डोक्यास गुंडाळलीं. २२ पंखवाळया इत्यादि कानांतील भूषणें त्यांनीं विसरून नाकांत घातलीं. २३ नथ.

नहो वीतरागी धरी लोकरीती, हरिप्राप्तिविघ्नें अशीं जे करीती ।
स्वमाता पिता बंधु संतान वारी, तया मानिती अंतरें दानवारी ॥ १८ ॥
स्वजनवर्जित जे हरिसेवनीं, कुशल लंघुनि त्यांत वसे वनीं ।
व्रजवधूगमनीं शुकवैखरी, प्रगट गोष्टि अशीच वदे खरी ॥ १९ ॥
पिता माता भ्राता स्वजन जरि गोपींस वरजी
तरी आल्या जेथें वनिं कमलजाप्राणवर जी ।
हरीतें पावावें त्यजुनि सकळांतें शुभजनीं
प्रवर्तावें ऐसें कुशल मतिनें आशु भजनीं ॥ २० ॥
आल्या अशा जवळि ज्या व्रजगोपदारा
देणें असेच सुख त्यांस तया उदारा ।
ऐसें असोनिहि विपर्ययताचि दावी
शब्दांत कीं स्वगतभक्ति तयीं वदावी ॥ २१ ॥
सभाग्याहो येणें मजजवळि हें उत्तम परी
करूं कैसें बोला प्रियहि तुमचें एतदुपरी ।
व्रज स्वस्थ क्षेम प्रथम मज सांगाच सकळा
कळावें कां ऐशा पळत तुम्हि आलांत विकळा ॥ २२ ॥
ह्मणे गोपिकांतें अघाचा अराती, तुह्मी गोजिऱ्या आणि हे घोर राती ।
जयांचा दिसे सूक्ष्म दृष्टीस माजें, स्त्रियांचा असा या वनीं कां समाज ॥२३॥
करीती गज व्याघ्र मोठे चपेटे, विषें तक्षकांच्या भडाग्नीच पेटे ।
मरे जो भरे या वनीं आड वाटे, तयाची तुह्मां काय हो चाड वाटे ॥२४॥
यालागिं मूढपण हें सहसा त्यजावें, वेगें व्रजासि परतोनि अगत्य जावें ।
काढी मुखामधुनि शब्द असा हरी तो, जाणों तयां प्रबल अंतक संहरी तो २५

---

१ वैरागी. ह्या श्लोकाचा अन्वयः–जे माता पिता, व बंधुजन, वैरागी होऊं नका, लोकरीति धरा, असें सांगून हरिप्राप्तीस विघ्नें करितात त्यांस, दानवारि अंतरला असें गोपी मानीत. २ दैत्यांचा शत्रु कृष्ण. ३ वाणी. शुकाचार्य ह्मणतात, जसे वैरागी स्वजन सोडून हरिप्राप्तीसाठीं अरण्यांत जाऊन राहतात तसें हें गोपींनीं केलें. ४ आड आलें. ५ कमलजा ह्म० लक्ष्मी तिचा प्राणवर ह्मणजे प्राणपति अर्थात् कृष्ण. ६ उलट गोष्ट; विपरीत भाव. ७ 'प्रिय तुमचियाही तदुपरी' असा एक पाठ आहे. ८ विकल ह्म० दुःखी होऊन. ९ अघासुराचा शत्रु. १० सुकुमार. ११ रात्रि. १२ कंबर. १३ समुदाय; 'स्त्रियांचा असा काननीं ये समाज' असाही पाठ आहे. १४ मार; नाश. १५ सर्पांच्या. १६ शिरतो. १७ आवड. १८ यम.

मुखपणें मुख इंदुचि बोलतो, परि करी प्रलयार्कचि बोल तो ।
म्हणुनि त्या न पहाति तदाननां, प्रभु म्हणे अवलोकिति काननां ॥ २६ ॥
पहायांसि आलों असों काननातें, अहा वाटलें हें मृगांकाननातें ।
असें त्यासि वाटे म्हणूनी हरी तो, स्वशब्दार्थ दावूनि चित्तें हरीतो ॥ २७॥
वन विचित्र असें तुह्मि देखिलें, स्वहृदयीं कुसुमांकित रेखिलें ।
लखलखी परिपूर्ण सुधाकरें, निवंवि जो अवघी वसुधा करें ॥ २८ ॥
मंद. वेग यमुनापवनाचे, लोल पल्लव समीप वनाचे ।
देखिल्या सकळ कौतुकरीती, ज्या मनास सुखहेतु करीती ॥ २९॥
वन असें तुह्मि सुंदर पाहिलें, परि गृहीं गृहकारण राहिलें ।
हुडकिती सुत बंधु पिता पती, तडफडूनि तुह्मांवरि तापती ॥ ३० ॥
हरिकडे न पहाति चहूकडे, नयन चाळिति तों शेंर रोकडे ।
हृदय भेदिति यास्तव त्या वधू, प्रभुसि पाहति कीं वधितो विधू ३१
जरी पावल्या दुःख पोटांत नारी, पहातीच सप्रेम त्या पूतनारी ।
अशातें पुन्हा होय जे शल्यवाणी, वदे ते न जीमाजि कौशल्य वाणी ३२
अशा स्नेहीं माझ्या जरि खवळल्या आशय असा
तरी ध्यानीं कीर्तिश्रवणगुणगानीं तुह्मि असा ।
अशी ध्यातां गातां श्रवण करितां भक्ति कवळे
न तैशी कामानें मजजवळि अत्यंत विकळे ॥ ३३ ॥
होतो स्वधर्म मज अर्पिति मानवाचा
तो एक योग करि भक्तिसुखानुवाचा ।
स्त्रीधर्म यास्तव तुह्मीं पहिले करावे
संक्षिप्त भक्तिनिधितें मग ऊंकरावें ॥ ३४ ॥
निशिदिनिं पतिसेवेकारणें अंग नाचे
कपटरहित धर्म श्रेष्ठ ही अंगनांचे ।

---

१ प्रलयकालींचा सूर्य. २ त्याच्या मुखाकडे. ३ अरण्य. ४ मृगांक म्हणजे चंद्र त्याप्रमाणें मुख ज्याचें असा कृष्ण. ५ फुलांनीं भरलेलें. ६ पूर्ण चन्द्रानें. ७ शीतल करी. ८ किरणांनीं. ९ लोल; चंचल. १० कृष्णाकडे पाहिलें तर कामशर लागून हृदयभेद होई. ११ कृष्ण चंद्रासारखा शीतल असून त्रास देतो, १२ कांट्याप्रमाणें टोंचणारे शब्द. १३ जिच्या मध्यें. १४ कुशलतेची कमताई. १५ ' ऊतरावे ' असाही एक पाठ आहे. १६ आंगमेहनत करावी. १७ पतिसेवेसाठीं अंग नाचणें इत्यादिक्रियांचे धर्म श्रेष्ठ हेत.

प्रिय जनहि तयांचें पोसणें संततीचें
कुल सफल म्हणूनी मानिती संत तीचें ॥ ३५ ॥

बहुत धर्म तिचे कथिले प्रियें, गमति तीं वचनें अति अप्रियें ।
सुरतभग्नमनोरथ झालिया, नयनिं शोकनद्या स्फुट आलिया ॥ ३६ ॥

ऐकूनि हे प्रियमुखें सुखहीन वाणी
केलीं रडूनि वदनें अति दीनवाणीं ।
चिंताब्धिमग्न मन भग्नमनोरथानें
निष्कुंकुमें करि सकज्जल नीर थानें ॥ ३७ ॥

ज्याकारणें त्यजिति सर्वहि गोपदारा
तो शत्रुतुल्य वदतो प्रिय त्या उदारा ।
सप्रेमकोपसहिता पशुपालकांता
हें बोलती पुसुनि नेत्रजल स्वकांता ॥ ३८ ॥

अहा हो गोविंदा वचनशर हे भग्न हृदया
करीती ये वाचे न दिसति तुझ्या योग्य सदया ।
पदांपाशीं आलों त्यजुनि अबला सर्व विषयां
न आम्हां या योग्या अतिकठिण गोष्टी सविषयां ॥ ३९ ॥

आलोंचि ज्या त्यजुनि सर्व तुतें वराया
त्यांशीं कसा वदसि अप्रिय देवराया ।
जैसे मुमुक्षु जन सेविति वासुदेवा
तैशाच कीं भजतसों तुज वाछुं देवा ॥ ४० ॥

तरि मुमुक्षुजनांसि दया करीं, युवति या धरिं रे सदया करीं ।
न धरूं मुक्तिचिही परि कामना, तुजविणें छळिती हरि कां मना ॥ ४१ ॥

आतां स्त्रियांस पतिपुत्रजनानुवृत्ती
धर्मज्ञ तूं वदसि धर्मपथप्रवृत्ती ।

---

१ मुलांचें संगोपन करणें. २ त्या स्त्रीचें कुल सफल झालें असें संत मानितात. ३ चिंतासमुद्रांत बुडून गेलें. ४ केशररहित. ५ काजळानें युक्त नीर म्हणजे अश्रु त्याच्या योगानें स्तनावरील केशराची उटी धुऊन गेली असा अर्थ. ६ प्रेमयुक्त रागानें गोपी बोलतात. ७ आपल्या प्रभूला. ८ वाग्बाण. ९ स्त्रिया; आश्रयरहित स्त्रिया. १० विषयांचा किंवा संसाराचा त्याग करून. ११ विषयुक्त. १२ मोक्षाची इच्छा करणारे. १३ सुंदर स्त्रिया; 'तुज सेवसेवा' असाही पाठ आहे. १४ मोक्षेच्छु. १५ हातामध्यें. १६ 'न धनमुक्तिचि ही वरि कामना' असाही पाठ आहे. १७ पति पुत्र इत्यादिकांशीं वागणूक. १८ धर्ममार्गानुसरण.

तो तूंचि सर्व जगदीश गुरु विशेष
झालासि तें तव पदींच पडो अशेष ॥ ४२ ॥
चर अचर तरंग श्रीगुरु सिंधुसारा
तरि इतर जडत्वें भाविजे कां पसारा ।
ह्मणुनि ह्मणति गोपी तूं गुरु देवराया
पति सुत पेद तूझें तेंचि हो दे वराया ॥ ४३ ॥
धरुनि अद्वयें आश्रय कामिनी, निजगळां पडती गजगामिनी ।
ह्मणसि तूं जरि हें न भलें असे, भजनिं मार्ग अनादिच हा असे ॥ ४४ ॥
दुःखप्रदा त्यजुनि सर्व गृहक्रतूंतें
नित्यप्रिया भजति संत अवक्र तूंतें ।
एवं दिला वर कृपा करिं तेंचि साची
कां छेदिशी तुझिच आसें बहु दिसांची ॥ ४५ ॥
स्वर्गासि रक्षक मुकुंद तसा व्रजाला
हा विश्वमंगलें तुझा अवतार जाला ।
यालागिं ठेवूनि करां अभयप्रदासी
तप्तस्तनी शिरिंहि या विनवीत दासी ॥ ४६ ॥
गृहस्थांच्या दारा त्यजुनि गृहदारा स्वबटकी
फुका कां होती या ह्मणुनि हरि हो गोष्ट लटकी ।
झणी मानी ऐसें मनिं भिउनि गोपी झडकरी
तुझे रूपें केल्या ह्मणति गरती या विधिकरी ॥ ४७ ॥
वक्त्रमंडित सुरत्नकुंडलीं, तेज तें उभय गंडमंडलीं ।
देखतां सरळ रम्य नासिकां, होतसों फुकट सर्व दासिकां ॥ ४८ ॥
अधर शोणित पातळ चांगले, खदिरपर्णरसें अति रंगले ।
अमृत इच्छुनियां दिनयामिनी, बटकि होत असों व्रजकामिनी ॥ ४९ ॥

---

१ श्रीगुरु हा समुद्र याचे चराचर पदार्थ हे तरंग ह्म० लाटा आहेत. २ तुझे पद हेंच आह्मांस पति सुत इत्यादि होत ह्मणून तेंच आह्मांस दे. ३ वटपत्रादि समस्त प्रपंच ब्रह्मच आहे असा भाव गोपींनी मनांत धरून. ४ गृहयज्ञ. ५ आशा. ६ संपूर्ण विश्वास मंगलकारक असा. ७ अभय देणारे असे तुझे हस्त आमच्या शिरावर व स्तनांवर ठेव. ८ मदनतप्त. ९ स्त्रिया. १० घरदार. ११ तुझ्या दासी. १२ लौकर. १३ मुख. १४ रत्नखचित कर्णभूषणें. १५ उभय गालांवर. १६ नाक. १७ बुटकी; दासी. १८ लाल. १९ कातानें व पानानें. २० रात्रंदिवस.

भ्रमर वाटति केशचि मस्तकीं, मुखसरोरुहलंपट मस्त कीं ।
सरस हास्य निरीक्षण जें करी, वदन तें करितें अजि किंकरी ॥ ६० ॥
रक्षिले शरण लोक उदंडें, ते हरी अजि तुझे भुजदंड ।
योजिती स्मरमनीं प्रमदांसी, होतसों फुकट यास्तव दासी ॥ ६१ ॥
या सुंदरा देखुनियां उरा रे, दासी नव्हे कोण हरे मुरारे ।
शोभेस त्या लुब्ध रमा रमाया, तूझी अजी नंदकुमार माया ॥६२॥
ज्या अशा त्वदधरामृतदासी, जाळिशी स्मरदेवें प्रमदांसी ।
नेदिशी जरि जितांमृतलाहो, मेलियावरि धरूं तुजला हो ॥ २३ ॥
जालिया फुकट ज्या निजदासी, जाळितोसि हरि त्या प्रमदांसी ।
या मरोनिहि तुतेंचि धरीती, हे नव्हे हरि तुझी बुध रीती ॥ ६४ ॥
स्मरण मरणकाळीं सद्य होतांचि वाचे
परमपद पदातें नेति ज्या माधवाचे ।
स्मरत मरत आहों त्यासि त्याचे वियोगें
तरि गति हरि आह्मां योगियां जेविं योगें ॥ ६५ ॥
तुझ्या गोडा गीतीं हसित अवलोकीं उजळतो
तया कामाग्नीनें व्रजजनवधूवृंद जळतो ।
ह्मणूनी जी पाजीं त्वरित अधराच्या स्वअमृता ।
वियोगाग्नीनें जों नव्हति तुझिया भस्महि मृतों ॥ ६६ ॥
स्मरहुताशन हे तुमचे पती, विज्ञविती ह्मणशील रमापती ।
तरि तुझें पद हें जयिं देखिलें, न तयिंपासुनि ते प्रिय लेखिले ॥ ६७ ॥

---

१ तुझ्या मस्तकावरील केश हे भ्रमरांसारखे वाटून, ते मस्त होऊन तुझ्या मुखकमलावर लंपट झाले आहेत असें आह्मांस भासतें. २ मुखकमल. ३ मदमत्त. ४ जें तुझें वदन सहास्य निरीक्षण ह्मणजे अवलोकन करतें तें आज आह्मांस दासी करून सोडतें. ५ दासी. ६ पुष्कळ. ७ ज्या तुझ्या भुजदंडांनीं पुष्कळ लोक रक्षिले ते भुजदंड आमच्या मनांत स्मराची योजना करितात ह्मणजे आमच्या मनांत काम उत्पन्न करितात. ८ वक्षस्थळ. ९ 'स्वाविरहें' असाही पाठ आहे, १० जितांस ह्म० सजीवांस अमृताचा लाभ; 'जितां निज लाहो' असा एक पाठ आहे. ११ शहाणपणाची रीति. १२ ज्या माधवाचें पद परमपदातें नेती असा अन्वय. १३ तुझ्या गोड गीतामध्यें व हास्ययुक्त अवलोकनामध्यें (सुळें) उजळणारा ह्मणजे पेटणारा कामाग्नि त्यानें. १४ गौवळणींचा समुदाय. १५ अहो. १६ अधरामृतपान द्या. १७ तुझ्या वियोगानें मृत होऊन आह्मी भस्म झालों नाहीं तों. १८ कामाग्नि.

मुखसुधारस टाकुनि कां मना, मृगजळीं उपजे अजि कामना ।
ह्मणुनि पाजुनियां अधरामृता, जिवविं सत्वर अद्रिधरा मृता ॥ ५८ ॥

पर नर जरि गातो गोड तो चांगला ही
न करिति कुलनारी आपुली अंगलाही ।
ह्मणशिल तरि कोण स्त्री तुतें जी न मोहे
इतरपुरुषवार्ता देवदेवा नमो हे ॥ ५९ ॥

तुझ्या या वेणूचा ध्वनि मृदु जगन्मोहन मनीं
निघे जीच्या त स्त्री कवण असि जे मोह न मनी ।
जया रूपें गाई मृग तृण अगाई विसरती
कुलाचारीं नारी तुजविण हरी कोविं सरती ॥ ६० ॥

अनाथांसें चित्तें हरुनि ह्मणसी जा स्वसदना
कसें जावें सांगा त्यजुनि मन जी इंदुवदना ।
तनू राहे देशी न पद चळतें पाउल हरी
कसें जावें ऐसें तरि अजि ह्मणावें हरिहरी ॥ ६१ ॥

खुपेल हा शब्दचि जेविं कांटा, ह्मणेल येथूनि तुह्मी निकोटा ।
यालागिं पोटांतिल कोप जाया, काकूळती बोलति गोपजाया ॥ ६२ ॥
चित्तें जया ये स्थळिंहून जावें, चित्तेंचि या भर्तसुखा भजावें ।
तें चित्त चित्तें अवघें हरूनी, कां जा ह्मणावें हट हा धरूनी ॥ ६३ ॥
जाऊनि गेहीं गृहकृत्य कांहीं, करावया शक्ति करादिकांहीं ।
चित्तेंचि यावी परि ते हरूनी, कां जा ह्मणावें हट हा धरूनी ॥ ६४ ॥
ये स्थळींहुनि कशातरि जा च, स्वामि तू करिशि हा जरि जोच ।
पाय पाउलें न येथुनि जाती, चित्तहीन विषयेंद्रियजाती ॥ ६५ ॥
स्वकर्म हें याहि कुळीं कराया, चित्ताविणें शक्ति न देवराया ।
आतां अजी काय तरी करावें, मर्गी तरी जी कवण्या भरावें ॥ ६६ ॥

अघटित हरि आतां तूजपासूनि जाणें
तदपि कराणि तुह्मी आयकावी सुकानें ।

---

१ मुख हाच सुधारस ह्म० अमृत. २ गोवर्धन पर्वत धारण करणाऱ्या. ३ आंगाची लाही; आंगाची आग अथवा संताप. ४ जगन्मोहक. ५ मानीत नाहीं. ६ अमावचून. ७ आपल्या गृहास. ८ निघून जा. ९ आग्रह. १० घरीं. ११ पीडा. १२ एक पाऊलभर सुद्धां. १३ 'शव इन्द्रियजाती' असा एक पाठ आहे. १४ विषय आणि इंद्रियें यांची जात चित्तहीन ह्म० जड आहे. १५ जावें; शिरावें. १६ असक्य.

चळेति चरण तूझे चित्त तें जो हरी तो
निजपद तिकडेहो जीकडे श्रीहरी तो ॥ ६७ ॥
न येथूनी जेव्हां ढळत पद येथें तुह्मि असा
स्वयें जातों वेगें ह्मणुनि पळशी तूं जरि असा ।
तुझ्या पायीं चित्तें चलन तुज संगेंचि चरणा
न सोडों जी तूतें त्यजसिल कसा सांग शरणा ॥ ६८ ॥
धांवों सेवें तूं जरि तीव्र जाशी, परंतु जाऊं न कधीं व्रजासी ।
कीं देहचक्रा हरि चित्तदोरी, शिक्यासवें जेविं फिरे शिदोरी ॥ ६९ ॥
हे आयकूनि शरणागत कामिनींची
देखूनि भक्ति मदकुंजरगामिनींची ।
हांसे दयें करुनियां सकळांस पाहे
त्यांशीं रमे करि रमेहुनिही कृपा हे ॥ ७० ॥
सदयहृदय जेव्हां कृष्ण गोपींस पाहे
विकसित मुखपद्में होति होतां कृपा हे ।
उडुपतिसह तारा ये रिती गोपदारा
मिरवति यदुवीराभोंवत्या त्या उदारा ॥ ७१ ॥
कृष्ण गायनविलासकलांतें, त्यांस दावित तया सकलांतें ।
घेउनी फिरतसे गजरानें, हस्तिनी सह जसा गज रानें ॥ ७२ ॥
स्त्रीवृंद अधिनें करून मनांत टाकी
आणी तया हरि अशा यमुनातटाकीं ।
जेथें समीर सुख दे स्थिरजंगमाला
सेवूनियां कुमुदमंदतरंगमाला ॥ ७३ ॥
दाखवी स्मराविलासकळांतें, कोण वर्णिल तयां सकळांतें ।
चेतवी मदन तृप्त करूनी, बालचंद्रकरजीं उकरूनीं ॥ ७४ ॥

---

१ गमन करीती. २बरोबर. ३ सत्वर. ४गोकुळास. ५ चित्तरूप दोरी देहरूप चक्रास जिकडे फिरवील तिकडे तें चक्र जातें ह्म० आमचें जिकडे चित्त तिकडे आमचा देह. ६ मत्त हत्तीप्रमाणें मंद आहे गति ज्याची अशा कामिनी. ७ त्यांच्यावर लक्ष्मीपेक्षां अधिक कृपा करी. ८ प्रफुल्लित. ९ नक्षत्रांचा स्वामी; चंद्र. १० नक्षत्रें. ११ त्या सगळ्या गायनाच्या कला. १२ दणदणून किंवा जयजयकार करीत. १३ स्त्रियांचा समुदाय. १४ स्वाधीन. १५ वायु. १६ मुकुर ह्म० कमल, मंद तरंग ह्म० मंद लाटा यांची माला ह्म० पंक्ति; कमळें व लाटा यांवरून येणारा वायु. १७ बालचंद्र ह्म० प्रतिपदेचा चंद्र; करज ह्म० नख; बाल चंद्राप्रमाणें शोभणाऱ्या नखांनीं.

आत्मत्वयोग परिपक्वहि दक्ष जाला, होऊनि तृप्तहि भजे च अधोक्षजाला ।
कामाग्नि ये रिति विझूनि रतिप्रसंगें, पेटे पुन्हा त्वरित माधवअंगसंगें॥७५॥
क्रीडेंत जे सुरतसंभ्रमभाव दावी, ते कामशास्त्रगति काय किती वदावी ।
संक्षेपरूप ह्मणऊनिच ते शुकानें, श्लोकैकमात्र कथिली रतिकौतुकानें ॥७६॥
इत्यादि देतां रतिरंगलाहो, गोपीस वाटे हरि रंगलो हो ।
आह्मीं सुरूपा त्रिजगांत नारी, हा मोहला यास्तव पूतनारी ॥ ७७ ॥
मनींच इत्यादिक गर्व झाला, या गोष्टिचा देव न तो भुकेला ।
हा गर्व जेथें न वसे हरी तो, सा शत्रु कामादिक जो हरी तो ॥ ७८ ॥
त्यांचा हरावा मदगर्व सारा, तेव्हां गमे यारिति विश्वसारा ।
अदृश्य त्यांच्या नयनांसि जाला, कीं गर्व सोसे न अधोक्षजाला ॥७९॥
बहु धन अधनातें हारपे सांपडूनी, त्यजुन सकळ धुंडी मोहफांसां पडूनी ।
हरिविण हेरिपीसें लागलें कामिनींतें, करुनि हरिचरित्रे कंठिती यामिनीतें ॥८०॥
मिळूनि गाती सकळा हरीतें, गाणें जयांचें अशुभा हरीतें ।
उन्मत्तरीतीं व्रजगोपदारा, रात्रीं वनीं धुंडिति त्या उदारा ॥ ८१ ॥
जैसा तरंगांत समुद्र साचा, प्रपंच तैसा निजचिद्रसाचा ।
त्या धुंडिती त्या पुरुषोत्तमातें, दावा ह्मणूनी ह्मणती द्रुमांतें ॥ ८२ ॥
वदें हो कल्याणी हरिचरणगोडी अतुळशी
दिसे तुझ्याठायीं ह्मणुनि पुसतों माय तुळशी ।
तुझ्या माळा कंठीं भवकलभकंठीरव धरी
असे कोठें झाली अनलविरहाचीच लहरी ॥ ८३ ॥
रे चंपका कुरवका तिलका अशोका
छेदा अरे त्वरित कृष्णवियोगशोका ।
जो दे तुह्मांसि सुख लावुनियां करातें
दावा तया स्वसुखसिंधुसुधाकरातें ॥ ८४ ॥

---

१ सुरतसमयीं. २ एकाच श्लोकांत. ३ सुरत. ४ लाभ. ५ गढून गेला; मोहून गेला. ६ कृष्ण. ७ साहा; कामादिक षड्रिपु. ८ सर्व जगताचें सार असा कृष्ण. ९ कारण. १० निर्धन मनुष्यास पुष्कळ द्रव्य सांपडून लागलीच तें गमावल्यामुळें वेड लागावें तसें गोपींस कृष्ण अदृश्य झाल्यामुळे वेड लागलें असा भावार्थ ११ वेड. १२ रात्र. १३ जीस तुलना नाहीं अशा प्रकारची हरिचरणाविषयीं गोडी तुझे ठिकाणीं दिसते. १४ कलभ ह्मणजे हत्तीचा छावा, कंठीरव ह्म० सिंह; भवकलभ कंठीरव ह्म० संसाररूप जो हत्ती त्याचा हन्ता सिंह असा कृष्ण. १५ तुमच्या सुखसागरास चंद्राप्रमाणें भरती आणणारा.

कोणी तयांत अबला पुसते क्षितीतें, रोमांचरूप दिसतो तृणवृक्ष जीतें ।
कीं कृष्णपादतळ लागलिया विनाही, होणार जें सुख असें घडणार नाहीं ८५
तूझ्या तपा न तुलना क्षिति लेश वाचे, मोजूनि पाय जिस लागति केशवाचे ।
जो स्पर्शउत्सव मनांतिल भावदावी, प्रेमांकुरीं तनुचिही किति भा वदावी ८६
गोवर्धनस्तनतटीं हरिच्या पदांतें, स्पर्शूनि दाविसि अशा तनुसंपदांतें ।
पाय त्रिविक्रमपणीं तयिं तूज लागे, हें काय तें सुख पुसों क्षिति तूजला गे ८७
कृष्ण त्रिविक्रमतनुद्वयपादपद्मा, तूं स्पर्शलीस करि वास जयांत पद्मा ।
किंवा वराहपणिं हें सुख पावलीस, आलिंगनें करुनि फार सुखावलीस ॥८८॥
अशा धुंडिती तों लता एक वाटे, दिसे तीस तो ठाउका कृष्ण वाटे ।
फुलें खुंटिलीं कृष्णजीनें सदेवें, नखस्पर्श केला ह्मणे ईस देवें ॥ ८९ ॥
नखें आपणा स्पर्शतां कैटभारी, गुंढचा देहिं रोमांचरूपें उभारी ।
लतेच्या शरीरासि कांटे स्वभावें, ह्मणे ते नखांच्या सुखाच्या प्रभावें ॥९०॥
तरू नम्र भारें फळापल्लवांच्या, तया मानिती[12] त्या स्त्रिया बल्लवांच्या ।
असें कीं करीती[13] तया वंदनातें, दुरूनीच नंदाचिया नंदनातें ॥ ९१ ॥
असें धुंडितां देखिले पाय त्याचे, वनीं आत्मयाच्या प्रिया आत्मयाचे ।
निशा चांदणी पादवि[14]न्यासमुद्रा[15], पहाती स्मरूनी तया चित्तमुद्रा ॥ ९२ ॥

अगाई कृष्णाचे चरणतल हे कीं मिरवती
[16]ध्वजी पद्मी वज्री करुन ह्मणती सर्व युवती[17] ।
अशीं त्याच्या पायांविण परम चिन्हेंचि नसती
असें जे ते बोले भरुनि उदकें लोचन[18] सती ॥ ९३ ॥

उत्पन्न येथें जलजाक्ष[19] जाला, जाणों तदारभ्य[20] अधोक्षजाला ।

---

१ एका गोपीस पृथ्वीवरील वृक्ष हे तिच्या रोमांचाप्रमाणें भासले ह्मणून तिणें पृथ्वीस विचारलें कीं हे रोमांच कृष्णाच्या पादस्पर्शावांचून उभे राहणार नाहींत. ह्मणून कृष्ण कोठें आहे, हें तुला ठाऊक आहे असा अर्थ. २ बरोबरी. ३ स्पर्शसुखाचा अनुभव. ४ शोभा. ५ गोवर्धन पर्वत हाच कोणी तुझा स्तनप्रदेश त्यानें कृष्णाच्या पदास स्पर्श केल्यामुळें तुझ्या अंगावर वृक्षरूप रोमांच उठले. पृथ्वीस ' पर्वत स्तनमंडलें ' असें विशेषण देतात. ६ तृणवृक्षरूपसंपदा. ७ वामन. ८ लक्ष्मी. ९ वराहानें तुला दाढेवर धरिली तेव्हां. १० आनंददर्शक ध्वज किंवा तोरणें. ११ लतेचे कांटे हेच रोमांच वाटले. १२ ' पुसती ' असा पाठ आहे. १३ फळें व पानें यांच्या भारानें तरु नम्र झाले ते कृष्णास दुरून नमस्कार करीत आहेत असें गोपीस वाटलें. १४ पायाचें ठेवणें; पदचिन्ह. १५ चिन्ह; खुणा. १६ ध्वज; पद्म, वज्र इत्यादि चिन्हांनीं युक्त १७ तरुण स्त्रिया. १८ डोळे. १९ कमलाक्ष कृष्ण. २० तेव्हांपासून आह्मी त्यास ओळखतों.

जो आमुचा नंदकुमार साचा, हा मार्ग त्याच्या पदसारसाचा ॥ ९६ ॥
जो रेणु दुर्लभ सुरांसि महाउपायीं, देखूनि ते धरणि मंडित कृष्णपायीं ।
अन्योन्य त्या वदति दुर्लभलाभवार्ता, आरोग्य ज्या श्रुतिसुखें करिती भवार्ता
चरणरज सर्याहो धन्य या श्रीपतीचे, शिरिं धरुनि कृतार्था होतसे श्री पतीचे ।
भवकमलभवादी आपुला ताप जाया, मिरविति मुकुटीं तें लाधलों गोपजाया।
वदति ये रिति गौळिणि लोळती, हरिपदाब्जरजीं अजि लोळती ।
फसति मागुति विस्मित बोलती, त्यजुनि शब्द मुखें मग डोलती॥९७॥
तो डोलेंही त्यजुनि चित्त हरीस पाहे, दे अंगसंग विभु त्याहुनि ही कृपा हे ।
एवं च तें स्थळहि सोडुनि त्या उदारा, मार्गें तया हुडकिती पशुपालदारा९८
असें धुंडितां धुंडितां त्याच मार्गें, पदें दूसरीं देखिलीं त्याच मार्गें ।
हरीच्या पदाच्या रजांचेचि संगें, वधूचीं पदें देखिलीं त्या प्रसंगें ॥९९॥
दुःखाग्नि जो किमपि कृष्णपदीं विझाला
तों दीप्त मत्सरसमीर सवेंचि आला ।
गोष्टी मुकुंदपदभक्तिचिया उडाल्या
सापत्नमत्सरजळीं युवती बुडाल्या ॥ १०० ॥
अहाहा हें पाहा अमृत मथितां तें विष महा
उदेलें कीं जाला सम सदय आम्हां विषम हा ।
समा आम्ही रामां चतुर अभिरामा परि हरी
रमे तो एकीशीं वनिं लपत आम्हां परिहरी ॥ १०१ ॥
लपत तों अबला सकळा वधू, वधहि तो बरवा परि हे वधू ।
गिरिधराधर एक फुका पिते, स्वपद दावुनि काळिज कापिते ॥ १०२ ॥

---

१ पदकमल. २ रज. ३ अलंकृत. ४ एकमेकांस. ५ संसाररोगानें पीडितास. ६ सख्याहो. ७ लक्ष्मी. ८ आपल्यास्वामीचें चरणरज शिरीं धरून. ९ भव म्ह० शंकर आणि कमलभव म्ह० ब्रह्मदेव. १० तें (अनेकवचन) चरणरज. ११ चरणकमलाच्या धुळींत. १२ डोलणें. १३ गौळणी. १४ कृष्णाची पदपंक्ति पाहून गोपींचा विरहाग्नि थोडा शांत झाला होता तो त्याच्या बरोबर एका गोपीची पदपंक्ति पाहून मत्सररूप समीरानें (वाऱ्यानें) अधिक पेटला. १५ सवतमत्सर. १६ अमृतासाठीं समुद्रमंथन करीत असतां विष निघालें. १७ तूं सर्वच ठिकाणीं सम व सदय असतां आम्हांवर विषम कसा झालास. १८ स्त्रिया. १९ सुंदर. २० टाळतो. २१ अबला, स्त्रिया. २२ वध; मृत्यु. २३ गोवर्धन पर्वत धारण करणारा जो कृष्ण त्याचा ओष्ठ. २४ फुकट; निरर्थक. २५ आपलीं भूमीवरील पदाचिन्हें दाखवून आम्हांस दुःख देते.

हरिपदीं पेथ[1] जो विमलें[2] क्षिती, चरण त्यांतचि ते सम लक्षिती[3] ।
निकट[4] चालतसे गजगामिनी, ह्मणुनि तर्क उभारिति कामिनी ॥ १०३ ॥
बहु इणेंचि असे हरि पूजिला, सवतिरूप दिसे न रिपू जिला[5] ।
त्यजुनियां सकळा व्रजनायिका[6], परम जे रुचली व्रजनायका ॥ १०४ ॥
पुढें पाय तीचे न देखूनि वाटे, कडे घेतलीसे असें त्यांसि वाटे ।
हरीचीं पदें रुतलीं खोल भारी, गमे भार वाहे तिचा कैटभारी[7] ॥ १०५ ॥
पद तिचे दिसती न अलीकडे, तरि असेलचि वैसविली कडे ।
तृणशिखा[8] ह्मणि तीस उभी रुते, उचलिली मनिं मानुनि भीहि[9] ते ॥ १०६ ॥
पहा गोपिका हो कसा कृष्णकामी, कसे घेतसे भोग[10] ते ही[10] रिकामी ।
असें बोलती आणि धुंडीत जाती, पथीं त्याच त्या देखती पुष्पजाती[12] १०७
प्रियानें प्रियेकारणें जेविं हार, स्वयें गुंफिले दीसतो तो विहार[13] ।
अशीं लक्षितीं लक्षणें हीं सयांहो न वाटे खरें त्या पहायास याहो[14] ॥ १०८ ॥
न सारे हे पाय क्षितिस रुतले अर्ध चवडे
तिच्या ऐशा चिन्हें करुनि तरि हे गोष्ट निवडे[17] ।
स्वजांनुद्वंद्वीं[18] ती बसवुनि पुढें विश्वशरण[19]
स्वयें वेणी घाली उमटति असे अर्धचरण ॥ १०९ ॥
टेवी गंजीवरि[20] करीं करपुष्करातें[21], स्कंधीं[22] तिच्या हरि तसा करपुष्करातें[24] ।
स्थापूनि[25] चालत असे ह्मणवूनि वाटे[26], या मत्सरें तडफडा बहु होय वाटे ११०
मऊ वाळुवंटीं बहू पुष्पजाती, नये मोगरे कुंद मंदार जाती[27] ।
पदें देखिलीं त्या स्थळीं फार तीचीं, दिसों लागलीं चित्रचिन्हें रतींचीं[28] १११
तेथेंचि चिन्ह अवलोकुनियां रतीचें
त्या मत्सरें ह्मणति पुण्य अपार तीचें ।
कीं गुंफितां शिरिं फुलें वसला रमाया
देखूनियां तिचिच नेत्रविकारमाया[29] ॥ ११२ ॥

---

१ मार्ग. २ स्वच्छ; स्पष्ट. ३ पाहती. ४ जवळ. ५ आह्मी तिच्या सवती अर्थात् शत्रु आहों हें तिला दिसत नाहीं. ६ व्रजांतील स्त्रिया. ७ कैटभ दैत्याचा शत्रु विष्णु अ० कृष्ण. ८ कुसळ वगैरे शुष्क तृणाचीं अग्रें. ९ स्त्री. १० ते स्त्री. ११ फुकट. १२ पुष्पांच्या अनेक जाती किंवा प्रकार. १३ क्रीडा. १४ पाहणा. १५ सख्याहो; गडेहो. १६ पाय. १७ सिद्ध होणें; जमिनींत बोटें मात्र रुतलीं होतीं टांचा उमटल्या नव्हत्या यावरून अशी गोष्ट निष्पन्न होते कीं. १८ दोन्ही गुडघ्यांवर. १९ संपूर्ण विश्वाचें आश्रयस्थान जो कृष्ण. २० हा मिषावर. २१ हस्तीं. २२ खुंटाईंड. २३ खांद्यावर. २४ हस्तकमल. २५ ठेवून. २६ वाटेनें. २७ जाईचीं फुलें. २८ सुरताचीं अनेक चिन्हें. २९ कटाक्ष मारण्याचें कौशल्य.

पद तिचें अबलाजन लक्षिती, ह्मणति देखुनि हे मृदुल क्षिती।
उतरुनी कुसुमें व्रजशेखरें, विविध तोडुनि तीस दिलीं करें ॥ ११४ ॥
ती स्वयें हरि अखंड विरक्त, स्त्रीजनीं प्रभु न जो अनुरक्त।
कल्पवृक्षफळ दे भजनाचें, वाक्य हें जलजनाभ जनाचें।
खांदा कडे घेउनि देव दावी, कामीजनाची गति हे वदावी।
कामातुर स्त्रीवश या प्रकारें, हें दाखवी वर्ड जनानुकारें ॥ ११५ ॥

असेल स्त्रीवृंदीं किमपिहि दुरात्मत्व घडलें
तरीच श्रीकांता सह विहरणें हें विघडलें।
स्वदोषाचें आह्मां विरहफळ दावी परम तो
भली ते कीं सर्वां त्यजुनि हरि तीशींच रमतो ॥ ११६ ॥

विझाला असें बोलतां क्षिप्र ताप, प्रियाच्या पदाच्या रजाचा प्रताप।
तरी भ्रांतचित्ता न सोसे वियोग, स्त्रिया धुंडिती कीं घडो जेंवि योग ११७
अदृश्य एथें जलजाक्ष जाला, जाणों तदारभ्य अधोक्षजाला।
जो आमुचा नंदकुमार साचा, हा मोह ज्याच्या पदसारसांचा ॥ ११८ ॥
स्कंधीं प्रियेच्या भुजदंड भारी, ठेवीतसे जो मधुकैटभारी।
उरोजपाळीं स्वकरें उदारा, दावा तया बोलति गोपदारा ॥ ११९ ॥
तुह्मां आम्रवृक्षादिबिल्वां कदंबा, पुसों आणिकांहीं तरूंच्या कदंबां।
तुह्मी वंदितां ज्यासि तो मेघकाय, पहातो कृपेनें नमस्कार काय ॥१२०॥
अशा धुंडिती तों मृगी एक वाटे, दिसे ठाउका कृष्ण तो तीस वाटे।
ह्मणे पाहतां माधवाच्या मुखातें, पहा लाधली लोचनीं या सुखातें ॥१२१॥

जालीस लक्षुनि सुखी भवभंजनातें
सौंदर्य दाखविसि तें नयनीं जनातें।

---

१ मऊ. २ जमीन, ३ अनेक. ४ कल्पवृक्षाप्रमाणें. ५ जलज ह्म० कमल त्या सारखी आहे नाभि ज्याची तो जलजनाभ जो कृष्ण, त्याचे जन ह्मणजे भक्त त्यांचें वाक्य. ६ संसारबद्ध जन कामी होऊन स्त्रीस कडेवर, खांद्यावर घेऊन हिंडतो त्याचें अनुकरण कृष्णानें केलें असा भावार्थ. ७ स्त्रीसमूहांत ह्मणजे आह्मांत ८ पाप. ९ विहार, क्रीडा. १० धन्य. ११ सत्वर. १२ वेडावलेलें. १३ जेणेंकरून. १४ कमलनेत्र कृष्ण. १५ पदकमलाचा १६ " ठेवीं ठका रे मधुकैटभारी" असा पाठ ही आहे. १७ स्तन. १८ बेल. १९ कलंबवृक्ष. " तुह्मां आम्रवृक्षांनि किंवा कदंबा " असाहि पाठ आहे. २० समुदाय. २१ मेघासारखें श्यामवर्ण शरीर ज्याचें तो. २२ हरिणी. २३ वाटेनें. २४ डोळ्यांमध्यें. २५ पाहून. २६ संसारनाशक जो कृष्ण त्यास.

प्रिया तयाजवळि काम असे हरी तो
आत्मांस जो स्वविरहें प्रभु संहरीतो ॥ १२२ ॥
प्रिया एकि नेऊनिया क्षिप्र संगें, रमे तीसवें चित्र लीला प्रसंगें ।
स्तनांच्या तिच्या कुंकुमें रक्तहार, स्वकंठीं धरूनी करी तो विहार ॥१२३ ॥
तो वाटला जवळि त्यांसि जगन्निवास
ये कुंदमंद कुचकुंकुममिश्र वास ।
कीं कुंदपुष्पकृत जो प्रभुकंठहार
घ्राणीं तयांवरिल वायु करी विहार ॥ १२४ ॥
न केला मनीं गर्व तों गोपजाया, स्वयें योग्य झाली अशी हे सजाया ।
तिनेंही बहू मानितां आपणांतें, हरी अंतरे कां शिवे मीपणातें ॥ १२५ ॥
सर्वांत मी वरि ह्मणूनिच एकलीला
आणूनि त्यांतुनि करी मदनांकलीला ।
ऐसा मदें करुनियां तिस गर्व जाला
लाडें वदे वचन हें गदपूर्वजाला ॥ १२६ ॥
भागलें आजि न चालति पाय, काय यासि करितोसि उपाय ।
पाहिजे जरि असें तुज वाटे, वागवूनि तरि ने मज वाटें ॥ १२७ ॥
दे उत्तर प्रभु न होत विलंब ईस
स्कंधावरी तरि ह्मणे हरि येच वैस ।
देखूनि नम्र उचली पद सारसाक्षी
तों गुप्त होय प्रभु सारअसारसाक्षी ॥ १२८ ॥
गोपी न देखे जशि लोकपाळा, ह्मणूनि घे आपुलिया कपाळा ।
ह्मणे शिवे गर्व जिच्या मतातें, भोगेल कैसा सुखधाम तीतें ॥ १२९ ॥
ह्मणे कृष्णा कोठें त्यजुनि अजि गेलास मजला
अनर्थाचा हेतू त्वरित मज नाहीं समजला ।

---

१ अनेक स्नेहच्या. २ स्तनकुंकुमास लागून तांबडा झालेला हार. ३ क्रीडा. ४ जगाचे ठिकाणी वास आहे ज्याचा; जगद्व्यापी. ५ हारांतील कुंदपुष्पें व स्तनावरील केशर यांचा वास. ६ नाकामध्यें. ७ त्या कुंदपुष्पांचे माळेवरून येणारा वायु. ८ मी थोर आहें असा गर्व करितांच हरि दूर झाला. ९ अहंकारातें. १० मदनलीला. ११ कृष्णाचे धाकटे भावाचें नांव. १२ थकले. १३ उचलून. १४ कृष्णास वांकलेला पाहून. १५ कमलनयना. १६ सर्व द्रष्टा. १७ कृष्णास. १८ सुखाचें स्थान जो कृष्ण. १९ कारण.

तुझी मी तों दासी म्हणि मज उदासीन गमसी
फिरेनें श्रीकांता रमत तुजशीं जेंवि रमसी ॥ १३० ॥

विविध भोगितसोनिहि सोहळे, उपजले मज गर्वित डोहळे ।
निज शरीरचि म्यां अभिमानिलें, प्रभुसि गर्वभरें अपमानिलें ॥ १३१ ॥
परोपरीं स्वप्रियें कोप जाया, आक्रंदिली ये रिति गोपजाया ।
तियेचिही दूरि तथापि कानीं, ते ऐकिली वैखरि गोपिकांनीं ॥ १३२ ॥
वनीं अशी धुंडितसे स्वकांता, आकांत हा ऐकुनि गोपकांता ।
धांवूनियां त्या पुसती सतीतें, टाकूनि गेला प्रिय जीस तीतें ॥ १३३ ॥

म्हणे ती बाया हो बहु मजसि गोविंद रमला
कडे खांदा वाटे बसवुनि फिरे सुंदर मला ।
अशा लाडें जाला बहुत हृदयीं गर्व मजला
हरी येणें जातो म्हणुनि मज नाहीं समजला ॥ १३४ ॥
दचकति वचनें या सर्वही गोपजाया
म्हणति अवघियांसी हेतु हाची त्यजाया ।
त्यजुनि सुखपथातें कष्टलों आडवाटे
म्हणवुनि अबलांतें हा स्वअन्याय वाटे ॥ १३५ ॥
नवल करुनि जी ती राहिली सारसाक्षी
जिस तिस हरि वाटे सर्वसंसारसाक्षी ।
फिरवि विशय त्यासी इंद्रियांदीक गाई
पशुपतनय आम्ही मानिला तो अगाई ॥ १३६ ॥

हुडकिती मग तीसह कामिनी, चहुंकडे फिरती गजगामिनी ।
शशिकरीं न दिसे अति सत्तमीं, हरि अदृश्य गमे निबिडा तमीं ॥ १३७ ॥

समजति न कितेकी ज्ञानसिद्धिप्रदा या
धरुनि अगुण मार्ग क्लेशकृत् संप्रदायीं ।

---

१ " बहु केलें गर्वा म्हणुनि मज तूं जी न गमसी " असाही चतुर्थ चरणाचा पाठ आहे. २ कृष्णाचा राग जाण्यासाठीं. ३ वाणी. ४ ह्या श्लोकाचा पाठ पुढें लिहिल्याप्रमाणेंही आहेः— "म्हणे ती बायाहो बहु मजसि गोविंद रमला, अशा लाडें जाला बहुत हृदयीं गर्व मजला। " हरी येणें जातो म्हणुनि मज नाहीं समजला, अहो बाई गेला मग विधि असा हा उमजला ॥" ५ आम्हां सर्वांस कृष्णानें टाकलें त्याचें कारण तरी हा गर्वच. ६ गोपस्त्रियांस. ७ कमलनयना. ८ द्रष्टा. ९ इंद्रियरूपी गायी चारणारा त्यास आम्ही साध्या गायी चारणारा गवळ्याचा मुलगा असें समजलों. १० चंद्राच्या किरणांनीं. ११ दाट. १२ ज्ञानसिद्धि देणारा. १३ क्लेश म्ह० दुःख देणारा. १४ गुरुपरंपरेनें आलेला शिक्षणक्रम.

भ्रम विफल पहातां मागुती ते भजाला
भजति मद वधूंचा ये रिती दूर झाला ॥ १३८ ॥
आत्मा मनीं स्फुरतसे व्यतिरेकरीती
तो अन्वयें जडचि निश्चय हा करीती ।
गर्वे न तो मनिं दिसे मग नरेश्वराचें
अद्वैत कंवि गवसे जगदीश्वराचें ॥ १३९ ॥
चंद्रप्रकाशितवनीं न दिसे हरी तो
त्यांचा लपोनि मद ये रिति जो हरीतो ।
गर्वे जसें मनिं न देखति बोध मनीं
कीं चंद्र तोचि मनिं सर्व मनोभिमानी ॥ १४० ॥
आत्मा न देखति मनीं व्यतिरेकरीती, गर्विष्ठ ते जडचिदैक्य मुखें करीती ।
जाणूनि अन्वय जडैक्य दिसे न कांहीं, ऐसा तमांत हरि मानिति गोपिकाही १४१
जडतरंग चिदब्धि च भासतो, परि तमोगुण मात्रचि भास तो ।
हरि तमीं न दिसोनि गमे असें, वदति बोधमदान्वित हें असें ॥ १४२ ॥
प्रकाशीं शशीच्या हरी सांपडेना, असूनी तमामाजि ठायीं पडेना ।
असें बोलतां भाव हा व्यासदेवें, असा दाविला कीं पहावा सदैवें ॥१४३॥
मनातें जरी गर्व टाकूनि योजी, ह्मणे ध्यानयोगांत तो देव यो जी ।
तरी तो वळे स्पर्शतां मीपणातें, हरी त्यासि नेदी शिवों आपणातें ॥ १४४ ॥
व्रजपतियशगंगे न्हाणिलें त्यांस देवें
स्वमनिं तरि शिवोंही दीधलें त्यांस देवें ।
ह्मणुनि सकळ गोपीवृंद तो गीत गाय
मिळति शुकमुखें ते भक्ति लोकीं न माय ॥ १४५ ॥
परि जया यमुनापुलिनीं हरी, करुनि गुप्त तनू मदसंहरी ।
धरुनि तेंचि तटीं मृदुलें क्षिती, हरिस गाति तदन्य न लक्षिती ॥१४६॥
ज्या भूमिके श्रीनवमेघनील, गमाविला सुंदर इंद्रनील ।

---

१ नाशिवंत वस्तूचे. २ ह्या श्लोकाचा असाही पाठ सांपडतो:—" चन्द्रप्रकाशक मनीं न दिसे हरी तो, त्या चाळवूनि मद ये रिति जो हरीतो । गर्वे जसे मुनि न देखति बोध मानी, कीं चन्द्रमाति तोचि मनोभिमानो ॥ " ३ उपदेश ४ गर्वी. ५ पाठ "मुनी" ६ "तो अन्वयें जडचिदैक्य इ० " असा पाठ आहे. ७ जड सृष्टिरूप लाटा. ८ चैतन्य सागर. ९ चंद्राच्या. १० भाग्यवंतांनीं. ११ येवो. १२ गर्व. १३ कृष्ण. १४ मावत नाहीं. १५ वाळवंटांत. १६ आपण गुप्त होऊन. १७मऊ. १८ जमीन. १९ पाहणें. २० नूतन मेघाप्रमाणें श्यामवर्ण. २१ इंद्रनील मण्यासारखा.

त्या भूमिकेवांचुनी सांपडेना, अन्यत्र ठायीं पदरीं पडेना ॥ १४७ ॥
अद्वैतभूमीवरि गर्व झाला, गमाविलें त्या गदपूर्वजाला ।
तरी प्रसन्न प्रभु तोचि केला, धरूनियां त्याचि सुभूमिकेला ॥ १४८ ॥

पुन्हा या अद्वैतक्षितिवरि हरी तो न गवसे
जया दिव्या हेमीं स्थिरचरपणिं तो नग वसे ।
विटाळें सर्वांच्या अशुचि मन तें पात्र सहसा
नव्हे त्या ज्ञानातें भ्रमविति जया शत्रु सह सा ॥ १४९ ॥
ज्या भूमिकेसि असतां मनिं गर्व जाला
तेथें अदृश्य मनिं मानियलें अज्ञाला ।
आल्या तयाच पुलिनाप्रति तें शुकानें
कीं बोलिले मनिं रहस्य धरा सुकानें ॥ १५० ॥
ह्मणवुनि पुलिनीं त्या मागुती गोपजाया
अनुसरति तथापी मागुती कोप जाया ।
करिति हरिगुणांचे कीर्तना सुस्वभावें
वसति सकळ तीर्थें ज्या कथेंत स्वभावें ॥ १५१ ॥

ह्मणूनि गाती गुण माधवाचे. ते कीर्तिगंगाच अगाध वाचे ।
येती मनें शुद्ध करूनि दाना, जगा नगीं हाटकें तें निदाना ॥ १५२ ॥
मनांत होतांच अगाध वाचे, विलासदेहीं प्रभु माधवाचे ।
पावूनि गाती व्रजगोपदारा, न देहगेहीं स्मरती उदारा ॥ १५३ ॥

अशी रासक्रीडा मदनशरअध्याय रचिली
प्रवृत्तीच्या लीलांहुनि बहु निवृत्तीच रुचली ।
निवृत्तीवाचूनी न किमपिहि वृत्तांत गवसे
दिसे ब्रह्मीं त्याला जग कनकिं जैसा नग वसे ॥ १५४ ॥

अध्याय पांच शरही धरि पांच काम, प्रद्युम्न अंगजें जया करि पूर्णकाम ।
केला अनंग रतिनायक शंकरानें, त्याला तनू दिधलि शंकरशेखरानें॥१५५॥

---

१ गदाचा वडील बंधु कृष्ण. २ अद्वैताला. ३ सोन्यांत ४ दागिना. ५ कामक्रोधादि सहा शत्रु. ६ आपल्या उत्तम कर्णांनी. ७ बाळवट. ८ जाण्यासाठीं. ९ जगरूपी दागिन्यास. १० सोनें. ११ आदिकारण. १२ देहरूप शरीरास. १३ मदनाचे शर पांच आहेत ह्मणून ' मदनशर अध्याय रचिली ह्याचा अर्थ, पांच अध्यायांत लिहिली. " १४ संसारांत शिरणें १५ संसारांतून दूर असे; कर्मत्याग करणें. १६ सोन्यांत जसा दागिना तसें ब्रह्मामध्यें जग. १७ पुत्र. १८ अंगरहित. १९ मदन.

असे पांच अध्याय हे व्यास देवें, करूनी दिले वर्णिले हे सुदैवें ।
सुतें त्याचिया यांत अध्याय दोन, असे वर्णिले शब्द थोडे वदोन ॥१९६॥

प्रवृत्तीची लीला निजरस निवृत्तींत मिरवी
प्रवृत्तीं वृत्तांत त्वरितचि निवृत्तींत फिरवी ।
भवार्त्ता हे वार्त्ता निववुनि विवर्त्ता परि हरी
रमाभर्त्ता कर्त्ता करुनिहि अकर्त्ता परिहरी ॥ १९६ ॥

पद.

गोपी ह्मणती जी गोपाळा । ऐसी न चव दे वनमाळा ॥ ध्रु० ॥
सांडूनियां सर्व विषय । तुझें धरिलें चरणद्वय ॥ १ ॥
टाकूनिया हटवाद । अंगसंग दे आल्हाद ॥ २ ॥
जेविं मुमुक्षु यातें हरी । तेविं आह्मां अंगिकारी ॥ ३ ॥
पति पुत्र आणि सुहृद । आह्मी जाणूं तुझें पद ॥ ४ ॥
सर्व भावें तुझें भजन । करिताति कुशल जन ॥ ५ ॥
आतां स्तनीं आणि शिरीं । कर ठेवूनि ताप हरीं ॥ ६ ॥
देखूनियां सौंदर्यासी । झालों फुका तुझ्या दासी ॥ ७ ॥
देखुनियां तुज मुरारी । दासी कोण नव्हे नारी ॥ ८ ॥
ऐकुनियां शरण आला । दास दाटुंनि वामन जाला ॥ ९ ॥

अभंग.

अदृश्य हरी होतां, हरि झाल्या गोपकांता ।
भृंग पिकें ध्यातां, गोपाळा ॥ १ ॥
एक होय पूतना, एक कृष्ण शोषी स्तना ।
वेधियेल्या गोपांगना, गोपाळा ॥ २ ॥
यशोदा होय एक नारी, कृष्ण होय एक हरी ।
बांधों जाई उदरीं, गोपाळा ॥ ४ ॥
एक होय कालिया, कृष्ण होय मर्दी तया ।
ह्मणे मजसम अव्यया, गोपाळा ॥ ४ ॥
गोपी गोप गाई होतो, कृष्ण होय तीप्रती ।
वृष्टिभयें त्राहीं ह्मणती, गोपाळा ॥ ५ ॥

---

१ शुक्राचार्यानें. २ आमह. ३ मोक्षेच्छुजन. ४ मित्र. ५ वळेंच; आमहावें. ६ हार गेल्या. ७ कोकिळा. ८ कृष्ण होऊन. ९ रक्षण कर.

कृष्ण होय ते वसेन, धरी जाणों गोवर्धन ।
तैसे व्रजजन, पाहती गोपाळा ॥ ६ ॥
वियोगें कृष्णपिसें, लागे गोपींतें जैसें ।
योगें वामनाच्या ऐसें, गोपाळा ॥ ७ ॥

पद,

शैरदिंदुयामिनी, वेणुरवें कामिनी ।
ज्ञाति गजगामिनी, हरिकारणें ॥ १ ॥
कामें सर्व सोडिती, आर्यमार्ग मोडिती ।
गृहपाशा तोडिती, प्रेमें हरीच्या ॥ २ ॥
दोहनें वधूजनें, त्यागिलिसे भांजनें ।
चित्त भवभंजनें वेधिलें असे ॥ ३ ॥
एकीं अन्नें काढितां, स्वजनासी वाढितां ।
वेणु कानीं पडतां, त्याहि धावल्या ॥ ४ ॥
एकि शेष जेविती, एक पती सेविती ।
त्याहि वेगें धांवती, कामविव्हळा ॥ ५ ॥
एकि थानीं लेंकुरें, जाती लोटुनियां करें ।
शांसनें भयकरें, ते निघाली ॥ ६ ॥
विपरीत भूषणें, दिसती न दूषणें ।
चित्तीं व्रजभूषणें, वेध लाविला ॥ ७ ॥
एकि नाकीं बाळिया, कानिं मोतीं त्यालिया ।
त्याहि वेगें आलिया, जेथें हरी तो ॥ ८ ॥
वडिलीं वांजिलिया, पतिनिंही गांजिलिया ।
तरि नाहीं लाजलिया, पावल्या हरी ॥ ९ ॥
त्यागुनि मताभिमान, स्वकुल अभिमान ।
गातो विना तानमान, वामन गुण ॥ १० ॥

रासमंडळ.

माळाकार परस्परें कर गळां घालूनि गोपांगना
गाती नाचति पाहतीं अवघिया एका जगज्जीवना ।

---

१ वस्त्राचा गुंडाळा करून गोवर्धन पर्वत म्हणून हातावर धरी. २ कृष्णाचें वेड. ३ शरदृतुंतील चांदणी रात्र. ४ वेणुध्वनि ऐकून. ५ श्रेष्ठमार्ग. ६ धार काढणें. ७ भांडीं. ८ संसारनाशक कृष्ण त्यानें. ९ आज्ञेनें १० उलट. ११ व्रजास भूषण अशा कृष्णानें वेध लावल्यामुळें. १२ वेड.

सोन्याचे मणि ओंविले भुजगुणीं गोऱ्या शशांकानना
पाचूचें पदक स्थळीं स्मर मना श्रीदेवकीनंदना ॥ १ ॥
कालिंदीतट वाळुवंट गगनीं संपूर्ण तारापती
कल्हारीं कुमुदोत्पळीं अळि शरत्काळीं जळीं गुंजती ।
वारा मंद सुगंध शीतल फुलें नाना तरू शोभती
ऐशा यामिनिं गोपिका हरिसवें रासोत्सवें क्रीडती ॥ २ ॥
गोपीनायक इंद्रनील मिरवे मुक्ताफळांच्या कळा
गोऱ्यां गौळिणि रासमंडळिं तशा मध्यें हरी सांवळा ।
कस्तूरी निढळीं कलिंदतनया श्रीरासमाळा गळां
सौभाग्य व्रजभूमिचें पदरजें त्याच्याचि आलें फळा ॥ ३ ॥
जे तें गोपिस आपणाचजवळी वाटे असावा हरी
जाणूनि जितुक्या स्त्रिया तितुकिया तत्काळ मूर्ती धरी ।
सोन्याचे मणि इंद्रनील तितुके तो हार त्याचे परी
दों गोपींत मुकुंद कृष्णयुगुलीं एकेक ते सुंदरी ॥ ४ ॥
सर्वांचे हरिकंधरीं भुज तया रासक्रियामंडळीं
कृष्णाचे सकळां गळां भुज अशी झाली अहो सांखळी ।
एका त्या अवघ्या स्थळीं प्रकृतिही नाना दिसे वेगळी
गोऱ्या गौळिणि त्यांत एक मिरवे कृष्णप्रभा सांवळी ॥ ५ ॥
त्या गोपी जितुक्या करूनि तितुक्या मूर्ती जरी नाचला
ज्या त्या मानिती आपणाचिजवळी आहे हरी एकला ।
तीची तेथुनि दृष्टि ती न विघडे जो जो जिणें देखिला
मेघश्याम अनेकरूप रमतो ऐसें न भासे तिला ॥ ६ ॥

---

१ बाहुरूप दोऱ्यांत. २ चंद्रवदना. ३ हिरव्या रंगाचे रत्न. (पाच) ४ चंद्र. ५ कल्हार, कुमुद इत्यादि निरनिराळ्या जातींची कमळें त्यांत भ्रमर गुंजारव करीत आहेत जेव्हां अशा रात्रीं. ६ भ्रमर. ७ गुंजारव करितात. ८ अशा सुंदर रात्रीं. ९ मोत्यांच्या. १० गौळणी गोऱ्या होत्या त्या माळेंतील मुक्ताफळाप्रमाणें शोभल्या व कृष्ण काळा होता तो त्यांच्यामध्यें इंद्रनील मण्याप्रमाणें शोभता झाला. ११ कपाळीं. १२ माळेंत जितके सोन्याचे मणि तितके इंद्रनील मणि होते म्ह० जितक्या गोपी तितक्या कृष्णमूर्ति झाल्या म्हणून दोन गोपींत एक कृष्ण व दोन कृष्णामध्यें एक गोपी असें चौथे चरणांत म्हटलें आहे. १३ गळ्यांत. १४ "एका त्या पुरुष स्वरूपें प्रकृति ही नाना दिसे वेगळी" असाही पाठ आहे.

रूपें तीं स्मर कल्पवृक्ष हरिचीं गोपांगना त्या लता
कीं ते मेघसमूह त्या चमकती त्यामाजि विद्युल्लता ।
कीं तारा युवती अनंत गगनीं मूर्ती मध्यें नीलता
जेव्हां एकचि तेधवां उडुगणीं भूचंद्रमा खालता ॥ ७ ॥
गोऱ्या गौळिणी सांवळ्या हरितनू रासोत्सवीं नाचती
श्रीगंगे यमुने मधें तरलें ते कल्लोळ आंदोलती ।
गोपीलोचन मीन लोल मकरश्रीकुंडलें डोलती
गोपस्त्रीकुचकुंभ तारक करी पोंहे रतीचा पती ॥ ८ ॥
थै थै तालसमन्वयें ध्वनि उठे कीं तन्न तन्न श्रुती
त्या गोपी व्यतिरेक गाउनि परब्रह्मीं अहो नाचती ।
तेथें गायक ते मुनी भ्रमर तद्वृंदांसवें गुंजती
आत्मा निर्गुण विश्व उद्धरितसे श्रीयोगमायापती ॥ ९ ॥
कोणी लाविति नाचतां मुख मुखा तांबूल त्याचे मुखीं
कोणी मानवला हरी मजवरी ऐशाच भावें सुखी ।
त्यांच्या देखुनियां कळा स्तुति करी त्या त्या गुणासारखी
जे ते आवडती ह्मणे मज अशी नाहीं दुजी आणखी ॥ १० ॥
कोणी श्रीभुजदंड हुंगिति गळां जे आपुल्या घातले
जे स्वाभाविक ही सुगंध अगरुश्रीचंदनें चर्चिले ।
कोणी श्रांत कुचावरी करतल श्रीमूर्तिचे ठेविले
कोणी ओष्ठहि नाचतां मुख मुखीं घालूनि आस्वादिले ॥ ११ ॥
ऐशा कृष्णसमागमें स्मरभरें गोपांगना नाचल्या
गातां चित्र विचित्र नृत्य करितां कामातुरा भागल्या ।
मूर्त श्रीपतिच्या समीपचि गळां तींहीं मिठ्या घातल्या
लक्ष्मीवांचुनि ते अलभ्य रतितें गोपांगना लाधल्या ॥ १२ ॥

---

१ हरीच्या अनेक मुर्ति तेच कोणी कल्पवृक्ष व गोपी ह्या त्या वृक्षांच्या आश्रयानें राहणाऱ्या तितक्या लता असें भासे. २ वीज. ३ किंवा गोपी ह्याच आकाशांतील अनंत तारा ह्म० नक्षत्रें. ४ नक्षत्रांमध्यें. ५ चंचल. ६ लाटा; कृष्णमूर्ति काळ्या व गोपी गोऱ्या असल्यामुळें त्यांचें एकत्र नाचणें गंगायमुनांच्या मिसळलेल्या लाटांप्रमाणें दिसलें. ७ गोपींचे नेत्र तेच कोणी मत्स्य व कृष्णमूर्तींचीं कुंडलें हेच कोणी मकर दिसले. ८ मासा. ९ चंचल हालणारे. १० हत्ती. ११ मदन. १२ जी ती गोपी ह्मणे माझ्यासारखी दुसरी कृष्णास आवडती नाहीं. १३ ते भुजदंड स्वाभाविकपणेंच सुगंधित असुन पुनः अगरु चंदनानें चर्चिले होते. १४ थकून. १५ थकल्या. १६ मिळण्यास अशक्य असें सुख

नाना भिन्न उंपाधि घेऊनि लेवीं मांया मिषें केवळीं
श्रीमूर्ती युवती मिळोनि घडली होती अशी सांखळी ।
तें ब्रह्म प्रतिबिंबलें बहुघटीं जें एक एके जळीं
गोपी एकचि कृष्ण एक रमती द्वंद्वें अशीं वेगळीं ॥ १३ ॥
गोपींचे मुखइंदु बिंदु बरते नृत्यश्रमें निर्मिले
नानारूपधरें करें सुखकरें पीतांबरें पूशिले ।
कस्तूरीविण निष्कलंक बरवे एणांके ते शोभले
कामव्याधि अनादि आधि जितुके ते सर्वही नासले ॥ १४ ॥
गांठी कंचुकिच्या जगद्गुरुकरें गोपींचिया सूटल्या
ग्रंथी[१०] चिज्जड त्या अनादि रचिल्या त्याही अहो तूटल्या ।
कृष्णाच्या अधरामृतें अमरता तत्काळ त्या पावल्या
नीवीमोक्षें मुकुंदहस्तकमलें तो मोक्ष त्या लाधल्या ॥ १५ ॥
नेले राजसराग ते अधरिंचे श्रीवल्लभें चुंबनें
दृष्टींतील निरंजनें हरपलीं जीं तामसें अंजनें ।
जें का चंदन सत्त्वही हरि हरी त्यांचें निजालिंगनें
केल्या निर्गुण त्या रतान्तसमयीं गोपी जगज्जीवनें ॥ १६ ॥
जाल्या निर्गुण त्या परंतु सगुणप्रेमेंचि जें राहिलें
कांहीं चंदन शुभ्रता उरवुनी तें सत्त्व तों शोभलें ।
स्वानंदांत बुडी रतान्तसमयीं देऊनि तें ठेविलें
जीवन्मुक्तपणें हरीस सकळा तेणेंचि आलिंगिलें ॥ १७ ॥
ब्रह्मीं नित्यसुखानुभूतिरस त्या रंगेंचि जें रेखिलें
कीं पुण्यार्णव देवकीजठरजें त्याही मिषें ओतिलें ।

---

१ रूपें; सोंगें. २ नाशकाळीं. ३ मायेचीं अनंत रूपें जशीं नाहींशीं होतात तशी ती कृष्णमूर्तीची व गोपींची बनलेली सांखळी लयास गेली. ४ " आत्मा तो प्रतिबिंबला प्रकृतिच्या नाना घटांच्या जळीं " असाही पाठ आहे. वस्तु एकच असून अनेक घटांमध्यें तिचीं अनेक प्रतिबिंबें दिसतात तद्वत् कृष्ण एकच व माया ( गोपी ) एकच असून त्यांचीं अनेक द्वंद्वें प्रतिबिंबरूपानें दिसतात. ५ घर्मबिंदु. ६ बहुरूपी कृष्णानें. ७ हरिणांक, चंद्रावर हरिणाचें चिन्ह असतें, परंतु गोपीमुखचंद्र कस्तुरी न लाविल्यामुळें चिन्हरहित होते त्यांवर घर्मबिंदु चिन्हाप्रमाणें दिसले असा अर्थ. ८ मनोव्याधि. ९ चोळी. १० देहांच्या गांठी सुटल्या म्हणजे जन्मबंधापासून मुक्त झाल्या. ११ वस्त्रग्रंथि सोडणें. १२ ओठाचा रजोगुणरूपी रक्त वर्ण. १३ कृष्णानें. १४ मायारहित. १५ कामकळा. १६ चंदनरूपी सत्त्वगुण. १७ ब्रह्मसुखाचा अनुभव हाच कोणी रंग. १८ पुण्यसागर. १९ उदर.

गोपींच्या कुचकुंकुमें करुनियां माळा गळां माखिली
क्रीडांतीं हरिमूर्त्ति सावधपणें ती एकली देखिली ॥ १८ ॥
गोपींच्या स्थिरजंगमासहित जो त्यांच्या पतींचा हरी
आत्मा कारण संतदृष्टिस दिसे जो तंतु सर्वांबरीं ।
त्यांशीं सर्व निशा निशापतिमुखी ज्या क्रीडल्या सुंदरी
त्यांला धन्य किती ह्मणूं त्रिभुवना ज्यांची कथा उद्धरी ॥ १९ ॥
कामी लोक तयांसही निजकथाप्रीतिपद श्रीहरी
विश्वोद्धारनिमित्त गोपललनांक्रीडा विचित्रा करी ।
ऐसें आपणही करूं ह्मणउनी जो कां अपेक्षा धरी
थोडेंसें विष तो गळां न मिरवी कांहो शिवाचे परी ॥ २० ॥
गोपींतें रतिलाभ देउनि सदा जो ऊर्ध्वरेता हरी
तेव्हां तत्पति मानिती निजभुजीं आलिंगिल्या सुंदरी ।
जो लक्ष्मीपति नित्यमुक्त करिती जे मूढ त्याची सरी
ते तोंडें वणवा पिऊं न ह्मणती कांहीं तयाचे परी ॥२१ ॥
गोपींच्या नटनश्रमें करुनि जो आला उबारा हरी
कालिंदीसलिलामधें गजगती संगेंचि[12] लीला करी ।
संगें गौळणि मागुती उपवनीं त्यांशीं रमे श्रीहरी
भाग्यें गोपवधूंचिया क्रमिलिया ऐशा बहू शर्वरी ॥ २२ ॥
गोपीनाथ कथारुची सुजनहो ध्यां[16] आपुलाल्या मना
शृंगारामृत हेंचि घ्या त्यजुनियां दुर्वासना कामना ।
गोपींतें अधरामृतें कलियुगीं नामामृतें वामना
केलें धन्य तया तुह्मां फुकट कां नेघा जगज्जीवना ॥ २३ ॥
जो नेणे विषयाविणें रुचि तया आह्मां तुह्मां कारणें
केला गोपवधूविलास रस हा विख्यात नारायणें ।

---

१ वस्त्रांत. २ निशापति जो चंद्र त्याच्या सारखें आहे मुख ज्यांचें; चंद्रवदना. ३ गोपललनांसह क्रीडा. ४ इच्छा. ५ सारखा. ६ ब्रह्मचारी. ७ बरोबरी. ८ कृष्णानें द्वादश गांवें अग्नि गिळिला तसा ते कां गिळूं शकत नाहींत. ९ नाचण्याच्या श्रमानें. १० " तोही उबारा हरी " असा एक पाठ आहे. ११ गजगामिनी स्त्रिया. १२ " गजगती तज्जाती क्रीडा करी " असा एक पाठ आहे. १३ पुनः. १४ बागेंत १५ रात्र. १६ ध्यान करा. १७ ज्यानें द्वापारयुगीं गोपींस धन्य केलें व कलियुगीं वामन पंडितास धन्य केलें. १८ घेत नाहीं. १९ आमच्या तुमच्या सारखे सामान्य जन ज्यांस विषयावांचून अन्य कसली रुचि नाहीं त्यांच्या करितां हरीनें गोपवधूविलास नामक हा रास केला असा अर्थ.

त्याही ऊपरि काव्यनाटकमिषें शृंगार जो पाहणें
या श्रीकृष्णकथामृतीं न रमणें धिक् धिक् तयाचें जिणें ॥२४॥
गाईचें शिशु तें पशू परि सुधा ते तीं सवे त्या मिसें
कर्मे आचरती समस्तहि ऋषी वेदोदितें त्या रसें ।
लोकोद्धारनिमित्त गोपललना संगें मुकुंदें तसें
केलें त्या चरितामृता शुकमुखें राजर्षि प्याले असे ॥ २५ ॥
देतांही विष पावली अमृतता ते राक्षसी पूतना
नीवीमोक्षें अपेक्षितांचि चढल्या वैकुंठ गोपांगना ।
द्वेषें दानव शत्रु दैत्य तरले ऐशा जगज्जीवना
घ्या प्रेमें श्रवणें करूनि हृदयीं हे वामनप्रार्थना ॥ २६ ॥

इति रासक्रीडा समाप्त.

---

## गोपीगीत.

( कथेचा सारांश. )

श्रीकृष्णानें वेणु वाजवून रासक्रीडेकरितां मधुवनीं गोपींस जमविलें असतां गोपीस वाटूं लागलें कीं आह्मांसारख्या सुंदर स्त्रिया त्रिभुवनांत नाहींत ह्मणूनच कृष्ण आह्मांस भुलला. असा त्यांस गर्व झालेला पाहून श्रीकृष्ण अदृश्य झाला. तेव्हां गोपी त्यास वनांत धुंडीत त्याचे गुण गाऊं लागल्या. त्यास गोपीगीत ह्मणतात. हें गीत मूळांत ह्मणजे श्रीमद्भागवत दशमस्कंध अध्याय ३१ यांत, कामदा वृत्तानें वर्णिलें आहे. त्या प्रत्येक श्लोकावर टीका वामन पंडितांनीं त्याच वृत्तांत केली आहे. हें समश्लोकी गीत लोकप्रिय असून मूळ संस्कृत श्लोकासह ह्मणण्याचा फार पाठ आहे, ह्मणून तें आह्मी मूळ श्लोकासह येथें दिलें आहे.

जयति तेऽधिकं जन्मना व्रजः श्रयत इंदिरा शश्वदत्र हि ।
दयित दृश्यतां दिक्षु तावकास्त्वयि धृतासवस्त्वां विचिन्वते ॥ १ ॥

प्रगटलासि तूं नंदगोकुळीं, ह्मणुनि इंदिरा वास ये स्थळीं ।
सकळ ही सुखी यां व्रजीं हरी, विरहदुःखिता गोपसुंदरी ॥ १ ॥
प्रकट होइं तूं विश्वभूषणा, प्रियतमा त्वरें दाविं आपणा ।
हुडकितों तुतें गोपकामिनी, तुजवरी हरी प्राण ठेवुनी ॥ २ ॥

---

१ वेदांनीं सांगितलेलीं. २ अमरत्व. ३ निरी. ४ लक्ष्मीची वसती. ५ गोकुळांत ६ स्त्रिया.

शरदुदाशये साधुजातसत्सरसिजोदरश्रीमुषा दृशा ।
सुरतनाथ तेऽशुल्कदासिका वरद निघ्नतो नेह किं वधः ॥ २ ॥

कमळगर्भिंचे श्रीस जे हरी, करिं कृपा तया दृष्टिनें हरी ।
सुरतनाथ तूं भोगदायको, दासि गोपिका तूझिया फुका ॥ ३ ॥
विरहें देउनी आस लावुनी, सकळही अडामाजि घालुनी ।
तदुपरी हरी दोर कापणें, तरि मृतासही काय मारणें ॥ ४ ॥

विषजलाप्ययाद्व्यालराक्षसाद्वर्षमारुताद्वैद्युतानलात् ।
वृषमयात्मजाद्विश्वतोभयादृषभ ते वयं रक्षिता मुहुः ॥ ३ ॥

विगतदर्प तो सर्प काळिया, करुनि रक्षिलें गोकुळासि या ।
विषजलाचिया नासुनी भया, विरहसागरीं घातलें प्रिया ॥ ५ ॥
व्रज गिळूं ह्मणे त्या अघासुरा, अजगरासि कारुण्यसागरा ।
वधुनि रक्षिलें त्या तुला हरी, व्रजवधूंवरी कोप कां तरी ॥ ६ ॥
प्रलयमेघही वर्षतां वरी, गिरि धरोनियां रक्षिल्या हरी ।
प्रळय तो स्वयें त्यांवरी करी, कठिण चित्त हें आजि कां परी ॥ ७ ॥
पिउनि अग्नि तूं ज्यांसि रक्षिसी, विरहअग्निनें आजि जाळिसी ।
हरुनि सर्वही आमुचीं भयें, विरहसंकटीं घालिसी स्वयें ॥ ८ ॥

न खलु गोपिकानन्दनो भवानखिलदेहिनामन्तरात्मदृक् ।
विखनसार्थितो विश्वगुप्तये सख उदेयिवान् सात्वतां कुले ॥ ४ ॥

नव्हसि गोपिकापुत्र निश्चयें, सकळ अंतरीं साक्षि तूं स्वयें ।
यदुकुळीं विधिप्रार्थनामिसें, भुवन तारिसी या कथारसें ॥ ९ ॥

विरचिताभयं वृष्णिधुर्य ते चरणमीयुषां संसृतेर्भयात् ।
करसरोरुहं कांतिकामदं शिरसि धेहि नः श्रीकरग्रहम् ॥ ५ ॥

ह्मणुनियां तुतें प्रार्थितों हरी, सफळ आमुची कामना करीं ।
प्रकट शीघ्र तूं होउनी प्रिया, अभय देउनी छेदिजे भया ॥ १० ॥

---

१ कमळाच्या गर्भातील जी शोभा तीस हरण करणारी तुझी दृष्टि तिनें. २ " सुरतनाथ तूं शुल्कदासिका, वटकि गोपिका त्या तुझ्या फुका " असाही पाठ आहे. शुल्कदासिका ह्मणजे मूल्य देऊन विकत घेतलेल्या दासी. ३ " वरहि देउनी आस लावुनी, विरहकूप या माजि घालुनी " असाही पाठ आहे. ४ अगोदरच मेला त्यास. ५ गेला आहे गर्व ज्याचा; गर्वहीन करून. ६ अघासुर नांवाचा अजगर. ७ इंद्रानें अति वृष्टि केली तेव्हां. ८ गोवर्धन पर्वत. ९ ज्या गोपींस रक्षिलें त्यांच्यावरच स्वतः प्रलय करितोस असा अर्थ. १० दावाग्नि याने अग्नि गिळून कृष्णानें गोकुळाचें रक्षण केलें. ११ ब्रह्मदेवानें विश्व तारण्याकरितां तुझी प्रार्थना केली ह्मणून तूं येथें अवतरलास असा भाव. १२ मिष. १३ इच्छा. १४ [illegible]

भवभयासेही दूर जो करी, निवेंति लागतां गोपसुंदरी ।
अभय हस्त तो आमुचे शिरीं, करुनियां कृपा ठेविं गा हरी ॥ ११ ॥
प्रगटतां रमा क्षीरसागरीं, धरिसि तूं तिचा हस्त ज्या करीं ।
अभयहस्त तो मस्तकावरी, निर्यवि ठेवुनी गोपसुंदरी ॥ १२ ॥

व्रजजनार्तिहन्वीर योषितां निजजनस्मयध्वंसनास्मित ।
भज सखे भवत्किंकरीः स्म नो जलरुहाननं चारु दर्शय ॥ ६ ॥

व्रजजनाचिया दुःखनाशका, वदन दाविं कां गोपनायका ।
बटकि आपुल्या ज्या तयांवरी, हृदयीं एवढा कोप कां करीं ॥ १३ ॥
सहज दावुनी भाव हाससी, तरि तुं आमुचे गर्भ नासिसी ।
नख न लावितां छेदणें जया, हरि कुऱ्हाडि कां हाणणें तया ॥ १४ ॥

प्रणतदेहिनां पापकर्शनं तृणचरानुगं श्रीनिकेतनम् ।
फणिफणार्पितं ते पदांबुजं कृणु कुचेषु नः कृंधि हृच्छयम् ॥ ७ ॥

अशुभ शीघ्र जो वंदनें हरी, कमळजा वसे ज्यांत सुंदरी ।
तृणचरांसवें हिंडतो वनीं, चरण ठेविं तूं आमुचे स्तनीं ॥ १५ ॥
निजसुखामृता लुब्ध होउनी, भ्रमरि ज्यामध्यें सिंधुनंदिनी ।
पदसरोज तें या कुचावरी, करुनियां दया ठेविं गा हरी ॥ १६ ॥
रगडुनी फणा काळिया फणी, दवडिला खळाचा शिरोमणी ।
मदन दुष्ट हा आमुचे उरीं, पदतळें तसा मर्दि गा हरी ॥ १७ ॥
हरुनि दर्प कंदर्प हा हरी, दवडिं काळियाचे परी अरी ।
रविसुताऱ्हदीं काळिया जसा, हृदयीं आमुच्या कामही तसा ॥ १८ ॥

मधुरया गिरा वल्गुवाक्यया बुधमनोज्ञया पुष्करेक्षण ।
विधिकरीरिमा वीर मुह्यतीरधरसीधुनाऽऽप्याययस्व नः ॥ ८ ॥

मधुर वैखरी बोल आमुशीं, निगमरूप जें संतमानसीं ।
विरहमूर्छिता या स्वकिंकरी, स्वाधरामृतें जीववीं हरी ॥ १९ ॥

---

१ संसारापासून होणारें भय. २ शीतल होतात; संतापमुक्त होतात. ३ भयापासून रक्षिणारा. ४ लक्ष्मी. ५ हातानें. ६ दासी. ७ पुनर्जन्म " गर्व नाससी " असाही पाठ आहे. ८ जो तुझा चरण. ९ लक्ष्मी. १० तृण भक्षणारे पशु त्यांच्या बरोबर. ११ समुद्रकन्या लक्ष्मी. १२ पादकमल. १३ स्तनांवर. १४ सर्प १५ " दवडिलें खळा चिच्छिरोमणी " असाही पाठ आहे. १६ श्रेष्ठ. १७ गर्व. १८ मदन. १९ सारखा. २० शत्रु. २१ सूर्यकन्या कालिंदी अथवा यमुना तिच्या डोहांत. २२ मदन. २३ गोड वाणी. २४ वेदासारखी. २५ दासी. २६ आपल्या अधरपानानें.

तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।
श्रवणमंगलं श्रीमदाततं भुवि गृणंति ते भूरिदा जनाः ॥ ९ ॥

तुझि कथा सुधा तापल्या जना, निवावि अंतरीं विश्वजीवना ।
अमृत निंदिती स्वर्गिचे मुनी, तव कथामृता वंदिती जनीं ॥ २० ॥
अमृत मातवी स्वार्गिचे हरी, तुझि कथासुधा बंध संहरी ।
अमृत जे पिती त्यांचिये शिरीं, चरण देउनी ने कथा वरी ॥ २१ ॥
अमृत गोड हें जों जिभेवरी, तुझि कथासुधा गोड हे हरी ।
श्रवणिं आननीं बाह्य अंतरीं, मधुर सर्वथा जे परोपरी ॥ २२ ॥
कनक आणि तें गुंज जोखणें, तुझि कथासुधा तुल्य लेखणें ।
सुलभ जे सदा सर्वही स्थळीं, अमृत तुच्छ तें देवताकुळीं ॥ २३ ॥
त्रिभुवनेश तूं त्या तुला जसी, करिति तुल्यता ऊर्णनाभिसीं ।
अमृतसाम्यही श्रीकथामृता, वदति तेथ हा भाव तत्त्वता ॥ २४ ॥
वसत लक्ष्मी तूझिया उरीं, तशिच मुक्ति हे श्रीकथेवरी ।
बहु उदार जे ते अशी कथा, श्रवण याचकां देत सर्वथा ॥ २५ ॥
सुजन याचकां अर्पिती धनें, परि मदासि तीं होति साधनें ।
हरिकथा तुझी विश्वपावनी, बहु उदार जे वर्णिती जनीं ॥ २६ ॥
विरहिं हे जरी प्राण टाकिती, तरि कथामृतें गोपिका जिती ।
परि हरी तुझ्या संगतीविणें, मरण तें बरें काय हें जिणें ॥ २७ ॥

प्रहसितं प्रिय प्रेमवीक्षणं विरहणं च ते ध्यानमंगलम् ।
रहसि संविदो याः हृदिस्पृशः कुहक नो मनः क्षोभयंति हि ॥ १० ॥

सुरसें हांसणें प्रेम पाहणें, विरहणें चिदानंदलक्षणें ।
करिति अंतरीं ध्यान जे मुनी, विसरती कशा गोपकामिनी ॥ २८ ॥
स्मरविलास एकांतिचे वनीं, बहु रतोनि जे राहिजे मनीं ।
करिति आमुच्या क्षोभ मानसीं, कपटिया कसा गुप्त मारिसी ॥ २९ ॥

---

१ अमृत. २ संसारानें तप्त झालेल्या जनांस. ३ स्वर्गींचें अमृत असा संबंध. ४ मार उत्पन्न करितें. ५ संसारबंधन. ६ कानामध्यें. ७ मुखामध्यें. ८ बाहेरून आंतून. ९ सोनें. १० तुझ्या कथेची तुलना अमृताबरोबर करणें म्हणजे सोन्याची आणि गुंजेची तुलना करणें होय; अर्थात् कथेच्या बरोबरीनें पाहतां अमृत गुंजेच्या मोलाचें आहे. ११ क्षुल्लक. १२ कोळी; सुतेरा. १३ मागणारे; भिक्षु. १४ तीं धनें गर्वास कारण होतात. १५ विरहानें. "विरहि जे जनीं प्राण काढिती" असा एक पाठ आहे. १६ जिवंत. १७ जिवंत राहणें. १८ "सुरस हास्य सप्रेम पाहणें" अशाही पाठ आहे.

चलासि यद्व्रजाच्चारयन्पशून्नलिनसुंदरं नाथ ते पदम् ।
तृणशिलांकुरैः सीदतीति नः कलिलतां मनः कांत गच्छति ॥ ११ ॥
फिरसि गोधनें[1] चारितां वनीं, पद तुझे व्रजीं आठवूं मनीं ।
दुखवतील कीं ते तृणांकुरीं[2], ह्मणुनि बूडतों दुःखसागरीं ॥ ३० ॥
दिनपरिक्षये नीलकुंतलैर्वनरुहाननं बिभ्रदावृतम् ।
घनरजस्वलं दर्शयन्मुहुर्मनसि नः स्मरं वीर यच्छसि ॥ १२ ॥
दिवस मावळे येसि तूं व्रजा, नयनिं दाविसी श्रीमुखांबुजा[3] ।
कुरळ केश जे भृंग[4] ते जसे, वरि पराग[5] ते धूळिही दिसे ॥ ३१ ॥
परतसी वनीं दैत्यमारुनी, दिसति थोर तूं वीर लोचनीं[6] ।
वदनचंद्र सांजेसि[7] दावुनी, मदन सोडिसी आमुचे मनीं ॥ ३२ ॥
प्रणतकामदं पद्मजार्चितं धरणिमंडनं ध्येयमापदि ।
चरणपंकजं शंतमं च ते रमण नस्तनेष्वर्पयाधिहन् ॥ १३ ॥
पुरवि वंदनें सर्व कामना, चरण तो तुझा नंदनंदना ।
त्वरित ठेवुनी आमुच्या कुचीं, पुरविं ईतुकी आस[8] आमुची ॥ ३३ ॥
सतत पूजिला जो चतुर्मुखें[9], वसति ज्यामध्यें सर्वही सुखें ।
धरणिला[10] अलंकार या वनीं, चरण ठेविं तूं आमुचे स्तनीं ॥ ३४ ॥
सकळ संकटीं ध्येय[11] अंतरीं, स्मरति त्याचिया आपदा हरी[12] ।
त्वरित गोपिकांच्या पयोधरीं[13], चरण आपुला ठेविं तूं हरी ॥ ३५ ॥
सुरतवर्धनं शोकनाशनं स्वरितवेणुना सुष्ठु चुंबितम् ।
इतररागविस्मारणं नृणां वितर वीर नस्तेऽधरामृतम् ॥ १४ ॥
सुरत वाढवी शोक जो हरी, स्वरितें[14] वेणुनें चुंबिला ऽधरीं ।
विसरवी जना सर्व रक्तता, त्वरित पाजि त्या स्वाधरामृता ॥ ३६ ॥
सुरततृप्तिही झालियावरी, अधर जो तुझा चुंबितां हरी ।
सुरतवासना होय मागुती, अमृत तेंथिंचें दे रमापती[15] ॥ ३७ ॥
अटति यद्भवानह्नि काननं त्रुटिर्युगायते त्वामपश्यताम् ।
कुटिलकुंतलं श्रीमुखं च ते जड उदीक्षतां पक्ष्मकृद्दृशाम् ॥ १५ ॥
ढकलुनी युगासारिख्या त्रुटी[16], दिवस कंठुनी थोर संकटीं ।

---

१ गाई. २ गवताच्या टोकांनीं; कुसळांनीं. ३ मुखकमल. ४ भ्रमरांसारखे. ५ पुष्परज. ६ "ये विलोचनीं" असाही पाठ आहे. ७ संध्याकाळीं. ८ आशा. ९ ब्रह्मदेवानें १० पृथ्वीला. ११ ध्यान करण्यास योग्य. १२ हरण करी. १३ स्तनांवर. १४ स्वर करणारा पांवा ज्यानें. १५ हे लक्ष्मीपते. १६ निमेषाचा तीन हजारावा हिस्सा.

नयनिं पाहतां श्रीमुखाप्रती, लवति पापण्या त्या न सोसती ॥ ३८ ॥
नयनिं पाहतां तूज माधवा, करिति पापण्या विघ्न जेधवां ।
करुनि अंगुळीभंग तेधवां, बहुत निंदितों पद्मसंभवा ॥ ३९ ॥
न पुरती मुखा पाहतां धणी, करिति पापण्या विघ्न पापिणी ।
कपटिया कसें त्यागिलें वनीं, वरिल कोण पां तूजवांचुनी ॥ ४० ॥

पतिसुतान्वयभ्रातृबांधवानतिविलंघ्य तेऽन्त्यच्युतागताः ।
गतिविदस्तवोद्गीतमोहिताः कितव योषितः कस्त्यजेन्निशि ॥ १६ ॥

पतिसुतादि हे बंधुबंधुता, त्यजुनि पातलों तूज अच्युता ।
मुरलिच्या रवें मोहिलों मनीं, कपटि कोणसा टाकि यामिनीं ॥ ४१ ॥

रहसि संविदं हृच्छयोदयं प्रहसिताननं प्रेमवीक्षणम् ।
बृहदुरःश्रियो वीक्ष्य धाम ते मुहुरतिस्पृहा मुह्यते मनः ॥ १७ ॥

त्रिविध शब्द एकांतिचे तुझे, श्रवणिं ऐकतां काम ऊपजे ।
तुजविणें हरी प्राण जातसे, परि कृपालवें वांचलों असें ॥ ४२ ॥
वदन लोचनीं पाहतां हरी, अति विशाळता देखतां उरीं ।
उपजती मनीं कामकामना, घडिघडि स्पृहा वाटते मना ॥ ४३ ॥

व्रजवनौकसां व्यक्तिरंग ते वृजिनहंत्र्यलं विश्वमंगलम् ।
त्यज मनाक् च नस्त्वत्स्पृहात्मनां स्वजनहृद्रुजां यन्निषूदनम् ॥ १८ ॥

भुवनमंगलें मूर्ति जे करी, व्रजजनासि ते पावली बरी ।
त्यजुनि कोप या गोपसुंदरी, निर्वावि दावुनी कार्मकूसरी ॥ ४४ ॥

यत्ते सुजातचरणांबुरुहं स्तनेषु भीताः शनैः प्रिय दधीमहि कर्कशेषु ।
तेनाटवीमटसि यद्व्यथते न किंस्वित्कूर्पादिभिर्भ्रमति धीर्भवदायुषां नः ॥ १९ ॥

चरण ठेवितां कर्कशा स्तनीं, बहु भितों मनीं गोपकामिनी ।
फिरसि त्यापदीं तूं चहूंकडे, म्हणि तयांसिही रुतती खडे ॥ ४५ ॥

---

१ कारण पापण्या लवल्या असतां तितका वेळ कृष्णदर्शन अंतरतें म्हणून डोळ्यांचें पातें लवणेंही त्यांस सहन होईना. २ ब्रोटें मोडणें. ३ ब्रह्मदेवास. ४ "कपटिया अशा ज्या विलासिनी, त्यजील कोण त्या तुजवांचुनी" असाही पाठ आहे. ५ "कुल-पती-सुत-भ्रातृ-बंधुतें, त्यजुनिया हटा पावलों तुतें । त्वरित मोहिल्या गोपसुंदरी त्यजिल कोण रात्रि वनांतरीं ॥" असाही एक पाठ आहे. याचा अर्थ कुल, पति, पुत्र, भाऊ, आणि स्वजन यांस टाकून. ६ नाशानें. ७ रात्रीचा. ८ कृपालेशानें. ९ डोळ्यांनीं. १० तुझें विशाळ वक्षःस्थळ पाहून. ११ इच्छा; वासना. १२ जे तुझी मूर्ति भुवनास मंगल म्ह० कल्याण करणारी. १३ संतापयुक्त क्रूर. १४ कौशल्य. १५ कठिन स्तनांवर.

सकलही अशा गोपसुंदरी, करिति गायनें त्या परोपरी ।
रडति सुस्वरें अश्रु लोचनीं, धरुनि लालसा कृष्णदर्शनीं ॥ ४६ ॥
रडति तों तयां माजि ये हरी, प्रकट आपुलें रूप तो करी ।
मदनमोहन श्रीपति स्वयें, पुसतसे तयांलागिं विस्मयें ॥ ४७ ॥
वसन पींवळें हार कंधरीं, नयानें देखुनी गोपसुंदरी ।
उठलिया जशा प्राणें आलिया, सकळ शक्ति त्या येति इंद्रियां ॥ ४८ ॥
धरिती धांवुनी एकि त्या करीं, धरिति एकि त्या पितिं अंबरीं ।
भुज धरीति त्या एकि अंगटीं, कितिक त्या गळां घालिती मिठी ॥ ४९ ॥
हरिपदीं तया नित्य वामनें, त्रिभुवनीं मिठी घातली मनें ।
अमन या मनें वृत्ति गोपिका, सकळ झालिया चित्सुखात्मका ॥ ५० ॥

॥ इति श्रीगोपीगीत समाप्त ॥

## कंसवध अथवा नवरस श्लोक.

### ( कथेचा सारांश. )

कंसास मारण्याकरितां कृष्ण मथुरेंत शिरला तेव्हां निरनिराळ्या व्यक्तींस भिन्नभिन्न स्वरूपानें कृष्ण कसा दिसला त्यानें ह्यांत वर्णन आहे.

नवरसें भवरोगरसायनें, करि हरी करिती मुनि गायनें ।
किमपि कंसवधीं रसें देखिले, कथिन जे मानीं वामनें रेखिले ॥ १ ॥
रंगाचिया द्वारवेंटांचि[13] हस्ती, मारूनि घे सार्थज[14] दंतें[15] हस्तीं[16] ।
देहीं[17] गजाचे मद रक्त बिंदू, तो मल्लरंगांत मुकुंद वंदूं ॥ २ ॥
भिन्न भिन्न मतिच्या अवलोकीं, देखिला कसकसा रस लोकीं ।
श्लोकें एकाचि वदे शुक राया, जे रसज्ञ तिहिं अर्थ कराया ॥ ३ ॥

---

१ डोळ्यांमध्यें. २ इच्छा. ३ मदनालाही मोह करणारा. ४ वस्त्र. ५ कंठी. ६ कलेवरांत प्राण आल्यावर जशा इंद्रियांत शक्ति येतात तसा कृष्णरूपी प्राण आल्यावर गोपींस उठण्याची शक्ति आली. ७ पीतांबरास. ८ हाताचा अंगटा धरती. "अंगदीं" असाही पाठ आहे. अंगदीं म्हणजे बाहुभूषणाचे ठिकाणीं. ९ वामन पंडितानें. १० भव म्हणजे संसार हाच कोणी रोग त्यावर औषध. ११ रस म्हणजे क्रोध, शोक भय, इत्यादि उत्कटावस्थेस पावलेल्या मनोवृत्ति. १२ वामनानें जे मनांत किंवा ध्यानांत आणिले ते नवरस. १३ दरवाज्यांत; वेशींत. १४ बळरामासहित. १५ त्या हत्तीचा दांत. १६ हातामध्यें. १७ ज्या कृष्णाच्या अंगावर गज मारल्यामुळें रक्ताचे व मदाचे बिंदु उडाले होते. १८ "मल्लानामश- निर्नृणां नरवरः" इत्यादि भागवतांतील मूळ श्लोक.

मल्लां वज्र गमे नरां नृप गमे काम स्वयें स्त्रीजनां
गौळ्यां आप्त नृपां खळां प्रभु शिशू मातापित्यांच्या मना ।
कंसा मृत्यु अशक्त पामरजनां संतांसि तत्त्वाऽमृत
श्रीशेषासन यादवां हरि दिसे रंगांत रामाऽन्वित ॥ ४ ॥
हे मल्लां रस रौद्र अद्भुत नरां शृंगार नारीजनां
गौळ्यां हास्य नृपांस वीर करुणा मातापित्यांच्या मना ।
कंसालागिं भयानकाऽख्य रस हे बीभत्स मूढां भ्रमें
संतां शांतरस स्वभक्तिरस तो हे यादवां या क्रमें ॥ ५ ॥
नवरस हरि दावी यांत मल्लांदिदृष्टीं
करि दशम रसाची यादवांमाजि वृष्टी ।
रस दश कथिले जे ज्या क्रमें श्रीशुकानें
हरिगुण रस तैसे घ्या मुखें आणि कानें ॥ ६ ॥
दहा रस श्रीशुक बोलिला हो, त्यांचा क्रमें घ्या श्रवणादि लाहो ।
रसीं प्रतिश्लोक रसाऽवलोकीं, गुणाऽमृतप्राशन मृत्युलोकीं ॥ ७ ॥
वधुनि दारवंटांचि महाकरी, उभय दंत सहाग्रज घे करीं ।
गज वधुनि मृगांत जसा हरी, त्वरित मल्लदळांत निघे हरी ॥ ८ ॥
रंगांऽगणीं लक्षुनि कैटभारी, वज्राहुनी मानिती मल्ल भारी ।
ऐशा हरी रौद्ररसासि दावी, कथारसाची रुचि हे वदावी ॥ ९ ॥
भोजराज विगतप्रभ झाला, श्रीपती नृप गमे मनुजांला ।
दाखवी सुरस अद्भुत लोकीं, कीं असें जन मला अवलोकी ॥ १० ॥
सर्वांगशृंगाररसास नेत्रीं, कीं रंग दावूनि कुरंगनेत्रीं ।
अनंगरंगांऽबुधिच्या तरंगीं, रंगीं करी व्याकुळ अंतरंगीं ॥ ११ ॥

---

१ जो मल्लास वज्रासारखा कठोर दिसला. २ जो स्त्रियांस प्रत्यक्ष मदन दिसला. ३ बालक. ४ शेषशायी. ५ बलरामयुक्त असल्यामुळें तो यादवांस शेषशायी दिसला. ६ त्यावेळीं कृष्णाचे ठिकाणीं निरनिराळे लोकांस निरनिराळे रस म्हणजे शृंगारादि नवरस दिसले व दहावा भक्तिरस दिसूं लागला. ७ भयानक नावांचा रस. ८ शांतरसाची. ९ लाभ. १० हत्तींत; वेशींत. ११ मोठा हत्ती. १२ अग्रज म० बळराम त्यासह. १३ सिंह. १४ पाहून. १५ कंस. १६ कांतिहीन; प्रभाहीन. १७ जनांस कृष्णच राजा दिसूं लागला. १८ अद्भुत नामक रस. १९ अंगसहित; शृंगाररसाचीं विप्रलंभशृंगार व संभोगशृंगार अशीं दोन मुख्य अंगें आहेत. २० हरिणी. २१ मदन. २२लाट. २३ मनांत.

शरीर रक्तांकित दंत हस्तीं, येतो कसा डोलत मत्त हस्ती ।
ह्मणोनि जे हांसति सख्य भावें, गोपाळ हा हास्यरस स्वभावें ॥ १२ ॥
घेऊनियां याच नृपाऽसनातें, करील आम्हांवरि शासनातें ।
वाटे असें दुःख नृपांसि भारी, वीराऽख्य दावी रस कैटभारी ॥ १३ ॥
कृष्ण हा परम देवदेव कीं, हें स्मरे न वसुदेवदेवकी ।
लेंकरूं ह्मणुनि वर्षती दया, दाखवी हरि दयारसोदया ॥ १४ ॥
कृष्ण हीनबळ बाळ लेंकरूं, मल्ल मारितिल काय मी करूं ।
ये रिती करिति खेद दंपती, फुंदती रडति आणि कांपती ॥१५ ॥
द्विरदंत जसे उपडूनि घे, रस भयानक कंसमनीं निघे ।
मनिं ह्मणे निमिषें वधिला करी, मजहि मारिल यावरि लौकरी ॥ १६ ॥
अनंतशक्तीसहि अज्ञलोकीं, अशक्त मानूनि कृपाऽवलोकीं ।
निरूपिला खेद बहुप्रकारें, बीभत्स केला रस निर्विकारें ॥ १७ ॥
श्रीमूर्ति देखूनि महाविभूती, संतां गमे स्वात्मसुखाऽनुभूती ।
ते देखती शांत निजस्वरूपीं, दावी हरी शांतरस स्वरूपीं ॥ १८ ॥

नवरस कवि गाती हेचि वर्णूनि जाती
निजचरितरसीं त्या दाखवी दिव्य जाती ।
दशम रस अनन्यप्रेमभक्तीस लोकीं
यदुपति हरि तो दे यादवां स्वावलोकीं ॥ १९ ॥

विना शेषशायी दुजा यादवांला, नसे देव ते देखती माधवाला ।
गमे राम तो शेष हा शेषशायी, स्वपायीं तया दे रस प्रेमदायी ॥२०॥
इष्टदैवत अभीष्ट अशेषें, दे जनां प्रिय हितेंचि विशेषें ।
यादवां स्वसुख कल्पतरूचें, प्रेम हें सहज आदिगुरूचें ॥ २१ ॥
इष्ट सर्वहि अभीष्ट असेना, कृष्णरूप सचराचरसेना ।
वामनास सकळात्मक लाहो, कीर्तनप्रिय असा कळला हो ॥ २२ ॥
सेविजे प्रिय मुकुंद उगा हो, कीर्तनीं अजि तयासिच गा हो ।
या ह्मणी सुख ह्मणाल जगा हो, हे मृगांबु ठकणार मृगां हो ॥ २३ ॥
टीकाकार जसे क्रमें रस दश जे बोलिले श्रीधरें

---

१ रक्तानें भरलेलें. २ हातामध्यें हत्तीचा दांत. ३ मित्रभावानें. ४ सिंहासन. ५ करुण रसाचा उदय. ६ अशक्त. ७ वसुदेव आणि देवकी. ८ हत्ती. ९ अज्ञानी जनांनीं. १० विकाररहित जो कृष्ण त्यानें. ११ तेजस्वी. १२ अनुभव. १३ त्याच्याकडे पाहून. १४ बलराम जो शेष. १५ कृष्ण हा शेषशायी. १६ मृगजळ. १७ भागवतावर टीका करणार श्रीधरस्वामी.

श्लोकींचि रस त्या क्रमें कथियले हे वामनें सादरें ।
ते येती कवणे रितीं अनुभवा तो भाव यां प्राकृतां-
श्लोकीं आणि पदीं असा अवधिया आधार जो संस्कृता ॥२४॥

॥ इति श्रीकंसवध समाप्त ॥

## द्वारकाविजय.

### प्रथम सर्ग.

( कथेचा सारांश. )

या प्रकरणांत श्रीकृष्णाचें द्वारकेंतील वैभवाचें संक्षिप्त वर्णन आहे म्हणून यास "द्वारकाविजय" हें नांव दिलें आहे. प्रथम सर्गांत श्रीकृष्णास अष्टनायका व सोळा सहस्र स्त्रिया कशा प्राप्त झाल्या, याचें वर्णन असून द्वितीय सर्गापासून नारदमुनीनें, त्या प्रत्येक स्त्रीचे सदनांत तितकीं निराळीं रूपें घेऊन श्रीकृष्ण काय काय लीला करीत होता, व इतक्या ठिकाणीं एकदा कसा नांदत होता, व त्या सदनांत संपत्ति काय काय होती, इत्यादि ज्या गोष्टी पाहिल्या त्याचें वर्णन केलें आहे.

सोळासहस्रसदनीं यदुराज नांदे
सत्कीर्ति तारक करूनि जगीं जनां दे ।
वंदोनियां पद शिरीं वरदा तयाचें
वर्णीन तें गुणगणाऽमृत दातयाचें ॥ १ ॥
भौमासुरा वधुनियां रण संगतातें
स्त्रीवृंद षोडश सहस्र अनंगतातें ।
द्वारावती पुरिस देऊनि दिव्य यानें
त्या धाडिल्या नृपसुता अजि अव्ययानें ॥ २ ॥
एके घडीसचि धरी सकळां करीं तो
आत्माचि जो जडजिवां सकळां करीतो ।
जो भूमिपुत्र मुरदैत्य वरीं हरीतो
सोळा सहस्र नवऱ्या नवरा हरी तो ॥ ३ ॥
सोळा सहस्र वरही जलजाऽक्ष जाला

---

१ वर देणारा. २ भूमिपुत्र प्राग्ज्योतिष्पुरीचा राजा. ३ युद्धामध्यें आलेल्यास. ४ स्त्रीसमूह. ५ कृष्णालें. ६ अश्वयादि वाहनें. ७ राजकन्या. ८ नाशरहितानें. ९ करीं धरी म्हणजे लग्न लावी. १० श्रेष्ठास. ११ हरण करतो. १२ जलजाक्ष म्हणजे कमलासारिखे आहेत नेत्र ज्याचे.

तें कायसें अजि अशक्य अधोक्षजाला ।
सस्त्रीक षोडश सहस्रचि देवदेवें
केले विवाह समयीं वसुदेव देवें ॥ ४ ॥

देवकी प्रतिगृहीं वरमाय, जो जगांत न रमावर माय ।
तोचि हा प्रति गृहीं नवरा वो, जो मनीं ह्मणति मानव रावो ॥ ५ ॥
वरबापही प्रतिगृहीं वसुदेव, प्रतिमंदिरीं सकळरूपहि देव ।
यदुवीरआप्त अवघे प्रतिगेहीं, हरि दाखवी इतर लोक उगेही ॥ ६ ॥

जोशी पुरोहितहि तोचि मुकुंद जाला
जे सावधान ह्मणताति तया अजाला ।
एकाच लग्नसमयीं अवघ्या करीं तो
हातें धरी जगही जो निमिषें करीतो ॥ ७ ॥

मोजिनां दशशतें द्विअष्टकें, मंदिरें सकळ मंगळाष्टकें ।
व्यापिलीं प्रभु-गुणांऽमृताक्षरीं, व्याप्त जेविं हरि तो क्षरोक्षरीं ॥ ८ ॥
गर्जती द्विजचि ते शुभनादी, अन्य मौनपर बंदिजनादी ।
मंगलत्व इतरत्व न साहे, मंगलप्रद कथा परिसा हे ॥ ९ ॥
नरक अद्वय पाश जो हरी, वरि तयां युवतींस तो हरी ।
द्विज तयाच सुमंगलाऽष्टकीं, रमति तेच जगीं अभीष्ट कीं ॥ १० ॥

दुर्गं सर्व चुरा करी सहभुरा मर्दुनी भौमासुरा
निर्दाळी असुरां सुखी करि सुरां साधूजनां भूसुरां ।
भौमाच्या कुमरी समर्पुनि धरा जाऊनि त्याच्या घरा
धाडी स्वात्मपुरा स्त्रिया निजपुरा सोळासहस्रा वरी ॥ ११ ॥
भौमक्ष्माधिपती स्त्रिया कुलवती सोळासहस्रा सती

---

१ विवाहसमयीं षोडशसहस्र सस्त्रीक ह्म० स्त्रीसह वसुदेव निर्माण केले. २ प्रत्येक घरीं. ३ वराची आई. ४ लक्ष्मीपति "जो जगांत नवरा वरमाय" असाही पाठ आहे, वरमाय ह्म० श्रेष्ठ आहे माया ज्याची. ५ मावतो. ६ राजा. ७ व्यर्थ. ८ जो एकाक्षणांत जग उत्पन्न करितो. ९ सोळा हजार. १० मंगळाष्टकांत प्रभूचे गुण वर्णन करणारे गोड वर्ण त्यांनीं. ११ स्थावर जंगमीं. १२ भाट इत्यादि. १३ हरण करितो. १४ स्त्रियांस. १५ पुढील मंगलाष्टकरूपी अकरा श्लोकांत कृष्णानें १६००० स्त्रिया व अष्ट पटस्त्रिया कशा केल्या याचें वर्णन आहे. १६ प्रिय. १७ गुरु दैत्यांसह. १८ ब्राह्मण. १९ भौमासुराच्या. २० पुत्रास. २१ पृथ्वीचें राज्य. २२ श्रेष्ठा. २३ भौम-क्ष्मा-अधिपति,-क्ष्मा-अधिपति ह्म० पृथ्वीपति जो राजा भौमासुर त्यानें कुलवती स्त्रिया हरण करून आणिल्या मार्गीत् होत्या. २४ साध्वी.

आणी शौर्यगती हरूनि कुमती तो पावला श्रीपती ।
युद्धीं दैत्यपती वधूनि युवती धाडी स्वगेहाप्रती
त्यांतें द्वारवतीमधें हरि अतिप्रेमें वरी ये रिती ॥ १२ ॥
श्रीमद्द्वारवतीस ये खगपतिस्कंधीं बसे श्रीपती
वामांकीं सुदती अलंकृतवती श्रीसत्यभामा सती ।
एवं दैत्यपती वधूनि युवती सोळासहस्रा कृती
आणी हंसगती वरी यदुपती नामेंचि जो दे गती ॥ १३ ॥
रुक्म्याची अनुजा समुद्रतनुजा दे पत्र रामानुजा
धाडी गुप्त अजोसमीप नृपजा नामें सुदेवा द्विजा ।
तेव्हां श्रीगिरिजागृहीं स्वसहजा आणी सुधासिंधुजा
मर्दी अश्वगजा चमू निजभुजावीर्यें हरी पद्मजा ॥ १४ ॥
भावाच्या मरणीं मुकुंदकरणी सत्राजितें स्थापुनी
घाली आळ जनीं स्यमंतक मणी नेला ह्मणे चोरुनी ।
ऋक्षाच्या सदनीं बिळीं हुडकुनी आणी हरी त्याक्षणीं
प्रायःश्चित्त मनीं करी सहमणी श्रीसत्यभामार्पणीं ॥ १५ ॥
माझा राम धनी यदूत्तमपणीं आला न जाणें घृणी
झोंबे त्यासि रणीं कळोनि करुणी पायीं स्वचूडामणी ।
अर्पी श्रीचरणीं स्मयंतकमणी तो जांबवान् सद्गुणी
वंदी पायवणी पदांबुजि धणी घे ऋक्ष कन्यार्पणीं ॥ १६ ॥

---

१ द्वारकेमध्यें. २ गरुडाच्या खांद्यावर बसून. ३ सुंदर आहेत दांत जिचे अशी सत्यभामा जिला नरकासुराचे वधास जात असतां कृष्णानें बरोबर घेतलें होतें. ४ अलंकार घातलेली. ५ कृतकृत्य. ६ मोक्ष देणारा. ७ धाकटी बहीण रुक्मिणी. ८ रुक्मिणी ही लक्ष्मीचा अवतार ह्मणून तीस समुद्रकन्या ह्मटलें. ९ सात श्लोकाची पत्रिका. १० बळरामाचा धाकटा भाऊ अर्थात् कृष्ण त्यास. ११ कृष्णाकडे. १२ भीमक राजाची कन्या १३ देवीच्या देवळांत. १४ आपल्या बरोबर अवतरण पावलेली. १५ सुधासिंधूपासून झालेली लक्ष्मी अर्थात् येथें रुक्मिणी. १६ सैन्य. १७ आपल्या बाहुबलानें पद्मजा लक्ष्मी हिचें ह्म० रुक्मिणीचें हरण करी. १८ कृष्णानें माझा बंधु मारून स्यमंतक मणि चोरून नेला अशी सत्राजितानें कृष्णावर आळ घातली होती. १९ अस्वल जो जाम्बवान् त्याच्या. २० मण्यासह सत्यभामेस अर्पण केलें हेंच आळ घातलेल्या पापाबद्दल प्रायश्चित्त केलें असा अर्थ. २१ रामानें यादवांत अवतार घेतला हें न जाणून. २२ दयाळू. २३ हा राम आहे असें कळल्यावर. २४ पायाचें तीर्थ. २५ तृप्ति. २६ जाम्बवती अर्पण करून.

कालिंदी यमुना फणींद्रदमनावांचूनि ते अंगना
अन्यातें वरिना ह्मणूनि वचना या बोलिली अर्जुना ।
आली कृष्णमना गजेंद्रगमना आणूनि चंद्रानना
पाहोनी सुदिना वरी सुनयना आनंद सर्वा जना ॥ १७ ॥
आतेचा पति जो अवंतिनृपती तत्कन्यका श्रीपती
जाणोनि स्वरती स्वयंवरगती श्रीमित्रविंदा सती ।
आणी द्वारवतीप्रति क्षितिपती जिंकोनि जे वर्जिती
भाऊ दुष्टमती तिचे वरतनी दुर्योधनाचे प्रती ॥ १८ ॥
वर्षांचे दिसती वईल असती बांधे तया हे सती
कन्या नाग्नजिती ह्मणे क्षितिपती देईन ऐशा व्रतीं ।
बांधे विश्वपती ह्मणोनि सुमती अर्पी सुता त्याप्रती
आणि द्वारवती प्रियेस नृपती जिंकोनि मार्गीं किती[13] ॥ १९ ॥
आतेची दुहिता तिच्या निजहिता जाणोनि मातापिता
भाऊ त्याच मता धरूनि विहिता मार्गींच ते सुस्मिता ।
देती कीं चरिता स्मरोनि जनितां पावे गती तत्वता
होता विश्वपिता वरू निजसुता भद्रावती सुव्रता ॥ २० ॥
कोणी एक करीं धनुष्यचि धरी जें सज्ज कोणी करी
एवं भूप वरी न राजकुमरी जो विंधिला यापरी ।
त्या चापेंचि हरी स्वयंवर वरी लक्षूनि नीरीं[19] वरी
विंधी[20] मत्स्य वरी तयास नवरी श्रीलक्ष्मणा सुंदरी ॥ २१ ॥
त्याच्याचि वैवाहिकमंगलाष्टकें, गाती विवाहीं द्विज मंगळाष्टकें ।

---

१ सर्पश्रेष्ठ कालिया त्याचें दमन करणाऱ्या कृष्णावांचून. २ ती कालिंदी; कृष्णाची चतुर्थ नायिका. ३ अर्जुन व कृष्ण हे मृगयेकारितां निघाले असतां दोनप्रहरीं यमुनातीरीं आले तेव्हां ही स्त्री त्यांच्या दृष्टीस पडली. ४ गजगामिनी. ५ उत्तम दिवस. ६ आपले ठिकाणीं प्रीतियुक्त आहे असें जाणून. ७ पंचम नायिका. ८ तिचे बंधु विंद आणि अनुविंद जे दुर्योधनाचे पक्षपाती होते. ९ अयोध्येच्या राजा नग्नजित याणें कन्येच्या स्वयंवरीं असा पण केला होता कीं जो हे सात बैल एकदम बांधील त्यास ही कन्या देईन. १० नग्नजिताची कन्या, कृष्णाची षष्ठ नायिका. ११ पण. १२ कृष्ण. १३ मार्गांत अनेक नृपति जिंकून. १४ चारुहासा. १५ पिता. १६ विश्वजनक कृष्ण. १७ वर, नवरा. १८ भद्रावती पितृभगिनी सुता कैकेयदेशच्या राजाची कन्या कृष्णाची सप्तम भार्या. १९ पाण्यांत. २० भेद केला. २१ मद्राधिपाची कन्या कृष्णाची अष्टम भार्या.

हें आयके माधव देव सुद्विजां, सोळासहस्त्रा वरि दे वसु द्विजां॥ २२ ॥
ज्या मंगलें मंगल या जनाचें, चरित्र तें रम्य निरंजनाचें ।
भावें अशा वर्णिति मंगळाला, मुखें जयाच्या रस हा गळाला ॥ २३ ॥
सावधान हरि संतरक्षणीं, त्यांसि दे न कधिं अंतर क्षणीं ।
सावधान ह्मणती द्विजन्म ते, यानिमित्त असि बुद्धि जन्मते ॥ २४ ॥
अंतिंचे घडिस अंबुजेक्षणीं, अंतरीं बुडवि अंबु जे क्षणीं ।
कामिनी बुडविती मनास त्या, मानिती सफळ कामना सत्या ॥ २५ ॥
जडत्व भ्रांतीचें कपट सरतां अंत्रपट तो
दिसे सच्चित्तंतू प्रगट नयनीं निष्कपट तो ।
सहस्त्रें सोळाही प्रकृति वरिती सत्पति सत्या
अनन्या चिच्छक्ती वरिती सगुणा श्रीपतिस त्या ॥ २६ ॥
माइका कपट अंत्रपटातें, वारिती युवति निष्कपटातें ।
आत्मतंतु शतधाच पहाती, अक्षता मणिमयांकित हातीं ॥ २७ ॥
भ्रांति अंतरपटा विरहातें, वारितां मग परस्पर हातें ।
अक्षताच शिरीं अक्षतमोतें, अर्पताति नवला न गमो तें ॥ २८ ॥
जयीं त्या चतुर्वक्त्रअष्टाक्षतातें, स्त्रियांच्या शिरीं अर्पिलें अक्षतातें ।
तयीं ऊठती नाद वाद्यांत नाना, द्विजीं मंत्र गंधर्ववृंदीं तनाना ॥२९॥
मृदंगादि नाना ध्वनी गायनाचे, सुरस्त्रीनटीवृंदही गाय नाचे ।
दिशा व्यापिल्या सर्वही अंबराच्या, असा नाद लग्नांत पीतांबराच्या॥ ३०
मुक्ताफळांतें द्विज अक्षतांतें, श्रीकुंकुमें रंगुनि अक्षतांतें ।
करूनियां अर्पिति वेदवादी, ते पाहती कौतुक यादवादी ॥ ३१ ॥

---

१ सुंदर आहेत दंत ज्याचे अशा सोळासहस्त्र स्त्रियांस वरी. २ दक्षिणा; दान. ३ अज्ञानरहित जो कृष्ण त्याचें. ४ ब्राह्मण. ५ "अंतिची सुघडि" असाही पाठ आहे. ६ पाणी. ७ जडत्वाची भ्रांति देणारा ह्मणजे मायिक खोटा अंत्रपट निघाल्यावर पटाचें तंतुरूप कारण जो परमेश्वर तो निष्कपट प्रकट दिसूं लागला. ८ कपटरहित. ९ सोळा सहस्त्र स्त्रिया त्याच सगुण प्रकृति १० मायारूप आडवा येणारा पट. ११ कुंकुमयुक्त तांदूळ. १२ अविंध मोत्यें. १३ वाटो. १४ चारमुखें व आठ नेत्र ज्याला आहेत अशा ब्रह्मदेवाच्या बापानें (श्रीकृष्णें) १५ ब्राह्मणामध्यें मंत्र उठले ह्म० ते मंत्र ह्मणूं लागले व गंधर्ववृंद गायन करूं लागले. १६ सुरस्त्री ह्म० अप्सरा व नटी यांचा समुदाय गाऊं व नाचूं लागला. १७ आकाश. १८ कृष्णाच्या. १९ मोत्यें. २० अक्षत ह्म० न मोडलेलेसाम अशा अक्षता. २१ कुंकुमामिश्रित तांदुळ. २२ वेद पठण करणारे ब्राह्मण.

लाधल्या नवरिया हरिला ज्या, होमिती[१] सकळ सुंदरि लाज्यां[२] ।
हस्त हस्तकमळीं युवतींचे, श्रीपती धरि नितंबवतींचें[३] ॥ ३२ ॥

थांकार[४] दे धनद[५] बैसुनि दक्षणातें
संतोषवी नवरियां कमलेक्षणातें ।
दातृत्व देउनि दरिद्रपणास त्याला
धाडी दिगंत वरि तो हरि त्या सत्यांला ॥३३॥

कामें करी दशशताक्ष[६] हरीसमोर
देखूनि[७] नृत्य करि जेविं घनास मोर ।
सर्वांगलोचन[८] सुरेंद्र मयूर साचा
घे लाभ मेघतनुकृष्णकृपारसाचा ॥ ३४ ॥

जे ते गृहीं मणिमयांक[९] विवाहवेदी
जो तो अहेर सुर देववरा निवेदी ।
गाती मुकुंदगुण गायक सामवेदी
कीजे[१०] तसें स्तवन मूर्ति धरोनि वेदीं[११] ॥ ३५ ॥

सोळासहस्र सदनीं हरि भोजनातें
अन्नें सुधामयें[१२] चतुर्विध[१३] दे जनातें ।
स्त्रीरूप हें धरणि घेउनि अन्नपूर्णा[१४]
सर्वांस वाढित असे अजि अन्न पूर्णा[१५] ॥ ३६ ॥

भाज्या सोठि[१६] भरी तयांतहि परी रांधूनि शाकंबरी[१७]
पात्रें तेंचि करीं धरी तदुपरी वाढी स्वशाकंवरी[१८] ।
वामांकीं नवरी वराप्रती हरी दिव्यासनाऊपरी
त्यातें हें अमेरी असे सुखकरी वाढूनि कोशांबिरी[१९] ॥ ३७ ॥

पात्रें सुवर्णमणिनिर्मित विश्वकर्मा
मांडूनि दाखवि तया निज शिल्पिकर्मा[२०] ।

---

१ लाजाहोम करितात. २ लाह्या. ३ स्त्रियांचे. ४ थाकार दक्षिणा; थावयाचें जें द्रव्यादि तें. ५ कुबेर. ६ सहस्राक्ष इंद्र. ७ मेघास पाहून. ८ ज्याच्या सर्वांगावर नेत्र आहेत असा सुरेंद्र म्ह० इंद्र किंवा मोर. •इंद्रास सहस्रनेत्र आहेत, व मोरास पिच्छावर डोळे आहेत. ९ रत्नखचित बोहलें. १० करावे. ११ पंडितांनीं. १२ अमृततुल्य. १३ लेह्य, पेय, चोष्य, आणि खाद्य अशीं चार प्रकारचीं अन्नें. १४ अन्न पुरविणारी देवी. १५ पुरणाचें अन्न. या दोन चरणांचा असाही पाठ आहे. "स्त्रीरूप हें धरुनि आणि स्व अन्नपूर्णा । सर्वांस वांटुनिहि वाढित अन्नपूर्णा ॥". १६ थाट. १७ अनेक जातींच्या भाज्या. १८ प्रत्यक्ष देवी. •१९ देवी. २० कौशल्य.

बैसावया जडित पाट पुढें चवाचा
ताटातळीं इतर बैसुनि आंचवाया ॥ ३८ ॥
गंगा स्वयें मूर्तिमती जनाला, दे वारि जैं बैसति भोजनाला ।
स्नानें जिच्या मुक्ति अजी वदावी, ते नीर दे हें यदुवीर दावी॥३९॥
संतोष हो हरिचिया पदसारसातें
भावें अशा वरुण घेउनि सा रसांतें ।
वाढी जिभेसि रुचि दे बरवी जनांच्या
ऐशा गनी रसपती करि भोजनाऱ्या ॥ ४० ॥
सद्यपंक्क रस जे गिरिजां ते, आणि हे धरणि वाढित जाते ।
शर्करादिक दलांम्ररसाचा, तृप्ति दे रसिक आत्मरसाचा ॥ ४१ ॥
श्रीकामधेनु पुरवी जनहो रसातें
स्त्रीमूर्ति होउनि घृतादिक गोरसातें ।
वाढावया भुवनसुंदरि ते निघाली
दुग्धादि पात्र भरुनी परिपूर्ण घाली ॥ ४२ ॥
साय आणिक दह्यां दुधताका, वाढिते मकरकेतुपताका ।
दे स्वरूपरस जे रसिकां जी, जीपुढें रतिहि[12] ते जसि कांजी ॥ ४३ ॥
जें शक्रदुर्लभ तसें निज नक्र वाढी
नासूनि जें अरुचि दे सुरुचीस वाढी ।
पंक्तीत या घमघमी ठिकरी तयाची
वाढी विभूति असि हे यदुराजयाची ॥ ४४ ॥
ब्राह्मणा मुखिं ध्वनी मिटक्यांची, दक्षिणा अमित सोनटक्यांची ।
तारकां गणिति भूमि दिसेना, मोहरीहि उदरांत धसेना॥ ४५ ॥
नद्या अग्निही घेउनी उष्ण पाणी, मनुष्याकृतीनें अहोरात्र पाणी ।

---

१ चवरंग. २ जल. ३ चरणकमलास.४ षड्रस. ५ वरुण. ६ नुकतेच पावित्र केलेले. ७ नदी; गंगा.८पृथ्वी.९"तृप्ति दे रसिक आत्मरसाचा, असाही पाठ आहे. १०मरककेतु जो मदन त्याची पताकारूप अशी स्त्रीरूप कामधेनु.११लावण्यरस.१२ मदनस्त्री. १३ इंद्रास दुर्मीळ. १४ ताक. १५ जें तक्र सुरुचीस वाढी ह्म० वृद्धि देई. १६फोडणी.१७सत्ता; शक्ति.१८मिटक्या मारण्याचा ध्वनि.१९ एक नाणें. २० तारका गणिति ह्म० ब्राह्मण बहुत जेवल्यामुळें त्यांच्यानें मान खालीं करवली नाहीं ह्मणून ते आकाशाकडे पाहून नक्षत्रें मोजूं लागले ह्मणजे वर मान करून बसले असा अर्थ. २१ ते इतके जेवले कीं मोहरीसही पोटांत वाव नव्हता.

जना देति सर्वांसही आंचवाया, बसावयासि देऊनि तेथें चवाया ॥ ४६ ॥
जसी मेघचक्रांत सौदामिनीची, असी कृष्णरूपीं प्रभा कामिनींची ।
हरी श्याम गोऱ्या स्त्रिया त्या सुवर्णा, विवर्णत्व देती स्ववर्णें सुवर्णा ॥ ४७ ॥
तैलंगकर्नाटकगुर्जरातें, कऱ्हाडकोल्हापूर निर्जरातें* ।
आनंद गोदातटिंच्या द्विजांला, वधूवरां देखुनि पूर्ण जाला ॥ ४८ ॥

तांबूल दे पति शशांक वनस्पतींचा
जो कां स्वयेंचि मनें सर्व जगत्पतीचा ।
सर्वत्र दोंदिल गणाधिप वेत्रहस्तीं
कामें करी नरतनू मुख जेविं हस्ती ॥ ४९ ॥

निरोप दे त्यांस चतुर्थ होमीं, ह्मणे हरी कीं तुमचा अहो मी ।
श्रीमूर्ति ते हे पुरुषोत्तमातें, तसी न विप्र प्रिय जेविं मातें ॥ ५० ॥
दे द्विजां हरि निरोप जेक्षणीं, प्रेमअंबु भरि अंबुजेक्षणीं ।
वंदितां पद जगद्गुरू निघे, जो किरीटहि न सांवरूनि घे ॥ ५१ ॥
प्रेमविव्हळ पदांबुरुहांतें, मस्तकीं धरि जगद्गुरु हातें ।
ब्रह्मभक्ति सुगुणार्णव दावी, प्रीति ते किति ह्मणूनि वदावी ॥ ५२ ॥
विवाह लोकांत अलोकरीती, करीतसे लोक जसे करीती ।
जो वामनध्यानपथेंचि पाहे, वर्णी तयाचीच अजी कृपा हे ॥ ५३ ॥
एवं यथायोग्यचि सर्वलोकां, दावूनियां लेश कृपावलोकां ।
निरोप गोविंद तया जनां दे, सोळासहस्रीं यदुराज नांदे ॥ ५४ ॥

सोळासहस्र सदनीं निज देह केले
ज्याच्या कथामृतरसा जन हे भुकेले ।
हा द्वारकाविजयनामकही हरी तो
दिव्य प्रबंध करितो भव जो हरीतो ॥ ५५ ॥

---

१ चवरंग. २ वीज; मेघावर वीज चमकते तशी स्त्रियांची कांति मेघवर्ण कृष्णावर चमकूं लागली. ३ उत्तम वर्ण ज्यांचा अशा. ४ फिकेपणा. ५ वनस्पतींचा पति ह्म० राजा चंद्र. ६ 'चंद्रमा मनसो जातः' इत्यादि श्रुतिप्रामाण्यात्. ७ वेताची कांठी धरणारा; भालदार. ८ प्रेमाश्रु. ९ कमलनेत्राचे ठिकाणीं. १० चरणकमलास. ११ कृष्ण. १२ ब्राह्मणाचे ठिकाणीं भक्ति. १३ गुणसमुद्र कृष्ण. १४ कृपायुक्त अवलोकन. १५ वेगळा वेगळा देह केला ह्म० आपण सोळा सहस्र रूपें धरून प्रत्येक सदनांत असता झाला. १६ प्रकरण. * भूदेव; ब्राह्मण.

द्वारकाविजयकाव्य जयांत, स्वामिचे विजय त्या विजयांत ।
हा विवाहविजय प्रभुचा हो, अर्पिला हरिकथामृत लाहो ॥ ५६ ॥

## द्वितीयसर्ग.

सोळासहस्र युवती घटिकेचि माजी
रूपें करूनि तितुकीं तितुक्या समाजीं ।
श्रीकृष्णजी वरुनि त्यांत अनादि शांत
स्वामी वसे म्हणुनि कीर्ति दश दिशांत ॥ १ ॥

हे कीर्त्ति गातां सुरगायकांनीं[1], श्रीनारदें आयकिली स्वकानीं ।
ये द्वारके विस्मितचित्त झाला, पाहूं म्हणे त्या पुरुषा अजाला[2] ॥ २ ॥

सोळासहस्र युवतींसहि एकला हो
एके घडीस वरि हे हरि केविं लाहो ।
नांदे कसा तितुकियां सदनीं[3] सदा हा
पाहों दिशा सकळ वर्णिति ज्यास दाहा[4] ॥ ३ ॥

परम कौतुक मानुनि ये मुनी[5], प्रतिगृहीं हरिदर्शन नेमुनी ।
गगनपंथ धरूनिच धांवला, त्वरित कृष्णपुरीप्रति[6] पावला ॥ ४ ॥

जटा मस्तकीं वाजवी ब्रह्मवीणा, हरीचे गुणीं मिश्र वाणी प्रवीणा[7] ।
प्रभूची मुखीं गाउनी कीर्ति[8] नाचे, नवे नित्य घे सोहळे कीर्तनाचे ॥ ५ ॥

तो नारद द्वारवतीस पाहे, कीं स्वर्गशोभेस करी त्रपा[9] हे ।
समृद्ध देखे जनसंपदांसी, घरोघरींही अणिमादि[10] दासी ॥ ६ ॥

द्वारकेंत अति रम्य मळे[11] हो, श्री[12] जयांतिल कधीं न मळे हो ।
पुष्पितें[13] उपवनें मुनि लक्षी, मोजितां न धरवें शतलक्षीं[14] ॥ ७ ॥

विहंगें[15] ज्यांत उदंड[16] अखंड जी, मधुरता वरिजे जिहिं अंडजीं[17] ।
कुसुमित द्रुमें[18] सुंदर साजती, फळभरेंच लवोन विराजती[19] ॥ ८ ॥

सरोवरें निर्मळ नीरें[20] ज्यांचें, कीं ज्यामधें कानन नीरजांचें[21] ।
तयां अजी वर्णिल कोण पद्मां[22], जेथें वसे सद्म[23] करूनि पद्मा[24] ॥ ९ ॥

---

१ गंधर्व. २ जन्मरहितास. ३ गृहांत. ४ दशदिशा. ५ नारद. ६ कृष्णपुरी; अ० द्वारका. ७ प्रवीण वाणी अ० कुशल वाणी. ८ कीर्ति; यश. ९ लज्जा. १० अणिमाद्यष्टसिद्धि. ११ बाग. १२ शोभा; लक्ष्मी. १३ फुललेलीं उद्यानें. १४ भ्रमर लक्ष. १५ पक्षी. १६ पुष्कळ. १७ पक्ष्यांनीं. १८ वृक्ष. १९ शोभतात. २० उदक. २१ नीर अ० पाणी त्यापासून झालेलें अर्थात् कमळ. २२ कमळांस. २३ घर. २४ लक्ष्मी.

परांग नीरीं नवपंकजांचे, कस्तूरि धिक्कारिति पंक ज्यांचे ।
देखोनि त्या मुक्तिपुरीं जळाला, संसार-संताप असे जळाला ॥ १० ॥
अन्य सर्व उपमा भ्रम राहो, पंकजें मुनि-मन-भ्रमरा-हो ।
द्वारकापतिपदें दिसती हो, जों स्तनीं धरि अनादिसती हो ॥ ११ ॥
हरिपदोपम पद्म सरोवरीं, परमहंस मुनींद्र सरोवरीं ।
दिसति हंसहि सात्विक साजिरे, वसति लाभ दुज्यां न असा जिरे ॥१२॥
हरिपदाकृतिनें अति सारसीं, प्रभुपुरींत तया जळसारसीं ।
त्यजुनि आवडि लौकिकसारसीं, वसति मांडियली द्विजें सारसीं॥१३॥
सांडिला कुसुम-संभ्रम रानीं, द्वारका-जळरुहीं भ्रमरांनीं ।
जे रिती मुनिमनो-मधुपानीं, कृष्ण-पाद-कमळीं मधुपानीं ॥१४ ॥
कृष्णपादकमळीं न रसाचा, स्वाद घेत नरवानर साचा ।
वानरादिकहि राघव तारी, हा तरे न कवणे अवतारीं ॥ १५ ॥
निर्माण ज्याणें विधि शंभु केले, त्याकारणें लोचन हे भुकेले ।
त्याचीं पदाब्जेंचि पहावयाला, त्वरा दुजा न प्रिय भाव याला ॥ १६ ॥
असे सर्वठायीं जरि हा उदास, प्रभूची पुरी रम्य त्या नारदास ।
गमे कीं हरीची तनू त्यास वाटे, पहातां उठे प्रेम उल्हास-वाटे ॥ १७ ॥
द्वारकाविभव जों मुनि लक्षी, माडियांसि गणना नवलक्षीं ।
उच्च शुभ्र रजतां स्फटिकांच्या, चांदण्यां रजनिच्या घटिकांच्या ॥ १८ ॥
चांदण्यांत सितं वस्तु विराजे, वर्णिती निपुण जे कविराजे ।

---

१ पुष्परज. २ चिखल. ३ द्वारकेंतील पाण्यास पाहून. ४ दग्ध झाला. ५ नारदाचें मन हेंच भ्रमर त्यास कमळें कृष्णाच्या पदपंक्तिप्रमाणें दिसूं लागलीं. ६ लक्ष्मी. ७ हरिपदें हींच कमळें ज्यांत अशा सरोवरीं अर्थात् द्वारकेमध्यें परमहंस म्ह० संन्यासी आणि योगी तसे हे सात्विक हंस सरोवरामध्यें वस्ती करीत होते. ८ पचणार नाहीं. ९ रसभरित. १० द्वारका. ११ ब्राह्मण किंवा पक्षी. १२ सारस पक्ष्यांनीं. १३ फुलांसाठीं हिंडणें. १४ द्वारकारूपी कमळांत. १५ मुनींचीं मनें हेच मधुप म्ह० भ्रमर यांनीं कृष्णपदकमल रसाचा आस्वाद घेतल्यामुळें इतर ठिकाणीं जाणें टाकलें, त्याचप्रमाणें भ्रमरांनीं तेथच्या सरोवरांतील कमळें पाहून इतर ठिकाणीं पुष्पार्थ हिंडणें टाकलें. १६ रसपान. १७ वानराप्रमाणें विचारहीन नर जो कृष्णपादकमलाचा आस्वाद घेत नाहीं तो कधींच तरणार नाहीं. १८ ब्रह्मदेव. १९ नारद सर्व वस्तूंविषयीं विरक्त होता तरी. २० वैभव; शोभा. २१ नवलक्ष माडयांचीं घरें होतीं. २२ रुपेरी. २३ चांदवे. २४ पांढरी.

मौक्तिकासहित चांदवियांची, दीप्ति तृप्ति करि यादवियांची ॥ १९ ॥
भूमि त्या नगरिं रत्नमणींची, कोंदणें जडित इंद्रमणींचीं ।
वाट ते गजरथाश्वनृपांची, हेम दिव्य वरि सुंदर पांची ॥ २० ॥
रत्नहेमखचिता पडशाळा, सत्सभा बहु अशाचि विशाळा ।
पंक्ति रत्नमय हाटवटचाची, दीप्ति रात्रिस दिसे दिवंटयांची ॥ २१ ॥
देखे असींच नवलें मुनि फार वाटे
देखोनि कृष्ण गृहसौख्य अपार वाटे ।
द्वारीं उभे सकळही सुर लोकपाळ
श्रीकांत जेथ वसतो भुवनैकपाळ ॥ २२ ॥
देखिलें हरिचिया भवनाशीं, दर्शनेंकरुनि जें भव नाशी ।
ज्यांत षोडशसहस्र सतींचीं, मंदिरें हरिचिये वसतीचीं ॥ २३ ॥
कौशल्य तें परम कीं भवबंध नाशी
कौशल्य तें न अजि जें करि बंधनाशी ।
कौशल्य वांछित असे नरराजयाला
कौशल्य अर्पुनि भजों यदुराजयाला ॥ २४ ॥
काव्यांत ज्या कुनरें आणि अपूतनारी
वर्णूनि वर्णिति जयांत न पूतनारी ।
तें काकतीर्थचि कदापि न मानसाच्या
हंसाचिया रमति हो गति मानसाच्या ॥ २५ ॥
स्वकौशल्य तें विश्वकर्मा विशेषें, हरीचे गृहीं दाखवी हो अशेषें ।
गृहें त्यांत सोळासहस्रें समानें, अशाही पुरीमाजि जे भासमानें ॥२६॥
सहस्रें जीं सोळा यदुपतिगृहें त्यांतहि मुनी
निघे एक्या गेहीं हरिपद रजांलागिं नमुनी ।
निघाला वैकुंठीं ह्मणुनि मुनिला वाटत असे
विलास श्रीकांत क्षितिवरिहि दावी अजि असे ॥ २७ ॥
स्वयंभे स्तंभ श्रीमरकतमणीचेच वरते

---

१ मोत्यांच्या झालरींसहित चांदवा किंवा छत. २ यादवांची. ३ पाच. ४ बाजारची ओळ. ५ मशाली. ६ मार्गानें. ७ गृह. ८ संसार. ९ सोळा हजार स्त्रियांचीं. १० राहण्याचीं. ११ संसारबंधन. १२ कुत्सित लोक. १३ अपवित्र स्त्रिया; कुब्जा इत्यादि. १४ कृष्णास. १५ मानससरोवरांतील हंसांच्या मानस गति काकतीर्थाचे ठिकाणीं कसलि सुख पावणार नाहींत. १६ संपूर्ण. १७ घरांत. १८ स्वयंभू; आपोआप. १९ पाचेचे.

फळाभ्याली रूपें खचित मणि वैडुर्य वर ते ।
न रात्रींही जेथें किमपि तम कीं उत्तमें-मणी
प्रकाशीती जाणों उदित तितुकेंही दिनमणी ॥ २८ ॥
शशीची प्रभा पांढरी चांदव्याला, गमे विश्वकर्माब्धि तो चांद व्याला ।
जया भोंवतें वृंद मुक्ता-द्विजांचें, जिहीं मोहिलें नेत्र मुक्ताद्विजांचें॥२९॥
चांदव्या करुनि त्यांचि अपारा, तृप्ति मानिति चकोर दुपारां ।
कृष्णपाद-नख-चंद्र सुधा ते, देखतां विहिगबुद्धिहि धाते॥ ३० ॥
गृहांतील कृष्णागराचा निघे तो, नभीं धूम्रही मेघ मानूनि घे तो ।
सुखें नाचती देखती त्यांस मोर, स्त्रिया हांसती ज्या उभ्या त्या समोर३१
ज्या कांकण्या वक्र गृहाग्रभागीं, रत्नांकिता त्यांत यथाविभागीं ।
चकोर पारावत हंस पक्षी, मयूरही नेत्र जयांसि पक्षीं ॥ ३२ ॥
त्या अंडजांमाजि चकोरजाती, ते चांदव्यांलागिं गृहांत जाती ।
बाहेर ये वृंद तया घनाचें, विलासमानीं शिखिवृंद नाचे ॥ ३३ ॥
इत्यादि या कुशलता करि विश्वकर्मा
दावी ह्मणे जडसचेतनविश्वकर्मा ।
संतुष्ट हो किमपि मानुनि हे स्वसेवा
भावें अशा कुशळें हो तुह्मि कां न सेवा ॥ ३४ ॥
कौशल्य जें ज्यांस असेल लोकीं, तें श्रीहरीच्याच कृपावलोकीं ।

---

१उत्तम रत्नें. २ ती रत्नें इतकी तेजःपुंज होतीं कीं पाहणारास तितके सूर्यच उगवले असें भासे. ३ छत. ४ विश्वकर्मारूप समुद्र. ५ जन्म दिला; समुद्रांतून जसा चंद्र उत्पन्न झाला तसा विश्वकर्माब्धिरूप समुद्रांतून चांदवा जन्मला. ६ मुक्ताफळें आणि चंद्र यांचे. ७ मुक्त झालेल्या ब्राह्मणांचे. ८ पक्षिविशेष ज्यांची चंद्रिकापान करण्याविषयीं प्रसिद्धि आहे. ९ तृप्त होते. १० कृष्णागरु चंदनाच्या धुराचा लोट घराबाहेर इतका निघे की मोरांस मेघ आले असें वाटून ते नृत्य करूं लागत. ११ पडवीस S अशा आकाराचे दिलेले धिरे ज्यास संस्कृतांत वलभी ह्मणतात त्यांत अनेक पक्षी यथाक्रमानें बसत होते. १२ ज्याच्या पिसाच्यांत नेत्र आहेत; मोराच्या पिसावर जी वर्तुळ डोळ्यासारखी आकृति असते त्यास नेत्रच ह्मणतात. १३ पक्षी. १४ अर्थात् चांदणें समजून. १५ मोरांचा समुदाय. १६ सचेतन अचेतन पदार्थांनीं भरलेलें जग उत्पन्न करणारा परमेश्वर माझी सेवा पाहून संतुष्ट होवो ह्मणून त्यानें आपलें संपूर्ण कौशल्य दाखविलें. द्वारका विश्वकर्म्यानें एका रात्रींत केली हें पुराणप्रसिद्धच आहे. १७ कौशल्य ज्यांस आहे असे लोक.

देणें हरीचेंच तथा हरीतें, न अर्पितां काळ वृथा हरी तें ॥ ३५ ॥

पेरूनि लाभ अधिकाधिक घे पिकाचा
तो एक पंक्ति म्हणवे न कदापि कोचा ।
दे भूमि तें करुनि अन्न न पाणि खातो
पेरी न तींत तरि पात्र न आणिका तो ॥ ३६ ॥

उष्टीं धुतां अन्न न काय सांचे, गर्ताजळीं त्या मग वायसांचे ।
समूह धांती न कदापि जाती, त्या काकतीर्थाप्रति हंसजाती ॥ ३७ ॥

उच्छिष्ट तांटांतिल अन्न सांचे, धुतां जळीं त्या मग वायसांचे ।
समूह तें घेउनि तृप्त जाती, न पाहती ते शुकहंसजाती ॥ ३८ ॥

धनाकारणें जे पराधीन वाणी, कवी नाचविती वृथा दीनवाणी ।
अहो त्यांत अन्योन्य उच्छिष्ट सारें, कवित्वें जना वाटती तींच सारें ॥३९॥

हरिगुणअमृतें जीं वांटिलीं व्यासदेवें
शुकसम जनवृंदें तींच घेती सदैवें ।
विविध मग असे ते ग्रंथ उद्गार सांचे
सहज निघति त्यांच्या तत्पदांच्या रसाचे ॥ ४० ॥

यालागिं जे कुशळता करि विश्वकर्मा
संतुष्ट हो मज म्हणे प्रभु विश्वकर्मा ।
एवं असेल कुशलत्व नरा जयाला
तो तें समर्पण करू यदुराजयाला ॥ ४१ ॥

मुकुंदाच्या पायीं कुशळ न समर्पी कुशळता
करी आयुष्याचा व्यय कुशळता ते विषलता ।
पहा तो कौशल्यें यदुपतिकृतें वामन मनीं
तरी त्यातें अर्पी न जरि तरि विश्रामें न मनीं ॥ ४२ ॥

हरीच्या या लीला नवरसुधासार सकळा
हरीती ज्या गातां कुरस भवरोगादि सकळा ।
असो ते हे सांडी रसिक जन हे साक्षि हरि तो
अजी जे या ग्रंथीं त्रिगुण तरि नामेंच हरितो ॥ ४३ ॥

---

१ हरण करून नेईल. २ पक्का. ३ कथा. ४ खळग्यांतील पाण्यांत. ५ तेथें कावळ्यांचे समूह मात्र तृप्त होतील. ६ पोपट हंस इत्यादि थोर जातींचे पक्षी. ७ समळें. ८ श्रेष्ठ. ९ पोपटासारखे; पक्षी शुकाचार्यांसारखे. १० सदैव; उत्तम दैवानें. ११ सांग. १२ विश्व करणारा. १३ विश्रामा. १४ शृंगारादि [illegible]

न जाणे कौशल्यें किमपि परि पोटीं नियम कीं
हरीच्या या लीला हरिच रचितो चित्र-यमकीं ।
तरी सर्वां ग्रंथीं प्रतिपदहि अर्पूनि हरिला
अहंकर्तृत्वाचा अनुसृतहि संस्कार हरिला ॥ ४४ ॥

## तृतीयसर्ग.

यानंतरें नारद त्या अजाला, देखून कैसा कृतकार्य झाला ।
त्या आयका श्रीहरिच्या कथा रे, तरेच येथें जरि चित्त थारे ॥१॥
सोळासहस्रांतहि पट्टराणी, श्रीरुक्मिणी आदिरमा पुराणी ।
आठां स्त्रियांमाजिहि मुख्य दारा, जे कां न सोडी क्षण त्या उदारा॥२॥
आधीं तिच्या नारद ये गृहातें, तों घेउनी चामर दिव्य हातें ।
सेवा करी श्रीयदुनायकाची, जी भोंवती दाटणि बायकांची ॥ ३ ॥
तीसमान सखिया नर्ग मोतें, लेइल्या नवल कीं न गमो तें ।
हे विलास सकळां सदनाचे, देखतां सुरसभासद नाचे ॥ ४ ॥
रूपें गुणें वेष वयें समाना, सख्या सहस्रावधि भासमानां ।
दासी तया श्रीहरिची विभूती, समात्मता सन्मनि जेविं भूतीं ॥ ५ ॥
सदनिं त्या मुनि लंघुनि उंबरा, निघतसे अजि तों कनकांबरा ।
स्वजनदर्शनउत्सव पावला, लगबगें उडि टाकुनि धांवला ॥ ६ ॥
उडी टाकिली श्रीपलंगावरूनी, त्वरें उत्तरीयांबरा सांवरूनी ।
किरीटांकितें मस्तकें विप्रपायीं, नमी वंदिजे जो सुरेंद्रें उपायीं ॥ ७ ॥
जया वंदिजे ज्या विरिंच्यादिदासीं, जया वंदिजे भक्तवृंदीं उदासीं ।
न साध्यांश ज्या सिद्धि मुक्ति प्रदासी, परी वंदितो देव तो नारदासी ॥८॥
रमाकांत सोळासहस्रांगनांचा, पती लाभ दे त्यासि आलिंगनाचा ।
धरूनि स्वहस्तद्वयें भक्तपाणी, पलंगावरी बैसवी चक्रपाणी ॥ ९ ॥
पादोदकें जो त्रिजगास तारी, अनंतकल्याणगुणावतारी ।

---

१ मनांत. २ अनेक यमकांनीं युक्त. ३ मी कर्ता आहें असा अहंकार. ४ हरण केला. ५ स्थिर होईल. ६ चौरी. ७ गर्दी. ८ दागीने. ९ नारद. १० प्रकाशमान. ११ लोकांचे ठिकाणीं. १२ सुवर्णासारिखा पिवळा पितांबर धारण करणारा ( कृष्ण ). १३ अंगवस्त्र; खांद्यावरील वस्त्र. १४ मुकुट घातलेल्या मस्तकानें. " त्वरें टाकितो मस्तका विप्रपायीं " असाही पाठ आहे. १५ इंद्र. १६ प्रयत्नांनें. १७ ब्रह्मदेवादि दासांनीं. १८ भक्त जो नारद त्याचा हात.